
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा

काव्य

रमयूतकुमारी लाट

लेखक - आनंदी रमण



वाचले
मंजूर ता. -693

रंजन कथा


—आनंदीरमण.

हर नारायण पटवर्धन.

मोदवृत्त, छापखान्यांत छापिलें.

(प्रकाशकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.)

[किंमत १ रुपया ६ आणे.



रजपूतकुमारी

तारा.

(एक ऐतिहासिक कादंबरी.)

निश्चयाचें बळ ।

तुका ह्मणे तेंचि फळ ॥

लेखक—आनंदीरमण.

प्रकाशक—नरहर नारायण पटवर्धन.

वाई ' मोदवृत्त ' छापखान्यांत छापिलें.

(प्रकाशकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.)

किंमत १ रुपया ६ आणे.

अर्पणपत्रिका

माझे परमपूज्य

तीर्थरूप रा० वामन कृष्ण हर्षे

यांस


हे प्रथम पुष्प

आपत नम्र भावानें

अर्पण

केलें असे.

आनंदीरमण.



लेखकाचे दोन शब्द.

प्रस्तुत ऐतिहासिक कादंबरी आमचे देशबंधु श्रीकिशोरीलाल गोस्वामी यांनीं हिंदी भाषेंत लिहिलेल्या 'तारा' नामक उपन्यासावरून मराठींत आणली आहे. आतां ही मराठीमध्यें कितपत चांगली वठलीं आहे हें पाहणें वाचकांकडे आहे.

ही कादंबरी छापतांना यामध्यें खिळेवजा ठोकळ चुका झाल्या आहेत त्याबद्दल वाचकवर्ग क्षमा करतील अशी आशा आहे.

जातां जातां ज्या सच्चिदानंद परमेश्वरानें भयंकर प्लेगच्या कराल दाढेंतून प्रस्तुत ग्रंथकारास सोडवून ही अल्प कृति शेवटास नेण्यास उत्साह दिला, त्याला सविनय प्रणाम करून व माझे परमप्रिय मित्र श्रीयुत न. ना. पटवर्धन यांनीं हें पुस्तकप्रकाशनाचें काम शेवटास नेलें याबद्दल, त्यांचे आभार मानून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

कल्याण.
तारीख ७ मार्च १९०६.

आनंदीरमण.

रजपूत कुमारी.

भाग १ ला.

प्रकरण १ लें

बंधुभगिनी.

चैत्राचा महिना. त्यांतून दोन प्रहरची वेळ. आकाशांत चंडकिरण प्रखर-तेजानें प्रकाशत आहे. त्याचीं तीं प्रखर किरणें प्रत्येकास असहनीय होत आहेत. रस्त्यावर त्यामुळें फारसे लोक दिसत नाहींत. दुकान-दारांनीं आपलीं दुकानें अर्धवट लावलीं आहेत. त्यापुढेंही फारशी गर्दी दिसत नाहीं. यामुळें मनुष्याचा गलबलाही कमी वाटत आहे. जिकडे तिकडे अगदीं शांतता वाटत आहे. अमीर-उमराव, सरदार, दरकदार वगैरे श्रीमंतांच्या मंदिरांकडे जरा नजर टाका. ह्मणजे आपणांस चट्कन् दिसून येईल कीं, प्रत्येक मंदिराच्या बातायनावर वाळ्याचे पडदे सोडले आहेत व त्यांवर घरचेवर नोकर लोक शीतोदकाचें सिंचन करीत आहेत. यामुळें आंतील लोकांस जरा गारवा वाटत आहे. अशा वेळीं शाहाजहान बादशाहाच्या भव्य इमारतींत एक स्त्री आपल्या उत्तम रीतीनें शृंगारलेल्या महालांत पलंगावर बसून दोन तसबिरा अवलोकन करीत आहे. या स्त्रीचें वय फार नाहीं तरी पंचवी-शीच्या सुमाराचें आहे. रूपानेंही उत्तम दिसते आहे. तिच्या अंगावर ह्मणण्यासारखे फारसे अलंकार जरी दिसत नाहींत तरी तिच्या सौंदर्यांत कांहीं कमतरता वाटत नाहीं. पोशाख हिंदू चालीचा नसल्यामुळें तिचे कांहीं अवयव मुळींच दिसत नाहींत व आपल्याला त्याची जरूरही पण नाहीं.

ती स्त्री तसबिरी पहाण्यांत गढली आहे इतक्यांत तिच्या कानीं पुढील-प्रमाणें कांहीं शब्द पडले.

" आज इतकी उदासीन वृत्ति कां बरें चेहऱ्यावर दिसते आहे ? "

हे शब्द कानीं पडतांच तिनें जाणलें कीं, इकडे आपला भाऊ दारा येत असावा व त्यानेंच हे शब्द उच्चारले असावेत. चट्कन् हातांतील तसबिरी गादीखालीं लपवून ती उठली व दारास आणण्याकरतां पुढें गेली. तिनें त्याचा घट्टेनें जाऊन हात धरिला व ती म्हणाली, " वा ! ही प्रश्न करण्याची नवीन तऱ्हा कोठून शिकलास ? "

' मीच तुला विचारणार होतें कीं, आतांशा तूं इतका दुःखी कष्टी का असतोस ? तो उलट तूंच मला हें असें विचारतोस तेव्हां माझें विचारणें माझ्या मनांतच राहिलें कीं नाहीं ? "

हें विचारतां विचारतां जहांनारेनें त्यास पलगावर आणून बसाविले व आपणही तेथेंच जवळ बसली.

दारा जहांनारेनें तसबिरी लपविलेल्या जागेकडे वरचेवर पहात म्हणाला. "प्यारी जहानारे ! परवस्तेनें माझी स्थिती काय झाली आहे ही तुला कळल्याशिवाय कशी राहील ? मदनबाधेनें व्याकुळ झालेल्या मनुष्याची स्थिति आणि कस्तूरीचा सुगंध कांहीं केल्या लपत नाहीं. मला प्रथम सांग कीं, बादशहाची या गोष्टींत नापसंती कांहीं नाहींना ? "

" शहाजादे ! " जहांनारा घट्टेनें म्हणाली. " मी कांहीं त्यांच्याजवळ यासंबंधानें चौकशी केली नाहीं. परंतु तुला इतकें भिण्याचें काय कारण ? आम्रफल मुखांत येतांच पक्व होत नसतें. तसें कोणतेंही मोष्ट तोंडांत येतांक्षणींच होत नाहीं. थोडा धीर हा धरलाच पाहिजे ! "

" तुझें म्हणणें बरोबर आहे. अद्याप तुला मदनबाधेचा अनुभव नाहीं. कीं जिच्या योगानें माझें मन कसें अगदीं करपून चाललें आहे. मनुष्याला अनुभवाशिवाय कोणतीही गोष्ट कळत नसते. "

" उघड आहे. मला याचा अनुभव कोठून येणार ? खुदानें आह्मांसारख्या बादशहाच्या पोरींना तो अनुभव आणून दिला नाहीं ही गोष्ट खरोखर नामी केली. "

" काय आश्चर्य आहे पहा ! जिला कोणाशीं गुजगोष्टी केल्याशिवाय एक रात्रदेखील जात नाहीं ती स्त्री या बाधेचा मला अनुभव नाहीं असें साफ सांगते ! " (उघड) " तुझें बोलणें सत्य आहे. ज्याच्या कपाळीं लग्नाचे सोहाळे होण्याबद्दल एकही शब्द खुदानें लिहून ठेविला नाहीं अशा तुजसा-

स्थ्या बिचारी शहाजाद्या या फंदांत पडून त्याचा अनुभव कशाला घेतील? थोडक्यांत सांगतों कीं, आतां यावेळीं या गोष्टी राहूं देत. तुजशिवाय मला या संकटांतून सोडविणारे कोण आहे?"

"पण कायरे! तूं आपल्याला हीं अशी स्थिति कां आलीं याचा विचार कधीं केला आहेस काय? शिवाय ईदच्यां सणांत एके दिवशीं तूं कशाबद्दल कुराणावर हात ठेवून शपथ वाहिलीस हें तरी स्मरतें काय? तारेची कुंटीण होण्याबद्दल मला तूं विनंति करून जे कांहीं मजजवळ करार केलेस ते सर्व विसरलास. मी आतां त्याचा येथें मुळींच उल्लेख करीत नाहीं. परंतु इतकें खरें कीं, मला जो त्रास झाला तो. सर्व तुज—"

"बस कर. आतां त्याबद्दल मला माफी कर. तुला तोंडसुद्धां दाखविण्याची माझी योग्यता नाहीं. थोडी तरी प्रीति तुझी मजवर असेल तर माझ्याबद्दल तुला दया येऊं दे. जहांनारे! तुझ्यावर अम्मल करण्याइतकी माझी मुळींच योग्यता नाहीं. म्हणून मी हजार वेळ शपथ वाहून सांगतों. कीं, "तारेस वश करून घेण्यांत तुझें आणि माझें—"

"बस बस. यापुढें एकही शब्द ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. तूं काफर आहेस; क्रिस्तान आहेस; तूं आमच्या धर्माला मुळींच योग्य नाहींस. तुझ्या भाषणावर आतां मुळींच माझा विश्वास बसत नाहीं. आजपासून तूं कोणत्याही बाबतींत माझ्याशीं बोलत जाऊं नकोस व मीही पण शपथ वाहून सांगतें कीं—"

असें म्हणून तिनें दाराला पायानें दूर केलें. तो म्हणाला "काय! थोडीसुद्धां तुला माझी दया येत नाहीं ना?"

"तूं मला थोडेंच विचारतोस म्हणून मला तुझी दया येईल?"

'तूं मला क्रिस्तान समजत असशील; परंतु मी शपथ वाहून सांगतों कीं, माझें तुझ्या ठिकाणीं जितकें प्रेम आहे तितकें या जगांतील दुसऱ्या कोणावरही नाहीं.'

"असें जर आहे तर माझ्यापुढें तारेसंबंधीं बोलण्यास तुला यत्किंचित्सुद्धां लाज कशी वाटत नाहीं.?"

"मग यांत तुला कांहीं त्रास होत आहे?"

" मी सांगतें तें जर तूं ऐकशील तर मात्र मला त्रास होणार नाहीं. "

' सांग सांग तर काय तें. '

' आजपासून तूं कोणत्याही बाबतीसंबंधीं मला विचारूं नकोस. आतां तूं खरेपणानें जर शपथ वहाशील तर बरीक मी तारेला मिळविण्याविषयीं प्रयत्न करीन. '

' हा तर केवळ तूं मजवर जुलूम करते आहेस. '

' कारण, एकदां मला धोका बसला आहे म्हणून मी हें स्पष्ट सांगितलें आहे. '

' अशा करण्यानें तुझे अंतःकरणास धक्का पोंचेल. '

' मग तर तारेविषयीं सर्व विचारही तूं सोडून दे कसे. '

' हें तर तूं माझ्या मनाविरुद्ध करण्यास मला सांगत आहेस. '

' मग तुझ्या मनास वाटेल तें कर. मला त्यांत कांहीं विचारूं नकोस. " जहानारा थंडेनें म्हणाली.

' मला वश करण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगीं नाहीं असें मला वाटतें. '

' सर्व कांहीं आहे. पण तुला निदान मजकरितां तरी शपथ वाहिली पाहिजे. '

' हें तूं मला मोठेंच कोडें घालतेस. '

' तारा जर पाहिजे असेल तर हें काम तुला केलेंच पाहिजे. '

' नाइलाजाची गोष्ट आहे; मी शपथ वहातों पण— '

हें ऐकतांच जहांनारानें त्याचें भाषण पुरे होण्यापूर्वीच त्याच्या गळ्यांत हात घालून म्हणाली— " प्यारे शहाजादे ! बस कर. झालें तें झालें. तूं आतां हजारदां शपथा वहा. मी लाख वेळ वहातें. या जिनगीवरील आपला हक्क खात्रीनें सुटणार नाहीं. "

लागलेंच दारानें जहांनारेच्या हाताचें चुंबन घेऊन विचारलें, " खरोखर तूं मला प्रसन्न कां करीत आहेस ? खरें पाहिल्यास मी ज्या ज्या वस्तूंवर प्रेम ठेवीत आहे त्यांत तूं अग्रस्थानीं शोभतेस. पण आज तूं इतक्या प्रेमानें कसें बोलतेस ? "

' कां नाहीं बोलणार ? तुझ्यावरील माझ्या प्रेमाचा तुला पूर्ण अनुभव नाहीं कां आला ? बादशाहास मुठींत धरून ठेवण्यास मी इतका प्रयत्न कां करीत आहे ? जेव्हां तूं मुलतान आणि काबूल यांचा सुलतान झाला होतास

तेव्हां मीं तुला इकडे मुद्दाम कशाकरितां कायमचें बोलावून आणलें ? आणखी औरंगजेबास दक्षिणेचा, मुरादला गुजराथचा आणि सुजाला बंगालचा सुभेदार केलें हें तरी कशाकरितां ? केवळ तुझ्या हिताकरितां . '

' प्यारी जहांनारे ! तूं जें केलेंस तें खरोखर माझ्या हिताकरितांच केलेंस. मनापासून मी सांगतों कीं, तूं मजवर अनंत उपकार करीत आहेस कीं, न्यायोगानें मी तुझ्यापुढें तोंड वर करून बोलण्यासही मुळींच योग्य नाहीं. दैवयोगानें मी पुढें जर बादशाही तक्तावर आरूढ झालों तर तुजशिवाय माझा दुसरा कोण प्रधान आहे ? '

' आणि खरोखरच माझ्याशिवाय कोणी नाहीं. '

' अगदीं अक्षरशः खरें आहे. सर्व लोक शाहाजहानला बादशहा समजतात. पण माझें मन सुलताना जहांनारा बेगम साहिब हीस महाराणी असें मानतें. "

' इतकी खुशामत न केली तर चालणार नाहीं का ? '

" तुला खुषामत वाटत असेल. "

असें म्हणून दारा ज्या ठिकाणीं जहांनारानें तसबिरा लपविल्या होत्या तिकडे वरचेवर पहात तिला म्हणाला " या तसबिरा कसल्या आहेत ? "

' तुला याची जरूर ? '

' काय ? या मीं पाहण्यासारख्या नाहींत ? '

' नाहींत. '

' तें काय म्हणून ? '

' या जर तुला पहाण्यासारख्या असत्या तर त्या मीं लपविल्या असत्या काय ? '

' मग या अशा तसबिरा आहेत तरी कोणाच्या ? '

" माझ्या प्राणप्रियाच्या " जहानारा थट्टेनें म्हणाली, (आत्मगत) ' आश्चर्य आहे कीं नाहीं. ! मलाच काय पण बादशहासुद्धा हिच्या चारित्र्योपितत्वाचा संशय आजपर्यंत आला नाहीं. हिनें पित्यापुढें साखर पेरून अगदीं पित्याला आपलेसें केल्यामुळें सर्व लोकांनासुद्धां हिच्या वर्तनाचा संशय येत नाहीं. '

' इतका यांत विचार तो कसला करतो आहेस ? '

' तुझ्या कारस्थानाविषयीं. '

'यांत विचार तो काय करायचा आहे ? बादशहानें मजवर ताण करण्याकरितां स्नानगृहांत एक तरुण नुरुद्दीन नांवाचा गवई खोजे लोकांकडून मारविला व तसाच दुसरा नजीरखान त्याला अन्नांतून विष घालून मारिलें. तसें करण्याचा कांहीं विचार आहे वाटतें ?'

'दुष्टे ! त्याला तर तुझ्या सांगण्यावरूनच मारलेना ?' (उघड)

'थट्टा पुरे आतां. ही तसबीर खरी कोणाची आहे हें तर दाखवशील ?'

'काय म्हणून दाखवावी ?'

'केवळ मी विनति करतों म्हणून'

'एवढेंच मला पुरें आहे. ही पहा'

असें म्हणून जहांनारेनें गादीखालीं लपविलेल्या तसबिरा बाहेर काढून त्या दोन्हीं तसबिरा दाराच्या हातांत दिल्या आणि म्हणाली,

'ओळख पाहूं आतां या कोणाच्या आहेत त्या ?'

दारा मोठ्या प्रेमानें तसबिरीकडे पाहून म्हणाला 'प्यारी जहांनारे ! खरोखर या तसबिरी फारच अप्रतिम आहेत. यांत चिताऱ्यानें आपलें पूर्ण कौशल्य खर्च केलेलें स्पष्ट दिसतें आहे. अशा तऱ्हेचें चित्र निदान आपल्या कलमांतून तरी कागदावर उतरणार नाहीं.'

'पण या कोणाच्या आहेत हें तरी कळूं दे.'

'कांहीं ओळखत नाहीं बुवा !'

'नाहींना ओळखत ? मग मी सांगतें आतां.."

'सांग सांग लवकर.."

'या सुंदर तजबिरी तारेच्या आहेत.."

"काय जी माझ्या नेत्रांत रात्रंदिवस खेळते आहे त्या सुन्दरी तारेच्या या तसबिरी आहेत ? सांग सांग पाहूं या कोणत्या चिताऱ्यानें काढल्या आहेत ?'

'खुद्द मीं काढल्या आहेत.."

'मग तर तुझ्या या हाताचें अवश्य चुंबन घेतलें पाहिजे. तुझी चित्रकलेमध्यें इतकी प्रगति झाली असेल असें नव्हतें इतका वेळ मला कळलें.' (आत्मगत.) अरे ! ही प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांत धूळ टाकून सांगते

कीं ' खुद मीं काढल्या आहेत. ' या तसबिरी अशरफखानानें काढल्या आहेत हें दारा पूर्णपणें जाणत आहे असें हिला कळलें नसावेंसें वाटतें.

जहांनारा चांगली सुशिक्षित होती. तिला पारशी भाषा येत होती. कशिदा, चित्रें काढण्यांत ती चांगली तयार होती; परंतु, या दोन्ही तारेच्या तसबिरी मात्र तिनें काढल्या नव्हत्या. खरें पाहूं गेलें असतां या अशरफखानानेंच काढल्या होत्या. आणि त्या केवळ जहांनारेनें त्यास काढण्यास सांगितल्या म्हणूनच.

" कशा काय उतरल्या आहेत ? "

" फार चांगल्या ! यांतील एखादी मला मिळेल काय ? "

" त्यांपैकीं एक मिळेल. "

" आणि तूं दुसरीचें काय करणार ? "

" ती मी तारेस देणार आहें. "

" अवश्य दे. पण जी तूं तारेस देणार त्या तसविरीवर मी कांहीं लिहूं काय ? "

" पण काय लिहिणार तें प्रथम मला सांग पाहूं ? "

" तेरी सूरत मुझे भाई, मेरा जी जानता है, । तस्बीर जिसने बनाई, मेरा जी जानता है " हेंच लिहिणार.

" तस्बीर जिसने बनाई, मेराजी जानता है. " यावरून अशरफखानानें या तसबीरी काढल्या असाव्यात असें यानें जाणलें कीं काय ? " (उघड) " हं खुशाल लिही. "

आज्ञा मिळतांच दारा जवळच पडलेलें एक कलम घेऊन बशींतील रंगानें तसबिरीच्या अग्रभागीं लिहूं लागला तों इतक्यांत बाहेर कोणी हळूंच शिटी वाजविली ती ऐकतांच जहांनारेनें विचारलें ' कोण आहे ? '

हें विचारतांच बाहेरून कोणी उत्तर दिलें कीं ' आपली दीन दासी जोहरा बाहेर हजर आहे. '

जहांनारेनें तिस आंत येण्यास सांगितलें.

इतक्यांत एक तरुण दासी आंत आली आणि तिनें जहांनारेस अत्यंत

नम्रतेनें मुजरा करून हातरुमालानें आपले हात बांधून ती तिच्यापुढें उभी राहिली.

" काय झालें ? " जहांनारेनें विचारलें.

" कुवरी ताराबाईची दासी बाहेर आली आहे. ती सांगते कीं, ताराबाईच्या मनांत आज आपली भेट घ्यावयाची आहे. तर त्यांनीं केव्हां यावें असें विचारलें आहे. "

" असें काय ? तिला जाऊन सांग कीं, माझी भेट सायंकाळीं वसंतोद्यानांत होईल. तेथें तूं अवश्य ये. "

जोहरा ' आज्ञा ' असे शब्द उच्चारून जाऊं लागली. तोंच जहांनारेनें तिला थोडा वेळ थांबविलें आणि तिच्याजवळ एक चिठ्ठीवर दाराला न कळत कांहीं लिहून दिलें. ती चिठ्ठी तिनें घेतली व ती चालती झाली. इतक्या अवधींत दारानें त्या तसबिरीवर मागें सांगितलेली ओळ लिहिली व तो जहांनारेस म्हणाला " खरोखर माझें दैव आज फुललें. पण मी तुला एक विचारतों—"

(मध्येंच थट्टेनें) " मी लपून तारेला पाहूं काय ? हेंच कीं नाहीं ? "

" होय तेंच. पण तूं जर मजवर प्रसन्न होऊन तसें करण्यास परवानगी देशील तर माझी इच्छा सफल होईल. "

" कांहीं हरकत नाहीं. तूं तारा आल्यावर थोड्या वेळानें वसंतोद्यानांतील वरच्या मजल्यांत आम्ही जेथें बसूं तेथें आड तूं उभा रहा म्हणजे तिचें दर्शन होईल. पण जर कां तेथें फार वेळ उभा रहाशील तर बरीक तें माझ्या पसंतीला येणार नाहीं. "

दारानें तें तिचें म्हणणें कबूल केलें व तेथून तो निघून गेला.

प्रकरण २ रें.

दोन मैत्रिणी.

सायंकाळचा समय. अखिल विश्वाला सौभाग्य देऊन कमलपुष्पांना प्रफुल्लित करणारा भगवान् आदित्यराज नुकताच कोठें पश्चिमपर्वतांवर उतरला आहे. विहंगगण वृक्षांवर बसून किल् किल् किल् किल् असा मधुर शब्द काढीत आहे. यमुनेच्या निर्मल जलामध्यें आकाशांतील आरक्त मेघांचें प्रतिबिंब पडलेलें आहे. तें आज फारच मनोहर दिसत आहे. अशावेळीं जहांनारा आपल्या यमुनेच्या मध्यभागीं असलेल्या सुंदरशा संगमरवरी दगडानें बांधलेल्या वसंतमंदिरांत एका महालाच्या वातायनांतून यमुना नदीच्या काठची नैसर्गिक सृष्टिशोभा अवलोकन करीत बसली होती. इतक्यांत एका दासीनें तिला येऊन सांगितलें कीं, ' बाहेर ताराबाई आल्या आहेत. '

दासीनें ताराबाई आल्याची बातमी देतांच जहांनारा तिच्याकडे वळून म्हणाली ' जा, तिला आंत घेऊन ये. ' दासी चटकन् बाहेर गेली व कांहीं वेळानें तारेसह आंत आली. तारा आलेली पहातांच हंसत हंसत तिच्याजवळ जाऊन जहांनारेनें तिचा हात धरून तिला पलंगावर बसविलें व आपणही तिच्या शेजारींच बसली. तिनें तिला प्रश्न केला ' कां ताराबाई! आज इकडे कोणीकडे चंद्रोदय झाला ? '

' आपल्या इकडेच. ' तारेनें उत्तर दिलें.

' तें मला सुद्धां कळतें आहे. पण किती दिवसांनीं झाला, असा माझ्या विचारण्याचा भावार्थ. '

' खालीनें कांहीं सांगतां येणार नाहीं. मध्यंतरीं दोन तीन वेळां आपल्याकडे यावें असें माझ्या मनांत फार होतें; परंतु एकाएकीं माताजी आणि पिताजी फार आजारी पडल्यामुळें नाइलाजास्तव मला इकडे येतां आलें नाहीं, याबद्दल माफी असावी. मजवर आपण प्रसन्न होऊन मोठ्या प्रेमानें इकडे बोलावून आणतां, हे मजवर केवढे आपले उपकार आहेत— '

' इतकें मजबरोबर अदबीनें वागण्याची कांहीं जरूर नाहीं ' आपण '

या विशेषणानेंही पण मला संबोधण्याचें कांहीं कारण नाहीं. आजपासून तूं मला मैत्रिणीप्रमाणें समजून मजशीं बोलत जा. '

' बाईसाहेब, आपण काय बोलतां हें ! आपला दर्जा कोणीकडे, आणि माझा कोणीकडे. मी जर आपल्यास एकेरी शब्दानें बोलेन तर हें शोभेल काय ? '

' शोभणार नाहीं हें जरी खरें आहे तरी पण तूं माझ्याशीं तशा प्रकारेंच वागलें पाहिजे. या ठिकाणीं श्रीमंती आणि गरिबी असा भाव कांहीं ठेवण्याचें कारण नाहीं. तुझ्यांत आणि माझ्यांत कांहीं अंतर नाहीं, असें नित्य समजून माझ्याशीं वागत जा. '

' एका हलक्या स्त्रीशीं आपण निर्मल स्नेहभावानें वागतां तेव्हां आपली स्तुति करावी तितकी थोडीच आहे. परमेश्वर आपणांस सुखी ठेवो ! '

' पुन्हां ' आपण आपण ' करतेंसच. '

' एकाएकीं विनय कसा बरें सुटेल. ? '

' तो सुटल्याशिवाय पुढें भाषणच करावयाचें नाहीं. '

' मर्जी '

' आतांशीं तूं पारशी भाषेचा अभ्यास करीत नाहींस वाटतं ? '

' नाहीं, आतां मी संस्कृतचा अभ्यास करीत असतें. कधीं कधीं परशियन ग्रंथही वाचतें. '

' मला सुद्धां संस्कृत शिकावें, अशी फार फार इच्छा आहे; पण शिकवणार कोण ? संस्कृत भाषा फारच चांगली आहे असें म्हणतात हें खरें कां ? '

' खरोखरच चांगली आहे; सर्व जगांत तिचाच चांगलेंपणांत पहिला नंबर यईल. कोणी जर शिकेल तर खात्रीनें त्याला परशियन भाषा निःसत्व वाटेल. मला वाटतें, संस्कृत कांहीं ग्रंथांचें परशियनमध्यें भाषांतर झालें असावें. '

' होय. ज्याला परशियन आणि संस्कृत या दोन्ही भाषा येत असतील अशा गृहस्थास त्यांत फार गम्मत वाटते असें लोक म्हणतात. बरें पण सध्यां तूं सस्कृत ग्रंथ तरी कोणते वाचीत असतेस ? '

' महाकवि कालिदासकृत ' रघुवंश ' व भारविकृत 'किरातार्जुनीय,' वगैरे काव्यें मी वाचीत असतें. '

या काव्यांचीं नांवें तरी आजच मी तुझ्या तोंडून ऐकतें आहे. मला तुमच्यामधील वाल्मीकीरामायण हाच एक ग्रंथ माहीत आहे. त्याचें परशियनमध्यें भाषांतर केलें आहे तें मी नियवाचतें. खरोखर भाषांतरांत इतकी गोडी आहे तर मग खऱ्यांत किती बरें असेल ! '

' वाचल्याशिवाय काय कळणार ? असेंच कांहीं आमच्या भाषेमध्यें ग्रंथ आहेत कीं, ते माताजी वाचीत असतां मी सर्व काम सोडून ते एकाग्रचित्तानें ऐकत असतें. '

' आणखी गाण्यासंबंधानें काय हालहवाल आहे सांग पाहूं. '

' कधीं कधीं तें शिकत असतें; परतु म्हणण्यासारखी त्यांत मला गोडी वाटत नाहीं. '

' हें तर मी पूर्वीपासून जाणतेंच आहे. एकूण माझ्यासारखीच तुझी स्थिति आहे म्हणायची. कांहीं चित्रकलेंत प्रगति झाली आहे काय ?

' कांहीं पहिल्यापेक्षां झाली आहे. '

' कोणाच्या तसबिरा काढल्या आहेत ? '

' माताजीची व पिताजींची काढली आहे. शिवाय इतर देवादिकांच्या पुष्कळ काढल्या आहेत. तुझी सुद्धां काढली आहे. ही पहा. '

असें म्हणून ताराबाईनें आपल्या रंभेस हाक मारिली. रंभा जवळच होती. तिच्याकडून तिनें जहांनारेची उत्तम रंगविलेली तसबीर तिच्या हातांतून घेऊन ती जहांनारेस दिली. जहांनारेनें तिच्या हातची तसबीर घेऊन तीकडे पहात ती म्हणाली ' काय ! या तुझ्या नाजूक हातानें तूं ही तसबीर रंगविलीस ? '

' होय '

' तूं हें चित्र काढून एखाद्या खऱ्या कसलेल्या चित्रकाऱ्यास सुद्धां मागें टाकलेंस. ही तसबीर आपल्या जवळ ठेवून मीं काढलेली तुझी तसबीर तुला नजर करतें ' असें म्हणून जहांनारेनें आम्हीं मागें ज्या तसबीरीचा उल्लेख केला आहे ती तसबीर आपल्या चोळींतून काढून तीस दिली. यावेळीं त्या तसबिरीच्या पृष्ठभागावर दारानें कांहीं लिहिलें होतें. तें फारसें कोणाच्या नजरेस येत नव्हतें. तारा ती तसबीर आपल्या हातांत घेऊन थट्टेनें तिला म्हणाली—

' काय म्हणतां ? ही माझी तसबीर आहे ? आणि ती आपण काढलीत ?

ही तसबीर काढण्यांत आपल्याला बराच त्रास सोसावा लागला असेल ! '

' पुन्हां वरचेवर ' आपण ' ' आपण ' करायला लागलीसच '

' चुकलें याबद्दल माफी असावी. खरेंच सांग, ही तसबीर तूंच काढलीस ? '

' यांत तुला आश्चर्य तें काय वाटतें ? '

' छे छे ! आश्चर्य वाटण्याचें काय कारण ? विचारण्याचा भावार्थ इतकाच कीं, मजपेक्षां आपण अधिक श्रम सोसून ही तसबीर बनविली आहे, त्यामुळें ही फारच सुबक दिसत आहे. आपल्या अंगीं इतकी उत्तम कला असेल असें आजपर्यंत मला नव्हतें वाटलें. '

' पुन्हां आपण '—

इतक्यांत जोहरा आंत आली व तिनें जहांनारेस एक पत्र दिलें. तें वाचून पाहून जहांनारा तारेला विनोदानें म्हणाली. ' ह्या गोष्टी आतां राहूं देत. पण आतां खरेंच सांग, तुझें मन कोणावर बसलें आहे ? '

हें ऐकून तारा जरा लाजून अधोवदन झाली. हें पाहून जहांनारा तिची मान वर करून म्हणाली ' यांत काय बाई लाजायचें ? त्यांतून मेल्ली मजजवळ लाज ! तुझें मन कोणा एका तरुणावर गेलें आहे, असें मीं आजच ऐकलें.. खरें कां तें ? '

' तुझ्यासारख्या स्वर्गीय सुकुमार सुंदरीच्या निर्मल प्रेमाला पात्र होणारा परम भाग्यवान् प्राणी तरी या भूतलावर कोण आहे, हें मला ऐकण्याची फार उत्कंठा लागली आहे. सांग सांग लवकर. '

यावर तारा स्वस्थ बसली. पुन्हां जहानारेनें तिला विचारलें–'सांग, सांग, लवकर. दाराशिकोहावर तुझें प्रेम बसलें आहे असें '—

' छे, छे, आपला समज चुकीचा आहे. भलतेंच कोणी तरी आपल्या मनांत भरवून दिलें असावें ' तारा मध्येंच म्हणाली.

' एकूण मी ऐकतें तें सर्व खोटेंच तर ? '

' अगदीं अक्षरशः खोटें आहे असें समजा. मी तर दाराशिकोहास आपल्या बंधुप्रमाणें समजत असतें. '

हें ऐकतांच जहांनारा मनामध्यें थोडी कचरली. पुन्हां ती म्हणाली—

' दारा तुजवर फिदा झाला आहे असेंही मीं ऐकलें आहे. जो आप-

ल्यावर फिदा झाला त्यावर आपण होणें यांत कांहीं मोठेंसें वावगें नाहीं. '

हें एकतांच तारेचे नेत्र पाण्यानें भरून आले. ती ह्मणते—' मी त्याला आपल्या थोरल्या भावाप्रमाणें खरोखर समजत आहें– '

' मग त्यांत काय मोठेंसें ? ' जहांनारा धट्टनें ह्मणाली, ' आमच्या लोकांत नित्य भाऊबहिणींचीं लग्नें होत असतात. '

' पण माझा दुसरीकडे विवाह होण्याचें ठरलें आहे. यापूर्वी जर मला आपला मतलब कळला असता तर मी कदाचित् त्याला मान दिला असता. एकदां एकाशीं विवाह व्हायचा असें ठरल्यावर दुसऱ्याशीं लग्न लावण्यापेक्षां आह्मी रजपूत कुमारी स्वतःचा देह जाणें उत्तम समजतों. '

' काय ही भिकार चाल तुमच्या हिंदु लोकांत पडून गेली आहे कोण जाणें ! शहाजादा किंवा बादशहा यांनीं एकदां एखादी स्त्री दृष्टीनें पाहिली आणि ती त्यांच्या मनांत भरली तर ते तिला हरप्रयत्नानें आपल्या महालांत नेल्यावांचून रहात नाहींत हे तुला माहीत आहे काय ? '

' मला तरी त्याचीच भीति पडली आहे. काय परमेश्वर करील तें पहावें आहे. आपल्या पित्यांनीं जर माझ्या पिताजीस दाराचा पक्षपात घेऊन तारेस दारालाच दिली पाहिजे असें जर सांगितलें तर तें त्यांना सुद्धां पसंत पडणार नाहीं. '

" पण असें तुला वाटतें कां कीं बादशाहा तुझ्या पित्यास त्याच्या मनाविरुद्ध कांहीं करायला सांगेल ? '

' बरें. यदाकदाचित् नच सांगितलें तर दारा स्वस्थ बसणार नाहीं ! '

' जें होईल तें होवो. पण मी तुला सांगून ठेवतें कीं, बादशहानें जर त्याला कांहीं सांगितलें तर तो तें ऐकेल. '

' काय, आपण हें खरेंच ह्मणतां कीं केवळ माझें तोंडापुरतें ? '

' माझ्या भाषणावर तसा तुझा भरंवसा बसणार नाहीं. मी कुराणावर हात ठेवून सांगतें, कीं होतां होईल तितका तुझा संबंध दाराशीं लावूं देणार नाहीं. मग तर झालें ना ? '

' परमेश्वर आपलें बोलणें खरें करो ! पण आपण आज दाराच्या विरुद्ध काय ह्मणून ? '

' त्याचेंही कारण सांगतें ऐक. आह्मी जातीनें खरे मुसलमान लोक

आहोंत आणि दारा सध्यां आमच्या धर्मापासून भ्रष्ट झाला आहे. त्यानें हिंदु-लोकांच्या वेदोपनिषदाचीं भाषांतरें परशियनमध्यें करविलीं आहेत आणि तो त्याप्रमाणें वागतही आहे. तरी यांवर तूं जाऊं नकोस. हें त्याचें करणें केवळ हिंदु लोकांना फसवून त्यांच्या धडधडीत डोळ्यांत धूळ टाकण्याकरितां आहे. मुसलमानी धर्म सोडून आतां त्यानें क्रिस्थानी धर्म स्वीकारला आहे. तेव्हां असल्या स्वेच्छाचारी, धर्मभ्रष्टाच्या संगतींत वागण्यांत काय बरें अर्थ आहे ? '

' पण दारा या गादीला हक्कदार आहेना ? ईश्वरी इच्छा सुद्धां त्यानेंच बादशहाचें बरें वाईट झाल्यावर गादीवर बसावें—'

' असें तर दिसतें आहे खरें. मर्जी खुदाची ! '

' मी ऐकतें कीं, आपण तर त्याची मदतदारीण आहां आणि आपलीही इच्छा त्यानेंच गादीवर बसावें अशी आहे. '

' हें तुला सांगितलें तरी कोणी ? मी जातीनें खरी मुसलमानीण असतां त्या काफराला काय म्हणून या कामीं मदत करीन ?

मी त्याच्या तर्फेची आहें हें तूं जाणतेस तरी कशावरून ? मी जर त्याच्या बाजूची झालें तर मग तूं त्याच्या हातून सुटशील तरी कशी ? आणि मग तूं सुटावेंस अशी इच्छा धरून मी त्यांत आपलें मन तरी काय म्हणून घालावें ? तुझा हा सर्व कल्पनेचा खेळ आहे. '

' असेल. नाहीं तरी म्हणावें कोणीं ? '

' तूं यापुढें अगदीं निश्चिंत राहून ज्याच्या बरोबर तुझा विवाह होण्याचें ठरलें आहे त्याबरोबर लौकर लाव. '

' बरें तर. आतां बराच वेळ झाला आहे. कांहीं आज्ञा—'

' पण आतां यापुढें तूं मला केव्हां भेटणार तें सांग पाहूं ? '

' आपली इच्छा होईल तेव्हां मी आपल्यापुढें लागलींच हजर होईन. बरें आपण ही तयार केलेली तसवीर मीं घेऊं का ? "

' खुशाल घे. ही तरी मीं तुला देण्याकरितांच तयार केली आहे. माझी

---

१ दाराची त्याचेळचीं हिन्दुधर्माविषयीं भक्ति पाहून सर्व लोक म्हणत कीं हा जर गादीवर बसेल तर खात्रीनें आम्हांस अकबराचा विसर पडेल.

आठवण म्हणून ही मी तुला देत आहें. जेथें तूं असशील तेथें माझें स्मरण होईल ना पण तुला ? '

असें म्हणून जहांनारेनें ती तसवीर तारेच्या हातीं दिली. त्यावर तारा म्हणाली ' हें काय बाई, मी आपल्याला अगदींच कशी विसरेन ?— '

' बरें तें राहो.' जहांनारा म्हणाली. ' पण शेवटीं तूं कोणत्या सत्पुरुषास आपल्या हृदयामध्यें प्रेमस्थान दिलें आहेस हे कांहीं सांगितलें नाहींस ? '

' ज्या मेवाडच्या महाराण्याच्या मदतीनें आपल्या पिताजीनें हें दिल्लीचें राज्य पाहिलें त्या भाग्यवान् पुरुषाचा पुत्र रा—

' काय काय ! राणा जगत्सिंहाच्या राजसिंहनामक पुत्राला तूं आपल्या हृदयमंदिरांत ठेविलें आहेस ? आणि त्याच्याबरोबर तुझा विवाहही होण्याचें खास ठरलें आहे ? '

' होय बाईसाहेब. '

' खरोखर हें ऐकून मला मनापासून आनंद होत आहे. ही गोष्ट घडून आली तर सोन्यापेक्षां पिवळें होईल असें मी समजेन. तूं आतां मेवाडच्या कट्टया रजपुताची राणी होणार. खरोखर तूं धन्य आहेस. पण लक्ष्यांत ठेव कीं, ज्याप्रमाणें जगत्सिंहानें बादशहास संकटकालीं मदत केली तद्वत् तुझ्या पतीनेंही पुढें आपल्या पित्याचें अनुकरण करावें असें कर. '

' अवश्य करीन; पण आपल्या इकडल्या लोकांनीं त्यांच्याशीं नेहमीं मित्रत्वानें वागलें पाहिजे. '

' बरें, त्याचा विचार पुढें करतां येईल. पण कायग, अमरसिंह तुझा विवाह राजसिंहाशीं करण्याकरितां तुला तिकडे घेऊन जाणार किंवा राजसिंहाला इकडे अग्रयामध्यें आणणार ? '

' यासंबंधानें अद्याप मला कांहींच कळलें नाहीं. '

तारेनें जहांनारेस असें उत्तर दिलें खरें. परंतु, आह्मी खात्रीनें सांगतों कीं, तारेला यासंबंधाची सर्व माहिती होती. तिनें मुद्दाम जहांनारेस तसें सांगितलें. मग तें काय म्हणून सांगितलें याचा विचार पुढें करण्यांत येईल.

यावर जहांनारा व तारा यांचें बरेंच भाषण झालें तें विशेष महत्वाचें नसल्यामुळें येथें देण्याची आह्मी तसदी घेत नाहीं. नंतर तारेला थोडा वेळ

बसवून एका गायिकेचें गाणें ऐकविलें. नंतर तारा तिचा रजा घेऊन आपल्या घरीं गेली.

याठिकाणीं आह्मांस या गोष्टीचा अवश्य उलगडा केला पाहिजे कीं दारानें मागें तारेच्या तसबिरीवर कांहीं लिहिलें होतें, तें जहांनारेनें जेव्हां तारेस ती तसबीर दिली त्यावेळीं त्यावर नव्हतें. तें काय झालें ? ज्यावेळीं जहांनारा 'वसंतोद्यानांत भेट घेण्याकरितां गेली त्यावेळीं तिनें त्यावर कांहीं रंगाचा प्रयोग करून तें घालविलें होतें.

प्रकरण ३ रें

प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला.

प्रहर रात्र उलटून गेली होती. हवेंत अत्यंत उष्मा असल्यामुळें शरीराचा दाह होत होता. त्यामुळें निद्रादेवीचा पूर्ण अम्मल या सकल विश्वांतील असंख्य जीवमात्रांवर बसेना. अशा समयीं दारा आपल्या महालांत पलंगावर निद्रादेवी आपल्याला केव्हां माळ घालते आहे आणि आपण तिला एकदां केव्हां वश होतों आहों याची चिंता करीत या कुशीवरून त्या कुशीवर व त्या कुशीवरून या कुशीवर होत होता. निद्रादेवी तरी कसली वस्ताद ! तिला यावेळीं मोठा मान चढला होता. ती कांहीं केल्या दारास आपलें कृष्णमुख दाखविना ! दाखविणार कशी ? दारानें तर एका रजपूत कुमारीस आपल्या हृदयमंदिरांत प्रेमानें बसवून तिला सवत च करून ठेवली होती ! बोलून चालून स्त्रियाच त्या. त्यांना एकमेकींचा सहवास सहन होणार कसा ? दाराचें मात्र यावेळीं फार हाल झाले. आपल्यापुढें सारखी मूर्तिमंत रजपूत कुमारी उभी आहे असें त्याला वाटे व कित्येक वेळां तो खरोखरच रजपूत कुमारी आपल्याजवळ उभी आहे असें समजून तिला आलिंगन देण्यास उठे व एकदम कुमारी ह्मणून पलंगाच्या पायासच दोन्ही हातांनीं आंवळून धरी. बोलून चालून ते पुरुष ! मग त्यांना असला दाराचा लघळपणा कोठून बरें सहन होणार ? ते त्याला त्याबद्दल चांगलेंच प्रायश्चित्त देण्यास मागेंपुढें पहात नसत ! असो.

दारानें निद्रा येण्याचे पुष्कळ उपाय केले पण व्यर्थ. शेवटीं तिचा नाद सोडून देऊन त्यानें गादीखालीं ठेविलेली तारेची तसबीर हातांत घेतली व जवळ प्रकाशत असलेल्या शामदानाच्या तेजांत ती तसबीर तो अनन्यभावानें पाहूं लागला. यावेळीं जवळच नुरुल्हक दाराचे सर्व चाळे अवलोकन करीत स्वस्थ बसला होता. दाराची स्थिति काय झाली आहे हें त्याला माहात होतें. थोड्या वेळानें दारा आत्मगत त्या तसबिरींतील मूर्तीला उद्देशून म्हणाला ' हे सुकुमारसुंदरि ! तुझ्यामुळें माझी काय ही दशा झाली आहे ! हा अदय मदन तर रात्रंदिवस मला पीडा देतो आहे. त्यामुळें माझे जे कांहीं हाल होताहेत ते तुला काय सांगूं ! कांहीं तरी या दीनाची तुला दया येऊं दें ! ' हें म्हणत असतां एकदम त्याच्या नेत्रांतून दोन बाष्पबिंदु त्या तसबिरीवर गळाले. ते त्या नुरुल्हकनें पहातांच तो दाराला म्हणतो ' महाराज, इतकें ऐश्वर्य असून आज आपण दुःखीकष्टी होऊन अश्रुपात कां बरें करितां ? आज आपल्याला कमी काय आहे म्हणून आपण त्याकरितां या मार्गाचें अवलंबन केलेंत ? '

' नूर ! काय सांगूं तुला, माझी स्थिति आज अशी कां होत आहे तें. '

' जहांपनाह ! मला वाटतें आपलें मन ताराबाईवर— '

' अरे पण तूं एकदम हें कशावरून जाणलेंस ? '

' महाराज, मदनबाधा कोठें छपून राहिली आहे ? '

' म्हणतोस तें कांहीं खोटें नाहीं; परंतु आतां याला उपाय काय ? '

' उपाय हजारों आहेत. आपण सांगण्याचाच अवकाश. हिंदुस्थानांतीलच काय पण परिस्तानांतील सुद्धां एकुण एक स्त्रिया आपल्या सेवेला आणून सादर करण्याचें मला आज सामर्थ्य आहे. '

' काय, त्यांच्यावर जबरदस्ती करूनच त्यांना तूं आणणार कीं नाहीं ? छे ! छे ! ! असें करणें बिलकुल मला पसंत नाहीं. तुला ठाऊक आहेच कीं मला नित्य बादशहा काफराप्रमाणें समजत असतो. आणि कित्येक दुस्मान माझ्या विरुद्ध कांहीं तरी त्यांना सांगून मजविषयीं त्यांचें मन अधिक कलुषित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. शिवाय माझे बंधु दूर दूर राहून माझ्याविरुद्ध काय काय षड्यंत्रें रचताहेत ! अशी जर स्थिति आहे तर असें करणें योग्य वाटतें कां तुला ? '

' आपल्याला यांत मुळींच भिण्याचें कारण नाहीं '.

' शिवाय बादशहाचें प्रेम हिंद लोकांवर विशेष आहे. ते नित्य म्हणत असतात कीं जोंपर्यंत हिंदू दुःखीकष्टी नाहींत तोंपर्यंतच ही बादशाही. जर का आपण या हिंदूंस त्रास देण्याचा प्रयत्न करूं तर एका घटकेचा अवकाश कीं बादशाही जळून खाक झाली म्हणून समजा ! याकरतां ते त्यांना प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. '

' महाराज, हें जरी खरें आहे तरी हे बेवकूब हिंदु लोक बादशहाला प्रसन्न करून घेण्याचा कधींही प्रयत्न करीत नाहींत. बादशहास एखादी रजपूत कन्या पसंत पडली तर त्यास अवश्य त्यांनीं आणून द्यावी. परंतु हे नीच बादशाहास आपल्या कन्या देऊन तितकी सहिष्णुता दाखवीत नाहींत. यांत हलकटपणा आहे असें ते समजतात, तेव्हां त्यांना मूर्ख न म्हणावें तर काय म्हणावें ? मला वाटतें या हिंदु लोकांशीं रोटीबटीव्यवहार जर झाला नाहीं तर बादशाही कधींही स्थाईक रहाणार नाहीं. '

' ज्या वेळीं मला बादशाही प्राप्त होईल त्यावेळीं याचा विचार करतां येईल. आज येथें विनाकारण काथ्याकूट करीत बसण्यांत काय अर्थ आहे ? प्रथम मला ती रजपूत कन्या प्राप्त करून घेण्याकरितां एखादा रामबाण उपाय तुजजवळ असला तर सांग कसा ! '

' आहे उपाय पण— '

' पण, पण, काय ? काय असेल तो चटकन् सांगून टाक. '

' आपण जर नित्य एखाद्या चतुर कुंटिणीकडून तऱ्हेतऱ्हेचे मौल्यवान् जिन्नस आपल्या प्रियकरणीस नजराणा म्हणून पाठवाल आणि त्या कुंटिणीचे या कामीं ऐकाल तर ती आपल्याला हरप्रयत्नानें तारा मिळवून देईल '.

' युक्ति तर चांगली आहे. परंतु ती कुंटीण जर मजवर एखादे वेळीं उलटून माझ्यासंबंधीं सर्व गोष्टी बादशहास सांगण्यास तयार झाली तर मग कसें होईल ? एक वेळ मला मदनव्यथा तारेची प्राप्ति करून घेण्यास प्रवृत्त हो म्हणून सांगते व दुसऱ्या वेळीं बादशहाची भीति हा तूं नाद सोडून द्यावास अशी सूचना करते, यामुळें मला खरें तरी काय करावें हेंच कळेना. एकदां वाटतें ती आपणास वश झाली तर बरी, नाहीं तर आपले प्रयत्न व्यर्थ जाऊन लोकांत हंसें मात्र होईल. '

' आपल्याला इतकी बादशहाची भीति धरण्याचें काय कारण ? '

'ते या कामीं मदत करणार नाहींत म्हणून.'

'हें पहा. अकबराच्या मनांत पुष्कळ होतें कीं नूरजहान जहांगीराची बेगम न व्हावी म्हणून. त्यानें तिचें लग्न सुद्धां एका अफगानखानाशीं लावून दिलें व त्याला बंगालबहारमध्यें पाठवून दिलें. परंतु शेवटीं जहांगीरानें अकबराच्या मृत्यूनंतर त्याला मारून नूरजहानला आपली बेगम केली. यावेळीं त्याला कोणी—'

'गाढवा! तिचें प्रेम जहांगीरावर पूर्ण होतें म्हणून त्यांना ही गोष्ट घडवून आणण्यास त्रास पडला नाहीं. परंतु या ठिकाणीं मला तारा मुळींच विचारीत नाहीं. नूरजहानचे मनांत बेगम व्हावयाचें होतें. आणि तारेच्या मनांत आजपर्यंत ज्या रजपूत घराण्यानें मुसलमानापुढें आपल्या माना वांकविल्या नाहींत अशा प्रकारच्या उच्च घराण्यांतील शूर पुरुषाची पत्नी होण्याचें आहे. तेव्हां आतां तिला आपली पत्नी करून घेण्याची इच्छा करणें म्हणजे पंगूनें हिमालयपर्वतावर चढण्याच्या तयारीला लागणें नव्हे काय!'

'ताराबाईचा विवाह कोणाबरोबर होणार आहे?'

'ज्याच्या मदतीनें पित्याला हें राज्य दृष्टीं पडलें व आजपर्यंत ज्याच्यामुळें त्याचें 'शहाजहान' नांव कायम राहिलें आहे व ज्याच्यापुढें तो मान वर करून जास्त कमी कांहीं बोलत नाहीं त्या मेवाडच्या जगत्सिंह महाराजाच्या पुत्राशीं. त्याचें नांव राजसिंह असें आहे.'

"'असें जर आहे तर तिचें लग्न त्याच्याशीं होणें इष्ट नाहीं.'

'मलाही तसेंच वाटतें आहे पण उपयोग काय?'

'आपण त्याची पर्वा मुळींच बाळगूं नका. तिचा विवाह दोन प्रकारांनीं होण्याचा संभव आहे. एक अमरसिंह तारेला जगत्सिंहाच्या राज्यांत घेऊन जाऊन तेथें तिचें लग्न लावील किंवा त्यालाच इकडे आणील. जगत्सिंह जर इकडे येतो आहे असें आपणांस कळलें तर त्याला आपण रस्त्यानें येतांना मध्येंच स्वर्गाची वाट दाखवूं. कां उपाय नामी आहे कीं नाहीं? अशा रीतीनें आपल्या हातीं तारा येईलच व यदाकदाचित् तसें झालें नाहीं तर अमरसिंह आपली तारा तिकडे उदयपुरास घेऊन जाईल. तेव्हां आपण तो जात असतांना घाटांत त्याला मारेकऱ्यांकडून ठार मारवूं आणि तिला इकडे पळवून आणूं. म्हणजे झालें.

ही गोष्ट आपल्या मनाप्रमाणें होऊन शिवाय बादशाहासहि याचा मागमूस लागणार नाहीं. यदाकदाचित् लागलाच तर मग पुढें पहातां येईल. '

' चल ही तुझी सूचना मुळींच मला पसंत नाहीं. बेवकूफ ! तुला एवढें कसें कळत नाहीं कीं राणा जगात्सिंह इकडे येतांना पायदळ किंवा लढवय्ये लोक घेतल्याशिवाय येईल. त्याला अगदींच कां मुसलमानांची भीति नाहीं ! ते केव्हां उलटतील हें तो पूर्ण जाणून आहे. तो इकडे येईल तर खात्रीनें मजबूत रीतीनें येईल. तेव्हां त्याच्यावर छापा घालून हें काम करणें मुळींच शक्य नाहीं. आतां यदाकदाचित् खुद्द अमरसिंहासच तिकडे तारेस घेऊन जायला लावील तर मात्र आपलें संधान साधेल. '

' महाराज, आणखी आपणास कांहीं सांगावयाचें आहे. आज्ञा मिळेल तर सांगतों '.

' खुशाल सांग. '

' सलावतखान सुद्धां ज्यारीनें ताराबाईच्या प्राप्तीविषयीं खटपट करीत आहे. आपणास हें कदाचित् कळलें असेलच. '

हें ऐकतांच दारा तक्तयाला मागें सारून रागानें म्हणाला. कांय— तूं म्हणतोस तें खरें आहे ? बरें, यदाकदाचित हें जरी खरें ठरलें तरी त्याला या कामीं मुळींच यश येणार नाहीं. '

' आपण म्हणतां तें जरी खरें आहे तरी पण स्वस्थ बसाल तर मात्र आपलेही कदाचित् हेतु विफल होण्याचा संभव आहे- '

' रास्त आहे. आतां मला तुझ्या म्हणण्याचा भावार्थ समजला. तुझी इच्छा ही कीं आपण अलग राहून सलावतखानाला तारा न मिळेल अशी खटपट करावी. व असें करण्यांत आपण तारेच्या लाभाकरितां खटपट करतों आहों असें बादशाहास न कळतां आपलेंही काम साधेल. '

' हांहां, आपण म्हणतां तीच माझी इच्छा आहे. '

इतक्यांत दाराचा परम प्रिय गुलाम अब्दारखान तेथें आला. त्याला पहातांच नूरुल्लहक चटकन् दारास मुजरा करून चालता झाला. तो गेला असें पाहून अब्दरखान दाराजवळ येऊन आदबीनें मुजरा करून म्हणाला ' महाराज, आपल्या हुकुमाप्रमाणें काम तर अगदीं बेमालुम झालें. नुरुद्दीनला साप चावला असा बाणा करून पुरून सुद्धां टाकलें. आतां सर्वत्र असें झालें आहे कीं नुरुद्दीन साप चावून मेला ! '

हें ऐकतांच दारास मोठा आनंद झाला. त्यानें त्याला प्रसन्न होऊन एक मोहरांनीं भरलेली पिशवी इनाम दिली. ती अव्वारखानानें मोठ्या आदबीनें घेऊन दारास लवून सलाम केला. नंतर दारानें त्यास सांगितलें कीं ' यावेळीं सलावतखानास असेल तसा बोलावून घेऊन ' वसंतमंदिरांत ' घेऊन ये. '

' आज्ञा ' असें म्हणून अव्वारखा निघून गेला.

* * *

मागें जहानारा आणि जोहरा यांच्यामध्यें जो पत्रव्यवहार झाला तो कशा प्रकारचा होता हें आम्हांस वाचकांना अवश्य सांगितलें पाहिजे. जहांनारेच्या पत्रांत ' ज्यावेळीं दारा इकडे येईल त्यावेळीं मला वसंतोद्यानांत अवश्य कळविण्यास ये आणि नूरुद्दीन यास असें सांग कीं दाराचें मन तुजविषयीं कलुषित झालें आहे, तर तूं त्याला पहातांच अग्र्यामध्यें पळून जा '. यावर जोहरानें आपल्या पत्रांत कळविलें कीं आपल्या पत्राप्रमाणें नूरुद्दीनास सावध राहाण्याकरितां तिकडे एक खोजा पाठविला आहे. आतां वाचकांना माहीत आहेच कीं जोहराचें पत्र पोंचल्यावर जहानारेनें तारेशीं लग्नासंबंधानें चौकशी बरीच केली. जहानारेनें नूरुद्दीनकरितां आपल्याकडून पुष्कळ प्रयत्न केला परंतु बिचारा शेवटीं मेला तो मेलाच !

प्रकरण ४ थें.

प्रतिस्पर्ध्याची भेट.

दारा आपल्या महालांतून अव्वारखानास सलावतखानाकडे पाठविल्यानंतर कांहीं वेळानें वसंतमंदिरांत येऊन सलावतखानाची बराच वेळ वाट पहात बसला. इतक्यांत सलावतखानही तेथें आला. त्यानें महालांत येतांच मोठ्या आदबीनें दारास मुजरा केला. दारानें त्याचा मुजरा घेऊन त्याला जवळच्या खुर्चीवर बसण्यास सांगितलें. सलावतखानास आतां आपण याला कोणत्या तऱ्हेनें तारेसंबंधाची माहिती विचारावी हेंच

दाराला बराच वेळ कळेना. पुष्कळ वेळ त्यानें विचार केला व शेवटीं एकदां त्यानें त्यास विचारण्यास सुरवात केली. तो म्हणाला "तुम्हाला यावेळीं मीं इकडे कां बोलाविलें हें कळलें काय ?"

"हुजूज ! गुलामाला आपण कां बोलाविलें हें कसें कळणार ! आपला काय हुकुम आहे तो कळवावा ".

"आपल्याला मला कांहीं विचारायचें आहे. "

"हजरत ! या लांवेदाराला आपण काय वाटेल तें विचारावें. "

"मला असें कळतें कीं अमरसिंहाच्या कन्येवर आपलें प्रेम बसलें आहे. आणि आपण तिच्या प्राप्तीविषयीं खटपटही करीत असतां "

हें ऐकतांच सलाबतखानानें आपले दोन्हीं हात कानांवर ठेवून "तो वः ! तो वः ! ! महाराज ! ! ! — "

' मग मीं जें ऐकलें तें सर्व खोटेंच तर ? "

" महाराज ! अशी गोष्ट मीं स्वप्नांत सुद्धां कधीं काढणार नाहीं. परंतु — "

" परंतु काय ? "

" इतकेंच कीं, त्या स्त्रीस हस्तगत करून घेण्याकरितां मीं मनापासून प्रयत्न करीत आहें ".

' याचें कारण काय ? "

" यदाकदाचित् ती हस्तगत झाली तर तिला आपल्या सेवेलाच पाठवून द्यावयाची. "

' तिला घेऊन मला करायची काय ? "

" दिली तर जशी कांहीं टाकूनच द्याल ! " सलाबतखानानें हें शब्द आत्मगत उच्चारून तो उघड म्हणाला " माफी कराल तर — "

' सांगा सांगा. "

' मीं सुद्धां असें ऐकलें आहे कीं आपल्या मनांत ती फार भरलीं आहे. तेव्हां ती आपणांस मिळवून द्यावी एतदर्थ मी इतकी खटपट करीत आहें; नाहींतर मला हो काय त्याची जरूर ? "

' पण हें सांगितलें कोणीं ? "

' हजरत ! — "

' मग आजपर्यंत मला तुम्हीं सांगितलें कसें नाहीं ? "

'याचें कारण इतकेंच कीं कदाचित् ती हस्तगत नच झाली तर आपली मजवर— '

'बरें, आजपर्यंत तिच्या प्राप्तीकरितां आपण प्रयत्न तरी काय काय चालविले आहेत ? '

'नुकताच मी कोठें त्या नादाला लागलों आहें.'

'पण कांहीं तरी आपला विचार ठरला असेलच कीं नाहीं ? '

'एखाद्या कुंटिणीच्या मदतीनें तिचें मन भुलवून आपल्याकडे तिला आणून द्यायची आणि— '

'पण सलावतखानसाहेब ! मी कोण आहें हें ठाऊक आहे का आपल्याला ? '

'आपण तर दिल्लीचे भावी बादशा— '

'मग लक्ष्यांत ठेवा कीं आपण जर माझ्याबरोबर या कामीं लबाडी केलीत तर याचा परिणाम फार भयंकर रीतीनें आपणावर घडून येईल. '

'तोबः ! तोबः ! अशी गोष्ट कधींही होणार नाहीं' सलावतखाननें हात जोडून उत्तर दिलें.

'मग मी आज तुम्हांला हुकूम देतों कीं तुम्हीं तारेच्या कामांत माझ्या परवानगीशिवाय कांहीं एक करतां कामा नये. जर का माझ्या आज्ञेचें उल्लंघन कराल तर मात्र मी कांहीं ऐकणार नाहीं. '

'आज्ञा मान्य आहे. '

'आपण आतां रजा ध्यावी. '

हें ऐकतांच सलावतखान तेथून उठून दारास अत्यंत नम्रतेनें लवून मुजरा करून चालता झाला. जातेवेळीं त्यानें दाराकडे क्रोधपूर्ण दृष्टीनें मात्र पाहिलं. तें दाराच्या दृष्टीं पडलें नाहीं.

प्रकरण ५ वें.

अंतःकरणाचें प्रकाशन.

सलावतखान दाराच्या महालांतून जों निघाला तों तडक आपल्या महालांत आला. त्या ठिकाणीं नुकताच नूरुल्हक येऊन बसला होता. त्यानें

सलावतखानाला पहातांच आदबीनें मुजरा केला च तो आपलें अंग चोरून उभा राहिला. या वेळीं सलावतखानाचें मन क्रोधानें गांजल्यामुळें त्याला नूरुल्हकनें मुजरा केलेला दिसला नाहीं. तो एकदम कांहीं एक शब्द न उच्चारतां आपल्या पलंगावर येऊन पडला. कांहीं वेळानें त्याचें क्रोधानें बहकलेलें मन ताळ्यांत आलें. नंतर तो पलंगावर उठून बसला. तोंच त्याची नजर नूरुल्हकाकडे गेली. अद्याप नूरुल्हक जागच्या जागीं तसाच उभा होता. त्याला पहातांच सलावतखानानें जवळ बोलाविलें. त्याच-प्रमाणें तो जवळ गेला. सलावतखानानें त्यास खालीं बसण्यास सांगितलें. च नुरुल्हक मोठ्या आदबीनें खालीं बसला. पलीकडल्या दाल-नांत कांहीं खोजे उभे होते. त्यांना त्यानें बाहेर जाण्यास सांगि-तलें. खोजे बाहेर गेल्यावर ते दोघे बराच वेळ स्तब्ध बसले. नंतर नुरुल्हक् म्हणाला ' महाराजांनीं मला कशाकरितां हाक मारली ? '

' नूर ! नांव गेलें तरी पतकरलें, परंतु मला जें योग्य करावयाचें तें करणारच ' सलावतखान म्हणाला.

' पण झालें काय तें तर कळूं द्याना प्रथम. '

' प्रथम दाराशीं काय काय तुझें भाषण झालें तें तूं साग '.

यावर दाराकडे झालेली सर्व हकीकत नूरुल्हकनें सलावतखानास निवेदन केली; परंतु त्यानें ' सलावतखानही तारेवर लुब्ध होऊन तिच्या प्राप्तीवि-षयीं खटपट करीत आहे असें मींच दारास सांगितलें ' एवढें मात्र त्यास सांगितलें नाहीं.

सलावतखान दाराच्या घरीं असेंपर्यंत आपलें दाराशीं व दाराचें आप-ल्याशीं काय काय भाषण झालें तें सर्व त्यानें त्यास सांगितलें व पुन्हां त्यास रागानें म्हटलें—

' ऐक. बादशाही गादीचा खरा वारस व हक्कदार दारा जितका हुशार, सभ्य, मनमिळाऊ व गरिबाचा कनवाळू आहे तितका तो नीच आहे. त्याला मुरवत कोणा एकाचीही नाहीं. हा जर गादीवर पुढें मागें बसेल तर खात्रीनें आपल्या कपट कृतीनें लोकांस आपल्या फासांत गुंतवून त्यांना अकबराचा विसर पाडायला लावील. आज या काफरानें मजशीं इतक्या बेमुरवतीचें वर्तन ठेविलें कीं त्यायोगानें माझें पित्त अगदीं खवळून गेलें आहे. त्याला यापुढें

मी या बादशाही गादीवर मुळींच बसूं देणार नाहीं. आज त्याच्यावरील माझें प्रेम समूळ उडालें आहे. तो तारेवर फिदा होऊन माझें नुकसान करण्यास तयार झाला आहे. सर्व जगाला माहीत आहे कीं सुजा आणि मुराद हे या गादीला नालायक आहेत. व खरा मुसलमान या गादीला योग्य जर असेल तर एक औरंगजेबच आहे. आणि माझी बुद्धि जर मला पुढें मागें दगा न देईल तर मीही पण जोरानें सांगतों कीं शेवटीं औरंगजेबच या गादीवर बसेल. ही गादी मिळविण्याचा प्रयत्न तो करीत आहेच. केव्हां तो या आपल्या भावांच्या डोळ्यांत धूळ टाकील हें कांहीं सांगतां येत नाहीं. आजपर्यंत माझा ओढा त्याच्याकडे नव्हता परंतु आतां यापुढें या तारेच्या पार्यी मात्र मी औरंगजेबाचाच मदतगार आहें असें समजतों. तारेची प्राप्ति होतांच मी त्याच्या सेवेला गेलोंच ह्मणून समज. आणि मला त्याची खात्री आहे कीं तो मला कधींही दूर करणार नाहीं. यदाकदाचित् त्यानें मला तेथें आश्रय दिला नाहीं तर मी दाराला त्याच्याकडे कैद करून पाठवीन आणि तारा हस्तगत करून घेईन. ती जर वश न होईल तर शेवटीं तिलाच ठार मारून मीही पण आत्महत्या करून घेईन ह्मणजे एक भांडण तरी मिटेल. एवढें मला माहित आहे कीं—

' नारीप्रेमाकर्षित तत्पाणिस्तव करी न काय नर ।
होईल त्यांत विजयी किंवा वेंचील आपुले प्राण ॥ '

पण नुरुल्हक ! तुला मी आपला परम स्नेही असें नित्य समजत असतों. कारण काय ह्मणशील तर तूं नित्य दाराच्या महालांत राहून तेथील सर्व गुप्त बातम्या मला देत असतोस. आतां मला या कामीं सुद्धां तूं मदत केली पाहिजे. शिवाय मला तारा मिळवून दिली पाहिजे. '

औरंगजेबच्या तर्फेची रौशन आरा बेगम होती. तिच्या विशेष कृपेंतील नुरुल्हक होता. परंतु हें सलावतखानास माहित नव्हतें. सलावतखानाचें औरंगजेबाच्या वतीचें भाषण ऐकून तो अत्यंत खुष झाला. तो त्याला ह्मणाला ' महाराज ! आपण जर औरंगजेबाच्या वतीनें भांडाल तर खात्रीनें आपली प्रियकरीण तारा मी आपल्याला मिळवून देईन. '

सलावतखानानें कांहीं कारण नसतां आपल्या मनांतील हेतु बेध-

उक नूरुल्हकूला कां बरें कळविला ? मनुष्य रागाच्या संपाव्यांत काय न करील ? त्याची विवेकशक्ति सर्व नष्ट होते. आपण काय करतों आहोंत यांचें त्याला मुळींच भान रहात नाहीं. जें बोलावयास योग्य नाहीं तें तो बोलून जातो. पण एकदां तो रागाचा झटका कमी झाला म्हणजे मात्र त्याला आपल्या कृतीचा पश्चात्ताप होतो. त्याचप्रमाणें सलावतखानासही आपल्या बोलण्याचा पश्चात्ताप झाला. परंतु तेव्हां नूरुल्हक सुद्धां आपल्यासारखा औरंगजेबाकडला आहे असें त्याच्या बोलण्यावरून त्याला कळलें, तेव्हां तो त्याला म्हणाला " तुझी तरी औरंगजेबावर कां भक्ति ? "

नूरुल्हक म्हणाला ' आपण मी जीवांत जीव आहे तोंपर्यंत औरंगजेबास दगा न देतां त्याच्या हिताकरितां झटेन असें कुराणावर हात मारून सांगाल तर मी आपणांस सर्व सांगेन. '

सलावतखानानें यावर कुराणावर हात ठेवून शपथ वाहिली व नुरुल्हकानें औरंगजेब आणि रौशन आरा बेगमचीं सर्व षड्यंत्रें त्यास कळविलीं. त्यानें औरंगजेबाविषयींचें आपलें मत सुद्धां काय आहे हें सांगितलें. तो म्हणाला " रौशनआरा औरंगजेबाची पुरी हितचिंतक आहे. आपल्या विरुद्ध कोण काय करतें आहे याची ती गुप्त रीतीनें खबर मिळवून जें काय करायचें तें करीत असते. तिच्या लोकांपैकीं एखाद्यानें तिला दगा करण्याचें मनांत आणलें आहे असें तिला जर कळलें तर ती त्याला लहानसहानशी शिक्षा न करतां जीवानिशीं ठार मारिते. '

यावर पुढें त्याचें बराच वेळ भाषण झालें. शेवटीं रात्र बरीच झाल्यामुळें नुरुल्हकानें सलावतखांची रजा घेतली.

प्रकरण ६ वें.

मदतगार बळीं पडला !

नूरुल्हक सलावतखानाच्या घरून निघाला तों थेट आपल्या महालांत येऊन अंथरुणावर स्वस्थ पडला. त्याचा महाल किल्ल्यांत यमुनानदीकडील

बाजूस राजगृहापासून थोडया अंतरावर होता.. आणि हा महाल रोशन आरेनें त्यास मोठ्या आनंदानें बांधून दिला होता..

अंथरुणावर पडून त्याला फार वेळ झाला नाहीं तोंच कोणी बाहेर दारावर हळूं टिचकी मारिली. टिचकीचा आवाज ऐकून नूरुल्हक झटकन् उठला आणि दार उघडून बाहेर पाहूं लागला तोंच त्याला एक तरुणी दिसली.. ही तरुणी जहांनारेची विश्वासू दासी जोहरा आमच्या वाचकांच्या ओळखीची आहेच..

तिला पहातांच नूरुल्हक्कनें मोठ्या प्रेमानें तिचा हात धरून तिला आंत घेतली व पूर्ववत् दरवाजा बंद केला.. नंतर तो तिला आपल्या अंथरुणावर बसवून घेऊन मोठ्या प्रेमानें म्हणतो "अहाहा ! सुन्दरि, काय सांगूं तुला ! तुझ्या प्रेमपाशानें मी इतका कांहीं वेडा होऊन गेलों आहें कीं थोडा वेळ जर तुझें दर्शन झालें नाहीं तर माझी अशी कांहीं स्थिति होऊन जाते कीं ती शब्दानें व्यक्त करणें अगदींच अशक्य आहे.. बाकी तुला ती समजत आहेच— "

" पुरे, पुरे करा आपलें हें वाक्पाटव, मी तें सर्व जाणून आहें. आपल्या या मोडगोड भुलथापांनीं भुलणाऱ्या स्त्रियांपैकीं मी नाहीं हें आपण खास समजा. आपण या अशा भुलथापा देऊन मजसारख्या किती गरीब स्त्रियांचा दगा केला आहेत कोण जाणे ! हें ईश्वर पाहून घेईलच. " हे शब्द उच्चारतांच जोहरेचें नेत्र अश्रुपूर्ण झाले. "बस, बस, यापुढें तुझा माझा सर्व संबंध तुटला, असें समजूनच आज मीं त्याची इतिश्री करण्याकरितां येथवर धाव घेतली आहे.. "

" काय, काय, असें करायला माझ्या हातून इतका मोठा अपराध तरी काय घडला ? " नुरुल्हकनें घाबरून विचारिलें..

" अरेरे ! धडधडीत गुन्हा केला असून काय झाला म्हणून वर तोंड करून विचारायला लाज तरी मेली कशी वाटत नाहीं ? तुझ्यासारखा हरामखोर खरोखर दुनियां शोधूं गेलें तरी सांपडणार नाहीं.. निर्लज्ज मेला ! "

" तो बा ! तो बा ! काय तूं हें बोलतेस ? व्यर्थ नसता गुन्हा माझ्या माथीं लावतेस तेव्हां म्हणावें तरी काय तुला ? यांत मला तर कांहीं कळत नाहीं.. "

'कशाला कळेल ? गुन्हा करतांना मन ताळ्यावर होतें कां ? तेव्हां विचार करतास तर असा प्रसंग येऊन ठेपताना ! '

'पण असा प्रसंग येण्याला गुन्हा तरी मीं काय केला तो तर सांगशील ? '

'काय सांगूं मेल्या डोंबल तुझं, डोळे अगदीं फुटले कीं काय ? दिसत नाहीं कां काय झालं आहे तो. तुझे खेळ झाले पण आज माझ्या डोंबलावर दगड पडला ना ? त्याचें काय ? '

'सुंदरि ! जरा शांत हो, इतकें घाबरण्याचें कारण काय ? '

'तुझं मेल्या ठीक आहे. तुला त्याचं थोडेंच दुःख होणार आहे ? ज्याचें दुःख त्यालाच कळतें. परदुःख मोठं शीतळ असतें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. हेंच जर मी पूर्वी चांगला विचार करतें तर असा प्रसंग कशाला आला असता ? आतांचा प्रसंग म्हणजे इतका कांहीं भयंकर येऊन ठेपला आहे कीं तो तुला काय सांगावा ? चांगलाच गळफांस येऊन बसला आहे आणि तूं खुशाल चैनींत दिवस काढतो आहेस. ही मी तुझ्या कर्मांचीं फळें भोगतें आहें. बरें तूं करावंस आणि मीं तें निस्तारावं हें चांगलंना ? '

'प्यारी जोहरा, रागावूं नकों, जरा दमानं घे. मी तुझ्यावर बेइमान झालों नाहीं. पण हें असें झाल्याला दिवस तरी किती झाले ? '

'जवळ जवळ चार महिने झाले असतील. आणि याची तुला अद्याप दाद सुद्धां नसावीना ? आतां हीं सर्व गर्भचिन्हें राजमंदिरांत राहून लपणें अगदींच अशक्य आहे. एक तूं मला घेऊन अन्यत्र कोठें पळवून नेशील किंवा ठार मारशील तर मी या संकटांतून सुटेन. '

'घाबरूं नकोस. असें झालें आहे तर मी यावर तुला चांगला दवा देतों. तो घेतल्यास यांतून सुटलीस म्हणून समज. '

'दे दे, कोणता दवा देणार तो, लवकर दे. ' जोहरा चटकन् म्हणाली.

यावर नूरुल्हकानें जवळच्या कपाटांतून एक औषधाची शिशी काढून जोहरेला दिली व त्यांतील औषध कसें घ्यावयाचें वगैरे सर्व समजावून सांगितलें. जोहरेनें ती शिशी त्याच्या हातून घेऊन आपल्या चोळींत लपविली व म्हणाली:—

'हायरे हाय ! खरोखर सर्वस्वीं मी फसलें गेलें ! अब्रू गेली ! इमान नाहींसें झालें ! तारुण्य मातींत गेलें ! अंतःकरण फुटण्याची वेळ जवळ

आली ! तूं जे करार केलेस तेही अद्याप तुझ्या हातून सिद्धीस जात नाहींत. काय तुला त्याची स्मृति तरी आहे कां नाहीं ? कुराणाची शपथ कीरे त्या दिवशीं घेतलीस. ती आतां गाढवाच्या + + + गेलीना ? हर हर ! करायला गेलें काय आणि आतां झालें काय ? '

' तूं इतका बेइमानपणा माझ्याशीं करशील हें जर मला पूर्वी कळतें तर आज असा गळ्याला फांस कशाला लागता ? नशीब माझें. त्यांत तुला काय दोष द्यायचा ? '

' प्यारी, जरा शांत हो. ' असे शब्द उच्चारून नुरुल्हकनें जोहरेचा हात धरून तिला आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ झाला. तिनें झटकून त्याचा हात दूर लोटला आणि रागानें फुणफुणत त्याला म्हणाली ' बस, बस, यापुढें अंगाला हात लावशील तर खबरदार ! जोंपर्यंत तूं माझ्याशीं निक्का लावण्यास तयार होणार नाहींस तोंपर्यंत मी तसें मुळींच तुला करूं देणार नाहीं. तुझ्या त्या गोड भाषणानें आणि कुटिल प्रेमपाशांत व्यर्थ फसून भयंकर गुन्हेगार मात्र झालें आहें. माझ्या सुखांत केवल माती कालविण्याच्या हेतूनें दुसरें प्रेमपात्र निवडलेंस तेव्हां तुला म्हणावें तरी काय ? '

' खरोखर तूं मला निरर्थक दोष देते आहेस ! शपथपूर्वक तुला सांगतों कीं माझें प्रेम तुझ्याशिवाय कोणावर जडलें नाहीं. आणि तूं असें म्हणतेस तेव्हां काय म्हणावें तुला ? '

' बस, बस, अगदीं चुप रहा. तुझ्या शपथा, तें गोडगोड भाषण, तीं निरानिराळीं वचनें आणि कामापुरत्या त्या मोहक युक्त्या यांमध्यें कितपत सार आहे, हें मीं पूर्णपणें आतां जाणून चुकलें आहें. उघड आहे, ज्याला शहाजादीसारख्याची मर्जी संपादन करतां आली त्याला एखाद्या कोपऱ्यांतील भिकारीण थोडीच आवडणार आहे. आणि तो थोडाच तिच्याशीं विवाह लावण्यास तयार होणार ! '

' काय काय ! हें तूं आज बोलते आहेस तरी काय ? ' कांपत कांपत नुरुल्हकनें विचारलें.

' कांहीं नाहीं. प्रेमाला बंधन थोडेंच आहे. परंतु लक्ष्यांत ठेव कीं यांत उलट तुझेंच नुकसान होईल. '

' आज हें असंबद्ध बोलतेस तरी काय हें ? '

' आपल्याला तें असंबद्धच वाटायचें. '

' शहाजादीसंबंधीं जे तूं उद्गार काढलेस ते काय ? ''

' त्याचा आपणच मनाशीं विचार करा. ''

' म्हणजे याचा अर्थ काय ? ''

' याचा अर्थ इतकाच कीं आपण फार मूर्ख आहांत. एका गरीब स्त्रीवर एकदां प्रेम करून तिला खोटंच आश्वासन देऊन, तिच्यापासून आपलें कार्य उरकून आज तिची अब्रू घालविण्यास तयार होऊन एका शहाजादीचें प्रेम संपादन करून घेतलेंस. ''

' छे छे, असें कधीं झालें आहे ? ' वाबरून नुरुल्हक म्हणाला.

' व्हायचें नाहीं खरें, परंतु तशी स्थिति झाली आहे खरी. '

' व्यर्थ मजवर हा दोषारोप घेत आहेस; परंतु खरी स्थिति काय आहे हें तो सर्वसाक्षी खुदा जाणत आहे. '

हे शब्द ऐकतांच जोहरा रागानें अत्यंत लाल झाली. आतां तिच्या नेत्रांतून मूर्तिमंत अग्निच बाहेर पडून नुरुल्हकला जाळीत सुटतो कीं काय असें बहाणारास त्यावेळीं वाटलें असतें. अशा वेळेंत ती त्याला म्हणते ' बेइमान ! काफर ! नीच ! हरामखोर ! काय, तुला विशेषणें तरी द्यावींत किती ? जितकीं द्यावींत तितकीं तुझ्या करणीला कमीच आहेत. लक्ष्यांत ठेव आतां माझे प्राण तुझ्या हातीं राहिले नाहींत तर उलट तुझे माझ्या हातीं आहेत. तूं समजत असशील कीं मजवर शहाजादीचें प्रेम पूर्ण आहे; तेव्हां तिच्या नांवावर मी तुझें काय वाटेलतें करीन. पण हा तुझा सर्व भ्रम आहे. तुझ्या हातून यापुढें माझें कांहींही होणार नाहीं. '

जरा रागाचा आविर्भाव आणून ' काय काय म्हणतेस ? दुष्टे ! हे चालती कशी येथून ! '

' रागावण्याचें कांहीं कारण नाहीं. रौशन आरेच्या जवाहिऱ्याच्या पेटींतील तुझीं तसवीर पाहिली आणि सर्व तुमचीं भाषणेंहि मीं ऐकलीं आहेत. पण— '

जोहरेच्या तोंडचे हे शब्द नूरुल्हकनें ऐकले मात्र, तोंच तो अंथरुणावर बेभान होऊन पडला ! तो तसा पडलेला पाहून जोहरा झटकून् ती शिशी आपल्या जवळ आलेली पाहून आनंदानें दार उघडून बाहेर चालती झाली. ती बाहेर जाते आहे असें नुरुल्हकनें शुद्धीवर आल्यावर पाहिलें तों ती

ह्याच्या तडाक्यांतून फारच दूर निसटून गेली. जर कां ती त्याच्या हातीं त्यावेळीं सांपडली असती तर तिचे क्षणार्धांत तुकडे तुकडेच झाले असते !

* * *

पुढें जोहरानें जहांनारेस सांगून शाहाजहान बादशाहाचें मन त्याच्याविषयीं कलुषित केलें व त्याला एके दिवशीं स्नानगृहांत ठार मारून आपलें मन शांत केलें. त्याला कोणीं मारिलें हें मात्र रौशनआरेसें मुळींच समजलें नाहीं. तिचा वहीम जहांनारेवर शेवटपर्यंत होता.

* * *

त्यावेळीं अशी स्थिति होती कीं रौशनआरा जहांनारेशीं बहिणीच्या नात्यानें वागत नसे. शिवाय ती शाहाजहान बादशाहास केवळ आपल्या दुस्मानासमान गणीत असे. त्यावेळीं तिचा सर्व ओढा औरंगजेबाकडे होता व ती त्याला राज्य मिळविण्याकरितांच मनापासून प्रयत्न करीत होती.

* * *

नुरुल्हक मारला गेल्याची बातमी ऐकून दारास तर संतोष झाला असें दिसलें. त्यानें नंतर मनाची समजूत घातली कीं आपण नूरुद्दीन मारविल्यामुळें जहांनारेनें त्यास मारिलें असावें. तो एवढें समजत होता कीं आपण नुरुद्दीनला ठार मारवून उलट त्याला सर्पदंशानें मृत्यु आला, असा बहाणा करून सर्व लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकिली; परंतु तीं जहांनारेस मात्र कळली. आणि खरोखर अशीच स्थिति होती. नुरुद्दीन सर्पदंशानें मेला अशी बातमी जहांनारेच्या कानावर आली होती; परंतु खरें कारण तिनें शोधून पाहिलें तों तिला कळून आलें कीं तिच्या तसबिरीमुळें दारानें त्यास मारविलें.

स्त्री किंवा पुरुष आपल्या प्रेमविषयक वस्तूंवर एकदां उलटले म्हणजे त्याचें ते काय करतील आणि काय नाहीं हें कांहीं सांगतां येण्यासारखें नाहीं, असें जें सर्वत्र आपण ऐकतों तें कांहीं सर्वस्वींच खोटें नाहीं. कदाचित् ते त्यावर न उठतील तर मात्र आश्चर्याची गोष्ट आहे. ज्या ठिकाणीं लोभानें प्रेम नष्ट होतें तेथें त्या प्रेमपात्रांची अशीच स्थिति होते.

* * *

नूरुल्हकचा खुन झाल्याची बातमी ऐकून जर खरं दुःख कोणाला झालें असेल तर तें एकट्या सलावतखानासच. त्याला तरी इतकें दुःख होण्याचें कारण काय, तर तो त्याचा खरा मदतगार होता. आणि तो मेल्यावर सलावतखानास काय तापू सोसावा लागला हें आतां प्रसंगानें पुढें कळेलच.

प्रकरण ७ वें.

तारेचें पुनर्दर्शन.

मेवाडचे जे राजे होऊन गेले ते दिल्लीच्या बादशहाचे मोठ परमस्नेही असत. त्यांत मेवाडचा महाराणा राजसिंह जहांगिरबादशहाचा परम स्नेही असून मोठा सहायक होता. त्याला दोन बायका होत्या. त्यांपैकीं पहिली जरा वृद्ध होती व दुसरी अगदींच तरुण होती. पहिली स्त्री म्हणण्यासारखी शहाणी नव्हती. दुसरी मात्र कूटनीतीमध्यें अत्यंत चतुर होती. प्रतिकैकयी म्हटलें असतां अतिशयोक्तीचा दोष माथीं येणार नाहीं. ती लग्न झाल्यापासून आपल्या वृद्ध सवतीचा अत्यंत द्वेष करीत असे. तिला तिचें कोणतेंही करणें पसंत नसे. तिचा हेतु कीं, कांहीं तरी युक्ति लढवून तिला पतीपासून दूर दवडावें. बरेच दिवस ती विचार करीत होती, परंतु तिला कांहीं एक उपाय सुचेना. शेवटीं तिनें तिला ठार मारण्याचा विचार केला व एके दिवशीं तिनें मोठ्या चलाखीनें तिच्या अन्नांत जहाल विष कालवून तिला खाऊं घातलें. त्या योगानें राजसिंहाची पहिली पत्नी लवकरच स्वर्गाची रहिवाशी झाली. यावेळीं तिला एक लहानसा मुलगा होता. त्याचें नांव अमरसिंह असें होतें. त्याच अमरसिंहाचें विस्तृत चरित्र वाचकांना या कादंबरींत वाचावयास मिळणार आहे.

राजसिंहाची पत्नी मेल्याबरोबर दुसऱ्या पत्नीचा आनंद काय विचारावा ? ती हळू हळू राजसिंहावर आपला पूर्ण अंमल बसवूं लागली. राजसिंह पडला म्हातारा. तो तिच्या आज्ञेंत न राहून करतो काय ? ' वृद्धस्य तरुणी

भार्या प्राणैरपि गरीयसी ' ह्मणतात तें कांहीं खोटें नव्हे. गजसिंहासही त्याला त्याचा अनुभव आला नाहीं असें नाहीं !

पुढें तिला गजसिंहापासून दोन पुत्र झाले. त्यांपैकीं दुसरा झाल्यावरोबर मेला. पहिल्याचें नांव तिनें यशोवंतसिंह असें ठेविलें. इतके दिवस अमरसिंहाची ती थोडी तरी शुश्रूषा करी, पण आतां तिला पुत्र झाल्यामुळें ती त्याला रात्रंदिवस पाण्यांत पाहूं लागली. कोणत्याही मुलांस ' विमाता व्याघ्रीव भवति सततं हा ! भुवि सदा ' असा सर्वत्र नियम आहे. मग या ठिकाणींच कसा अपवाद येणार ? जसजसा अमरसिंह मोठा होऊं लागला तसतसा तिचा त्याविषयीं मत्सर अधिकाधिक वृद्धिंगत होऊं लागला. ' गजसिंह मेल्यावर मेवाडची गादी अमरसिंहास मिळेल, तोच त्या गादीचा हकदार समजला जाईल व आपल्या यशोवंतसिंहास मात्र त्याच्या तोंडाकडे दीनवाण्या दृष्टीनें पहावें लागेल ! ' याची तिला मोठी भीति वाटूं लागली. यशोवंतसिंहास गजसिंहाची गादी मिळावी या हेतूनें ती हळूं हळूं अमरसिंहाविषयीं गजसिंहाच्या मनांत द्वेष उत्पन्न होईल असा प्रयत्न करूं लागली. व तिचा हा हेतु सिद्धीसही जाईल असा तिला रंग दिसूं लागला. ती जें जें कांहीं अमरसिंहाच्या विरुद्ध सांगेल तें तें सर्व गजसिंहास खरें वाटूं लागलें. व तोही आपल्या तरुण स्त्रीच्या मोहपाशांत गुंतून जाऊन प्रत्यक्ष पोटच्या गोळ्याचा द्वेष उघड करूं लागला ! अमरसिंह या वेळीं कांहीं लहान नव्हता त्याचें लग्न वगैरे सर्व झालें होतें. त्याला आतां आपला पिता उघड द्वेष करीत आहे, असें कळूं लागलें. इकडे माता द्वेष करणार व तिकडे आपला प्रत्यक्ष पिता द्वेष करणार ! तेव्हां अशा संकटांत आपला निभाव लागणार कसा ? ही सिंहीण आपल्याला केव्हां मारून टाकील हें कांहीं कळणार नाहीं, तर आपण दुसरीकडे कोठें तरी रहाण्यास जावें हें बरें; असे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. कांहीं दिवसांनीं तरुण स्त्रीच्या सांगण्यावरून गजसिंहानें अमरसिंहास हद्दपार होण्याबद्दल हुकूम सोडला. जें त्याला पाहिजे होतें तेंच त्याच्या नशीबीं आलें.

गजसिंहानें हद्दपार होण्याचा हुकूम सोडलेला पाहून अमरसिंह यत्किंचित् डगमगला नाहीं. तो खरा शूर होता. त्याला राज्याची तृष्णा नव्हती. हे

राज्य मिळालें नाहीं तरी आपण आपल्या बाहुबलानें दुसरें राज्य मिळवूं असा त्याला मरंवसा होता. ह्मणून तो लागलाच आपली पत्नी चंद्रावती व सहा वर्षांची कन्या तारा यांस घेऊन पित्याचें राज्य सोडून चालता झाला. या वेळीं त्या राज्यांतील अमीरउमरावांस त्याच्या जाण्याबद्दल अत्यंत वाईट वाटलें. परंतु उपयोग काय ?

अमरसिंह तेथूनं जों निघाला तों शाहाजहान बादशहाच्या पदरीं येऊन राहिला. तिकडे त्याचा पिता गजसिंह चारपांच वर्षांनीं आटपला व त्याच्या गादीवर यशोवंतसिंह बसला. शाहाजाद्यास खरा हकदार अमरसिंह असतां यशोवंतसिंह गादीवर बसलेला पाहून बरें वाटलें नाहीं. तो अमरसिंहास गादी देण्याविषयीं खटपट करणार; परंतु अमरसिंहानें तसें करूं दिलें नाहीं.

अमरसिंह खरा रजपूत होता व त्याच्या अंगीं विलक्षण धैर्य वसत असल्यामुळें तो शाहाजहान बादशहाला अल्प काळांत फार प्रिय झाला. त्याचें तें अलौकिक शौर्य व निर्मल राजभक्ति पाहून तो अत्यंत प्रसन्न झाला व त्यानें अमरसिंहास राव ही पदवी देऊन तीन हजार स्वारांची मनसबदारी व नागोद परगणा दिला. अमरसिंहाच्या शौर्याची कीर्ति दिवसेंदिवस सर्वत्र प्रसरूं लागली. अमीरउमराव त्याचें तें अद्वितीय शौर्य पाहून तोंडांत बोटें घालीत !

बादशहाचें प्रेम जसजसें अमरसिंहाच्या ठिकाणीं अधिकाधिक दृढ होत चाललें तसतसें त्याच्या दरबारांतील लोकांस तें अगदींच असहनीय होऊं लागलें. ते अमरसिंहाचा अंतर्यामीं अत्यंत द्वेष करीत. कोणत्याही राज्यांत परोत्कर्ष सहन न होणारे लोक असावयाचेच. मग या वेळीं नव्हते, असें होईल तरी कसें ? परोत्कर्ष आमच्या लोकांना सहन न झाल्यामुळेंच आमचें राज्य आज रसातळाला जाऊन पोंचलें.

अमरसिंहास जे अनेक शत्रु होऊन बसले होते त्यांपैकीं प्रमुख काय तो बादशहाचा खजीनदार सलावतखान होता. सलावतखान अंतर्यामीं जरी त्याच्याशीं दुष्ट भावानें वागे तरी पण त्यानें त्याला कधीं तसें दाखविलें नाहीं. बाहेरून तो ' त्याचा मी हितचिंतक आहें ' अशी सर्वत्र शेखी मिरवी. तुलसीदासानें ह्मटलें आहेच ' मन मलीन तन सुन्दर कैसे, विषरस भरा कनकघट जैसे ' हा दृष्टांत येथें उत्तम लागूं पडतो.

अमरसिंहाचा स्वभाव अत्यंत भोळा होता: त्यामुळें त्याला सलावत-खानाचें अंतःकरण खरें कसें आहे हें बरेच दिवस कळलें नाहीं. तो त्याच्याशीं निर्मल स्नेहभावानें वागे.. सलावतखान तरी त्याच्याशीं असा बाह्यात्कारीं असा मित्रत्वानें कां वागत असे त्याचीं कारणें इतकींच कीं आपण त्याच्या विरुद्ध जीं षड्यंत्रें तयार करणार तीं त्याला न कळतां आपला डाव साधावा. आतां तीं षड्यत्रें कितपत सिद्धीस गेलीं हें सांगण्याची ही वेळ नाहीं.

आतां अमरसिंहाशीं सलावतखान इतका वैरभावानें कां वागत होता हें सर्व कळून येण्याची इच्छा आमचे वाचक बंधुभगिनींना साहजिकच झालीं असेल तर आतां आपण तिकडेच वळूं या..

अमरसिंहाची तारा नांवाची एक दहा वर्षांची सुस्वरूप कन्या होती. तिचें जहांनारेकडे बरेंच वळण होतें. या दोघीं एकाच काजीजवळ फारशी भाषा शिकत असत. एके दिवशीं तारा जहांनाराकडे शिकण्याकरितां जात असतां सलावतखान समोरून घोड्यावर बसून येत होता. त्यानें तीस पाहिलें.. तिला पहातांच त्याच्या मनांत विलक्षण फेरफार होऊन तो आत्मगत म्हणाला 'काय होईल तें होवो. आपण तारेशींच लग्न लावणार. त्याशिवाय आपल्याला यापुढें हें जीवित असार भासेल ' असें म्हणून तो घरीं चालता झाला.

झालें, सलावतखान याच एका कारणानें अमरसिंहाचा वैरी बनला !

* * *

तारेचें दर्शन झाल्या दिवसापासून सलावतखान अमरसिंहाशीं दिवसें-दिवस अधिक सलगी करूं लागला. व आपल्या कपटी हावभावानें त्याला अगदीं आपलेसें करून सोडण्याचा तो प्रयत्न करूं लागला. त्यानें अमरसिंहाचे घरीं जाण्याचा हळूं हळूं प्रघात पाडला. घरीं जाण्याचा मुख्य हेतु इतकाच कीं, आपल्याला तारेचें आणखीं एकवार दर्शन व्हावें, तिला आपला थाट दाखवून भुलवावें,. तिच्याशीं आपल्याला बोलण्याची संधि मिळावी व ओघाओघानें तारा आपल्याला देण्याविषयीं अमरसिंहास विनंति करण्याचा सुयोग घडून यावा.. परंतु त्या अभाग्याला इतकेंही करून पुन्हां तारेचें दर्शन म्हणून मिळालें नाहीं व त्याचें मनोरथ सिद्धीस जातील असाही रंग दिसेना.

आतां तर ती सोळा वर्षांची तरुणी झाली. मग त्याला तिचें पुनर्दर्शन कोठून होणार? ती पडद्यांतून बाहेर येईनाशी झाली. त्या कालीं तरुण स्त्रिया पडद्याआड बसत व परपुरुषास आपलें मुख दाखवीत नसत. कारण, मुसलमान लोक अशा स्त्रिया जर दृष्टीस पडल्या तर त्यांच्यावर बलात्कार करून आपली तारुण्यांतील क्षुधा शांत करून घेण्यास मुळींच मागें पुढें पहात नसत. या भीतीमुळें तरुण स्त्रियांना आपलें संरक्षण करून घेण्याचा उपाय हिंगजे एक पडदाच होऊन बसला होता व आमच्या देशांत पडद्याची जी चाल पडली आहे ती मुसलमानी राज्यापासूनच. अशा करण्यानें त्या कालीं स्त्रियाचें पातिव्रत्य पुष्कळ अंशीं कायम राहिलें.

ताराबाई पडद्यांत बसूं लागल्यापासून सलाबतखान अमरसिंहाच्या घरीं हजार वेळां आला असेल. तारेचें दर्शन होत नाहीं हें पाहून तो हताश होई परंतु तिचा नाद मात्र त्यानें सोडला नाहीं. प्रयत्न चालूं होताच.

एके दिवशीं प्रातःकाळीं अमरसिंह आपल्या बागेंत बसून जवळून वहात जाणाऱ्या यमुना नदीचा देखावा पहात बसला असतां त्या ठिकाणीं सलाबतखान आला. त्याला पाहून अमरसिंह उठून उभा राहिला व हसत हंसत त्यानें सलाबतखानाचा हात धरून त्याला एका जवळच्या आरामासनावर बसविलें. इतक्यांत तारा आपली सखी रंभा बरोबर घेऊन आपल्या महालांतून बागेंत आली. ती येतांच सलाबतखानाचें लक्ष्य तिजकडे गेलें. व तारेनेंही आपल्या पित्याजवळ सलाबतखान बसला आहे असें पाहिलें. त्याला पहातांच ती मागें वळली. सलाबतखान तिला मागें वळलेली पाहून हंसत पण लघळपणानें म्हणाला.

'या या, असें मागें कां वळतां ? मी परका का आहें ? मला इतकें लाजण्याचें कांहीं कारण नाहीं.'

यावर अमरसिंह तारेस हांक मारून म्हणाला 'बाळे ! ये इकडे. हे गृहस्थ कोणी परके आहेत असें नको समजूं. तुला हे चुलत्याप्रमाणेंच आहेत. मग अशी यांना लाजून कां बरें पुढें जातेस ?'

अरेरे ! बिचारा अमरसिंह पडला भोळा गृहस्थ ! त्याला 'मुखमें राम, बगलमे छुरी' अशापैकीं सलाबतखांचें वर्तन आपल्याशीं आहे हें कसें बरें कळावें ? हें जर कळतें तर खात्रीनें तो तारेस परत बोलाविण्याच्या भानगडींत पडला नसता.

पिताजीची आज्ञा उल्लंघून तारेला पुढें जातां येईना. ती मोठ्या कष्टानें मागें फिरली व अमरसिंहाकडे येऊं लागली. येतांना सहज सलावतखानाची व तिची एकदृष्टि झाली. ती होतांच सलावतखानानें तिजकडे अशा कांहीं वाईट दृष्टीनें पाहिलें कीं त्या योगानें तारेची दृष्टि लज्जेनें भूमिगत होऊन तिची मुद्रा अग्नीसारखी लाल झाली व चटकन् ती मागें वळून आपल्या महालांत शिरली. लिहिण्यास खेद वाटतो कीं झालेल्या प्रकारांपैकीं अमरासिंहास मात्र कांहीं कळलें नाहीं ! तें जर कळतें तर त्या दिवसापासूनच सलावतखानाचें येणें अमरासिंहानें बंद केलें असतें.

पांचसहा वर्षांपूर्वी सलावतखानें तारेस पाहिलें होतें. त्या स्थितींत आज ती नव्हती. त्या वेळीं ती किशोरी होती, आज ती तरुणी बनली होती. तारुण्यामुळें तिचें सौंदर्य उत्तरोत्तर विकास पावत चाललें होतें. आज तिचे गालांवर गुलाबाचीं फुलें उमललेलीं दिसत होतीं. नेत्रदृष्टि चंचल दिसत होती. अंगीं पोरकटपणा जाऊन सभ्यपणा आला होता. सारांश काय कीं कोणी जरी तरुण पुरुषानें तिजकडे पाहिलें असतें तर तो खात्रीनें मदन-पिशाच्चबाधेनें वेडा झाला असता. ' प्राप्ते तु षोडशे वर्षे गर्दभी अप्सरा भवेत् ' असा तर सृष्टीचा नियम आहे. मग तारेसारख्या त्रैलोक्यमोहिनीचें या वेळीं सौन्दर्य वाढूं लागलें यांत कांहीं मोठेंसे नवल आहे काय ? अशा या सुलभ-मनोहर सुन्दरीला अवलोकन करतांच सलावतखांची जी स्थिति झाली ती शब्दांनीं कोण बरें वर्णन करूं शकेल ?

'तारा निवून गेल्यावर सलावतखान कांहीं वेळ स्वस्थ बसला होता. त्याला त्यापुढें कांहींच सुचेना. कांहीं वेळानें तो आपण होऊनच तारेच्या सौंदर्याचें वर्णन अमरसिंहापुढें करूं लागला. या वेळीं तेथें अमरसिंहाऐवजीं दुसरा जर कोणी गृहस्थ असता तर त्यानें खात्रीनें ताडलें असतें कीं त्याचें मन तारेवर खास गेलें आहे. परंतु अमरसिंहाचा स्वभाव पडला भोळा ! त्यांतून तो सलावतखांच्या मोहक पण कपटी भाषणाला भुलून त्याला आपला प्राणश्च कंठश्च स्नेही मानीत असे. तेव्हां त्याच्या मनांत असें कोठून येणार ? एकीकडे सलावतखान तारेचें वर्णन करी व हळूच चोरट्या नजरेनें तारेच्या महालाकडे पाही. हेतु इतकाच कीं ती आपल्याकडे पहात आहे किंवा कसें ? जर पहात असेल तर अनायासें तिच्या मुखचंद्राचें पुनर्दर्शन होऊन आपला

मदनपीडित देह शांतता पावेल. त्यानें बरेच वेळां तारेचें वर्णन केलें, परंतु व्यर्थ ! तारेचें दर्शन मात्र झालें नाहीं. शेवटीं दर्शन मिळत नाहीं हें पाहून तो आपल्या घरीं अमरसिंहाचीं परवानगी मागून निघून गेला. जातां जातां आत्मगत एवढेंच म्हणाला " आजपासून हा अमरसिंह तर माझा पुरा हाडवैरी बनला आहे. मला आतां तारेशिवाय हा सर्व संसार असार वाटत आहे. तिच्या प्राप्तीकरितां अमरसिंहास मारावें लागलें तरी पत्करलें; परंतु आपला कलिजा शांत केल्याशिवाय स्वस्थ म्हणून बसावयाचें नाहीं. '

यापुढें तारेच्या प्राप्तीकरितां दारा व सलावतखां निरनिराळ्या रीतीनें प्रयत्न करूं लागले. सलावतखानें रोशनआराकडे आपलें वळण बांधून तिच्याकडील एका कुंटिणीकडून तारेच्या प्राप्तीविषयीं खटपट चालविली. दैवयोगानें सलावतखानचीच कुंटिण तारेस वश करून घेण्याकरितां दारानें ठरविली होती; परंतु ती सलावतखानाचेंही काम करीत असतें एवढें मात्र त्याला माहीत नव्हतें. दारा एवढेंच करून राहिला नाहीं. त्यानें ताराबाईचा मामा अर्जुन गोरें यास अशी लालुच दाखवून ठेविली कीं ' जर आपल्याला तारा मिळवून दिली तर आपण बादशहा बनल्यावर तुला आपला प्रधान नेमूं. यदाकदाचित् जर हें बादशहास कळलें व त्यानें या कामांत कांहीं व्यत्यय आणण्याचें मनांत आणिलें तर आपण त्यासच कैद करूं. ' ही लालुच मिळतांच तोही तिकडून प्रयत्न करूं लागला. याशिवाय त्यानें आणखी गांवांतील कांहीं प्रतिष्ठित लोक त्यांना धनाची आशा दाखवून आपलेसें करून घेतलें. व त्यांनीं सलावतखानवर पाळद राखून त्याचीं गुप्त षड्यंत्रें सर्व आपणास येऊन सांगावींत असा त्यांना त्यानें हुकुम दिला. पण मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं ते बेइमानी लोक सलावतखानास जाऊन मिळाले. वरचेवर सलावतखान दाराचे बेत रोशनआराच्या मदतीनें हाणून पाडी. रोशनआराही दारावर विशेष लक्ष्य ठेवी.

आतां त्यांचे बेत कितपत सिद्धीस गेले याचा विचार करण्याचें स्थळ सध्यां हें नव्हे.

प्रकरण ८ वें.

दूतींची ओळख.

पूर्वी बादशाही अंमल असतांना भोवारणी सुद्धां तोंडावरून बुरखा घेतल्याशिवाय बाहेर पडत नसत. ज्या ज्या वेळीं त्या अमीरउमरावांच्या घरीं जिन्नस विकावयास जात त्यावेळीं दांतवण, सुर्मा, नाना तऱ्हेचीं मुलांचीं खेळणीं, कंचुकीला लावण्याच्या जरीच्या फीति वगैरे मुख्य मुख्य जिन्नस बरोबर घेत. या स्त्रियांना अमीरउमरावांचे घरीं जाण्यास कोणीही अटकाव करीत नसत. यांचा माल त्यांच्या बायकांत चांगला खपून त्याचें मोलही पण विपुल येत असे. या स्त्रिया एवढाच व्यापार करून रहात नसत. त्या मोठमोठ्याकडे वळणें बांधून त्यांचें दूतीपण करीत. मग त्या अमुक प्रकारच्या कामांतच दूती होत असा मात्र नियम नव्हता. परंतु त्यातल्या त्यांत त्यांचीं मुख्य कामें म्हणजे एकाद्या उंडग्या स्त्रीस तिच्या जारास नेऊन भेटविणें, ज्या तरुणीवर ज्या तरुणाचें मन बसलें असेल त्याला ती तरुणी हरप्रयत्नानें मिळवून देणें,—मग ती भिकाऱ्याची असो वा बादशहाची पट्टाभिषिक्त राणी असो अथवा बेगम असो—चांगल्या स्त्रियांना वाईट मार्गाला लावून घरांतून पळविणें, हीं होत. या कामीं त्यांना सहसा यश आलें नाहीं असें होत नसे.

अशा प्रकारच्या उंडग्या स्त्रिया जहांनारा व रौशनआरा या दोघींच्या पदरीं अनेक असत. त्या नित्य गल्लोगल्लींत, घरोघरीं फिरून गुप्त बातम्या त्यांना येऊन सांगत. बादशहा किंवा शहाजादे यास एखाद्या स्त्रिया वश करून देण्याच्या कामीं या स्त्रिया फार उपयोगीं पडत. या कामीं त्यांना बराच पैसा मिळत असे.

या स्त्रियांच्या अंगीं अशा प्रकारचा धूर्तपणा असे कीं तो आपण बारकाईनें पाहूं गेल्यास खात्रीनें थक्क झाल्याशिवाय रहाणार नाहीं. एकच स्त्री परंतु ती दोघां प्रतिस्पर्ध्यांचें दूतीपणा करी पण त्यांपैकीं एकासही शेवटपर्यंत मी

म्हणजे तुझ्या प्रतिस्पर्ध्याचें काम सुद्धां करीत असतें असें कळूं देत नसे. आतां अशा करण्यानें एखाद्या कोणत्या तरी गृहस्थास खड्ड्यांत पडावें लागे तें निराळें. कोणाला जर शत्रूचा सूड घ्यावयाची इच्छा झाली तर तो या स्त्रीचाच त्या कामीं उपयोग करी. अशा करण्यानें त्यास आपलें यश ठरलेलें ! अस्तु.

या वेळीं शहाजहान बादशहाच्या राज्यांत गुलशन म्हणून एक वरीलप्रमाणें कुंटीण होती. ही जहांनारा व रौशनआरा या उभयतांचीं कामें वारीत असे. जहांनारा व रौशनआरा या एकमेकी बहिणी खऱ्या परंतु एकमेकांशीं विरुद्ध होत्या. तथापि गुलशननें दोघांचें दूतीपण पतकारिलें आहे असें एकीसही कळवून दिलें नाहीं. याच गुलशनच्या मार्फत दारा व सलावतखान तोंची प्राप्ति करून घेण्याविषयीं प्रयत्न करूं लागले.

या वेळीं गुलशन सुमारें पंचवीस वर्षांची होती. ती स्वरूपानेंही म्हणण्यासारखी बाईट नव्हती. तिला एका म्हातारीशिवाय जगांत दुसरें कोणी नव्हतें. तिचें लग्न झालें होतें काय ? असें कोणी प्रश्न करतील तर त्यावर उत्तर इतकेंच कीं ती विश्वयोषिता असून मोठी पतिव्रता होती. उघडच आहे. जो तिच्यावर प्रेम करील त्याच्याशीं ती स्त्रीधर्मास अनुकूल असेंच वर्तन ठेवून रत होई. मग तिला आपण पतिव्रता असें कां बरें म्हणूं नये ?

या आपल्या मोठ्या थोरल्या गुणाबद्दल कोणा एकासही संशय येऊं नये इतकी तिनें खबरदारी ठेविली होती.

तिला रौशनआरा व जहानारा यांच्याकडे नित्य जावें लागत असल्यामुळें तिनें निरनिराळ्या रंगांचे दोन झगे तयार केले होते. त्यांपैकीं एक जहानारेकडे जातांना व दुसरा रौशनआरेकडे जातांना ती घालीत असे. यामुळें तिजविषयां दोघींसही संशय घेण्याचें कारण पडलें नाहीं. त्याचप्रमाणें ती सलावतखां व दारा यांच्याकडे जातांनाही त्या झग्यांचा उपयोग करी.

प्रकरण ९ वें.

आनंदाची बातमी.

रात्र कांहीं म्हणण्यासारखी फार झाली नाहीं, परंतु आज अमावास्या असल्यामुळें आकाश मात्र कृष्णवर्ण मेघांनीं परिव्याप्त झालें आहे. अंधकार म्हणजे मी म्हणत आहे. हाताबरील अंतराची वस्तु दिसण्याचें राहो, पण स्वतःच्या डोळ्यांत बोट घालूं म्हटलें तर तें सुद्धां अशक्य झालें आहे. ईश्वराच्या घरचे सर्व प्राणी हळूं हळूं निद्राराक्षसीच्या जबड्यांत सांपडूं लागले आहेत. परंतु, वाचकहो ! तो त्या महालांत पलंगावर पडलेला तरुण गृहस्थ पाहिलांत का ? तो सारखा तळमळत आहे. त्याला झोंप कशी ती नाहीं. त्याच्या सर्वांगाचा अगदीं दाह होत आहे. असें होण्याचें कारण तरी काय असावें ? व्यर्थ चिकित्सा करीत बसण्यापेक्षां आपण त्याचा समाचार घेण्याकरितां त्याच्या महालांत प्रवेश करूं म्हणजे आपल्याला सर्व कळून येईल. ऐका तो काय बडबडतो आहे.

" झालें हृदय पहा मम दग्ध कसें मदनतप्त बाणानें
सखि ! तव संगतिवांचुनि निवावया तें समर्थ, मी नेणें
किति अंत पाहसी ? न च अल्प दया त्वन्मनीं कशी वसते !
सत्पुण्य बांध पदरीं वांचवुनी सुन्दरी ! सुदीनातें "

इतक्यांत त्याचें बडबडणें संपतें न संपतें तोंच एक तरुणी हळूं हळूं पावलें टाकीत त्याच्याजवळ आली. ती विनोदानें म्हणते—

' मेली मनोगत वस्तु केव्हांना केव्हां तरी हातीं आल्यावांचून रहाणार नाहीं. पण त्या नादांत एखाद्या गरीब माणसाकडे दुर्लक्ष्य करणें कांहीं चांगलें नव्हे ! '

हें एकतांच तो गृहस्थ मागें पाहून तिला म्हणाला ' वा ! तूं कशी पण अगदीं वेळेवर येऊन दाखल झालीस ! ' असें बोलून तो उठला आणि त्यानें तिला मोठ्या प्रेमानें आपल्या पलंगावर आणून बसविलें आणि पुन्हां तिला म्हटलें ' प्यारी गुल्शन् ! सांग सांग लवकर काय काय झालें तें. पण आज इतकी माझी वृत्ति उच्छृंखल कां बरें होत आहे ? '

" महाराज, उतावळींनें कधींही चांगलें कार्य घडत नसतें. मला भरंवसा आहे कीं यांत मला यश येईल."

' परंतु अगोदर काय काय घडलें तें तर सांगशील कीं नाहीं. काय माझी प्रिया कबूल झाली म्हणतेस ?"

' होय सरकार. तिच्या नजरेवरून तर मला असें कळून आलें."

' माझ्या गळ्याची शपथ आहे ब्रघ तुला. काय काय घडून आलें तें मला खरें खरें सविस्तर सांग."

" साहेब, मीं आजपर्यंत अशी स्त्री कधींच पाहिली नाहीं. आपण दिलेली अंगाठी मीं तीस दिली व तिनेंही कांहीं आढेवेढे न घेतां हंसत हंसत ती घेतली. शिवाय येतांना मीं बारकाईनें पाहिलें असतां मला कळून आलें कीं ती आपल्यावरच प्रेम करतें आहे. हें तरी कळण्याचें कारण काय तर भेनें तिची चेष्टा जी केली ती मीं इकडे येतांना पाहिली. तेव्हां आतां आपल्याला लवकरच तिचा लाभ होईल. रंभा जें सांगेल तें ऐकण्यास ती मागेंपुढें पहात नाहीं. जर रंभा मला वश झाली तर मी खात्रीनें तिचे कान भरून तारेला वश करून आपल्या स्वाधीन करीन. परंतु मला अद्याप रंभेचें अंतःकरण कसें आहे याचा चांगलासा अंदाज काढतां आला नाहीं. परंतु थोड्याच काळांत आपल्याला या गोष्टीचा उलगडा करून देईन."

" परमेश्वरेच्छा काय आहे, कोण जाणें ! एकुण तिनें मीं दिलेल्या अंगठीचा स्वीकार केला तर मग आतां उदईक तिकडे जातांना तारेकरतां एक हिरेजडित दागिना आणि रंभेकरतांही एक—"

' आणि याबद्दल मला काहीं बक्षिस—"

" हीं घे तुला मोहरांनीं भरलेली पिशवी."

" महाराज ! मीं मोहरांना मुकेलेली स्त्री नाहीं. केवळ अपल्याला जीं जीं वचनें दिलीं आहेत तीं पुरीं करण्यांतच मला भूषण वाटत आहे."

हें ऐकून गुलशन्‌ला आपल्याजवळ ओढून प्रेमानें तो तिला म्हणाला " तूं मला तारेची प्राप्ति करून दिल्याबर आजन्म मी तुला विसरणार नाहीं. या सलाबतखानाचा स्वभाव कसा काय आहे हें तुला लवकर कळेलच."

आतां हा गृहस्थ कोण होता हें कांहीं आम्हींच वाचकांना सांगितलें पाहिजे असें नाहीं.

यावर गुलशन् म्हणाली ' महाराज ! मलाही तीच आशा आहे.. खुदा जर साहाय्य करील तर थोड्याच काळांत आपली प्यारी आपल्याला या महालांत आणून भेटवीन.. पण महाराज ! आपण जें माझें मकान विकत घेणार होतां त्याचें काय झालें ? '

'माफ कर या वेळीं. मला या वेडामुळें त्याची स्मृति कशी तीं झाली नाहीं.

' बघ ! उदईक प्रथम तुझ्या कामाचा निकाल लावल्यावर दुसरीं कामें हातीं घेईन .!'

' तीं इमारत चांगली हवाशीर जागीं आहे.. जवळ यमुना नदी वहात आहे. मागें व पुढें चांगली बागही तय्यार केलेली आहे.. अशा या इमारतीस मोल तरी आपण काय देण्याचें ठरविलें आहे ? '

' पांच हजार रुपये.. शिवाय तूं माझें काम केल्यावर तीच इमारत तुला नजर करण्याचें माझ्या मनांत आहें..'

' लवंडीवर इतकी महर करण्याचें कांहीं कारण नाहीं ! '

' छे ! छे ! ! तुला लवंडी कोणीं म्हणावें.. तूं तर आतां माझी दिलरुबा झालीं आहेस.. अल्ला जर चाहील तर सर्व माझी जिनगी तुझींच आहे. '

सलावतखांचें हें भाषण संपल्यावर गुलशन्नें तेथून आपलें तोंड कोणीकडे काळें केलें हें कांहीं आम्हांस माहीत नाहीं. परंतु इतकें सांगतों कीं ती एका घोड्यावर बसून मात्र जलदीनें सलावतखांच्या घरांतून बाहेर पडली..

ही गुलशन कोण हें वाचकांनीं जाणलें असेलच..

प्रकरण १० वें.

हीं कोणाचीं वरें दोन पत्रें..

सायंकाळची वेळ.. तारा नुकतीच बागेंतून थोडा व्यायाम घेऊन आपल्या महालांतील पलंगावर एक पुस्तक वाचीत पडली होती. जवळच तिची सखी रंभा एका हातरुमालावर एक गुलाबाचें फूल विणीत बसली होती..

इतक्यांत एका दासीनें महालांत प्रवेश करून आणलेलीं दोन मोठमोठीं पत्रें ताराबाईस दिलीं व म्हटलें. ' कुंवरजी ! बाहेर देवडीवर हरनामसिंह पहाऱ्यावर आहे. त्यानें हीं पत्रें आपणास देण्याकरितां मजजवळ दिलीं. व तो म्हणाला ' हीं पत्रें कोणी दोन यवनी स्त्रियांनीं दिलीं आहेत असें बाईसाहेबास सांग. '

' हीं कोणाचीं बरें दोन पत्रें असावींत ' असे ताराबाईनें मनांत शब्द उच्चारिले व तीं पत्रें फोडतां फोडतां तिला म्हणाली ' झालें तें झालें. परंतु आतां हरनामसिंहास असें जाऊन सांग कीं यापुढें जर कोणीं पत्रें घेऊन आलें तर त्याच्या जवळील पत्रें घेऊन मजकडे पाठवावींत व त्या आलेल्या गृहस्थांस बसवून घेऊन त्याला माझ्या हुकुमाशिवाय सोडूं नये. असेंच सर्व पहारेवाल्यांसही सांगण्याचें विसरूं नकोस. '

' जी हुकुम ' असें म्हणून दासी तेथून बाहेर चालती झाली. ती बाहेर गेली असें पाहून ताराने तीं दोन्हीं पत्रें फोडिलींच. आंत पाहूं लागली तों तिला प्रत्येकांत एक एक तसबीर दिसली. तिनें त्या तसविरी निरखून पाहिल्या. त्यांपैकीं एक दाराची व दुसरी सलावतखानाची तसबीर होती. त्या तसविरीच्या पृष्ठभागीं कांहीं लिहिलें होतें. ताराने तें वाचून पाहिलें. आतां तें काय लिहिलें होतें. हें आम्ही आपल्या वाचकांकरितां मुद्दाम खालीं देत आहों. दाराच्या तसविरीच्या पृष्ठभागीं पुढीलप्रमाणें ताराने उद्देशून कविता लिहिली होती.

तारे ! तुझें मुख किती सुकुमार आहे !
तारे तया बघुनि लज्जित होति पाहे !
तारे ! तुझी तनु सुगौर बघूनि वाटे
टाकील कताकि झुरोनि निजप्रभेतें ! १

नेत्रांस दे सुख किती तव मंदहास्य !
मंजूळ भाषण तसें सुखवी मनास !
वाटे तुझा सुखद-वास सदा मिळावा
आयुष्य-कालहि कधीं न वियोगिं जावा ! २

नांवांतही मधुरता भरली तुझ्या गे !
भी वामवी सतत तें वदनीं शुभांगे !

पुष्पासवीं मधुप लोलुप होय जैसा
त्वन्नामिं मी विरत सुंदरि ! जाण तैसा ! ३

वेली जशी तरुस रोहिणि जैं शशीला
गंगा जशी उदधिला, वसुधा रवीला;
तारे ! तशी मजसि तूं प्रिय कोमलाङ्गे !
प्राणान्तिही हृदयिंचें न च प्रेम भङ्गे ! ४

धावोनि ये झडकरी मज भेट द्याया !
काल प्रिये ! क्षणभरी दवडी न वाया !
झाला पहा ! हृदयिं जागृत पंचबाण !
आलिङ्गनें सुखवुनी करि हेतु पूर्ण ! ५ *

सलावतखानाच्या तसविरीच्या मागेंहि वरील आशयाचें एक लहानसें पद्य होतें.

वरीलप्रमाणें पद्यें तारेनें वाचल्यावर ती रंभेस दाखवून घाबऱ्या स्वरानें ती म्हणाली:—

'सखे रंभे ! हें पाहिलंस कां केवढं मजवर संकट येऊन पडलं आहे तें. यांतून आतां माझी कशी बाई सुटका होणार कोण जाणें ! आतां यापुढं करावं तरी काय हेंच मला कांहीं सुचेनासं झालं आहे. माझं काळीज पाहिलंस कां कसं धडधडतं आहे तें. माझ्या नशिबीं तरी विधात्यानं मेलं काय काय तरी लिहून ठेवलं आहे कोणास ठाऊक. त्या दिवशीं माझं आणि जहांनारेचं काय काय भाषण झालं तें तूं सर्व ऐकलं असशीलच. त्या दिवसापासून इकडे वरचेवर निरानिराळे जिन्नस, कपडे, अंगठ्या वगैरे सारखी येत आहेत. आणि आज तर या पत्रांनीं माझी जी कांहीं तारांबळ उडवून दिली आहे ती कांहीं मला शब्दानं सांगतां येत नाहीं. ती गुलशन् इकडे आली किनई म्हणजे ती जाईपर्यंत माझ्या सर्वांगाचा असा कांहीं थरकांप होऊन जातो कीं तो बाई माझा मलाच माहीत ! आणि तिचें तर येणं नित्य वाढतच चाललं आहे. आतां यापुढं तूं तरी बाई एखादा रामबाण

---

* वरील कविता माझे प्रिय मित्र 'इंदिरारमण' यांनी माझ्या विनंतीला मान देऊन रचून दिली याबद्दल त्यांचे आभार मानल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं.

उपाय शोधून काढ कीं ज्याच्या योगानं तिचं इकडे वरचेवर येणं बंद होईल. तिचं येणं अगदींच बंद करण्यापुरतं सुद्धां मेलं माझ्या अंगीं सामर्थ्य नसावं यापेक्षां दुसरी दुःखाची गोष्ट कोणती बरं असावयाला पाहिजे? या मुसलमानी राज्यांत मजसारखी स्थिति भोगणारी एक तरी स्त्री असेल असं नाहीं मला वाटत. हें बघ मी जर अशाच स्थितींत फार वेळ राहीन तर मला खात्रीनें या दुःखद संसाराची यात्रा संपवून स्वर्गी प्रयाण करणें भाग पडेल !'

'पण तारे ! मनुष्यानें किनई कांहीं तरी धीर धरिला पाहिजे हो ! असं हताश होऊन कसं बरं चालेल ! जरा धीर धर आणि मी जें जें म्हणून तुला सांगत जाईन तें तें खरें आहे असें मानून माझ्या मतानें वागायला सिद्ध हो म्हणजे झालें. तुला ठाऊक आहेच कीं शाहजहान किंवा आपले पिताजी जर या काफराशीं शत्रुभावानें वागतील तर खास त्यांत त्यांना मोठमोठीं संकटें सोसावीं लागतील. तुला त्या दिवशीं मीं सांगितलेलें आठवतें आहे का कीं तुझा मामा अर्जुनसिंह माताजीच्या मनांत तुला राजसिंहास न देतां दाराशिकोहास अर्पण करावें असें भरवून देण्याचा प्रयत्न सारखा करीत आहे. यासंबंधानं अद्याप पिताजींना कांहींच न कळल्यामुळं तें तिकडं चागलसं लक्ष्य घालीत नाहींत. तिकडे तो नीच सलावतखां तर तुझ्या प्राप्तीस्तव रात्रंदिवस खटपट करीत आहेच. म्हणून मी आणखी बजावून सांगतें कीं यापुढें कांहीं एक चिकित्सा न करितां मजवर विश्वास ठेवून मी सांगेन तसें वतन ठेवलेंस तर खात्रीनं मी या दुष्टाची चांगलीच हाडें मोडून तुझ्या प्रियकर राजसिंहाशीं तुझें लग्न लावून देईन.'

'मला सर्व तुझं म्हणणं कबूल आहे. मी तुझ्या बाहेर काडीइतकं सुद्धां जाणार नाहीं. मग तर झालें ना ? पण काय ग रंभे ! त्या दिवशीं माझं व जहांनारेचं जें भाषण झालं त्याचा कधीं तूं विचार केला आहेस काय ?'

'होय त्याचा मीं पूर्ण विचार केला आहे. तिच्या मिष्ट भाषणांत कितपतसं तथ्य आहे हेंहीपण मी पूर्णपणें जाणून आहें. तुला मात्र तिच्या भाषणाचा खरा रोख काय आहे हें मात्र कळलं नसावं असं मला वाटतं.'

'म्हणजे माझ्यापेक्षां तुला अधिक कळलें आहे असाच ना तुझा बोलण्यांतला मतलब ?'

'असें जरी म्हणतां आलें नाहीं तरी तुला तिचें खरें अंतःकरण कसं

आहे याची परीक्षा नीट करतां येत नाहीं हें खास. तीं इकडे तुझ्याशीं मधुर शब्दानें बोलतें आणि तिकडे तुझें लग्न दाराशीं व्हावें ही इच्छा धरून दारास चिथवीत असते, हें तुला कळलें होतें कां? सांग.'

'वा! हें तर मला कधींच कळलें आहे. कारण, जहानारा आंतून दाराला नित्य कोणत्याही गोष्टींत सहाय्य करीत असते. एखाद वेळ शाहाजहान बादशहा दाराचे अत्याचार पाहून त्यावर जर अप्रसन्न झाला तर ती त्याचें समाधान करून दारास क्षमा करायला लावते, हें मी जाणून आहें. शिवाय माझें मन मला नित्य सांगतें कीं 'तूं जहांनारेच्यां मधुर भाषणावर विश्वास ठेवूं नकोस. ती तुला इकडे भुलवून तिकडे दारास चिथवून तुजवर काय प्रसंग आणील हें कांहीं सांगतां येत नाहीं' म्हणून म्हणतें रंभे! याबद्दल तूं पूर्ण विचार कर आणि जें काय करायचें असेल तें करायला तयार हो'

'तूं जरा चुकती आहेस. ऐक, बादशाही महालांत अनेक विवाहित बेगमा, अनेक शहाजाद्या व अनेक गुलाम स्त्रिया, दासी आहेत. या सर्व तूं पाहिल्या आहेसच'

'मग यांचें काय आतां?'

'घाई करूं नकोस. इतक्या स्त्रिया आहेत पण त्यांत एक तरी अशी स्त्री आहे का कीं ती म्हणजे जहांनारेच्या सौंदर्याची बरोबरी करील?'

'नाहीं एकही नाहीं.'

'नाहीं हें तर खरेंच. परंतु विधात्यानें तिच्याहीपेक्षां अधिक सौंदर्यवान् स्त्री जगामध्यें एकच निर्माण केली आहे. कोणती म्हणशील तर ती तूं. म्हणून—

'तारा लाजून जरा रागानें म्हणाली "चल बोलूं नकोस.'

"ऐक, अशा नाजूक कामांत थट्टा करणारी मी स्त्री नव्हे.'

"बरं घटकाभर तुझ्याकरितां मी करतें कबूल. पुढें बोल'

"जहांनारेला आपल्यापेक्षां अधिक सौंदर्यवान् स्त्रीचें आधिपत्य महालांत असावें असें मनापासून मुळींच आवडत नाहीं.'

"वा! ही तर तूं उत्तम गोष्ट सांगितलींस! आतां तुझ्या बोलण्यांतील मतलब सर्व समजले. मला नव्हतें बाई असें यापूर्वी समजलें.'

'आतां तरी तुला काय समजलें तें तर सांगशील कीं नाहीं?'

'जहांनारा रात्रंदिवस बादशाहीची किल्ली हातांत घेऊन शाहाजहानच्या

पुढें उभी आहे. ह्या दारासही आपल्या मुठींतून सोडण्याचा तिचा विचार नाहीं. इतकें करण्याचें कारण, आपल्या सौंदर्यापेक्षां अधिक सौंदर्यवान स्त्रीचें पाऊलही जनानखान्यांत शिरूं नये. '

' शाबास. शहाजहानला त्याची पत्नी मुमताजमहल मेल्यापासून जसें आपल्या अधीन केलें आहें तसेंच त्याच्या पश्चात् दारासही करण्याची तिची इच्छा आहे. '

' असें जर होईल तर मग अर्थात दाराशीं माझा विवाह न करण्याविषयीं प्रयत्न करील. '

' हां मी सुद्धां तेंच समजतें. परंतु सलावतखांची पत्नी न होण्याविषयीं मात्र ती मुळींच प्रयत्न करणार नाहीं. '

' हें कसं काय ? '

' ती रात्रंदिवस तुझें रूप पाहून अंतर्यामीं जळत असते. दाराशिकोहाची बेगम बनण्यापेक्षां तूं त्याची पत्नी व्हावें असें तिला मनापासून वाटत असतें. कां ह्मणशील तर जरी तूं रूपानें मग तिजपेक्षां जास्त अरालीस तरी तुझा दर्जा कमी पक्षाचा होईल. '

' मग दारा बरा स्वस्थ बसेल ? '

' जोंपर्यंत सर्व बादशाही तिच्या ताब्यांत आहे तोंपर्यंत दारा करणार काय ? '

' जरी कदाचित् तिनें या कामीं सलावतखांस सहाय्य केलें तरी सुद्धां त्याला तिच्या विरुद्ध कांहीं करतां येणार नाहीं. हें पहा, नूरजहान नांवाची एक अत्यंत सुन्दर स्त्री होऊन गेली. तिजवर अकबरचा पुत्र जहांगीर फारच आसक्त झाला. हें जेव्हां अकबरास कळलें तेव्हां त्यानें ' नूरजहान जर जहांगीराची पत्नी होईल तर तो तिच्या रूपास मोहित होऊन तिच्या मर्जीप्रमाणें वागेल व आपला सर्वस्वीं घात करून आपलें राज्यही धूळीस नेऊन पोंचविण्यास कमी करणार नाहीं. तेव्हां तिच्याशीं लग्न न लावावें हें बरें, असा पोक्त विचार करून त्यानें नूरजहानचें लग्न अफगानखानाबरोबर लाविलें व त्याला दूरचें (बंगालचें) राज्य दिलें. त्या वेळीं जहांगीरानें अकबरास काय केलें तें दारा शहाजहानास किंवा जहांनारेस करील ? '

" पण इतका जरी अकबरानें बंदोबस्त केला तरी पण शेवटीं जहांगी-रानें तिच्याशीं निका लावला ना पण ? "

" ह्मणजे दारा तुझ्याशीं लावील असें मात्र तूं समजूं नको हो ! " रंभा थट्टेनें ह्मणाली " दाराची बेगम होण्याची राहूं दे पण तूं सलाबतखांची सुद्धां पत्नी होणार नाहींस; हें मी छातीला हात लावून सांगतें. "

" तूं तर मला सर्व सांगून चुकली आहेस. माझा प्राण गेला तरी पत्क-रला; परंतु मुसलमान होऊन कधींही मी आपल्या निर्मल रजपूत कुलाला काळीमा लावणार नाहीं. या मुसलमानाच्या दुष्ट आचरणाची आठवण झाली ह्मणजे किनई रंभे ! माझ्या काळजाचं कसं अगदीं पाणी पाणी होऊन जातं. या वेळीं माझा धर्म संरक्षण करण्याचें श्रेय सर्व तुजवर अवलंबून आहे. तो मामा कसला ? केवळ ' कंस मामा ' च जन्माला आला आहे. तेव्हां तो माझें हित कशाला बरें चिंतील ? या कामीं पिताजी किंवा माताजी जरी आग्रह घेऊन बसले तरी सुद्धां मी त्याचें ह्मणणें कबूल करणार नाहीं. यदा-कदाचित् त्याच्या पुढें माझे सर्वस्वीं उपाय खुंटले तर मी मुसलमान बनण्याँपूर्वीच स्वर्गयात्रा करण्यास निघून जाईन ! "

' माझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत तरी तुला मुळींच भिण्याचें कारण नाहीं. पण तारे ! तूं जी इतकी जिवाला कंटाळलें असें वरचेवर ह्मणत असतेस तें काय ह्मणून ? या संसारांतील कोणत्या सुखाचा बरें तूं आस्वाद घेतला आहेस ? तुझ्या पश्चात् ज्याच्याशीं तुझा विवाह होण्याचें पक्कें ठरलें आहे त्याची काय बरें स्थिति होईल ? '

हें ऐकतांच तारेच्या सर्वांगावर एकाएकीं रोमांच उभे राहिले. ती ह्मणाली " आणखीही एक माझ्या मागें दुसरी चिंता लागली आहेच. एकदा एके ठिकाणीं विवाह होण्याचें ठरलें असतांना मग दुसरीकडे ठरवणें—मग तें स्थळ हिंदूचें असो वा परक्या जातीचें असो—ह्मणजे मोठा अधर्म आहे असें मी निश्चय समजत असतें. परमेश्वरानें जर मला चांगला धीर दिला तर मी जिवंत आहे तोंपर्यंत असल्या अधर्माचें अवलंबन करण्यास कधींही तयार होणार नाहीं ! "

" मी वरचेवर तुला धीर सोडूं नकोस, असं सागत असतां तूं आपली उदास होतेंस. तेव्हां बाई तुला ह्मणावं तरी काय ? तुझ्या या भिण्यामुळं मला

सुद्धां काय करावं हेंच सुचेनासं होतं. थोडा धीर धरलास म्हणजे मी काय काय खेळ करतें ते सर्व तुझ्या नजरेस येतीलच ".

" तुझ्या बुद्धीबद्दल मला पूर्ण भरंवसा आहे; परंतु त्या दिवशीं मला गुलशननें सलावतखांकडून आणलेली अंगठी व दाराकडून आलेले जडावाचे जिन्नस मी नको नको म्हणत असतां तूं मला जबरदस्तीनें स्वीकारण्यास लाविलेंस खरें; परंतु आपण ती योग्य गोष्ट केली नाहीं असें मला अद्याप वाटत आहे. व त्याच्यामुळें माझ्या हृदयांत जी एकदां भीति बसली आहे ती कांहीं केल्या मुळींच जात नाहीं. या वस्तूंचा स्वीकार करायला लावून त्या मुसलमानाच्या कामाग्नीवर घृत ओतण्यास तयार झालीस तें काय म्हणून ? "

' घृत ओततांना मी तो कामाग्नि पेटण्याकरितां त्याला एक फुंकर सुद्धां मारली आहे हें तूं विसरलीस वाटतें ? "

' गुलशन घरीं जात असतांना तूं जी माझी थट्टा केलीस तीच कीं नाहीं ? '

' होय तीच. गुलशननें सुद्धां ती चांगल्या रीतीनें पाहिली आहे आणि तिनें पाहिलें ही गोष्ट सुद्धां फार नामी झाली. '

' तें सर्व खरें पण बाई यापासून एखादा भलताच नाहींना परिणाम घडून यावयाचा ? "

' पुरे कर बाई तुझे हे कुतर्क. अगदींच कशी मेली भोळी निपजलीस. अगदीं आतां गप्प बैस कशी. जें जें होईल तें तें स्वस्थ चित्तानं पहा म्हणजे झालें. "

" परंतु गुलशन किती पाजी स्त्री आहे याचा मात्र पुरता विचार कर हो ! "

' पुन्हां आपली लागलीस भ्यायला. गप्प रहा म्हणते ना ? गुलशनला वाटतं आहे कीं मजसारखी हुशार बायको जगांत दुसरी कोणी नसेल. परंतु तिचे धिंडवडे काढण्याला मला कांहीं फारसा वेळ लागणार नाहीं. ती तुला वश करून घेण्याचे कामीं दारा व सलावतखां या उभयतांस मदत करीत आहे. आणि तिची इच्छा इतकीच आहे कीं तूं दोहोंपैकीं ज्याच्यावर प्रेम करशील त्याला मदत करून दुसऱ्यास अंगठा दाखवायचा. आतां तुझें खरें प्रेम एकावर आहे किंवा दोघांवर आहे हें ती कळून घेण्याकरितांच इकडे वरचेवर येत असते. जर ..... ,

" पण जर तिला आपण आशा लावून ठेविली तर ती राहील मुलखानिराळी पण माझ्या मात्र अब्रूला धक्का बसून कुलाला काळिमा लागेल तो निराळाच. मग तुझे सर्व खेळ एकीकडेच रहातील ! "

" ज्याला तूं खेळ समजतेस त्यापासूनच तुझी अब्रू बचावली तर बचेल. जर तूं जरा धीर धरशील तर मी याच खेळानें तुझ्यावर लुब्ध झालेले नीच भ्रमर कसे जाळ्यांत अडकवितें तें पहा. "

प्रकरण ११ वें

गुलशनचें आगमन.

रंभेचें भाषण पुरें होतें न होतें इतक्यांत एक दासी आली व तिनें कोणी बाहेर स्त्री आली आहे असें सांगितलें.

हें ऐकतांच तारेची मात्र स्थिति बदलली. तिच्या मुद्रेवर भीतीचें चिन्ह दिसूं लागलें. ती जरासा धीर आणून रंभेस ह्मणाली—

' ती दुष्ट गुलशन येऊन पोंचली बरं इथं ! '

' खुशाल येऊं दे तिला. ' असें रंभेनें तिला धीर देऊन ह्मटलें,

" आतां तूं घटकाभर डोकें दुखण्याचा बहाणा करून मी जें कांहीं तिच्याशीं बोलेन तें सर्व पलंगावर पडून ऐक आणि लक्ष्यांत ठेव कीं माझ्या भाषणांत जर कांहीं हास्यकारक भाग आला तर मात्र हंसायचें नाहीं.'

रंभेचें वरीलप्रमाणें भाषण ऐकतांच तारा पलंगावर पडून राहिली व रंभेनें गुलशनला आंत पाठवून देण्याकरितां दासीस आज्ञा केली. चट्कन् दासी बाहेर जाऊन थोड्या वेळांत गुलशनला आंत घेऊन आली. एकमेकींचे रिवाजाप्रमाणें मुजरे झाल्यावर रंभेनें तिला बसण्यास सांगितलें. प्रथम बोलावें कोणीं असा त्यांना प्रश्न पडला. थोड्या वेळानें गुलशननें बोलण्यास सुरवात केली. ती ह्मणाली—

' आज बाईसाहेबांची प्रकृति थोडी नादुरुस्त आहे वाटतें ? '

' होय, काल रात्रभर तिला त्या तसबीरीवर विचार करण्यानं जागरण झाल्यामुळें आज जरा तिचें कोठें डोकें दुखतें आहे ! '

" या कुणाच्या बरं तसबिरी आहेत ?— "

'तें कळेल पुढं. प्रथम मला हें सांग पाहूं कीं तारेची अब्रू म्हणजे तुला कांहींच वाटत नाहींना ?'

'काय आपण हें बोलतां आहां ! माझ्याकडून कांहीं अपराध झाला आहे कीं काय ?' गुलशन जरा घाबरून म्हणाली.

'अपराध करून सवरून वर मलाच आणखी विचारतेस कीं मजकडून काय अपराध झाला ? चांगलं. चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात, तें कांहीं खोटें नव्हे. दारा व सलावतखांच्या तसबिरा तारेकडे उघड रीतीनें पाठवायास जीं तूं सिद्ध झालीस त्यापूर्वी कांहीं थोडा विचार केला होतास का ? त्या तसबीरा केवळ इकडेच येऊन राहिल्या नाहींत. चाकरनोकरांनीं सर्वांनीं त्या पाहून त्यांवर तर्कवितर्क निघाल्यावर इकडे आमचे हातीं दिल्या. तारा म्हणजे बाजारांतील कोणी उंडगी रांड असेंच तुला वाटतेना ?' रंभेनें विचारलें.

'काय, काय हें आज आपण बोलतां आहां ? खुदाकसम मीं या तसबिरा आपल्याकडे पाठविल्या नाहींत. येवढेंच नाही तर यापूर्वी मीं या तसबिरीं पाहिल्या सुद्धां नसतील. असें करून ताराबाईच्या अब्रूस धक्का लावण्यांत मला कांहीं तरी फायदा आहे काय ? आतां हा पाजीपणा कोणा दुष्टानें केला असल्यास तो मला कसा बरें कळावा ?'

'तूं आपला गुन्हा लपवूं पहात आहेस; परंतु तो लपणार नाहीं हें खास. प्रत्यक्ष जिनें या तसबिरी आणून दिल्या तिनेंच तर स्पष्ट सांगितलें आहे कीं, 'या तसबिरी गुलशाननें बाईसाहेबास देण्याकरितां मुद्दाम मला पाठविलें आहे. म्हणून सांग' तेव्हां आतां तूंच या तसबिरी पाठविल्यास असें सिद्ध झालेना ?'

'काय म्हणतां, या दोन्ही तसबिरा एकाच दासीनें आपल्याकडे आणून देऊन मीं पाठवून दिल्या, असें सांगितलें ?'

'होय. यांत खोटें बोलण्याची काय बरें मला जरूर ?'

हें ऐकतांच गुलशनचा चेहरा फिक्का पडला. तिला आतां पुढें उत्तर तरी काय द्यावें, हेंच मुळीं सुचेना. ती आत्मगत म्हणाली 'झाली ती गोष्ट चांगली झाली नाहीं. मीं पाळीपाळीनें निरनिराळ्या दासींकडून या तसबिरा बंद करून पाठविल्या असतां या दोन्ही मला एके वेळीं मिळाल्या असें ही म्हणतें हें काय ? यांत त्यांनीं पाजीपणानें पत्रें फोडून तर यांच्या

हातांत दिल्या नसतील ना ? पण हें तरी मीं खरें कशावरून मानावें ; यांत रंभेचाच कांहीं तरी दोष असला पाहिजे— '

' कां आतां मुग्ध कां बसलीस ? ' रंभा जरा दटावून म्हणाली ' झालें ते झालें. यापुढें तरी आतां संभाळ. म्हशा वागण्यानें खास तुझें व माझें नुकसान झाल्यावांचून रहाणार नाहीं. '

' मी होतां होईल तितकी नीट वागतें आहेंच; परंतु आपण काय म्हणतां हेंच मला कांहीं कळत नाहीं. '

' तारेचे एका घावांत दोन तुकडे करण्याचा जिचा मनापासून इरादा आहे तिला हें कसें बरें कळावें ? '

' आज आपण हें भलतं भलतं काय बोलतां ? '

' एकटी स्त्री कधीं दोघांची पत्नी होऊं शकेल काय ? ' गुल्शनच्या भाषणाकडे दुर्लक्ष्य करून रंभा म्हणाली ' तुझी मनापासून इच्छा कीं, तारेनें दारा आणि सलावतखान या उभयतांशीं विवाह करण्यास तयार व्हावें.'

' हें आपण कदाचित् कल्पनेनें जाणत असाल. माझी इच्छा पुष्कळ आहे परंतु बाईसाहेब माझ्या इच्छेप्रमाणें थोड्याच वागणार आहेत ? त्यांना दोघांपैकीं जो प्रिय वाटेल त्यासच त्या वरण्यास तयार होतील. '

' बरं तें राहो. आतां तारेनं कोणास पसंत करावं अशी तुझी इच्छा आहे ? '

' माझी खरी इच्छा म्हणाल तर त्यांनीं शहाजाद्याबरोबर विवाह लावण्यास तयार व्हावें. अशा करण्यानें कधीं तरी त्या सर्व हिंदुस्थानची बादशाहीण होण्याचा सुयोग खास घडून येण्याचा रंग आहे. '

' तसें नाहीं. सलावतखांशीं विवाह लावून घ्यावा असा तारेचा विचार आहे. '

' असं कसं ? ' गुलशन साश्चर्य म्हणाली ' कुठें हिंदुस्थानची बेगम आणि कुठें एका भिकाऱ्याची पत्नी ? या करण्यांत—'

' ऐक. मी एक विचारतें त्याचं उत्तर दे पाहूं. तुला एखाद्या बादशहाची बेगम करून त्या बादशहाची व तुझी कधीं गांठ पडून दिली नाहीं तर ते बेगमेचें ऐश्वर्य तुला पसंत पडेल किंवा एखाद्या गरीबाची बायको होऊन त्याची प्रीति संपादून आनंदांत रहाणें पसंत पडेल ? '

'आपण विचारतां त्यांपैकीं शेवटचेंच खरें आहे; परंतु आपण हें कां विचारतां हें कांहीं मला समजत नाहीं.'

'बेगम झाल्यावर काय काय सुखें मिळतात, हें सर्व मी समजून आहें. बेगम हो यांत जीं कांहीं सुखें लाभतात त्यांपेक्षां एखाद्या भिकाऱ्याचीं बायको होऊन त्याचें निर्मल प्रेम संपादण्यांत पुष्कळ सुखें आहेत असें आम्ही समजतों.'

'तें कसें?'

बहुतेक राजपुत्रांचें व बादशहांचें प्रेम काय तें स्वरूपावर अवलंबून असतें. स्वरूप नाहींसें झालें कीं ते भ्रमरवृत्ति पतकरून दुसऱ्या स्वरूपवान् स्त्रीचा शोध करीत भटकतात. दुसरी स्त्री मिळतांच त्यांना मग पहिल्या स्त्रीची पर्वा नसते. ते तिच्या सुखदुःखाकडे दुर्लक्ष्य करतात. या वेळीं त्या स्त्रींत आणि कारागृहांत टाकलेल्या कैद्यांत विशेषसें अंतर आहे काय? नवऱ्यानें दुसरी स्त्री केली म्हणजे पहिलीनें सवतीमत्सरांत कुजत पडण्यापेक्षां गरीबाची पत्नी होऊन अखंड सुखांत नांदणें उत्तम नव्हें काय? यांत सवतीमत्सर किंवा अप्रेमाचा वांटा तरी पदरीं येत नाहीं. म्हणून म्हणतें कीं सलावतखांचें महालांत रहाण्यांत जें सुख आहे तें सुख दाराचे जनानखान्यांत मुळींच नाहीं. आज दाराच्या जनानखान्यांत किती तरी स्त्रिया दुःखांत पडल्या आहेत! पण त्याप्रमाणें सलावतखानच्या महालांत एक तरी दृष्टीं पडते आहे काय?'

'इतका दूरवर विचार करून काय करायचा?'

'कां बरं करूं नये? ज्याच्याशीं आपली जन्मभर गांठ पडणार, ज्याच्यापासून आपल्याला विविध सुखें मिळणार त्याबद्दल दूरवर विचार केलाच पाहिजे. आतां इतका विचार करून जर कांहीं मनाविरुद्ध घडून आलें तर परमेश्वराची इच्छा!'

'तें मला कबूल आहे. पण समजा ताराबाईनीं सलावतखांशीं विवाह लाविला आणि पुढें त्यांना कळून आलें कीं आपल्याला काहीं सवती आहेत तर मग त्या दुःखीकष्टी नाहीं कां होणार? मग त्या वेळीं मात्र त्यांना वाटेल कीं आपण बेगम झालों असतों तरी बरें झालें असतें.'

'बरी मुद्यांत सापडलीस!' (उघड) 'हें सांगितलेंस ही गोष्ट फारच

चांगली झाली. मग आतां मला वाटतं तिनें बेगमच बनावें व मी तिला तसें करण्याचाच आग्रह करीन. '

' माझी सुद्धां तीच इच्छा आहे. '

' पण जरा थांब. शहाजाद्यानें कदाचित् तारेला सोडून दुसरीशीं लग्न लाविलें तर ताराही दारास नालायक ठरवून दुसऱ्याशीं लग्न लावील. '

' बेगम बनल्यावर मग असें कसें करतां येईल ? '

' असें जर नाहीं करतां येणार तर मग सलावतखांशीं लग्न लावणेंच मला विशेष पसंत पडतें. या करण्यानें कदाचित् सलावतखांशीं पटलें नाहीं तर पुन्हां त्याला सोडून बेगम बनतां येण्यासारखें आहे. '

' यांत आपण माझी थट्टा तर नाहीं करीत ? '

' छे ! छे ! ! ' रंभा हंसून झपाली ' तूं दोघांनाही या कामीं भुलवून ठेव मग मी पुढें तुला तिचें कोणावर अधिक प्रेम जडलें आहे, हें अवश्य कळवीन. '

' कांहीं हरकत नाहीं. आतां बरीच वेळ झाली आहे. तेव्हां जातें तर मी. "

रंभेनें तिला जाण्यास मुसती मानेनेंच परवानगी दिली.

प्रकरण १२ वें.

जागीण.

अष्टमीची रात्र. भगवान् कुमुदबांधव विस्तृत परंतु निरभ्र नील आकाशमंडळीं विराजमान होऊन आपल्या सभोंवार चमकत असलेल्या असंख्य रोहिणीप्रमुख तारागणांसह स्मितवदन क्रीडा करीत आपलीं कोमल परंतु सुधाधवल किरणें पृथ्वीवर सोडून आनंदी जनांस आनंद व दुःखी जनांचें सांत्वन करीत आहे. अशा या रमणीय समयीं मरुद्राज सुगंधी पुष्पांतिल गंध चोरून घेऊन जिकडे तिकडे स्वैर नृत्य करीत आहे. सर्व प्राणिमात्र गाढ निद्रेच्या अधीन झाल्यामुळें जिकडे तिकडे शांततादेवीचें पूर्ण साम्राज्य पसरलें आहे. क्वचित् प्रसंगीं आग्रा शहरांतील रक्षणीच्या शिपायांचे ओरडण्यानें शांततेचा भंग होत आहे. अशा या

चित्ताल्हादक शान्त वेळीं यमुनेच्या काठीं असलेल्या भव्य इमारतीच्या उजव्या बाजूस एक तरुण स्त्री यमुनेकडे तोंड करून बीन वाजवीत बसलेली दिसत आहे. ती एका वृक्षाच्या शीतल छायेमध्यें असल्यामुळें तिचा पोशाख कसला आहे हें मात्र चांगलेंसें ओळखतां येत नाहीं. परंतु आपण आतां ज्यास्त चौकशी न करितां तिला जोगीण असें संबोधूं. ऐका. आतां ती पहा कर्णमनोहर एक पद्य म्हणत आहे:-

अतिभव्य नील गगन मना मोहवी कसें !
उगवोनि इन्दु सौंदर्या वाढवीतसे । ध्रु० ।
अतिचंड किरण हेम वसन मित्र दिनपति ।
या गगनमंडला क्रमुनी श्रांत हो किती !
जणुं सांगरांत मज्जनार्थं येई खालती ।
अस्तंगत पाहून रवि दुन्दु येतसे ! अतिभव्य०
नभि चंचल या स्फुरति पहा तारका किती !
प्रियसंगमास उत्सुक त्या फार भासती ।
उदयगिरीं स्वपति बघुनि फार हर्षती !
आलिंगन द्यावया परि स्थल न सोडिती । अतिभव्य०
किति रजनिनाथ नयन मनोरम जगीं अहा !
आश्लेषुनि तृप्त करी कामिनि स्पृहा ।
अति केलि करुनि तृप्त होति मानिनी पहा !
स्वस्थाना सोडुनि त्या येति भूतलीं । अतिभव्य०
शशि कोलि रमणिसह गगनीं विविधशा करी
नव पंकजास हंसावितसे निज करें सरीं
प्रतिबिंब पडत चंद्राचें हे तदंतरीं
करण्या जलकेलि जणूं उतरला दिसें । अतिभव्य०
अतिशांत समय बघुनि असा—

वरील ओळ संपते न संपते इतक्यांत कोणी एक तरुण तिच्या गायनाला मोहित होऊन तेथें आला. पुढें ती गायनाला आरंभ करणार तोंच सतारीची एक तार तुटली. अर्थात् तिचें गाणें थांबलें. व त्या तरुणाला गायन ऐकण्यास मिळालें नाहीं. जोगीण सतारीची तार तुटलेली पाहून ती बांधूं लागली. जोगीण गात नाहीं हें पाहून तो तरुण तिला म्हणाला " हे सुकु-

मारसुंदरि ! ज्या मधुर गायनानें तूं माझें मन आकर्षून इकडे भला निद्रावस्थेंतून आणिलेंस तें गायन गाणारी तूं कोण बरें असावीस ? '

' तूं तरी कोण आहेस ? ' जोगिणीनें जरा कुर्‍यांत विचारलें.

' मी कोणी कां असेना. याची तुला पंचाईत ? मी तुझ्या या अद्वितीय गायनामृताला मोहित झालेला एक भ्रमर आहें. याच्याकडून तूं आपली थोडी बहुत सेवा करून त्याला आपलें अधरामृत प्राशन करण्यास देऊन त्याची तृप्ति करशील तर मोठी बहार होईल. या ठिकाणीं तूर्त कोणी नाहीं व आतां इतक्या अपरात्रीं कोणी इकडे येणारही पण नाहीं. तेव्हां मग उशीर कां करतेस ? तूं लावण्यलतिका आहेस. मला सोडून जर इतरत्र जाशील तर येथील दुष्ट लोक तुझें हें सौंदर्य लुटून तुझी अब्रु चवाट्यावर नेतील. इतकें करून घेण्यापेक्षां तूं म..... '

' माझ्या अब्रूबद्दल नको आहे तुला काळजी घ्यावयाला ! तुझी आणि माझी आजपर्यंत ओळख नाहीं. शिवाय या वेळपर्यंत मीं तुला पाहिलें नाहीं किंवा तूंही पण मला पाहिलें नाहींस. आणि एकदम तूं मजबरोबर सलगी करण्यास तयार होतोस म्हणजे तूं जनावर आहेस कीं कोणी राक्षस आहेस ? '

' कोणी कां असेना, तूं माझी लालसा तृप्त करण्यास तयार हो म्हणजे झालें. '

' या घटकेस ज्यास्त कांहीं न बोलतां आपले तोंड काळें कर पाहूं येथून ! '

' एकूण तूं या घटकेला माझा कलेजा थंड करीत नाहींस तर ? '

' नाहीं, साफ नाहीं. यापुढें आतां तूं जबरदस्ती करणार कीं काय ? '

' प्रसंग आल्यावर तीही करण्यास मी मागें पुढें पाहणारा मनुष्य नाहीं. '

' शहाजहानच्या राज्यांत तरी निदान अशा गोष्टी होणें अशक्य आहे. '

' हं ! विचारतो कोण बादशहाला असल्या क्षुल्लक बाबतींत ! शिवाय या वेळीं तो मला पकडायला तरी थोडाच येणार आहे आपला जनानखाना सोडून ! '

असें बोलून तो नीच मुसलमान त्या जोगिणीच्या स्तनयुग्मावर हात टाकणार तोंच तिनें त्याच्या छातींत अशी जोरानें लाथ मारली कीं त्या सरशी यमुनेच्या जलांतच त्यानें शेवटची समाधी घेतली ! तो काफर बुडला असें पाहून जोगिण म्हणाली ' असल्या नीच लोकांचें वेळींच तोंड फोडलें पाहिजे ' असें म्हणून पुन्हां ती आपली सतार चांगल्या रीतीनें लावून गाऊं लागली:—

* * *

शशि ओति अमृतरस किरणीं आज भवरी
प्रतिवस्तु रजतपूर्ण जणूं आज हा करी
विलसोनि चंद्र सारितसे सवाल तम दुरी
धरणी रविकरतप्ता क्षीरिं न्हातसें अतिभव्य०

नाभिं काय चमत्कार दिसे हिमकरावरी
धन ऐक येइ तेजरहित स्यास कीं करी
तम गाड प्रसर पावुनियां राहि भूवरी
देखुनि मज अंतरिं हें दुःख होतसें ! । अतिभव्य०

परमेश ! विश्व निर्मुनि तूं करिसि नाशही
नच शाश्वत मुळिं वस्तु कशी एक भूवरी
टिकतें न सतत वैभव हें लाभल्यावरी
अभिमाना व्यर्थ धरिति जन मनीं कसें ! । अतिभव्य०

कृति थोर तुझी लाजविते उद्धतां जनां
प्रति वस्तुमाजिं वससि सदा हे दयाघना !
अतिदीन जंतु सपटेच पतितपावना !
भूतळिं या पाहि जरा सदय तूं कसें ! । अतिभव्य०

क्षिति मरणाधीन जनां विफल या तृषा
भुलतात मोहमय जगता सुज्ञ जन मृषा
मज कळत सर्व हें परि मी जडमती असा
संसृतिमृगसलिलातें भुलुनि जातसें ! । अतिभव्य०

वरील पद्य संपतांच आणखी एक तरुण तिच्या जवळ येऊन उभा राहिला. तिनें त्याला पाहिलें आणि म्हटलें ' कां आपल्यालाही त्या गृह-स्थासारखी स्वर्गाची वाट धरण्याची इच्छा आहे वाटतें ? '

' छे छे. मीं व ते पलीकडून येत असलेलें दाराशिकोह आपल्याच संरक्षणाकरितां इकडे आलों आहोंत. '

' एकूण मी प्रत्यक्ष ते येत असलेले दाराशिकोहच पहात आहें. ह्मणावयाचं. '

' होय बाईसाहेब. '

इतक्यांत तेथें दारा येऊन पोंचला. त्याला पहातांच जोगिणीनें अदबीनें लवून मुजरा केला व हात जोडून त्यांस ह्मटलें " महाराज, माझा गैरसमज झाल्यामुळें मीं आपणांस या वेळपर्यंत आपण कोणी तरी नीच गृहस्थ असाल असें मानींत होतें; तर आतां आपण याबद्दल क्षमा कराल असें वाटतें.. "

' हरकत नाहीं. तुझा अपराध क्षम्य आहे. तूं त्या गृहस्थास योग्य शिक्षा दिलींस हें पाहून मलाही संतोष वाटत आहे.. मीं आपल्या महालाच्या गच्चीवरून तुझें सर्व कृत्य पाहिलें.. त्या वेळींच मला वाटलें कीं तूं कोणी साधारण स्त्रीपैकीं नसावीस.. कांहीं हरकत नसल्यास तूं आपली सर्व हकीकत मला सांगशील कां ? '

" आपल्याजवळून कां मला माझीं हकीकत चोरून ठेवायची आहे ? "

" बरं तर, चला माझ्या महालाकडे तुझी मर्जी असल्यास.. '

असें ह्मणून त्यानें जोगिणीला आपल्या महालांत नेलें..

प्रकरण १३ वें..

ही जोगीण तरी होती कोण ?

दारा जोगिणीसह आपल्या महालांत आल्यावर तो आपल्या पलंगावर पडला व त्यानें जोगिणीला एका चौकीवर बसायास सांगितलें. काहीं वेळानें दारानें सांगितल्यावरून जोगीण आपली जन्मकथा सांगूं लागली. ती ह्मणाली ' महाराज ! आपल्या कृपेनेंच आज मीं या महालांत आलें आहें मी मुलतानची रहाणारी, मी जातीनें मुसलमानीण आहें. माझें जन्मस्थान नामीनजूमी. त्याच ठिकाणीं एका वस्तादाजवळ मी गाणें शिकलें. त्याच्या सहवासांत मी आनंदानें रहात असे. पुढें त्यानेंच माझें एका साधारण

प्रतीच्या मुसलमानाशीं लग्न लावून दिले. माझे पति जरी गरीब होते तरी मला त्यांच्या सहवासांत काडीइतका त्रास सोसावा लागला नाहीं. आह्मी मोठ्या प्रेमानें रहात होतों. परंतु एके दिवशीं मुलतानच्या सुभेदारानें मला कुठेंसें पाहिलें आणि तेव्हांपासून तो मजवर इतका आसक्त झाला कीं मजशिवाय त्याला कामकाज सुचेना व अन्न गोड लागेना. त्यानें एके दिवशीं मध्यान्हींच्या सुमारास आमचे घरांत शिरून माझ्या पतीला माझ्या मोहाच्या पायीं ठार मारलें. त्या वेळीं मी पतीजवळ नव्हतें; मी आपल्या वस्तादाचे घरीं एकदोन दिवस रहावयाकरितां गेलें होतें. मी जर त्या ठिकाणीं असतें तर त्या सुभेदारानें कामज्वराच्या वायुलहरींमध्यें मला खास भ्रष्ट केलें असतें. पतीची निधनवार्ता माझ्या कानीं लवकरच येऊन पोंचली ती पोंचतांच मग मी जोगिणीचा वेष धारण करून जीव घेऊन पळून इकडे आलें. इकडे येण्याचा मूळ हेतु इतकाच कीं शहाजहान बादशहास भेटून आपली स्थिति सांगावी व त्या सुभेदाराची चांगलीच खोडकी जिरविण्याची त्यांच्याकडून तजवीज करावी.'

'असें जर आहे तर या कामीं मी तुला मदत करण्यास तयार आहें. कांहीं काळजी करूं नकोस. बरें यापूर्वी तूं कधीं आग्र्यास आली होतीस काय?'

'नाहीं सरकार, आजच मी इकडे आलें आहें. रात्रीचा समय, त्यांतून आग्र्यांतील सरया मला माहिती नाहींत. सबब मी यमुनेच्या तीरीं जरा करमणूक व्हावी एवढ्याचकरितां बीन काढून गात बसलें होतें. इतक्यांत—

'पुढील सर्व मला माहित आहे'.

'महाराज, ज्याअर्थीं आपण मला पुढें साहाय्यकारी होणार त्याअर्थीं आपण मला कांहीं प्रश्न केल्यास मी त्यांचीं सविस्तर उत्तरें देणार आहें. मी एक जोगीण असून भविष्यवादीही आहे.'

'काय ह्मणतेस?' दारा साश्चर्य ह्मणाला 'हें जर खरें आहे तर मी त्यासंबंधानें तुला प्रश्न विचारणार तेंच सविस्तर सांग पाहूं'.

यावर जोगिणीनें आपली झोळी कांखेंतून काढून जमीनीवर ठेविली व त्यांतून एक कागद व कोळसा बाहेर काढून तोंडानें कांहीं पुटपुटून ती त्या कागदावर कांहीं विलक्षण लिपींत लिहूं लागली व कांहीं वेळानें ह्मणाली.—

' महाराज ! आपल्या मनांत कोणा रजपूत कन्येशीं विवाह करावयाचा आहे. '

(आत्मगत साश्चर्य) ' हिनें तर माझ्या मनांतील बरोबर ताडलें. तारा रजपूतकन्याच आहे. '

' शिवाय तिच्या नांवाचें आद्याक्षर ' ता ' असें आहे.

(आत्मगत) होय, हेंही खरें आहे.

' तिचे आईंबाप या ठिकाणींच अम्मलदार आहेत. '

" पुढें. "

' तिच्या बापाच्या मनांत तिचें लग्न कोणा एका रजपूत सरदाराशीं करावयाचें आहे. परंतु तिच्या मामाचे व आईचे मनांत तिला सरकारची बेगम बनवावें असें आहे. '

' ही जें सांगते आहे तें अक्षरशः खरें आहे. अर्जुनसिंहास मीं प्राधन करणार आहें अशी लालूच दाखविल्यामुळें त्यानें तारेच्या आईचें मन आपल्यास अनुकूल करून घेतलें असावें खास, असें यावरून सिद्ध होत आहे. दारा ' आत्मगत म्हणाला.

' ती बाह्यात्कारीं जरी आपला अत्यंत तिटकारा दाखविते तरी अंतर्यामीं आपलीच बेगम व्हावें अशी ती इच्छा करीत आहे '.

(आत्मगत आनंदानें) ' वा ! हीं तर अजब गोष्ट कळली म्हणायची. काल गुलशाननें तरी मला हेंच सांगितलें. '

' ही जरी गोष्ट खरी आहे, तरी पण महाराज आपल्याला तिच्याशीं आणखी दोन वर्षें लग्न लावतां येणार नाहीं. यापुढें जर आपण लग्न कराल तर आपला बेत खात्रीनें सिद्धीस जाईल. यापूर्वी जर उतावळीनें तें करूं लागला तर मात्र आपल्या गळ्यास फांस बसल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां सावध रहां. '

' आग लागो तुझ्या त्या भाषणाला ! ' दारा रागानें म्हणाला ' या अल्ला ! आम्ही दोन वर्षें कशीं बरें काढावींत ? आतां पुढें आणखी काय काय सांगते ते तर आधीं ऐकूं ' (उघड) ' बरें पुढें ' ?

आपण आपल्या चित्तहारिणीला वश करून घेण्याकरितां ज्या कुंटि-

णीची नेमणूक केली आहे तिच्या नांवाचें आद्याक्षर ' गु ' असें आहे. यापुढें आपण जर तिजवर विश्वास ठेवाल तर मात्र फसाल.

' काय, काय ह्मणालीस ? '

' ज्या स्त्रीवर आपण फिदा झालां आहांत त्याच स्त्रीवर आणखी एक गृहस्थ झाला आहे. त्याच्या नांवाचें आद्याक्षर ' स ' असें आहे. आणि त्या आपल्या प्रतिस्पर्ध्यानेंही तिला वश करून घेण्याचे कामीं आपल्याच कुंटिणीला नेमलीं आहे. ती कदाचित् त्याच्या नादानें आपणाला फसवील. '

' ही जें सांगते आहे त्यांत मला कांहीं खोटें दिसत नाहीं. ' दारा मनाशीं ह्मणाला.

' या पृथ्वीमध्यें आपली खरी हित चिंतणारी एकच स्त्री आहे. कोणती ह्मणाल तर ती स्त्री आपल्या मनोहारिणीजवळ रात्रंदिवस रहात असते तिच्या नांवाचें अ——

' नको नको तें सांगाण्याची येथें मुळींच गरज नाहीं. '

' आतां आपल्याला कांहीं यापेक्षां अधिक विचारायचें असेल तर विचारावें. '

' प्रथम तूं सांगितलेस कीं माझ्या प्रियकरिणीचें लग्न तिच्या पित्याच्या मनांत एका रजपूताशीं लावण्याचा विचार आहे. तो रजपूत कोण ? '

' तो कोणी हिंदुस्थानांतील एक उच्च कुलांतील रजपूत आहे. त्याचें ' रा ' या आद्याक्षरानें नांव सुरूं होतें. '

' त्याच्याशीं तिचें लग्न होईल काय ? '

' आपण जर दोन वर्षें तिच्याशीं लग्न लावण्याकरितां दम धराल तर त्याबरोबर होणार नाहीं व जर का जबरदस्तीनें आज उद्यां इतक्या अवधींत तिला आपली बेगम करण्याचा प्रयत्न कराल तर मात्र ती आपणांस न मिळतां तिचें लग्न त्या रजपूताशींच होईल व आपल्याला मात्र उतावळीपणाचा पश्चात्ताप भोगावा लागेल. '

' बरें ते राहो. आतां मला बहीण माऊ किती आहेत हें सांगूं शकशील काय ? '

' त्यांत काय मोठेंसें अवघड आहे ? मलाच काय पण सर्व जगाला सांगतां येईल कीं आपणास आपल्या तीन माऊ व तीन बहिणी आहेत. '

' आतां माझ्या बहिणींचें मत मजविषयीं कसें काय आहे ? '

' महाराज ! असले प्रश्न मला न विचाराल तर बरें पडेल. कारण, आतां मी जें सांगणार त्यावर कदाचित् आपला विश्वास बसणार नाहीं. '

' छे, छे, अशी गोष्ट होणार नाहीं. तूं जें सांगशील त्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. '

' आपल्या बहिणींपैकीं धाकटी बहीण चैनी आहे. ती नेहमीं नटत मुरडत असते. तिला कोणाची पर्वा नाहीं. मधली आपल्या एका भावाच्या तरफेंची आहे व सर्वांत मोठी आपल्या तरफेंची आहे '

' जी माझ्या तरफेंची आहे, तिला मीं त्या हिंदूस्त्रीशीं लग्न करावें हें पसंत आहे काय ? '

'प्रश्नाचें मान आतां फार वाढत चाललें. या सर्व प्रश्नांचीं सविस्तर उत्तरें देणें मला अशक्य आहे. '

' छे छे, या प्रश्नाचें उत्तर तर तुला दिलेंच पाहिजे. '

' कांहीं हरकत नाहीं. परंतु या कामीं जबरदस्ती मात्र उपयोगाची नाहीं. '

' पण या प्रश्नाचा जबाब तूं द्यावास हें बरें. '

' पण महाराज, मीं जर जबाब दिला तर तो आपल्या वर्मी तर नाहींना लागणार ? '

' असें जर असेल तर राहूं दे. ' थोडा विचार करून दारानें जोगिणीस सांगितलें ' खरोखर आज तूं माझ्या मनांतील प्रत्येक विचाराची सविस्तर उत्तरें देऊन ज्योतिषविद्येचें नांव राखलेंस. '

' महाराज, मीं काय राखिलें ? माझ्या पतीनें मला जी विद्या शिकविली त्या विद्येनें राखिलें. '

' असो, आज मी तुझ्यावर अत्यंत प्रसन्न झालों आहें. खात्रीनें तुझा शत्रु मुलतानचा सुभेदार यास मी चांगलीच शिक्षा देऊन तुला सुखी करीन. मला आजपर्यंत नव्हतें वाटलें कीं भविष्यवादी इतके हुशार असतात व ते सर्व मनांतील बरोबर सागतात. त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट ही कीं तूं मुसलमान आहेस. हीच विद्या एखाद्या हिंदूनें माझ्यापुढें दाखविण्याचा यत्न केला असता तर मला चांगलें वाटलें नसतें. '

' आपल्याला आतां ही दासी विनवीत आहे कीं वेळ बराच झाला.

आपली झोंपमोडही झाली तेव्हां आतां यापुढें तरी न व्हावी. तर आतां आज्ञा मिळावी. जातां जातां एवढेंच सांगतें कीं आपली प्रियकरीण खास आपल्याला भेटेल. '

' काय, काय ह्मणतेस ? '

' आतां मी त्याची पुनरावृत्ति करीत नाहीं परंतु उदईक आपल्याला माझ्या भाषणाचा अनुभव येईलच. '

' बरें, आतां यापुढें तूं आह्माला केव्हां भेटणार ? रहाणार कोठें ? तुझी कांहीं हरकत नसेल तर आह्मी तुझ्या रहाण्याची येथेंच व्यवस्था करूं. '

' महाराज ! विशेष जरी माझी हरकत नाहीं तरी पण मला सरईत रहाणें विशेष प्रशस्त वाटतें. आतां मी आपणास दर महिन्याच्या पहिल्या तारखेस याच वेळीं त्याच जागीं भेटेन. जातें आतां मी. '

' यदाकदाचित् आह्मांला मध्यंतरीं तुझी गांठ घ्यावीशी वाटल्यास तूं भेटणार कोठे ? '

' असाच जर प्रसंग येऊन ठेपला तर आपण यमुना नदीच्या उजव्या बाजूच्या दर्यांत एक माझ्या नांवाची चिठ्ठी लिहून टाका ह्मणजे मी आपल्याला यावेळीं त्या जागीं भेटेन. '

' ठीक आहे. परंतु जातेवेळीं कांहीं हरकत नसल्यास एखादी चीज गाऊन जा पाहूं. '

' आज्ञा महाराज ' असें ह्मणून जोगिणीनें आपलें बीन चांगलें लावून गाऊं लागली:—

उमाधवा ! त्वन्मूर्ती मजसि गमत नेत भया बहु दुरी
नाम तुझ फार गोड
पुरवी जें सकल कोड
विमळ चरण कमळ जोड—देई मागतें तरी
करिसि खळ-प्राण-हरण
मारुनि तव दिव्य बाण
करिति तुझें नित्यभजन—त्यासि तूं सुखी करी.
मूर्ति रम्य नयनिं ठरत
तवचरणीं लीन होत
कर जोडुनि तुज विनवित—ईप्सित मम पूर्ण करी.
उमाधवा ! त्वन्मूर्ती—

जोगीण वरील अप्रतिम गाणें, कर्णमधुर व मंजुल स्वरांत गात असतांना दारा तर तें ऐकण्यांत गुंग झाला. व गाणें संपतांच त्यानें प्रसन्नांतःकरणानें मोहरांनीं भरलेली पिशवी देण्यास पुढें केली; परंतु त्या निस्पृही जोगिणीनें तिचा स्वीकार केला नाहीं. ती ह्मणाली " मला ही घेऊन काय करावयाचें आहे ? यापासून मला यत्किंचित् सुख मिळण्याचें बाजूला राहून उलट त्रास मात्र सोसावा लागेल. " असें ह्मणून ती आपलें चंबूगवाळें आवरून घेऊन दारास आदबीनें लवून मुजरा करून जाऊं लागली. ती जात असतांना दारा तिला ह्मणाला ' तुला शहराची माहिती नाहीं तर आपल्याबरोबर एखादा शिपाई घेऊन जा— '

' काय करायचा आहे ? ज्या परवर दिगरानें या अनोळखी नगरांत सुखरूप आणून आपल्यासारख्यांची गांठ घालून दिली तो मला सरई दाखविण्यास नाहीं का येणार ? '

' तूं ह्मणतेस तें कांहीं खोटें नाहीं. परंतु तुझा अस्सल मदतगार तर तुझ्या अगदीं मुठींत— '

जोगीण:—' बल्कि अँगुलीकी एक पोरही मे है. '

जोगीण येथून निघाली तों ती हळूहळूं यमुनेच्या किनाऱ्यावर येऊन पोंचली. तेथून ती भरभर पावलें टाकीत व कोणी आपल्यावर पाळत राखून आपल्या मागोमाग येत आहे किंवा काय हें वरचेवर मागें वळून पहात पुढें चालली होती. तिच्या मागोमाग कोणीही या वेळीं येत नव्हतें व दारानेंही तिजवर पाळत राखण्याकरितां कोणास इशारा केला नव्हता. यदाकदाचित जर दारानें तिच्या मागें कोणास पाठविलें असतें तर तिला मात्र कोणत्या तरी मशीदीमध्यें रहावें लागलें असतें. अशी सर्वांस भिणारी ही जोगीण तरी होती कोण ?

अरे ! पण हें काय झालें ? ही जोगीण दुसरीकडे न जातां अमरसिंहाच्या बागेंत शिरून ज्या भागांत तारा कोणाची मार्गप्रतीक्षा करीत होती तिकडे काय ह्मणून झपझप पावलें टाकीत जात आहे ? आतां तर ती रंभा बनली आणि तारेजवळ येऊन उभी राहिली. वाचकहो ! याचा सर्व उलगडा आपणच करून घ्याल तर चांगलें होईल.

जोगीणीला जवळ उभी राहिलेली पाहून तारेनें तिच्या गालाचें मोठ्या

प्रेमानें चुंबन घेतलें व तारा तिला कांहीं उतावीळपणानें विचारूं लागली. 'सांग सांग लवकर काय झालें तें. कसकसें सकटाचें निवारण केलेंस !'

'थोडा मला विसावा तर घेऊं देशील ? मग सगळें हळूं हळूं सांगतें. अशी कांहीं आग भडकून दिली आहे कीं ज्याचें नांव तें. आज दोघां अतिथींचें आदरातिथ्य मात्र करावयाचें आहे.' रंभा म्हणाली.

वाचकहो ! आतां आपण यांना येथेंच सोडून जरा दुसरीकडे वळूं या.

प्रकरण १४ वें.

चक्रव्यूहाची तयारी.

तारेचें पुनर्दर्शन झाल्या दिवसापासून सलावतखान तर पूर्ण वेडाच बनला होता. त्याला कांहीं एक करावेंसें वाटेना. अन्न तर मुळींच गोड लागेना. रात्रंदिवस 'तारा' या नामाक्षराच्या जपापुढें त्याला कांहीं सुद्धां सुचेनासें झालें. तो जगांतील सर्व सुखें एका तारेंशिवाय असार मानूं लागला. त्यानें गुलशनच्या मतीनें तारेची प्राप्ति करून घेण्याबद्दल खटपट चालविली होती. परंतु त्यांतही लवकर यश येईलसें त्याला वाटेना. वरचेवर तो गुलशनला बोलावून आणी व तिला तारेकडील हकीकत विचारी. परंतु तिनें जर कां एखाद वेळ नकाराचा पाडा गाइला तर बरीक तो हताश होई. परंतु त्यानें तिचा अभिलाष सोडला होता कीं काय ?

अमरसिंहाकडे तारेचें दर्शन मिळावें एतदर्थ वरचेवर जाण्याचा त्याचा उपक्रम चालूंच होता. परंतु तिचें दर्शनच काय पण तिचें नख सुद्धां दृष्टीं पडणें त्याला कठिण झालें होतें. कारण, सलावतखान आतां पूर्वीसारखा नाहीं हें तोरेला पूर्णपणें कळून चुकलें होतें. तेव्हां ती होतां होईल तों आपलें मुख त्याच्या नजरेस न पडेल याविषयीं चांगलीच खबरदारी घेई. तिनें देवडीवर एक स्वतंत्र दासी ठेविली होती. तिनें केवळ सलावतखां आल्याची वर्दी मात्र आंत येऊन द्यावी, एवढेंच तिच्याकडे काम सोंपविलें होतें. हें करण्याचें कारण इतकेंच कीं आपण रात्रंदिवस पडद्यांतच कांहीं लपून रहात नाहीं. वेळेनुसार इकडे तिकडे जावें लागतें. एखाद वेळ बाहेर पडलों आणि

एकदम सलाबतखां आपला पुढें दस्त ह्मणून जर उभा राहिला तर आपली तारांबळ व्हायची. तीं न व्हावी ह्मणून त्या दासीनें बाहेर सलाबतखान येतांच आपल्याला येऊन प्रथम कळवावें. ह्मणजे पुढें त्रास पडणार नाहीं. अशा बंदोबस्तानें तारा नित्य वागत असल्यामुळें सलाबतखां नित्य अमरसिंहाच्या घरून हिरमुष्टी होऊन जाई !

पूर्वी सलाबतखांस लढाईचें नांव ऐकल्याबरोबर स्फुरण चढे; परंतु आतां आतां तर तारेचें वेड लागल्यामुळें तें ऐकतांच त्याला माथाशूल होई. एके दिवशीं दाक्षिणेंत लढाई सुरू झाल्यामुळें अमरसिंहानें त्यास लढाईवर येतोस कां ? असें विचारलें असतां तो कपाळाला आठ्या घालून ह्मणाला " या लढाईंत काय अर्थ आहे ? व्यर्थ लोकांचे व आपले हाल काय ह्मणून करून घ्यावेत ?" अशा रीतीचीं उडवाउडवीचीं उत्तरें ऐकून भोळ्या अमरसिंहास त्याविषयीं काडीइतका संशय आला नाहीं. तो येत नाहीं असें पाहून अमरसिंह मात्र लढाईवर निघून गेला.

सलाबतखानाचें आपल्या घरीं येणें दिवसेंदिवस अधिक वाढत आहे हें पाहून तारा एके दिवशीं सर्व लाजलज्जा सोडून देऊन आपल्या मातेस ह्मणाली ' आई ! या दुष्ट सलाबतखानाचें येणें जर तूं बंद न करशील तर बाई मी आत्महत्या करण्याला मागेंपुढें पहाणार नाहीं. तो पापी मला वरचेवर जिन्नस नजराणे ह्मणून पाठवून देतो. आजपर्यंत अंगठ्या, कपडे आणखी कितीतरी जिन्नस त्यानें पाठविले असतील ! मी ते नित्य नाकारीत तरी मेला लोचट ते पाठवायाला कांहीं कमी करीत नाहीं. त्याचे तर पत्रें पाठवीत असतो. हें कांहीं नाहीं बाई मला सहन होत तेंव्हां आतां एक माझी तरी आशा सोड; नाहींतर त्याचें आपल्याकडे अजीबात बंद कर. '

तारेच्या मातेनें (चंद्रावतीनें) तिचें सर्व भाषण ऐकून घेतलें त्याला त्यावेळीं थोडा धीर देऊन तिनें रात्रीं अमरसिंहाची एकांतांत भेट घेऊन करलेला प्रकार सर्व निवेदन केला. तें ऐकून सलाबतखांच्या गोड गोड भुलणारा भोळा अमरसिंह उडवाउडवी करून ह्मणाला ' सलाबतखान माझा परमस्नेही आहे. त्याच्या वर्तनाविषयीं मुळींच कोणी कुशंका नयेत. त्यानें तारेला पत्र पाठविलें ह्मणून काय झालें? आपण कन्येला

पत्र पाठवीत ? मित्राची कन्या तीच आपली नव्हे काय ? समज सलावतखांस जर एखादी कन्या असती तर मी तिला पत्र पाठविलें नसतें काय ? '

अरेरे ! बिचाऱ्या अमरसिंहास कोठून कळणार कीं सलावतखान तारेला जीं पत्रें पाठवितो व मोल्यवान् जिन्नसा नजराणा म्हणून पाठवितो तें केवळ मित्राची कन्या असें समजून नव्हे ! !

ताराबाईकडे मुळींच डाळ शिजत नाहीं हें पाहून सलावतखानास जरी वरचेवर हताश होऊन बसण्याची पाळी येई तरी पण त्याचें मन तिच्या लोभापासून पराङ्मुख होईना. मदनज्वाला दिवसेंदिवस अधिक जोरानें भडकूं लागल्यामुळें त्याच्या सर्वांगाचा सारखा दाह होऊं लागला. तारेला केव्हां एकदां भेटेन आणि आपला दाह कमी करीन असें त्याला झालें होतें. अशा भरांत तो एके दिवशीं अमरसिंहाकडे आला असतां त्याला त्यानें विचारलें ' आपण मला कोणत्या रीतीनें लेखीत असतां ? '

अमरसिंह म्हणाला ' मित्र ज्याप्रमाणें एकमेकांस लेखतात त्याप्रमाणें '.

' असें जर आहे तर मी विचारतों त्या प्रश्नाचें उत्तर द्या पाहूं. '

' विचारा काय तें. आपल्याला मी आपल्या सख्ख्या बंधूप्रमाणें जाणत असतां आपण विचारलेल्या प्रश्नाचें मी उत्तर न देईन असें कधीं झालें आहे काय ? '

' हें ऐकून सलावतखांनें आपलें बहकत असलेलें मन मोठ्या कष्टानें एकाग्यावर आणून विचारलें ' आपली कन्या तर आतां उपवर झालेली तिचें आहे. मग तिच्या विवाहाची तजवीज कां बरें अद्याप करीत नाहीं ? '

अमरसिंह हंसून म्हणाला ' सर्व कांहीं ठरलें आहे. आतां केवळ विवाहक्रम चाहूर्तच ठरायचा राहिला आहे. मेवाडचा प्रसिद्ध महाराण्याच्या पुत्रास पडणें त्यार्पण करण्याचें ठरलें आहे. त्याचें नांव राजसिंह असें आहे. '

हें तारेला तांच सलावतखांचें डोकें दुखूं लागलें. तो एकदम त्याला म्हणाला त्याच्या नाहीं. ज्या माळावर ज्याचा अधिकार आहे त्यालाच तो देणें योग्य एक स्वतंत्र काफराला काय म्हणून ताराबाईस देतां ? माझा अधिकार असतां भांत येाइयाशीं कां लग्न लावून देत नाहीं ? यांत आपल्याला हरकत ती काय अशी वाटत आहे ? मला नाहीं वाटत तुम्ही माझ्या याचनेस धुडकावून लावेल काय, मुसलमानाला रजपूतांनीं आपल्या मुली दिल्या नाहींत काय ? '

अंरेरे ! त्या दुष्टाला वरील शब्द उच्चारतांना लाज तरी कशी वाटली नाहीं ? आपण जातीनें मुसलमान आणि हें धडधडीत तिच्या वापाशीं काय बोलतों आहोंत, याचा त्यानें कांहीं विचार केला होता काय ? रजपुताच्या मर्मावर डाग देण्यासारखें आपण बोलावें किंवा नाहीं हें त्या कामांधाला—यवनकुलकलंकाला—काय कळणार ? जो गृहस्थ एका रजपूत स्त्रीशीं लग्न लावण्याच्या हेतूनें तिला स्वजातीपासून भ्रष्ट करूं पहातो तो नर तरी कसला ? इतका प्रकार जरी झाला तरी त्याबद्दल अमरसिंहास कांहीं सुद्धां वाटलें नाहीं. उलट तो त्याची समजूतच करूं लागला. धन्य आहे त्या अमरसिंहाची ! त्या बिचाऱ्यानें सलावतखानाला निर्मलान्तःकरणानें उपदेश केला म्हणून त्यानें कांहीं मनावर घेतला म्हणतां कीं काय ? उलट त्याची तारेच्या प्राप्तीविषयीं लालसा अधिक वाढत मात्र चालली. त्याच्या डोक्यांत कालरूपी पिशाच्चानें जर वास केला होता तर मग त्यांत अमरसिंहाचा उपदेश ऐकून थोडा तरी प्रकाश कोठून पडणार ? तो संतापानें उठून आपल्या घरीं चालता झाला. जातांना एवढेंच म्हणाला ' अमरसिंहा ! आजपासून तूं माझा पुरा हाडवैरी आहेस असें मी समजतों. आतां तुझी माझी मैत्री संपली. तारेच्या प्राप्तीविषयीं जर कांहीं माझ्या मनाविरुद्ध करशील तर तूं मोठ्या चक्रव्यूहांत अडकून मेलास म्हणून समज. '

जातां जातां या कृष्णसर्पानें अमरसिंहावर आपली गरल टाकल्यामुळें पुढें पुढें अमरसिंहाच्या शरीराचा अधिकाधिक दाह वाढूं लागला.

सलावतखांचा हेतु हा कीं अमरसिंहास कोणत्या तरी उपायानें एखाद्या खड्ड्यांत वालून तारेला आपल्या हस्तगत करावी. परंतु त्याचा हेतु लवकरच सिद्धीला जाईल असें चिन्ह दिसेना. अमरसिंहास बादशाहाच्या दरबारीं अनेक शत्रु होऊन बसले होते हें मागें एका प्रकरणांत वाचकांना कळविलेलें आठवत असेलच. त्या कांहीं शत्रूंकडून अमरसिंहास येथून उडवावें असा विचार सलावतखानें केला होता; परंतु तो शेवटास गेला नाहीं. पुढें सहज त्याला असें सुचलें कीं अमरसिंहास मिळालेल्या नागोद परगण्याच्या सरहद्दीवर करणसिंह आहे, त्याची आपण चांगली मैत्री संपादन करून त्याला अमरसिंहावर चालून जाण्याकरितां भर घालावी व अशा रीतीनें त्याला त्रास देऊन अत्यंत जर्जर केलें म्हणजे आपला लग्गा साधेल. असा विचार करून त्याप्रमाणें त्यानें चक्रव्यूह रचला व तो रंगांत येण्याचेंही सुचिन्ह दिसूं लागलें.

तिकडे अमरसिंहाचें व करणासिंहाचें भांडण लावून दिलें व इकडे सला-वतखांनें बादशहास येऊन सांगितलें कीं, 'हें भांडण उपसून काढण्यांत सर्वस्वीं अंग अमरसिंहाचें आहे. आपआपसांत भांडण उपस्थित करण्यांत त्यास काय शहाणपणा वाटला कोण जाणें !' हें सांगण्याचा त्याचा हेतु एवढाच होता कीं या योगानें तरी शहाजहान त्याला कामावरून दूर करील व अर्थात् अमरसिंह असें झालें ह्मणजे आमच्या तोंडाकडे पहात राहील मग आमचा हेतु सिद्धीस जाण्यास उशीर काय आहे ? सलाबतखान अशा तऱ्हेनें मनीं मांडे व स्वप्नीं पुऱ्या खुशाल खात होता !

शहाजहान बादशहानें विशेषेंसं सलाबतखानच्या सांगण्याकडे लक्ष्य पुरविलें नाहीं; परंतु अमरसिंह व करणसिंह यांच्या मधील वैमनस्य मोड-ण्याकरितां मात्र त्यानें एक मुसलमान सरदार नागोदपरगण्याच्या हद्दीवर पाठवून दिला. यामुळें पुढें सलाबतखांस मनांतील हेतु सिद्धीस जाईल असें न वाटल्या-मुळें स्वस्थ मनगटें चावीत बसणें भाग पडलें. परंतु त्यानें अमरसिंहाची पाठ मात्र शेवटपर्यंत सोडली नाहीं !

एंका तारेच्या पार्यीं अमरसिंहास दोन कट्टे शत्रु झाले. एक सलाबतखान व दुसरा त्याचा मेहुणा अर्जुनसिंह. आतां अर्जुनसिंह अमरसिंहाचा शत्रु कां बनला याचा थोडासा उल्लेख आह्मीं एकदा केला आहेच !

लोभाच्या पार्यीं मनुष्य काय न करील ? तो लाजलज्जा, आप्त, इष्ट, मित्र, आईबाप यांना सुद्धां विचारीत नाहीं. आपलें काम झालें ह्मणजे झालें असा विचार करून तो जें कृत्य करायला योग्य नाहीं असें करण्यास तयार होतो. त्याचप्रमाणें अर्जुनसिंह आपल्याला दारा बादशहा होतांच प्रधानकीचीं वस्त्रें मिळणार या लोभानें तो तारेस दाराला देण्याविषयीं खटपट करूं लागला. यांत अमरसिंहास धक्का पोंचून चंद्रावती (त्याची बहिण) रंडकी झाली तरी पतकरली, पण ताप्रा दारास देऊन त्याचा पुढें प्रधान होणार असा त्याचा निश्चय ठरला होता. लोभाचीं लक्षणेंच मुळीं अशीं आहेत.

लोभात्क्रोधः प्रभवति लोभात्कामः प्रजायते ।
लोभान्मोहश्च नाशश्च लोभः पापस्य कारणम् ॥

आतां यांपैकीं अर्जुनसिंहाच्या अंगीं किती उत्पन्न झालीं होतीं हें पुढें पाहूं.

प्रकरण १५ वें.

शहाजहान बादशहा.

दोन प्रहरची वेळ. शहाजहान बादशहानें खाना वगैरे आटोपल्यावर जहांनारेस बुद्धिबळाचे दोन डाव खेळण्याकरितां हांक मारिली. जहांनाराही चटकन् डाव खेळण्यास तयार झाली. त्यांचा डाव थोड्याच वेळांत रंगांत आला. त्यामध्यें जहांनारेनें बादशहावर ताण मारली. त्यांत बादशहाचें कांहीं चालेना. शेवटीं तो अगदीं कंटाळून त्यानें तिला डाव पुरे करण्यास सांगितले. जहांनारेनें बुद्धिबळांचा पट दूर सारला. नंतर शहाजहान तिला ह्मणाला—

'राव करणसिंह आणि राव अमरसिंह यांच्यामध्यें तूर्त बरीच धुमश्चक्री चालली आहे. ते उभयतां माझे चांगल्यापैकीं सरदार आहेत. त्यांच्यामध्यें अशी व्यर्थ लठ्ठालठ्ठी चालणें मला मुळींच इष्ट नाहीं. ज्या रीतीनें त्यांचें भांडण मिटेल त्या रीतीनें प्रयत्न करणें माझें कर्तव्यकर्म आहे, असें मी समजतों.'

'आणि माझीही तीच इच्छा आहे. मला वाटतें नागोद परगण्याच्या सरहद्दीवर कोणा तरी चांगल्या सरदाराची नेमणूक केल्यास तो या उभयतांचें भांडण मिटवील.' जहांनारा ह्मणाली.

'तूं ह्मणतेस तें मला कबूल आहे.'

'परंतु यांत आपल्याला यश येईलसें वाटत नाहीं.'

'तें काय ह्मणून?'

'या भांडणांत सलावतखांचें मुख्य अंग आहे.'

'हें काय तूं ह्मणते आहेस हेंच मला अद्याप कळलें नाहीं.'

'सलावतखां आतांशा अमरसिंहाशीं चांगल्या रीतीनें वागत नाहीं. अमरसिंहाची गर्दन मी केव्हां उडवीन असें त्याला झालें आहे. त्याचें मन अमरसिंहाच्या तारेवर गेलें आहे व एवढ्याच कारणामुळें तो त्याच्याशीं वैरभावानें आंतून वागत असतो व करणसिंहाला अमरसिंहाविरुद्ध भांडण्यास सुद्धां तोच कारण आहे. ज्या ज्या रीतीनें अमरसिंह फसेल तीं तीं षड्यंत्रें सलावतखान त्याच्या हातून घडवून आणीत आहे.'

'हें तूं सांगते आहेस तरी काय भलभलतें!'

' आपल्याला भलतेंच सांगून मला त्यांत काय बरें फायदा आहे ? या-संबंधानें मला बरेच दिवस सर्व कळलें आहे. योग्य संधि आल्याशिवाय तें आपणास यापूर्वी मला सांगतां आलें नाहीं. '

' यापूर्वीच जर हें मला कळतें तर तेव्हांच त्याचा बंदोबस्त केला असता. मध्यंतरीं एकदां सलावतखानें कांहीं अमरसिंहाविरुद्ध मला सांगितलें होतें त्याकडे मीं मुद्दामच दुर्लक्ष्य केलें होतें. आतां मात्र तसें करतां कामा नये. हें पहा जहांनारे ! या वेळीं तूंच बादशाहीण आहेस आणि राज्याचीं सर्व सूत्रें तुझ्या हातीं आहेत अशी कल्पना करून सांग पाहूं आतां सरहद्दीवर कोणत्या सरदाराची रवानगी करावी कीं जो सरदार सलावतखांची मिजास चालूं देणार नाहीं. '

' या कामीं योग्य झटला झणजे अबदूल अजीजखान आहे. तो इमानी, सत्यभाषणी, पक्षपातानें न्याय न करणारा असा आहे व तोच सलावतखांची खोडकी चांगली मोडील. '

' कांहीं हरकत नाहीं. यालाच आपण तिकडे रवाना करूं. पण काय गे जहांनारे ! अमरसिंहाच्या तारेचा विवाह जगत्सिंहाचे चिरंजीव राजसिंह यांच्या बरोबर होणार आहे असें ऐकतों; तें खरें का ? '

' होय, मी सुद्धां असेंच ऐकतें. '

' हें जर खरें असेल तर सलाबतखांनें तारेवर नजर ठेवणें मुळींच योग्य नाहीं. शिवाय अमरसिंह कट्टा रजपूत आहे. सलावतखान जर असें करील तर अमरसिंहानें त्याचें नाक कापण्यास का बरें तयार न व्हावें ? '

' महाराज, आपण त्याला ताकीद द्या. '

' अवश्य दिली पाहिजे. पण आणखी एक गोष्ट मी तुला विचारतों. दारा सुद्धां झणे तारेवर लुब्ध होऊन तिच्याशीं विवाह करण्यास तयार झाला आहे, हें खरें काय ? '

' यासंबंधानें अद्यापपर्यंत मला नाहीं बाई कांहीं कळलें '. चतुर वाचकांनों ! जहांनारेच्या बोलण्याकडे जरा लक्ष्य द्या.

' यदाकदाचित् मीं जें ऐकलें तें जरी खोटें ठरलें तरी पण एकदां तारेचें लग्न राणा जगत्सिंहाच्या पुत्राशीं ठरलें असतां त्यानें तिच्याशीं लग्न लाव-

ण्याकरितां तयार होऊन जगत्सिंहास अगर अमरासिंहास सहन न होईल असलें कृत्य करावें असें मला मुळींच पसंत नाहीं. यदाकदाचित् हा विवाह जगत्सिंहाच्या येथें कायम झाला नसता तर मी खात्रीनें दारासच तारा मिळावी याबद्दल तजवीज करण्यास तयार झालों असतों. काय समजलीस!"

"आपण ह्मणतां तेंच खरें. मेवाडच्या कट्ट्या रजपूत लोकांना चिडविण्यांत काय अर्थ आहे? उलट गळ्याला फांस लावून घेण्याची पाळी मात्र येईल."

"ऐक. माझा आणि रजपूत लोकांचा काय संबंध आहे त्याबद्दल तुला थोडक्यांत सांगतों. मीं दिल्लीच्या गादीवर बसण्यापूर्वी पुष्कळ त्रास भोगला आहे व त्या त्रासांतून सुटण्याकरितां मला हे रजपूत वीरच वेळप्रसंगीं उपयोगी पडले. मेवाडचा महाराणा करणसिंह आणि कांहीं इतर रजपूत वीर माझे परम स्नेही असल्यामुळें माझ्या भावांना राज्यावर बसूं न देण्याविषयीं ते खटपट करीत. जेव्हां मीं आपल्या पित्याबरोबर युद्ध केलें त्या वेळीं माझा पराजय होऊन मला दूर पळून जाणें भाग पडलें. या वेळीं तरी मला करणसिंहाशिवाय कोणींही मदत केली नाहीं. पुढें आमचे वडील परलोकीं गेले तेव्हां मी गुजराथमध्यें होतों. त्या वेळीं जगत्सिंहानें मला आपल्या राज्यामध्यें बोलावून नेलें. मींही पण त्या वेळीं आपल्या खऱ्या मदतगार जगत्सिंहाच्या राज्यांत येण्याबद्दल मुळींच आढेवेढे घेतले नाहींत. अहाहा! काय त्या दिवशींचा तो आमचा थाट! तो मी कधींही विसरणार नाहीं. जगत्सिंहानें मजकरितां सुंदर राजवाड्यांत मोठा दरबार भरविला, त्या वेळीं दिल्लीचे मोठमोठे सरदार अमीर उमराव वगैरे बरेच लोक हजर होते. मी मध्यपीठावर बसतांच मला सर्वांनीं 'शहाजहान' या नांवानें संबोधिलें.

इकडे पित्यानें स्वर्गलोकीं प्रयाण करतांच नूरजहाननें शेर अफगनखानच्या जावयाला ह्मणजे माझ्या भावाला बादशहाचे गादीवर बसविण्याबद्दल ज्यारीनें खटपट चालविली होती. या वेळीं जहांगीरचा थोरला मुलगा मेला होता. मेला हें चांगलेंच झालें. कारण, तो अगदींच मूर्ख होता. जहांगीरच्या मनांत मीच गादीवर बसण्यास योग्य आहें व मीं त्याच्या पश्चात् बसावें असें होतें. परंतु हें नूरजहानला मुळींच पसंत नव्हतें. ह्मणून ती शहरयारला गादीवर बसविण्याची तजवीज करीत होती. परंतु मी त्याच्याशीं लढून शेवटीं शहरयार यास ठार मारिलें व नूरजहानला कैदेंत टाकिलें.

इकडे मी मेवाडांत शहाजहान असें नाम धारण करून निघणार तोंच

मला नूरजहानचा भाऊ वजीर आजम आसिफखान यानें—ज्याच्या हातीं सर्व बादशहीचीं सूत्रें होतीं—मला दिल्लीस बादशाही गादीवर असण्याकरितां बोलाविलें व मीही तोंडानें खुदा खुदा करीत दिल्लींत प्रवेश केला व दिल्ली-च्या गादीवर आरूढ झालों.

आतां तूंच सांग कीं ज्यांनीं मला दिल्लीचें राज्य मिळावें या हेतूनें खटपट केली व माझें मोठमोठ्या संकटांतून प्राण वांचविले त्यांना म्हणजे जगत्सिं-हाला या वेळीं त्याच्या मनाविरुद्ध गोष्ट करून आपण त्यास त्रास देणें चांगलें आहे काय ? मी रात्रंदिवस विचार करीत आहें कीं या जग-त्सिंहानें आपणावर अनेक उपकार केले आहेत. तेव्हां ते कोणत्या रीतीनें फेडावेत ? खरोखर मी त्यांचे अनंत उपकार मेल्यावर सुद्धां विसरणार नाहीं. ”

“ आपलें म्हणणें अगदीं योग्य आहे. ”

“ रात्रंदिवस मी रजपूत लोकांना प्रिय अशाच गोष्टी करीत असतों. त्याचें कारण इतकेंच कीं ही बादशाही जी आज कायम आहे ती केवळ त्यांच्या जीवावरच. त्यांचें मन जर कां एकदां मुसलमानाविषयीं फिरलें तर या बादशाहीचा अंत होण्यास फार काळ लागणार नाहीं. ”

“ मग तर मी दारास बजावून सांगतें कीं, अमरसिंहाच्या कन्येवर तूं नजर ठेवूं नकोस. ”

“ तूं तर सांगच पण मीही त्याची चांगली कानउघाडणी करतों. तिकडे सलाबतखानलाही कांहीं धाकदपटशा दिला पाहिजे. नाहीं तर तो भलतेंच करून बसेल. मी आजच अमरसिंहास विचारितों कीं, आपण मुलीला कोणी-कडे देण्याचें ठरविलें आहे ? ”

“ मीही तारेची भेट घेऊन तिला तुझें मन कोणावर बसलें आहे ? तुला दारा आवडतो काय ? असें विचारीन. ”

“ अवश्य विचार. बरें, आज कांहीं आणखी अधिक उणी बातमी ? ”

“ कांहीं नाहीं. ”

प्रिय वाचकहो ! जहानारेनें तारेचा पक्ष घेऊन दारास काय काय उत्तरें दिलीं व तारेशीं कसकसें भाषण केलें हें सर्व आम्हीं मागें सांगितलें आहेच. तें सर्वांना स्मरत असेलच.

मागिल प्रकरणीं लिहिल्याप्रमाणें शहाजहाननें नागोद परगण्याच्या सरहद्दीवर अमरसिंहाचें व करणसिंहाचें पुनः युद्ध न व्हावें एतदर्थ जो सरदार पाठविला त्याचें नांव अबजुल अजीतखान. शहाजहाननें सलावतखानास अमरसिंहाच्या तारेंविषयींचा नाद सोडण्याबद्दल पुष्कळ सांगितलें. परंतु 'उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये' अशी स्थिति झाली !

जहानारेनें आपल्या चातुर्यानें व अर्जुनसिंहानें आपली धूर्तता दाखवून दाराशिक्कोहास कसें भुलवून सोडलें; व सलावतखांनें अमरसिंहाच्या तारेकरितां क्षय, काय, खटपट केली व या सर्वांवर कसकशी रंभेनें ताण केली, हें सर्व समजून घेण्याकरितां वाचकांनीं आतां थोडासा दम धरावा हें बरें.

प्रकरण १६ वें.

येथेंच अंत झाला !

रात्र बरीच झाली होती. इतक्या रात्रीं गुल्शन सलावतखानाच्या महालांतून बाहेर पडली व आपल्या गाडींत बसून आपल्या घरीं आली. या वेळीं तिची झातारी गुल्शनची वाट पहात घरांत बसली होती. इतक्यांत गुल्शनची गाडी वाजलेली पाहून तिनें दार उघडलें व गुल्शनही घरांत आली. येतांना तिनें घराचें दार चांगलें लावून घेतलें. व आपण पलंगावर जाऊन पडली.

गुलशनच्या घरांत तिच्या झातारीशिवाय दुसरें कोणी नव्हतें. हे वाचक जाणत असतीलच. तिचें नांव सागण्याचीं कांहीं जरूर नाहीं. गुल्शन ज्या कांहीं गुप्त बातम्या सांगे त्या फक्त आपल्या झातारीसच. गुल्शन पलंगावर पडल्यावर कांहीं वेळानें तिची झातारी तिच्या जवळ येऊन तिला पंख्यानें वारा घालून झणाली "बाळे ! इतक्या रात्रीं तूं बाहेर जाऊं नकोस असें मी सांगतें तरी तूं आपली ऐकत नाहींसच. तूं किनई बाहेरून रात्रीची लवकर आली नाहींस झणजे माझें काळजाचें कसें अगदीं पाणी पाणी होऊन

जातें तें तुला काय सांगू ? अमुक ठिकाणीं मी जात आहें असें तरी मला जातांना सांगून जात जा ह्मणजे मला काळजी लागणार नाहीं. ”

‘ आई, तूं किती ग वेडी आहेस ? मी आतां इतकी कां लहान आहें कीं, जरा मला उशीर झाला कीं, तुला त्याची भीति वाटतें. पण कायग, आजच तुला इतकी कां भीति वाटली ? जेव्हां मी आठआठ दहादहा दिवस कोठें गेलें आणि जरा मोहरा मिळवून आणतें तेव्हां कशी बरें तुला माझी काळजी वाटत नाहीं ? उलट मी जर तशी रिक्त हातानें आलें तर मात्र मला शिव्यांच्या लाखोली वहातेस. चल चालती हो येथून; मला आतां कांहीं सांगू नकोस. ’

‘ बाळे ! असें काय तें अगदीं ’ तिच्या तोंडावर प्रेमभावानें हात फिरवून, ‘ आज कोणा राक्षसाबरोबर विहार केलास कीं काय ह्मणून तुझी अशी स्थिति झाली ? माझें तुजवरील खरें प्रेम किती आहे ह्मणून काय सांगू ? शिवाय ही जी संपत्ति मीं हाडाचीं काडें करून मिळविली आहे ती कशाकरितां ? ती मी आपल्याबरोबर का कबरीमध्यें घेऊन जाणार आहें ? ही कांहीं दिवसांनीं तुझीच आहे. ’

“ चल चालती हो कशी येथून, उगीच वटवट किती करतेंस ? मला घटकाभर निजूं देतरी. ” असें ह्मणून तिनें ह्मातारीला लाथेनें दूर लोटली व ती तिच्याकडे पाठ करून निजली व बिचारी ह्मातारीही बडबड करीत तेथून निघून गेली.

एके दिवशीं रात्रीं गुल्शन व तिची ह्मातारी अशा दोघीच घराच्या गच्चीवर बसल्या होत्या व गुल्शन हंसत हंसत ह्मातारीला कांहीं सांगत असतां मध्येंच ह्मणाली “ काय मम्मा ! माझी कशी चलाखी आहे ती तूं पाहिलीस काय ? ”

“ जिच्याकडून तूं ही कला शिकलीस तिला जर तूं विचारीत नाहींस तर मला ती ऐकून काय करायची आहे ? ”

‘ पण ऐक तूं ह्मणतेस तें सिद्धीस जाईल हें जरी खरें आहे तरी पण मी जें सांगतें तें लक्ष्यांत ठेव. तुझा जो बंगला सलाबतखांनें विकत घेण्याचें ठरविलें आहे तो ह्माला विकत दे. पुढें तारेला त्या बंगल्यांत पळवून आणली कीं तूंही त्याच्याबरोबर तेथेंच रहा. आणि एके दिवशीं चांगली संधि साधून त्या दोघांस टाक मारून आणि त्यांच्या जवळ जी कांहीं माल-

मत्ता असेल ती इकडे घेऊन ये आणि मनास वाटेल ती चैन करीत बैस. '

' माझ्या सुद्धां मनांत तेंच आहे. सध्यां त्यांना आपल्या येथील जवाहीर द्यावें आणि पुढें त्यांना मारून इकडे यावें. '

' आणखी हें साधून दाराचेंही मन राखतां येईल. '

' सध्यांच शहाजाद्याला मीं आपलासा केला आहे. इतकी कीं माझ्यापुढें त्याला कांहीं बोलतां येत नाहीं. वरचेवर मला इनामेंही मिळतात. तेव्हां असें तर सिद्ध झालें कीं मी सलावतखानास मदत करतें आहें हें मुळींच त्याला माहीत नाहीं. हें तरी एक उत्तम झालें आहे. खुदा जर मजवर खैर करील तर पुढें मागें कधीं तरी दारालाही– ' .

इतकें ती बोलते आहे तोंच तिच्या घराचे दरवाजे फोडून भयंकर कृष्ण वर्णाचे चौघे धिप्पाड पुरुष आंत आले व तिला आवेशानें ह्मणाले, ' प्रथम तुलाच याबद्दल शिक्षा देतों ' अमें ह्मणून त्यांनीं जास्त चौकशी न करितां गुलशनची व तिच्या ह्मातारीची गर्दन उडविली. असे हे दुष्ट लोक तरी कोण होते ? कोणीं पाठविले होते ? ते–पण ' ते ' आतां पुढें.



रजपूत कुमारी.

भाग २ रा.

प्रकरण १ लें.

महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख.

जहानारेनें ताराबाईची तसबीर अशारफखानाकडून काय म्हणून तयार केली होती? ती तसबीर अशारफखानानें केली आहे असें दारास कळलें असून नुरुद्दीन मारला गेला हें काय? हा नुरुद्दीन होता तरी कोण? जहानारेशीं व अशारफखानाशीं त्याचा संबंध काय होता? सलावतखानाजवळ तारेची तसबीर कोठून आली? जहानारेची नजर सलावतखानावर इतकी करडी असण्याचें कारण काय? हें सर्व समजून घेण्याची आमचे वाचकांना बरीच उत्कंठा लागली असेल. तेव्हां प्रथम एक जहानारेविषयीं आख्यायिका लिहून आम्ही तिकडेच वळतों.

जहांनारा अद्वितीय सुंदर असल्यामुळें तिचें तें सौंदर्य जणूं काय तिला कोणत्याही कार्यांत विजयी करून देण्याला एक अमोघ अस्त्रच परमेश्वरानें दिलें होतें. तिचा तो उज्ज्वल मुखचंद्रमा, ते तिचे विस्तृत परंतु चंचल नेत्र व तिची ती अंतःकरणाला मोहविणारी कोकिलावाणी हें सर्व कोणीं जर एकसमयावच्छेदेंकरून पाहिलें तर तो खात्रीनें तिला वश झाल्याशिवाय रहात नसे. जहानारेशीं घटकाभर तरी आपणास भाषण करण्याचा प्रसंग यावा असें दरबारांतील प्रत्येक बड्या मनुष्यास वाटत असे. एखादे वेळीं त्या लोकांस तिच्याशीं कधीं वादविवाद करण्याचा प्रसंग आला तर ते तिच्या मधुर वाणीला सहज वश होत असत. मग ते कितीही विद्वान् धोरणी असले तरी त्या वेळीं त्यांची ती विद्वत्ता व धोरण सर्व नाहींशीं होत. असें झालें म्हणजे जहानारेचे सहज डावपेच साधत. जहांनारा नुसती रूपानेंच अवर्णनीय होती असें नाहीं. ती हुशार, चाणाक्ष, चांगली राजनीतिविशारद अशीं होती. अशा प्रकारें स्वरूप आणि विल-

क्षण गुण यांचें चांगलेंच मिश्रण तिचे अंगीं असल्यामुळें ती सहज प्रभावशाली राजदरबारी लोकांस फसवीत असे. आतां तिच्या अंगीं नुसते सद्गुणच होते, असेंच अगदीं स्पष्ट म्हणतां येत नाहीं; तर त्याबरोबर कांहीं अवगुणही वसत होते. परंतु ते अवगुण तिची अलौकिक प्रतिभा आणि तीक्ष्ण बुद्धि या दोन पडद्यांखालीं लपून जात. राजकार्यामध्यें शहाजहान बादशहास वरचेवर जहांनारेचें साहाय्य बरेंच मिळे त्यामुळें जहांनारेनें त्याच्या पश्चात् कांहीं जरी केलें तरी तिला तो एका शब्दानेंही विचारीत नसे. ती साधारण त्या वेळीं स्वतंत्रच होती म्हटलें तरी चालेल. जोंपर्यंत शहाजहान बादशहाचा विश्वास जहांनारेवर पूर्ण होता तोंपर्यंत तिला तिच्या प्रिय पुरुषाशीं वाटेल तें कृत्य करण्यास परवानगी असे. ती त्या प्रिय पुरुषाबरोबर यथेच्छाचार करण्यास कोणास भीत नसे. आतां त्या पुरुषाबरोबर जहांनारेचा इतका स्नेह जमला तरी कसा हें पाहूं.

सायंकाळीं एके दिवशीं जहांनारा आपल्या महालांत पलंगावर कांहीं वाचीत असतां एकाएकीं तिचा धक्का जवळच जळत असलेल्या दिव्यास लागला व तो दिवा तिच्या झग्यावर पडला. दिवा पडतांच झग्यानें पेट घेतला. झगा पेटला असें पाहून जहानारेनें ती आग विझविण्याचा प्रयत्न केला ; परंतु व्यर्थ ! ती उठली व झगा झाडूं फुंकूं लागली ; परंतु अशा करण्यानें उलट झगा अधिक अधिकच पेटूं लागला. आग विझत नाहीं हें जेव्हां तिनें पाहिलें तेव्हां तिची अगदीं पांचावर धारण बसली ! आतां या संकटांतून आपण जिवंत सुटत नाहीं असें तिला खास वाटूं लागलें. कांहीं वेळानें तर त्या आगीमुळें तिच्या नाजूक अंगास भयंकर चटके बसूं लागले व ते तिला असह्य वाटून ती खोलींत इकडे तिकडे ओरडत धावूं लागली. झगा फेडून टाकून आपण नग्न व्हावें एवढें सुद्धां तिला सुचेना ! फासांत सांपडलेल्या हरिणाप्रमाणें तिची स्थिति झाली. तिचें सर्वांग भाजूं लागलें. तोंड तर सर्व होरपळून गेलेंच. तिचें सारखें ओरडणें आणि धावणें चालूं होतेंच. इतक्यांत तिचें ओरडणें बाहेर बसलेल्या दासींनीं ऐकिलें व त्या आंत आल्या. जहांनारेवर तो ओढवलेला प्रसंग पाहून त्यांची सर्वांची पांचावर धारण बसली ! या संकटांतून आतां जहानारेस सोडवावी तरी कशी हेंच त्यांना सुचेना. त्याही एकदम तिच्यासारख्या ओरडूं लागल्या. एकदोन दासी ती आग विझविण्यास पुढें सरल्या तों त्यांचींहीं वस्त्रें जहानारेच्या झग्याच्या आगीनें

पेटूं लागलीं. त्याहि अधिकच ओरडूं लागल्या. हा सर्व गलबला शाहाजहान बादशाहास ऐकूं गेला. तो गलबला ऐकून तो एकदम घाबरून उठला व तडक जहानारेच्या महालांत आला. महालांत आल्यावर त्याला तो विलक्षण प्रकार दृष्टीस पडतांच तो तर अगदीं वेडाच बनला ! एकदम आग विझविण्याच्या भानगडींत न पडतांच तिला त्यानें घट्ट मिठी मारली. आतां तर आगीस भयंकर स्वरूप आलें. सगळा एकच गोंधळ झाला. कोणासही काय करावें हें सुचेना. शेवटीं एकदांची ती आग विझली. जिकडे तिकडे सामसूम झाली. परंतु जहानारेच्या नाजूक शरीराची स्थिति मात्र फारच शोचनीय झाली. सर्वांग प्रेतवत् झालें झटलें तरी चालण्यासारखें आहे. जिकडे तिकडे काळेनिळे चट्टे दिसूं लागले. ती तर बेशुद्धच पडली ! ती बरेच वेळ शुद्धीवर आली नाहीं. बादशहास व इतर एकदोन दासींस या आगीपासून बराच त्रास झाला होता; परंतु तो फार थोडा. बादशहानें शुद्धीवर येऊन जेव्हां आपल्या प्राणप्रिय कन्येची स्थिति अवलोकन केली, तेव्हां त्याला अत्यंत वाईट वाटलें. त्यानें ताबडतोब हकीम लोकांस बोलावून आणिलें. हकीम लोकांनीं आपली शिकस्त केली परंतु जहानारेला आराम कसा तो वाटला नाहीं. दिवसेंदिवस तिची प्रकृति अत्यंत क्षीण होऊं लागली. आतां तीं वांचेल असें सुद्धां कोणास वाटेना. सर्वांग कुजूं लागलें. त्याला दुर्गंध येऊं लागला. बादशहा हें पाहून अगदीं निरुत्साही झाला. गावांतील लोक सुद्धां त्याचप्रमाणें उदास झाले. मशिदींत निमाज पढणें, कुराण वाचणें बंद झालें, दुकानें बंद पडलीं. भिकाऱ्याला धनान्न मिळेना. अशी स्थिति सर्वत्र दिसूं लागली.

जहांनारा आतां मृत्यूच्या भयंकर जबड्यांतून सुटत नाहीं असें जेव्हां बादशहास कळून आलें तेव्हां त्यानें जहांनारेस औषधपाणी सुद्धां देण्याचें बंद केलें. त्याला वाटलें आतां औषधें देऊन त्रास देण्यापेक्षां तिला आहे या स्थितींत मरण येऊं दिलेलें बरें.

पुढें कांहीं दिवसांनीं लाहोरचा प्रख्यात हकीम इनायत उल्ला तेथें आला व त्यानें बादशहास भेटून सांगितलें कीं ' मी जहांनारा बेगमला दहा दिवसांत पूर्ववत् बरी करतों ' या वेळीं बादशहास जहानारेला औषध वगैरे देऊन त्रास देऊं नये असें वाटलें व त्याप्रमाणें त्यानें त्यास तसें स्पष्ट सांगितलेंही. पण इनायतुल्लानें वरचेवर छातीवर हात ठेवून जेव्हां सांगितलें

कीं ' आपण मुळींच निराश होऊं नकां. मी तिला दहा दिवसांत चांगली करतों. इतकी कीं आणखी दहा दिवसांनीं तिला पाहिली असतां कोणासहि यापूर्वी ती भाजली होती असें कळणार नाहीं. ' शेवटीं एकदांची बादशहानें त्यास जहानारेस औषधपाणी देण्याविषयीं परवानगी दिली. इनायतुल्ला परवानगी मिळतांच जहानारेस मनापासून औषध देऊं लागला. पांचसहा दिवसांत ती त्याच्या औषधानें उठूं बसूं लागली. या वेळीं बादशहास तें पाहून समाधान वाटलें व त्याला जहांनारेविषयीं आशा उत्पन्न झाली. नवव्या दिवशीं तर जहांनारा आपल्या पायानें इकडे तिकडे फिरूं लागली. या वेळीं अंगावरील चट्ट्यांचे डाग मात्र नाहींसे झाले नव्हते. तिचा अंगवर्ण कांहीं विलक्षणच दिसत होता. दहाव्या दिवशीं इनायतुल्लानें तिला कांहीं वनस्पतीच्या रसाचें स्नान घातलें. स्नान होतांच तिला निजविलें. पुढें पांचसहा तासांनीं तिला उठविलें व तिला नेऊन बादशहास भेटविलें. या वेळीं खरोखर जहानारा पूर्ववत् दिसूं लागली. ही ह्मणजे कधीं भाजली होती असें कोणासही वाटलें नाहीं. बादशहानें तिला त्या स्थितींत अवलोकन करितांच त्याला किती आनंद झाला असेल याची कल्पना वाचकांनींच केलेली बरी.

झालें. त्या दिवसापासून बादशहाची इनायतुल्लावर फारच मर्जी बसली व त्याला राजगृहांत रहाण्यास परवानगी मिळाली. इनायतुल्लानेंही आपलें वसतिस्थान लाहोर त्या दिवसापासून सोडिलें व तो राजगृहांत आनंदानें राहूं लागला. आतां वाचक सहज आह्मांला विचारतील कीं, इनायतुल्लानें जहानारेस प्रत्यक्ष काळाच्या दाढेंतून सोडवून बादशहाच्या पदरांत पूर्वस्वरूपांत घातली. याबद्दल बादशहानें त्यास अगदींच कसें पारितोषिक दिलें नाहीं. तेव्हां त्यांना येथें इतकेंच सांगतों कीं, बादशहानें अगणित द्रव्य त्यास देण्यास आपल्या खजिनदारास हुकूम दिला व त्याप्रमाणें ती रक्कम इनायतुल्लाकडे गेली; परंतु त्यानें ती नाकारली व स्पष्ट सांगितलें कीं, मीं जहानारेस जी बरी केली ती केवळ संपत्तीच्या लोभानें केली नाहीं. तर आपली वैद्यकी सर्वांस दाखवावी एवढयाच हेतूनें. यावर त्यास ती रक्कम स्वीकारण्याकरितां बराच आग्रह केला, परंतु तो फलद्रूप झाला नाहीं. असो.

बादशहाचें प्रेम इनायतुल्लाचे ठायीं अत्यंत जडलें हें जरी खरें होतें तरी

जहांनारा त्याच्यावर अत्यंत लोभ ठेवी; या वेळीं ती सुमारें सोळासतरा वर्षांची होती. जें कांहीं राजचक्र चालें, त्याचे सर्व सूत्र काय तें जहानारेचे हातीं होतें. तें आपल्या हातीं यावें या हेतूनें रौशन आरा गुप्त रीतीनें प्रयत्न करीत होती. यासंबंधानें पुढें लवकरच वाचकांना कळेल. या कामीं जहानारा इनायतुल्लाच्या विचारें वागत असे. ती आपलें प्रियपात्र इनायतुल्ला यावर जितका विश्वास ठेवी तितका ती कोणावरही ठेवीत नसे. ती त्याच्या जिवास अत्यंत जपत असे. तिचा व इनायतुल्लाचा इतका स्नेह जमण्याचें कारण त्यानें तिला मोठ्या संकटांतून सोडविलें हें होय. राज्यव्यवस्थेसंबंधीं कोणत्याहि गोष्टी जर विचारावयाच्या किंवा एखाद्या गुप्त गोष्टी सांगावयाच्या तर त्या फक्त ती इनायतुल्लास सांगत असे. तिचा जसा त्याजकर प्रेमा होता त्याचप्रमाणें त्याचाही तिचे ठायीं होता. तोहि कोणती गोष्ट जहानारेस मोठ्या विश्वासानें सांगत असे. जातां जातां मी येथें जोरानें सांगतों कीं अमरसिंहाच्या कत्तलींमध्यें जर तो मारला गेला नसता तर खात्रीनें औरंगजेबास बादशाही मिळाली नसती.

* * * *

* * *

सुमारें रात्रीचे दोन वाजले असतील. तो दिवस शुक्लपक्षांतील नव्हता. आकाशांत ग्रहमाला आणि वृक्षलताकुंजांत खद्योतमाला फारच चमकत होत्या. अंधकार तर मी मी म्हणत होता; जणू काय विश्वाचा अधिकार सर्व त्याच्याकडेच गेला होता. त्यामुळें बिचारी निशादेवी पडली अबला! तिलाहि नाइलाजास्तव त्याच्याशीं रममाण होणें भाग पडलें. अशा वेळीं आग्र्यांतीलच काय पण यमुनेवरील किल्ल्यांतील पहारेकरी सुद्धां निद्राधीन होऊन जिकडे तिकडे अस्ताव्यस्त पडले होते. त्यामुळें विश्व अगदीं शांत होतें. परंतु या शांततेचा भंग कुत्र्याच्या भुंकण्यानें मात्र मधून मधून होत होता. अशा वेळीं जहानारा आपल्या यमुनानदीवरील 'वसंतमंदिरांत' एकटीच पश्चिमेकडील खिडकीकडे तोंड करून कोणाची मार्गप्रतीक्षा करीत बसली होती. ती मध्येंच कानोसा घेतल्यासारखी करी व कांहीं ऐकूं आलें तर उठून खिडकीजवळ जाई व पुनः कोणी आलें नाहीं असें पाहून निराश होऊन स्वस्थानीं पूर्ववत बसे. मंदिराचीं सर्व द्वारें अगदीं बंद होतीं. केवळ उघडी काय ती

एक खिडकी दिसत होती. बाहेर जहानारेची विश्वासूक दासी जोहरा पहारा करीत होती. तिच्याजवळ एक कंदील मिणमिण जळत होता.

जहांनारेनें बराच वेळ कोणाची वाट पाहिली. इतक्यांत तिच्या कानीं बारीक शीळेचा आवाज आला. तो आवाज ऐकतांच जहानारा उठून खिडकीजवळ गेली व आपणहीं त्याप्रमाणें बारीक शीळ घालून पुनः स्वस्थानीं आलीं. येतां येतां तिनें खिडकीला बांधून ठेविलेली दोरी मात्र खालीं टाकली. तीं आपल्या स्थानावर येतांच त्या दोरींवरून चढून खिडकींतून तीं बसली होती त्या महालांत एक व्यक्ति आली. त्या व्यक्तीला जहांनारेनें पाहिलें तोंच आलेल्या व्यक्तीनें तिला एक मुजरा केला व जहांनारेनें त्यास उठून उलट मुजरा केला व हासत हासत त्याचा हात धरून त्याला आपल्या आसनावर बसविलें. आपणहि त्याच्या शेजारीं बसलीं. हीं व्यक्ति कोण बरें असावी ? आतां जहानारा त्या व्यक्तीशीं कायसें बोलत आहे त्यावरून आपल्याला कांहीं कळलें तर पाहूं.

'प्यारे ! इनायतुल्ला, मीं आपल्याला अशा रात्रीं चोरून भेटतें व आपणही माझी तशीच भेट घेतां हें जर लोकांत कळलें तर खास आपल्यावर कांहीं कुभांड रचून तें बादशहाकडून आपलें नुकसान करतील--' जहानारा म्हणाली.

" या संबंधांत मुळींच काळजी करायला नको. जोंपर्यंत तुझी इमानदार लायक दासी जोहरा बाहेर पहाऱ्यावर आहे व खालीं माझा गुलाम कादर सावध आहे तोंपर्यंत आपल्याला कशाचीच भीति नाहीं. खिडकींखालीं कदाचित् कांहीं जास्ती कमी झालें तर तो आपल्याला शिटी वाजवून सावध रहाण्यास इशारा देईल व त्या इशाऱ्यानें आपण उभयतां *भुयारांतून बाहेर पडूं. खोलीबाहेर कदाचित् असें झालें तर जोहराहि आपल्याला सावध केल्याशिवाय रहाणार नाहीं. तिची शिटी ऐकतांच आपण या दोरीवरून उतरून खालीं जाऊं. खालीं गेल्यावर सहज आपल्याला नौकेमध्यें पलायन करतां येईल." इनायतुल्लानें उत्तर दिलें.

' एखाद्यानें दोन्हींकडे पाळत राखली तर ? "

---

* या भुयारांतून आग्ऱ्याचें किल्ल्यांतील मनुष्यास दिल्लीचे किल्ल्यांत सहज जातां येत असे. यांतील रस्तेही पण चांगलें असत. एखाद्याला मधूनही बाहेर पडण्याकरितां मध्यें मध्यें लहान लहान मार्ग केलेले होते.

' जशी वेळ येईल तसें करतां येईल पण आतांच त्याचें काय ? या गोष्टी आतां राहोत. मी तुला आतां एक विचारतों तें सांग पाहूं '.

' विचारा, पण मी त्या तस्करणीबरोबर आपलें लग्न लावून मात्र देणार नाहीं. '

' हें काय तूं बोलतेस भलत्याच वेळीं त्याचें काय ? '

' कबूल, पण आपण काल दिल्लीतील त्या * * च्या घरीं नव्हता कां गेला ? '

' होय गेलों होतों. पण तें केवळ तुझ्याकरितां. आणि त्या कार्यांत थोडेंसें यशहि पण आलें आहे. परंतु ही बातमी तुला इतकी लवकर कशी लागली याचेंच मला मोठें आश्चर्य वाटतें. '

' त्यांत आश्चर्य तें काय वाटतें ? जी सर्व राज्यांतील गुप्त गोष्टीचा तपास लावते तिला ही क्षुल्लक गोष्ट कळणें अशक्य आहे कीं काय ? बरं तें असो, तिच्याशीं आपण निकाह कधीं लावणार ? '

' आं, येथवर तुला गोष्ट कळली आहे काय ? निकाह तर लावण्याचें माझ्या मनांत आहेच; परंतु तो केव्हां लावायचा हें मात्र तुझ्या परवानगी-वर अवलंबून आहे. '

' माझीच जर परवानगी पाहिजे होती तर मुद्दाम त्या हरामजादीस सोडून इकडे कशाला यायला पाहिजे होतें ? आतां माझी आपणाला थोडीच गरज आहे ? '

' येथेंच चुकतें पहा, ज्या दिवशीं तुझें वर्चस्व मजवर बसलें त्या दिवशींच प्रत्यक्ष पत्नीचा मीं संबध तोडून तिला या संसारयातनेंतून मुक्त केलें. याचें तुला स्मरण आहे कीं नाहीं ? त्या दिवसापासून मी म्हणजे एखाद्या स्त्रीवर फिदा झालों आहें हें तूं सप्रमाण सिद्ध करून देण्यास सिद्ध आहेस काय ? लाहोराहून मी येथें येऊन केवळ तुला मृत्युमुखांतून मुक्त केलें तें कशाकरितां ? शिवाय मी आजपर्यंत येथें राहिलों आहें तें तरी तुला माहित आहे ? आज मी लाहोरास जाईन असें म्हणाल्यावर मला येथें कोण अटकाव करणार आहे ? '

' रागावण्याचें कांहीं कारण नाहीं. मला सर्व कळतें आहे; पण माझें म्हणणें इतकेच कीं आपल्याप्रमाणें मीहि गुप्त गोष्टींचा पत्ता लावतें. '

' मग लावीत असशील. परंतु यावर मी स्पष्ट सांगतों कीं, तुला महत्त्वाच्या गोष्टीचा मुळींच पत्ता लावतां येत नाहीं व कदाचित् लावलासच तर तो फारच थोडा खरा असतो. राजदरबारांत जर कोणी तुझ्या जिव्हाळ्याचा असेल तर तो एकटा मीच आहें. अशी तुझी खात्री पण झाली आहे. व तूं मजवरच नेहमीं कोणत्याहि बाबतींत पूर्ण विश्वास ठेवतेस. '

' या गोष्टींचा उल्लेख करण्याची मुळींच या वेळीं आवश्यकता नाहीं. आपल्याविषयीं मुळींच माझ्या मनांत किंतु नाहीं. आपण माझे खरोखर जीव कीं प्राण आहांत. संकटांतून मुक्त कराल तर ते आपणच. हकिमसाहेब ! या वेळापर्यंत ज्या गोष्टी आपणांस मीं सांगितल्या त्या केवळ स्नेहभावानें व निकयासंबधीं जें बोललें तें थट्टेनें समजलांत ! आपण सौसनकडे कशाकरितां जात असतां व तिच्याशीं निकाह लावण्याचें वचन तिला कां दिलें आहे, हें सर्व माझ्या एका दासीकडून मला कळलें आहे '.

' या वेळपर्यंत तुझें मन मजविषयीं निर्मल आहे, हें पाहून मला फारच आनंद होत आहे. ही एक परमेश्वराची मजवर बहाल मर्जीच म्हणायची ! असो. आज महिन्यानें ज्या गोष्टीचा पत्ता लागला ती गोष्ट मी तुला प्रथम सांगतों. तुझी माझी भेट होऊन सुद्धां एक महिनाच झाला असेल नाहीं ? '

' हो झाला असेल कीं. काय पत्ता लागला तो लवकर सांगा कसे. कारण, आतां रात्र बरीच झाली आहे '.

' बरें, तूं अशरफखान ऊर्फ नूरूद्दीन याच्याकडून तारेची तसबीर कशाकरितां तयार केली होतीस ? व शहाजाद्यानें (दारानें) त्या बिचाऱ्याचा खून केला हें काय ? हें मला प्रथम सांग पाहूं. ' इतकें बोलून इनायतुल्ला जहानारेची गहिरी नजर अवलोकन करूं लागला. परंतु त्या जहानारेच्या सुंदर व राजनैतिक चेहऱ्यावर काडीइतका बदल त्याला दिसला नाहीं. त्यावर ती शांत भावानें म्हणाली--

' इनायतुल्ला ! खरोखर तारा स्वरूपानें सुंदर, तशीच स्वभावानें गोड, मनाची मोकळी, स्वधर्माभिमानी आहे. कोणत्याहि कार्यांत मजवर तिची सरशी होते परंतु त्याबद्दल मला मुळींच हेवा वाटत नाहीं. बालपणापासून जिच्याशीं मी प्रेमभावानें वागलें तिच्याविषयीं आतां मत्सर ठेवून

वागणें कधीं न्याय्य होईल काय ? एकें दिवशीं मला असें समजलें कीं तारेनें आपल्या हातानें माझी तसबीर तयार केली आहे. मी सुद्धां तसबीर काढण्याची कला शिकत होतें. परंतु अतां या राजकार्यामुळें मला मुळीं सवडच कशी तीं मिळत नाहीं. ह्मणून मीं कांहीं तारेच्या तसबिरी अशरफखानाकडून काढून घेतल्या व त्यांपैकीं एक मी तारेला माझ्या तसबिरीबद्दल नजर केली. दुसरी दाराला दिली.. आतां राहिलेल्या मजजवळ आहेत. दाराला तिची तसबीर देतांना मीं सांगितलें कीं हीं तसबीर मींच आपल्या हातानें काढली आहे. परंतु त्याला हें मुळींच खरें वाटलें नाहीं.. त्याला अशरफखानाविषयीं संशय आला आणि त्यानें त्या बिचाऱ्याचा विनाकारण प्राण हरण केला ! '

' अशरफखान मेला ही गोष्ट फारच चांगली झाली. तो फारच नीच होता. त्याचें आंतून सलावतखानाकडे अंग होतें. त्यानें त्याला सुद्धां एक तारेची तसबीर काढून दिली आहे व ती सलावतखानाजवळ अद्यापि आहे पण.. '

' असें काय ? तर मग माझ्या दुस्मानाचा दुष्ट जासूद मेला,. हें पाहून मला फारच आनंद वाटत आहे ! ' '

ताराबाईची तसबीर जहानारेनें काय ह्मणून तयार केली व अशरफखान आणि नूरुद्दीन हे कोण गृहस्थ होते हें सर्व आमच्या चतुर वाचकांनीं आतां ताडलेंच असेल.. अशरफखानाचें खरें नांव नूरुद्दीन होतें. त्याच्या चित्रकलेमुळें बादशहानें त्याचें नांव अशरफखान असें ठेविलें होतें.. आतां तिसरी गोष्ट सलावतखानाजवळ तारेची तसबीर कोठून आली ? याचाहीं उल्लेख वर झालाच आहे. आतां राहिली गोष्ट जहानारेची! सलावतखानावर इतकी करडी नजर असण्याचें कारण.

जहानारेचे वरील उद्गार ऐकून इनायतुल्ला ह्मणाला " होय तो हरामखोर तसाच होता. शिवाय त्याच्या बरोबर दुसरे आणखी दोन कुत्ते मारले गेले. याबद्दल खुदाचे फार फार आभार मानले पाहिजेत.. "

' ते आणखी दोन कुत्रे कोणते बरं ? '

' ती हरामजादी गुलशन आणि दुसरा निमकहराम नुरुल्हक. '

' नुरुल्हकच्या खनाबद्दल मला सर्व माहीत आहे. पण गुलशनचा खून कोणीं केला ? '

'ऐक. बादशहाचे कान भरून स्नानगृहांत त्याला तूंच मारविलेंस हें तर तुला कबूल आहे. तो मारल्याची बातमी दारास कळल्यावर त्याला अत्यंत वाईट वाटलें. शेवटीं त्यानें मनाची समजूत घातली कीं नुरुद्दीनच्या बद्दल जहांनारेनें नूरुल्हकला मारविलें असावें. नूरुल्हक किती पाजी, निमक-हराम, अविश्वासी गृहस्थ होता हें तुला मुळींच माहित नव्हतें. तो मारला गेला हींच गोष्ट आपल्या चांगलीच पथ्यावर पडली. नाहींतर त्याच्या अस्तित्वानें खास बादशाहीस चांगलाच धक्का बसला असता. परंतु खुदा आपली काळजी घेतो.'

'काय बोलतां आपण हें ? स्पष्ट काय तें सांगा.' जहांनारेनें बाबऱ्या स्वरानें विचारिलें.

'नूरुल्हकला तूं कां मारविलेंस हें प्रथम मला सांग पाहूं.'

'मला कोणीं सांगितलें कीं सुरंग (गुप्त मार्ग ऊर्फ भुयार) मधून गुप्त रीतीनें तो रौशन आरेच्या महालांत जात असतो व त्याची तसबीर तिच्या जवाहिराच्या पेटींत आहे' हें कळल्यावर मीं त्याचा चांगला तपास काढला व माझी पूर्ण खात्री झाल्यावर मीं त्याविषयीं बाद-शहास सांगितलें व हसनखानाकडून त्याला स्नानगृहांत मारविलें. आणखी त्याच्याविषयीं आपल्याला काय खबर आहे ?'

'शहाजादी ! खरोखर तूं कोणतीहि गोष्ट आपल्या मनांत न ठेवतां इत्थंभूत मला निवेदन करतेस याबद्दल मी तुझा फार फार आभारी आहें. आतां नूरुल्हकविषयीं आणखी इतकेंच मला माहीत आहे कीं तो आली-कडे मरण्यापूर्वी सलावत व रौशन आरा बेगमच्या बाजूस जाऊन मिळाला होता. आपल्या इकडील सर्व गोष्टी तो रौशन आरेस जाऊन कळवीत असे. रौशन-आरा प्रतिमासीं एक गुप्त रीतीनें दरबार भरवीत असते. त्यांत राजदरबारांतील बरींच प्रमख मंडळी सामील आहेत. शिवाय ती त्यांच्या साह्यानें आणखी कांहीं राहिलेली प्रमुख मंडळी आपल्या गटांत ओढण्याचा प्रयत्न करीत आहे. असें करण्याचा तिचा अंतस्थ हेतु इतकाच आहे कीं कोणत्याना कोणत्यातरी उपायांनीं औरंगजेबास बादशहाच्या पश्चात् गादी मिळावी. तिचें आणि औरंगजेबाचें फारच सख्य आहे. आंतून आंतून ती त्याला भेटून त्याची संमति घेत असते. आणि हें सर्व शोधून काढण्याकरितां

च मी आज

महिनाभर प्रयत्न करीत आहें आणि याचा पक्का शोध लावण्याकरितां सौसन रंडीसही मला वरचेवर भेटावें लागतें. कदाचित् आपला कार्यभाग उरकून घेण्याकरितां तिच्याशीं निक्का लावणें मला भाग पडेल. कारण, ही रंडी शहाजादी रौशन आरेची एक गुप्त दासी आहे. कांहीं दिवस ती नूरुल्हकजवळ होती. ह्मणून ह्मणतों तिच्या मनाप्रमाणें वागलों तर आपला कार्यभाग उरकला ह्मणून समज. आतां यांत कांहीं गोष्टी तुझ्या मताविरुद्ध कराव्या लागतील त्याचा विषाद मुळींच वाटूं देऊं नकोस. उलट जें जें संकट येईल त्यांतून पार पडण्याकरितां मला चांगलें साहाय्य कर ह्मणजे झालें. '

' कांहीं हरकत नाहीं. आपण जें साहाय्य मागाल तें देण्यास मी एका पायावर तयार आहें. आपल्याला जें काय वाटेल तें करून एकदां आपलें कार्य उरकून द्या. मला त्यांत बिलकूल विषाद वाटणार नाहीं. मजकरितां आपण वाटेल तें करण्यास जीवावर उठणार आणि मीं आपणावर विनाकारण रागवावें हें योग्य तरी आहे काय ? '

' ज्या अर्थीं असा विचार तुझ्या मनांत आला त्या अर्थीं आपलें काम सिद्धीस जाणार खास. ज्या ज्या कार्यांत मी हात घालतों त्या कार्यांत खुदाच्या कृपेनें मला यश येत आहे. व आताहि यांत मला यश येईल अशी खात्री वाटते. हरतऱ्हेनें मी सौसनला भुलथापा देऊन कधींना कधीं तरी तिच्याबरोबर रौशनआरेच्या गुप्त सभेंत जाऊन तेथील सर्व प्रकार पाहून येईन. कदाचित् तुला त्या सभेंत येण्याची इच्छा झाली तर मी नेईन. मग तुला रौशनआरा कशी कृष्णनागीण आहे—कीं तिला तोडून टाकण्यास जगांत मुळींच उपाय नाहीं—हें सर्व कळून येईल. '

यानंतर उभयतांमध्यें बराच संवाद झाला. तो सर्वच येथें सांगण्याची मुळींच गरज नाहीं. समयानुसार सर्वांचा पुढें उल्लेख होईलच. बरेच वेळानें एकदम जहानारेस कांहीं गोष्टींचें स्मरण होतांच ती ह्मणाली:—

' परंतु गुलशन कशी मारली गेली हें आपण शेवटीं सांगितलें नाहींच. '

' ऐक. ती सुद्धां मोठ्या गमतीनें मारली गेली. कांहीं दिवसांपूर्वी मध्यरात्रीं एक नागीण दर्या किनाऱ्यांतून चालली होती व ती कांहीं वेळानें बसंतमंदिराच्या पिछाडीस येऊन कांहीं चीजा गाऊं लागली. खरोखर तिचा

आवाज फारच मधुर होता. त्या वेळीं मी दूर एका वृक्षावर बसून तिचें तें गायन ऐकत होतों. इतक्यांत एक बदमाष तिच्याजवळ येऊन तिच्यावर बलात्कार करूं लागला—'

यापुढें काय काय गोष्ट घडून आली हें आमच्या चाणाक्ष वाचकांना ठाऊक आहेच. मग त्याची येथें विनाकारण पुनरावृत्ति कशाला करावयाला पाहिजे ? इनायलल्लानें सर्व हकीकत सांगितली व तो ह्मणाला—

' हा सर्व प्रकार प्रत्यक्ष मी डोळ्यानें पाहिला व कानानें ऐकिला. परंतु दुःखाची गोष्ट एवढीच कीं ती जोगीण होती कोण याचा पत्ता मात्र मला लावितां आला नाहीं. मी तिच्या मागोमाग जाणार परंतु इतक्यांत दारानें मला बोलावून नेलें. त्याला जागरणाचें बरेच श्रम झाल्यामुळें त्यानें मजजवळ श्रमपरिहार करणारें औषध मागितलें. मी तें दिल्यावर तिचा शोध केला, परंतु तिचा पत्ता ह्मणून लागला नाहीं. माझी खात्री आहे कीं ती कोणी तरी ताराबाईची गुप्त दासी असावी. '

' कदाचित् ती जोगीण नसेल कशावरून ? बरें कोणी कां असेना. तिनें जें काम केलें तें फारच नामी केलें. आपल्यासारखें युक्तिवान गृहस्थ आणि जोगिणीसारखी विलक्षण स्त्री माझ्या बाजूला असल्यावर आणखी यश यायला दुसरें साहाय्य तें कोणतें असायला पाहिजे ? '

परंतु या कामीं कदाचित् ताराबाईस बराच धक्का बसण्याचा संभव आहे ! '

" काय होईल तें पुढें पहातां येईल. मी ताराबाईचा विवाह खास होऊं देणार नाहीं. आज जर ती खुपसूरत स्त्री दाराची अर्धांगी बनली तर या राज्यांत माझें कांहीं वजन राहील काय ? हां हां ह्मणतां सर्व राज्यकारभार माझ्या हांतून निघून तिच्या हातीं जाईल. एवढेंच होऊन राहणार नाहीं तर बादशहानें ज्याच्या सहाय्यानें आज ही गादी पाहिली त्याच गादीचा नायनाट अल्पकाळामध्यें त्या रजपूत लोकांनींच केला ह्मणून समजा. तारेचें सौंदर्यच आपला कधींना कधीं तरी घात करील हें अद्याप दारास कोठें कळतें आहे ? "

' हो हो तूं ह्मणतेस तें कांहीं खोटें नाहीं. दारालाच काय पण सलाबत खानास सुद्धां तारेची प्राप्ति करूं देतां कामा नये. '

' सलाबतखानांवर आपण चांगलीच पाळद राखली पाहिंजे. तो नालायक माझ्या डोळ्या पुढें सुद्धां उभा रहायाला नको. त्याचें नांव एकलें कीं माझें शरिर दुखूं लागतें. तारा त्या दुष्टाच्या हातांत न जाईल याविषयीं आपण सुद्धां अंग मोडून खटपट केली पाहिजे समजलें का ?"

' त्याबद्दल मुळींच काळजी करण्याचें कारण नाहीं. त्यांच्या त्या गुप्त सभेंत माझा एकदां शिरकाव झाला कीं सलाबतखानाचीं हाडें मीं मऊ केलींच म्हणून समज. परंतु तूं मात्र ताराबाईस सावध रहाण्यास अवश्य सूचना दे, नाहीं तर होतां होईल तितकें लवकर उदयपूरला निघून जाण्यास सांग. तो अर्जुनसिंह तिकडे दारास जाऊन मिळाला आहे. विलंब झाला तर तो मात्र तिला दाराच्या स्वाधीन करील."

' होय मी त्याविषयीं चांगली खबरदारी घेतें. पण कायहो हकीमसाहेब !! त्या जोगीणीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून दारानें अबारखानाकडून गुलशनचा खून केला. व ती गुलशन माझी, दाराची, रौशनआरेची व सलाबतखानाची दासी होती हे आपणास कसें कळलें ?"

' मला सौभाग्यवतीकडून हें सर्व कळलें. दाराची ती गुप्त दासी होती हें मला कळायला मोठेंच आवघड होतें ? कसें तें तुला माहित आहेच. '

' या सर्वां वरून मला आतां खास वाटतें कीं ती जोगीण ताराबाईची मैत्रीण रंभाच असावी; ती फारच चलाख बायको आहे. तिच्या शिवाय हें धाडसाचें कृत्य कोणाचें हातून होणें शक्य नाहीं."

" मलाहि पण तसेंच वाटतें. आतां मी तारेच्या महालाकडे गुप्त वेषानें जातोंच. तिकडे दारा व सलाबतखान तारेकडे येणार आहेत; ते मी गुप्त वेषानें अवलोकन करून खरी जोगीण होती तरी कोण याचा शोध लावतों."

" मग तर अवश्य जा कसें आणि ह्या गोष्टीचा उलगडा झाला म्हणजे आपला सर्व कार्यभाग झाला म्हणून समजा. ती जोगीण खास रंभाच जर असेल तर ती तारेविषयीं सलाबतखानास व दारास लालच दाखवून शेवटीं त्यांच्या हातावर तुरी देऊन उदयपूरला निघुन गेली म्हणून समजा. "

इतक्या गोष्टी बोलून ते उभयतां कोठें गडप झाले. नंतर कांहीं वेळानें जहानारेनें इनायतुल्लास उदासी वृत्ति धारण करून जाण्यास सांगितलें व इनायतुल्लाहि चोर शिंडीवरून उतरून आपला रस्ता धरून चालता झाला.

प्रकरण २ रें

दाराचें आगमन.

' सांगेपर्यंत तरी तुला दम आहे कीं नाहीं ? जरा मला झोंप तर मिळू दे. मग मी सर्व सांगेन बरं. आल्यापासून माझ्या अंगाची अशी कांहीं आग होते आहे ती काय सांगूं तुला. बरं तें असो. उद्यां आपल्याला अतिथिद्वयाचें स्वागत करावयाचें आहे ' असें रंभेनें दाराकडून जोगीणीच्या वेषानें आल्यावर तारेला उत्तर दिलें हें वाचकांना स्मरत असेल. आतां ते अतिथिद्वय तरी कोण होतें, या शोधाला आपण लागावें हें बरें.

सुमारें प्रहर रात्रीचा समय झाला असेल. अशा वेळीं यमुना नदीकिनाऱ्यावर अमरसिंहाच्या हवेलीसभोवार हाताहाताच्या अंतरावर दोन स्त्रिया टेहळणी करीत होत्या. यावेळीं अमरसिंह हवेलींत नव्हता. आज चारपांच दिवस झालें, तो कोठें शिकारीस गेला होता. त्याची राणी चंद्रवती रामायण वाचण्यांत अगदीं चूर झाली होती. इतर नोकरचाकरही आपल्या कामांत गुंतले होते. अशा वेळीं बागेंत स्वैर विहार करणाऱ्या त्या दोन स्त्रियास व्यत्यय आणण्यास कोणासहीं फुरसत नव्हती; सबब त्याही निष्काळजीच होत्या. कृष्णपक्षांतील त्रयोदशीची ती रात्र होती व चंद्रही आकाशमंडळीं प्रकाशमान झाला होता. त्याच्या प्रकाशांत त्या हाताचे अंतरावर विहार करणाऱ्या दोन्ही स्त्रिया स्पष्ट तारा असाव्यात असा पहाणारास भास होई. त्यांच्याच मागें दोन रंभा फिरत होत्या. पण हें गूढ काय असावें. दोन रंभा आणि दोन तारा एकदम त्या पलिकडल्या बाजूस झाडा खालीं एकत्र जमून काय बोलूं लागल्या पहा. त्या कांहीं बोलणार तोंच तिकडून एक तिसरी तारा त्यांच्यात येऊन मिसळली. त्या कांहीं बोलत आहेत इतक्यांत नदी किनाऱ्यावर कोणी शीळ वाजविली. ती रंभेनें ऐकतांच ज्या दिशेकडून तो स्वर ऐकूं आला तिकडे ती चट्कन निघून गेली. तारा आणि रंभा महालांत निघून गेल्या. आतां राहिल्या स्त्रियापैकीं दोन तारा तेथें राहिल्या; त्या पैकीं एक तारा एका लतामंडपांत गेली व दुसरी नदीकिनाऱ्याकडील लतामंडपांत जाऊन बसली. या मंडपांत दोन आरामासनें मांडिलीं होतीं. त्यापैकीं एकावर तारा बसली व दुसरें तसेंच मोकळें

होतें. त्या दोन आरामासनाचे मध्यभागीं एक लहानसेंच पण टुमदार वाटोळें मेज मांडलें होतें त्यावर एक नकशीचा रुमाल पसरून अत्तरदाणी, गुलाबदाणी, तांबूलमंजुषा वगैरे जिन्नस मोठ्या व्यवस्थेनें मांडले होते. जवळच एका कंदीलांत मेणबत्ती जळत होती.

अशा या लतामंडपांत तारा येऊन बसल्यावर कांहीं वेळानें जी रंभा शीळ ऐकतांच नदीकिनाऱ्याकडे निघून गेली ती दाराशिकोहाबरोबर तेथें आली. दारानें आगमनसूचकच शीळ वाजविली होती हें चतुर वाचकांना सांगणें नकोच.

दारा आलेला पाहून तारा आरामासनावरून उठून त्याला सविनय मुजरा करून तीनें दुसऱ्या आसनावर बसण्यास खुणविलें. त्याप्रमाणें दारा तारेस उलट मुजरा करून त्यावर बसला. तो बसल्यावर ताराही पूर्ववत् आपल्या आसनावर बसली. रंभा मंडपाचे बाहेर उभी होती.

बराच वेळ तारा व दारा मूकवृत्ति धारण करून बसले होते. दारा मात्र चोरट्या नजरेनें तारेचा चेहरा अवलोकन करीत होता. शेवटीं तारा बोलत नाहीं हें पाहून त्यानें आपण होऊन बोलण्यास सुरवात केली. तो ह्मणाला.

" खरोखर आपले मजवर फारच उपकार झाले ! "

हे शब्द ऐकून तारेनें खालीं मान करून उत्तर दिलें " छे, छे, यांत उपकार कसचे. खरें पाहिल्यास आपल्या सारख्यांनीं मजसारख्या गरीब दासीचे घरीं चरणरज झाडलें हें पाहून मीच आपले उपकार मानले पाहिजेत आणि ते मी मानतेही; पण, आपल्याला इकडे येण्यांत श्रम झाले. "

' काय बोलतां हें आपण ? ' मध्येंच दारा ह्मणाला. ' आपलें प्रेम संपादण्याकरितां मला त्यांत कसले श्रम झाले ? वास्तविक मला यांत आनंदच वाटत आहे. मला आपण वाटेल तें करायला सांगा मी तें करण्यास अगदीं एका पायावर तयार आहे. पण एकदां प्रेमदृष्टीनें मला अवलोकन करून माझें—'

' आपण हें मनापासून बोलतां किंवा वरून वरून मला नुसते प्रसन्न ठेवून काम करून घेण्याकरितां, हें मी कसें समजावें ? आपलें निष्कपट प्रेम मजवर आहे हें समजण्यास काय मार्ग आहे ? केवळ आपण गोडगोड बोलतां एवढ्यावरूनच कीं नाहीं ? '

' मी इतकें सांगत असतां अद्याप आपल्याला माझ्या प्रेमाची शंका आहेच; हें पाहून मला आश्चर्य वाटतें. '

' कदाचित् आपलें प्रेम खरें असेल परंतु स्त्रियांची वृत्ति संशयखोर असतें ना ? '

' आपण मुळींसुद्धां आपल्या मनांत कुसंशयास जागा देऊं नका. मी आपणांस शपथ वाहून सांगतों कीं आपल्या शिवाय मला कोणतीच वस्तु या जगांत प्रेमविषयक वाटत नाहीं. माझें खरें प्रेम ह्मणाल तर तें केवळ आपल्यावरच व आपल्यासारखें माझें मन कोणीही आजपर्यंत आकर्षण करून घेतलें नाहीं. मी आपणास आज वचन देऊन ठेवतों कीं, आपण हिंदुस्थानची बेगम झाला, कीं मी आपल्या पायाचा दास ह्मणून आपली सेवा मोठ्या आनंदानें करीन. जगांतील सर्व स्त्रिया आपल्या अंकित ठेवीन व आपल्या विरुद्ध अशी गोष्ट मी प्राण गेला तरी करणार नाहीं. काय, आतां तरी आपल्या मनांतील कुसंशय दूर झाला कीं नाहीं ? आतां यापेक्षां मी आपल्यावरील माझ्या प्रेमाचें काय वर्णन करूं ? सांगितलेल्या गोष्टींत काडी इतकी जर कसुर झाली तर या खंजीरानें मी आपली गर्दन उडवीन. ' इतकें बोलतां बोलतां दारानें म्यानांतून खंजीर बाहेर काढला.

दाराची अशा प्रकारची उलु स्थिति पाहून तारा हंसत ह्मणाली " माफ करा महाराज. आपलें हें भाषण ऐकून माझ्या मनांतील सर्व संशय दूर झाला; परंतु मला आतां नाइलाजास्तव हीं गोष्ट सांगणें भाग पडत आहे. आह्मी रजपूतस्त्रिया—ज्यांच्याशीं आमची जन्माची गांठ पडणार—त्यांचें खरें प्रेम, त्यांची चालचलणूक पाहूनच त्यांना वरीत असतों. तसें जर न करूं तर पुढें आमच्यावर काय प्रसंग ओढवतील, हें आह्मांस आज कळणें शक्य नाहीं. ह्मणून मी आपल्याविषयीं इतकी साशंक होतें. आतां आपल्या त्या आणा भाका, मनाचे निश्चय पाहून माझी पूर्ण खात्री झाली आहे कीं, आपलें खरें प्रेम जर कोणावर असेल तर तें फक्त मजवरच. परंतु आजच आपली मी अर्धांगी बनेन अें मात्र घडणार नाहीं; व आपणही त्याविषयीं घाई न कराल तर फार बरें होईल. "

" आपण काय ह्मणतां तें मला सर्व मान्य आहे, परंतु हें माझ्या हातून निभणार कसें ? "

" कसें तरी आतां थोडया दिवसाकरितां निभावून घेतलें पाहिजे. आपण तर आतां माझें प्रेमविषयक बनलाच आहां. परंतु हें अद्याप कोणांस कळलें

नसल्यामुळें याला लोकमतें अनुकूल व प्रतिकूल आहेत हें आज कांहींच सांगतां येत नाहीं. परंतु आपल्याला त्यांच्या मताशीं विशेष कर्तव्य नाहींच. पण हो, आपल्याला सांगितलें तरी कांहीं हरकत नाहीं. खरें झटलें असतां प्रारंभापासूनच माझें प्रेम आपणावरच आहे व अद्यापहि तें तसेंच कायम आहे. आजपर्यंत आपणाला मी जें निष्ठुरपणाचें वर्तन दाखविलें तें केवळ मन पहाण्या करितां. आतां त्यांत आपल्याला त्रास होऊन मलाहिं पण झाला आहे. विवाह व्हावा तर तो एक आपणांशींच व्हावा, असें माझ्या आईला व मामाला मनापासून वाटत आहे. परंतु या गोष्टीला पित्याचें मत मात्र प्रतिकूळ आहे, तींच कायती एक मोठीं थोरली अडचण आहे. त्याचें मनांत माझा विवाह उदयपूरच्या युवराजा बरोबर व्हावा; परंतु असें होणें मला मुळींच इष्ट नाहीं. कारण, खरें प्रेम आपल्यावर आहे. अशी खरी स्थिती आहे तेव्हां याला काय उपाय योजावा ? मी पुष्कळ विचार करून पाहिलें; परंतु मला त्यांत कांहींच सुचेंना झणून झणतें जरा दमानें घ्यावें."

" एवढेंचना ? मग त्यांत इतकें भ्यायचें काय कारण ? या घटकेला चला मजबरोबर अथवा येथेंच गांधर्वविवाह लावला झणजे सर्वच झालें. एकदां विवाह झाल्यावर आपला पिता किंवा बादशहा तरी काय करणार आहे ? शिवाय दोघांचीं मनें जेथें एक झालीं तेथें कोण झणून काय करणार आहे ? "

' ठीक ठीक. ही गोष्ट मलाही पण पसंत आहे. आतां एका गोष्टीचा निवाडा करावयाचा राहिला आहे. आपण ती गोष्ट मान्य करील तर मात्र सर्व आपल्या मनाप्रमाणें घडून येईल. '

' सांगा, सांगा काय ते, लवकर. बाकी आपण काय जें सांगाल तें मला केव्हांही मान्यच आहे. '

' आपणास तें सांगणें झणजे माझ्या अज्ञानाचें मुद्दाम प्रदर्शन करणें होय. कांहीं दिवसापूर्वी इकडे एक जोगीण आली होती. तिला प्रत्येकांनीं आपआपले हात दाखविले. खरोखरच ती फार हुशार होती. तिनें त्यांचे हात पाहून भराभर भूतभविष्य सांगितलें, पण तें अगदीं अक्षरशः हो. त्यांत रतीइतकें सुद्धां खोटें नव्हतें. मी त्या वेळीं अगदीं अज्ञानच. मलाही सर्वांबरोबर तिला हात दाखविण्याची इच्छा झाली

व त्याप्रमाणें मीं आपला हातही पण तिला दाखविला. तिनें माझा हात पाहिला मात्र; तोंच ती म्हणाली ' तूं बादशहाची बेगम होशील व तुझ्या अंकित सर्व हिंदुस्थान होईल. परंतु हे केव्हां तर तुझें बरोबर आठराव्या वर्षीं लग्न होईल तर यापूर्वी जर तुझें कोणाशीं लग्न होईल तर माल तूं खास विधवा होऊन भीक मागत दारोदार फिरशील. ' महाराज हे तिचे शब्द ऐकले मात्र तोंच माझ्या मस्तकांत वीजच पडली कीं काय असें मला वाटलें. परंतु मागून झटलें कीं ही जोगीण कांहीं तरी सांगतें आहे झालें. तिच्यावर आपण विश्वास ठेवूं नये म्हणजे झालें. असा मनाचा दृढनिश्चय करून मीं तिला शिव्याची लाखोली वाहिली असेल. पुढें तीं गोष्ट मी विसरून गेलें. ते राहो. काल एक आणखी तिच्यासारखीच जोगीण आमचे येथें आली होती. तिलाहि मीं हात दाखविला. तिनेंहि पण त्या मागील जोगिणीप्रमाणेंच सांगितलें. आतां दोघींनींहि तेंच सांगितल्यामुळें कांहीं केल्या त्यांच्या वरून माझा विश्वास उडून जात नाहीं तेव्हां दोन वर्षें आपण थांबावें असें मला वाटतें. येथवर येण्यास आपणास तसदी दिली याबद्दल माफी असावी. अवांधि कांहीं फार नाहीं. फक्त दोन वर्षे. तीं संपलीं म्हणजे मी सर्वस्वी आपलीच आहे. आजपर्यंत जसे हाल सोसलेत तसेंच आणखी दोन वर्षें सोसा. तींही लवकर निघून जातील. माझ्यापेक्षां मला आपली अधिक काळजी आहे, म्हणून मी सांगतें आहें. आतां मापुढें काय होईल तें ईश्वर जाणें ! '

तारा जें कांहीं सांगत होती तें सर्व दारा मोठ्या शांतपणें ऐकत होता. तारा स्तब्ध झाली हें पाहून एक दुःखानें दीर्घ निःश्वास सोडून दारानें आपल्यालाही तसेंच एका जोगिणीनें सांगितलें आहे असें सांगून पुढें म्हणाला ' आपण जें सांगाल तें मला मान्य आहे, असें मीं आपल्याला मघाशीं शपथ वाहून सांगितलेंच आहें; परंतु आतां हें पुढले दिवस लवकर कसे जाणार ? "

" मुख्य आतां कायतें यांतच आहे. आतां मी आपलीच आहे अशी मनाची समजूत घालून येतील तसे दिवस घालवा म्हणजे झालें. यांत जें कांहीं आपल्याला दुःख सोसावें लागणार त्याला मी नाहींकां वाटेकरी होणार ? "

" हो हो, आतां मजविषयीं आपल्याला विशेष काळजी वाटणारच

एकमेकाच्या सुखाकरितां एकमेकांनीं झटलें पाहिजे. असो. पुढें आतां मधून मधून अशी मला भेट देण्याची कृपा होईलच '

' अवश्य होईल; पण दरमाहिन्याच्या प्रथमदिवशीं यावेळीं मी आपली या ठिकाणींच भेट घेत जाईन. '

इतकें बोलून तारा दारास विडयाचें सर्व सामान देणार इतक्यांत बाहेर कोणी शीट वाजविली. ती ऐकतांच तारा दारास घाबऱ्या स्वरानें ह्मणाली. ' महाराज ! या वेळीं आपणास निरोप घेण्यास सांगू नये परंतु नाइलाजास्तव तसें करणें भाग आहे. माझी आई मला शोधीत आहे अशी माझ्या दासीनें आतांच शीट वाजवून सूचना दिली. आतां आपण फार वेळ येथें बसूं तर व्यर्थ संशयास कारण होऊं व होण्याचा संभव आहे. कदाचित् यांत कांहीं संकट उपस्थित होण्याचा संभव आहे. तेव्हां वेळींच आपल्याकडून सावध राहिलेलें बरें. आपला व माझा विवाह होण्यापूर्वी आपण एकामेकांची एकांतात भेट घेत होतों हेंहि पण कोणास कळतां उपयोगीं नाहीं. '

' माझेंही पण तेंच मत आहे. '

असें बोलून दारा आरामासनावरून उठून उभा राहिला व आपल्या हातांतील आंगठी काढून तिच्या हातांत घालण्याकरितां त्यानें हात पुढें केला; परंतु आतां दारा काय करणार हें जाणून तारेनें आपला हात पदरांत झांकिला व ह्मणाली ' छे, छे, एकदां आपल्या कडून मला आंगठी मिळाली आहेच मग आतां हिची कांहीं आवश्यकता नाहीं. '

' ती आंगटी गुलशाननें तुला दिली, आतां ही मी प्रत्यक्ष प्रेमाची खूण ह्मणून तुझ्या हातांत घालणार. '

' यावेळीं असें न करणें बरें. जोंपर्यंत लग्नविधि झाला नाहीं तोंपर्यंत माझें जरी आपल्याशी लग्न व्हावयाचें आहे तरी पण आपल्याला माझ्या शरीरास स्पर्श करितां येणार नाहीं. मी जातीनें हिंदू आहे, तेव्हां मीहि तसें आपणास करूं देणार नाहीं. खरें ह्मटलें असतां आपण एकमेकांचें मुखावलोकन करतों हेंच मुळीं शास्त्ररीत्या दोषास्पद आहे. '

हें तिचें भाषण ऐकून दारा निराश झाला व नाइलाजास्तव त्यानें ती आंगठी मेजावर ठेविली व तो तिला ह्मणाला. ' माझ्या समोर तूं जरी ही आंगठी आपल्या हातांत घातलीस तरी मला कबूल आहे. '

आतां यावर आक्षेप न घेणें उत्तम असें समजून तिनें ती आंगठी आपल्या हातांत विनयानें दारास मुजरा करून घातली व विचारलें.—

' गुलशनचा नुकतांच खून झाला असें ऐकतें हें खरें काय ?

" होय मी सुद्धां तसेंच ऐकतों, मग आणखी त्यांत गूढ काय आहे कोण जाणें. झाली ती गोष्ट एक प्रकारें बरीच झाली असें समजलें पाहिजे. कारण ती स्त्री फारच पाजी होती. "

" मलाही पण यांत आनंदच वाटतो. ती दुष्ट अब्दसा हरतऱ्हेनें मी सलाबतखानाबरोबरच शादी लावण्यास तयार व्हावें अशाविषयीं मला उपदेश करी. उपदेशच नाहीं करून बसली तर त्याच्याशीं शादी न करशील तर तुजवर एखादें मोठें संकटसुद्धां येईल अशी तिनें भीति घातली. आतां ती मेल्यानें त्या सलाबतखानाकडून दुसरी एखादी तरी स्त्री येऊन मला त्रास देणार नाहीं. "

" असें आहे कां ! तर मी उदईक त्या हराम सलाबतखानाचे तुकडे तुकडेच करतों. "

' छे छे, असें करणें मुळींच यावेळीं आपल्या पथ्यावर पडणार नाहीं. असेंच कांहीं दिवस त्याला प्रयत्न करीत राहूं दे. मग पुढें आपला विवाह झाला म्हणजे आपण त्याचा खरमरीत समाचार घेऊं. '

' बरें तसें कां होईना. पण आतां यापुढें माझी स्मृति राहील ना ? दाराचे हे शब्द ऐकतांच तारेनें त्याला आणखी एकदां सविनय मुजरा केला व म्हणाली ' वा, हें काय विचारावें. आपणच या दीन दासीवर मेहेर नजर ठेवावी. तिला स्मृतिपथांतून दूर न लोटावी असें मींच आपणास विनविलें पाहिजे. '

' छे छे, अशी गोष्ट होईल तरी कशी ? आजपासून मीं अगदीं आपला बंदिवान झालों आहें व मीहि पण तसें करणें माझें कर्तव्यकर्मच आहे असें समजतों. थोडयाच दिवसांत आपण हिंदुस्थानची बादशाहीण बनाल तेव्हां मी आपला सेवा करणारा दीन गुलाम होईन. '

' ईश्वर अशी स्थिति न देवो. मींच आपली अनन्यभावानें सेवा करणें योग्य आहे आणि रात्रंदिवस परमेश्वरापाशीं आपली अखंड सेवा मजकडून घडो असें मी मागत असतें '

'असो आतां त्या गोष्टीला बराच काळ जावयाचा आहे. आज या दासीला आपण न विसराल अशी मला बळकट आशा आहे.'

'आपण उदईक शिकारीस जाणार म्हणून ऐकलें.'

'खरेंच, मी तें आपल्याला सांगण्यास या नादांत मुळींच विसरलें. मग यांत आपली अनुमति आहेना?'

'खुशाल जावे, परंतु होतां होईल तितकें लवकर परत यावें.'

यानंतर दारा एकदां तारेकडे प्रेमदृष्टि फेंकून लतामंडपांतून बाहेर आला व बाहेर रंभा उभी होतीच ती त्याच्या बरोबर नदीकिनाऱ्यापर्यंत गेली.

प्रकरण ३ रें

सलाबतखान

मागील प्रकरणांत उल्लेख केलेल्या त्या तीन तारा व दोन रंभा कोण असाव्यात व दारा गेल्यावर इकडे काय काय प्रकार घडून आला त्याकडे आपण वळूं या.

दारा निघून गेल्यानंतर तारा (जी इतका वेळ दाराशीं बोलत होती.) आपलें बनावट रूप टाकून देऊन रंभा बनली. खरोखर ही रंभाच होती. दाराला भुलविण्याकरितां तिनें जसें जोगिनीचें सोंग घेतलें होतें त्याचप्रमाणें यावेळीं ती तारा बनली होती. आणि ती रंभा जी दाराला नदी किनाऱ्यावरून आणायाला पोहोंचविण्याला गेली होती ती खऱ्या रंभेची एक विश्वासू स्त्री होती. आपल्या मालकीणीनें सांगितल्यावरून ती रंभा बनली होती. शिवाय आणखी एक नकली तारा व रंभा महालात निघून गेल्या हे मागें कळविलेंच आहे. दाराला पोहोंचवून आल्यानंतर त्या नकली रंभेनें आपलें तें रूप टाकिलें. इतकें होतें आहे तोंच गलीकडील दुसऱ्या एका लतामंडपांत बसलेली खरी तारा त्या ठिकाणीं रंभेनें तोरऱ्या घेतल्यानें दाराशीं संभाषण केलें त्या मंडपांत आली.

तारा तेथें आल्याबरोबर तिनें रंभेस घट्ट मिठी मारिली व तिच्या गालाचें चुंबन घेत ती म्हणाली– 'कमाल आहे बाई तुझी. काय सांगूं तुला. तुझ्या त्या

गोष्टी ऐकून मला हसतां हसतां पुरेवाट झाली. तुला इतकीं विद्या अवगत आहे हें नाहीं बाई मला या घटकेपर्यंत समजलें. खरंच सांग माझ्या गळ्याची शपथ आहे पहा. हीं तूं धूर्तविद्या शिकलीस तरी मेली कोणापासून ? '

'काय सांगू तुला ' असें म्हणून रंभेनें तारेचें चुंबन घेतलें व ती पुन्हां म्हणाली ' ही सर्व विद्या मीं एका धूर्तशिरोमणी महापुरुषाच्या चालचलणूकी पाहून शिकलें. जसें जसें हे दुष्ट आधिक त्रास द्यावयास तयार होतात तसतसें त्यांना अशाच कांहीं युक्तीनें खड्यांत घातलें पाहिजे. त्या शिवाय त्यांचे डोळे उघडणार नाहींत. '

' पाहूं आतां या तुझ्या प्रयत्नांत काय निष्पन्न होतें तें. '

' जें कांहीं माझ्या मनांत आहें तें सर्व घडून येणारच. उदेपुरांस पाठविलेला मिश्रजी पण खास आनंदाची बातमी घेऊन येणार. अल्पकाळांत या दुष्टांना मी कसें फसावितें पहा. '

इतक्यांत जी दासी नकली रंभा बनली होती ती तेथें आली व तिनें रंभेला कांहीं सांगितलें. तें एकतांच रंभा तारेस म्हणाली. ' हं ऊठ. पूर्वीप्रमाणें त्या मंडपांत जा कशी. तो पहा सलाबतखान येत आहे. त्यालाहीं पण आतां हात दाखविला पाहिजे. पहा आतां काय तमाशा होतो तो.

हें ऐकून तारा झट्कन् दुसऱ्या लतामंडपांत निंघून गेली. नंतर रंभेनें तें मेज दान्ही आरामासनामागें नेंऊन त्यावरील सर्व सामान दूर लपविलें. या वेळीं सलाबतखानाचीं भेट निराळ्या तऱ्हेनें घ्यावी असें तिच्या मनांत होतें. तिनें ती आंगठी[1] हातांत घातली व वगलेंत एक कट्यार घेऊन तीं इकडे तिकडे पहात बसली. इतक्यांत मागील दासी सलाबतखानास तेथें घेऊन आली. सलाबतखान आलासें पाहून रंभेनें त्यास मुजरा करून दुसऱ्या आरामासनावर बसण्यास खुणाविलें. त्यांवर सलाबतखान तिला परत मुजरा करून बसला व तिच्याकडे पहात त्यानें विचारिलें. ' ताराबाईचें हित चिंतणाऱ्या आपणच कां त्या रंभाबाई ? '

' इतक्यांत आपण मला विसरलांत वाटतं. बोला बोला काय तें. '

' ती सुन्दरी कोठें आहे. '

' ती आपल्या महालांत निजली आहे. '

---

१ या अंगठीसंबधानें पहिल्या भागांत उल्लेख केला आहे.

' मग आतां तिची भेट नाहीं कां होणार ? '

' नाहीं सरकार '

' तें कां ? '

' हिंदूंच्या विशेषतः रजपूत स्त्रियांच्या रीति भाति आपणाला ठाऊक नाहींत वाटतें. नसल्या ठाऊक तर ऐका. रजपूत स्त्रिया विवाहित होईपर्यंत घराबाहेर येत नाहींत. ज्याच्याशीं त्यांचा विवाह होण्याचें ठरलें असेल त्याला सुद्धा त्या त्यापूर्वी दृष्टी पडत नाहींत. '

' असं आहे कार्य ? आपणही जातीनें रजपूत असून परपुरुषाला दिसतां हें कसें ? '

' सरकार ती राजकुमारी आहे आणि बोलून चालून मी तिची बटीक. मी जर घरांतून बाहेर न पडेन तर कसें चालेल. जें काम पडेल तें, तिच्याकरितां मला करणें भाग आहे. आणि आज तरी मी तिच्या करितांच आपल्या दृष्टी पडत आहे. '

' म्हणून आपली किंमत कमी आहे कीं काय ? '

' या ठिकाणीं विषयांतर झालें. '

' छे छे. मी बोलतों तें यथायोग्यच आहे. मात्र आपण या ठिकाणीं चुकतां आहां. रजपूत लोकांविषयीं साधारण नियम मला माहीत आहे कीं, ज्याच्याशीं राजकुमारीचा विवाह व्हावयाचा असतो. त्याची व तिची ओळख तिच्या दासीकरवींच होत असते. तो पुरुष जर दासीच्या मनाप्रमाणें न वागेल तर मात्र ती त्याला मिळणार नाहीं हें खास. तेव्हां या कामांत तुम्हीच मुख्य आहांत. मग तुमची किंमत कशी बरें कमी ? '

" माझीच त्यात इतकी प्रतिष्ठा कशाला पाहिजे ? आपल्यासारख्या इमानी सद्गृहस्थाबरोबर जी स्त्री सलगी करण्याची इच्छा न करील तर ती केवळ अज्ञानी किंवा मूर्ख समजली पाहिजे. "

" तें तर खरेंच. परंतु रंभाबाई, आपण खरोखर प्रत्येक गोष्टीमध्यें अत्यंत हुशार आहांत. मला नाहीं वाटत तारा इतकी शहाणी असेल. तेव्हां खरोखरच तिची मर्जी संपादन करून घेण्यापूर्वी आपलीच संपादन करून घेतली पाहिजे. "

" छे, छे, माझी कशाला पाहिजे. आपली गुलशन आहे कीं. ती आपल्याला या कामीं खास यश मिळवून देईल. "

इतकें बोलून रंभेनें सलाबतखानाची मुद्रा चोरटया दृष्टीनें अवलोकन केली तों तिला ती उतरलेली दिसली व तोहि पण अडखळत म्हणाला—

" हें काय तुम्ही गुलशनविषयीं बोलतां ? "

" आपल्याला ती मजपेक्षां प्रिय नाहीं ? "

" काय हें बोलतां तरी काय आपण ? बिचारी गुलशन केव्हांच ठार मारली गेली. "

" ती काय म्हणून मारली गेली ? कोणत्या बरं त्या दुष्टानें तिला मारलें. " जसें कांहीं त्याविषयीं आपल्याला मुळींच माहीत नाहीं असें दाखवून रंभेनें साश्चर्य विचारिलें.

' कोणत्या दुष्टानें तिला मारली आणि कां हें कांहीं अद्याप बाहेर फुटलें नाहीं; परंतु माझा एक असा तर्क धांवतों कीं शाहाजाद्याकडून ती ठार मारली गेली असावी. '

' झालें तें तरी एक प्रकारें बरें झालें. यांत मला खरोखर आनंद होत आहे. ' इतकें बोलून पुन्हा रंभा सलाबतखानाची मुद्रा बारकाईनें अवलोकन करूं लागली तेव्हां तर ती त्याची मुद्रा फारच उतरलेली दिसली.

' पण तिची निधनवार्ता ऐकून आपल्याला इतका आनंद होण्याचें काय कारण ? ' सलाबतखानानें विचारलें.

' त्या बागेंतली इमारत आपण गुलशनला जी देणार होता ती आतां मला मिळणार म्हणून. काय ? आपण ती इमारत मला देणार नाहीं ? आतां गुलशनप्रमाणें माझा त्यावर नाहीं कां हक्क चालणार ? अलबत चाललाच पाहिजे. ज्याकरितां आपण ती तिला देणार होता तेंच काम (तारेस आपल्या हस्तगत करून देण्याचें) मी आजपासून करणार आहे. '

" खरोखर रंभाबाई, आपण एक अद्भुत स्त्रीरत्न आहांत. माझें प्रम ताराबाईवर जर न बसलें तर खास मी आपल्याला माझी अर्धांगी आनंदानें बनाविलें असतें. आतांतरी तारेशी निक्षा लावणें म्हणजें आपल्याच ताब्यांत सर्वस्वी मी राहणें होय. '

' विचार करून बोला काय बोलायचें तें. मग हें वचन आपणांस मोडतां यावयाचें नाहीं. '

" हरकत नाहीं. पण कायहो रंभाबाई ! गुल्शनविषयींच्या या गुप्त बातम्या आपल्याला कशा कळल्या ? "

" आतां त्या कदाचित् खोटया असतील; परंतु खुद्द तिनेंच मला सर्व निवेदन केल्या. "

याठिकाणीं आमच्या वाचकांना अवश्य सांगितलें पाहिजे. कीं, खरोखर गुल्शननें याविषयीं रंभेस कांहीं एक सांगितलें नव्हतें. केवळ रंभेनें खोटेंच सांगितलें.

' असें आहे का ? ' सलाबतखान ह्मणाला ' मग तर ती खरोखर पाजी अविश्वासी स्त्री होती असें समजलें पाहिजे. अशी जर ती कृत्या होती तर आतां ती मारली गेली हें पाहून खरोखर मलाहि पण फारच आनंद वाटत आहे. '

' खरोखर ती जर जिवंत असती तर तिनें मुळींच आपल्याला या कामीं मदत केली नसती. तिच्या मनांत ताराबाईनें शहाजाद्याबरोबरच विवाह करण्यास तयार व्हावें असें फार होतें. कारण ती दाराचीहि कुंटीण होती. ती वरचेवर त्याचे कडून अनेक मौल्यवान् वस्तू ताराबाईस आणून देत असे. यावरून असें सिद्ध होतें कीं तिचा खून कोणीं तरी दुसऱ्यानेंच केला असावा. दारानें करविला असें ह्मणावें तर तसें संभवनीय नाहीं. ती मेल्यानें दाराची चांगलीच मदतगारीण नाहींशी झाली. '

आपल्यामुळेंच दारानें अल्वारखानाकडून गुल्शनचा खून करविला हे रंभेस जरी पूर्ण माहीत होतें तरी पण ती मुद्दाम सलाबतखानास पेचांत ओढण्याकरितां अशा प्रकारचें भाषण करीत होती.

' असें आहे कां ! ' सलाबतखान ह्मणला. ' झालें तें ठीकच झालें; असल्या दुष्ट सांडांना असेंच शासन योग्य आहे. '

' हो हो, असेंच झालें पाहिजे. '

' रंभाबाई, या आपल्या भाषणानें मी दुसऱ्या तऱ्हेनें आपला बंदा झालों आहे. आपली माझी अशी कधींच भेट झाली नव्हती. आज तुमची भेट झाली नाहीं तोंच आपण आपल्या या मोहक भाषेनें माझें मन कसें अगदीं आकर्षून घेतलें आहें त्यामुळें मला असें वाटतें कीं आपल्या या गुलाबी कपोलभागाचें एकदां चुंबन घ्यावें—'

' हं, खबरदार, आतां ज्यास्त बोलाल तर. मी आपल्या बाहेर नाहीं व या गोष्टींही केव्हांना केव्हां तरी घडून येणारच. मग त्याचा वाच्यांश कशाला पाहिजे. तें असो आज मी जें आपणास एकांतांत इतक्या रात्रीं भेटण्याचें धारिष्ट केलें तें या असल्या पाजीपणाच्या गोष्टीच ऐकण्या करितां कीं काय ? '

' तसें नव्हे. हे आपलें नुसते प्रेमाचें खेळ; झालें; त्यांत इतकें रागावायचें काय ? खरी गोष्ट ही कीं तुह्मां उभयतांनां मी गुपचुप शहाजादा अवरंगजेबाच्या आश्रया खालीं नेणार आहे. व नेण्याची वेळहि पण जवळच आहे. '

' जवळच आहे ह्मणतां मग त्याला इतका विलंब कशाला पाहिजे ? '

' फारसा कांहीं विलंब नाहीं ह्मणा. परवांचे दिवशीं अमची एक गुप्त रीतीनें सभा होणार आहे. तीं मध्यें आपणास कां पळवून न्यावयाचें हें ठरणार आहे. '

' पण हा जलसा आहे तरी कसला व कशा करितां ? काय या सभेमध्यें बायका सुद्धां— '

" त्यासंबंधीं यावेळीं मला आपल्याला कांहीं सांगतां येण्यासारखें नाहीं. आणि आह्मांला सक्त हुकूम आहे कीं यासंबंधीं कोणाजवळ कोणीं बोलावयाचें नाहीं. "

" या गोष्टी मला किंवा ताराबाईला सुद्धां सांगण्याची तुह्मांला भीति वाटतेंना ? ठीक आहे आपलें यावरून कितपत खरें प्रेम आहे तें सर्व कळून आलें. "

" छे, छे, रागावूं नकां. आपल्याकरितां सांगणें भाग आहे. आमची एक गुप्त सभा आहे. ज्यावेळीं आह्मांला कांहीं गोष्टींचा निवाडा करावयाचा असतो त्यावेळीं अशा प्रकारची आह्मी सभा भरवितों व त्यावेळीं सर्व सभासदही तेथें हजर असतात. "

" याचा सभाधिपति कोण आहे. कोणी पुरुष कां स्त्री ? "

' याचा आपणास काय जबाब देतां येणार ? पण सांगतों, सर्वच सभाधिपति आहेत. '

' आतां आपण किती जरी लपविण्याचा प्रयत्न केलात तरी तो मजजवळ साधणार नाहीं. आपणास वाटत असेल कीं, ही एक अज्ञान पोर आहे. हिला कांहीं जरी सांगितलें तरी तीं गप्प बसेल; परंतु आपण खास समजा कीं, याची सर्व माहिती मला पूर्ण आहे. '

हें ऐकतांच सलाबतखान साश्चर्य होऊन म्हणतो ' जर आपल्याला सर्व माहित आहे तर आमच्या सभेचा आधिपति आहे तरी कोण हें मला आपण सांगा पाहूं. '

" एक शहाजादी '

' खरोखर आपण जोतिषी किंवा गंधर्वकन्या आहांत, कोण आहांत तरी कोण. आपल्या सारखी अष्टपैलु अवरत मीं आजपर्यंत कोठंही पाहिली नाहीं. खरोखर त्या सभेंत आपलें कांहीं गुप्त रीतीनें अंग आहे कीं काय ? '

' काय, आतां आंपल्याला शहाजादी साहेबाचें नांव सांगूं किंवा आपली सभा कोठें भरणार आहे तें स्थान सांगूं ? '

' रंभाबाई ! खास आपलें अंग त्यांत असले पाहिजे. आतां आपल्याला त्यासंबंधानें कांहीं सांगण्याची मुळीच जरूरी नाहीं. बरें पण आपण आमच्या सभेला कोणत्या प्रकारें मदत करणार आहांत ? '

' ज्या प्रकारें आपण नूरुल्हक संबंधांत मदत करणार त्याच प्रकारें ? '

हे रंभेचें शब्द जरी कांहीं अंशी खोटे होते तरी पण सलाबतखानास ते खरेच वाटले. रंभेचा पगडा सलाबतखानावर इतका बसला होता कीं रंभा म्हणजे कोणी तरी कारस्थानी स्त्री आहे. ती जें सांगें तें तें सर्व त्याला खरें वाटलें. ते रंभेचे शब्द ऐकून तिला त्यानें विचारलें. ' मग परवांचे दिवशीं आपण तेथें हजर रहाणार असालच. '

' नाहीं नाहीं. मी हजर रहाण्याची फारशी जरूरी नाहीं. तेथें ज्या कांहीं गोष्टी घडतील त्या आपण मला इत्थंभूत कळवा म्हणजे झालें. '

' अवश्य कळवीन. आपण त्याबद्दल मुळींच काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. '

' बरें आहे, आतां आपण निरोप घ्यावा. मला आतां इतक्या रात्रीं घराबाहेर रहातां येत नाहीं. '

हें ऐकून सलाबतखान आसनावरून उठून उभा राहिला व त्यानें रंभेस मुजरा केला. रंभेनें त्याला लतामंडपाचें तोंडीं पोहोंचविलें. बाहेर दासी उभी होतीच तिनें त्याला बागेबाहेर नेलें. सलाबत गेला असें पाहून तारा त्या लतामंडपांतून रंभा जेथें बसली होती तेथें आली. येतांच तिनें हा प्रश्न केला ' रंभे ! कमाल आहे बाई तुझी इतक्या गोष्टी तरी मेल्या तुला कशा कळल्या कोण जाणें. सभाधिपति कसला ? शहाजदी कोण ? आणखी

तें गुप्तस्थान कोठें आहे ! याचा पत्ता मला कसा लागला नाहीं ? धन्य आहे बाई तुझी. ही लोकांच्या डोळ्यांत धूळ घालण्याची अद्भुत विद्या तरी तुला कशी अवगत झाली यांचेंच मला मोठें नवल वाटतें ! '

" आतां तुला उदईक मी सर्व सांगणारच आहें. ही सभा कसली ? कशाकरितां भरते ? मी तेथें कोणत्या वेषानें जातें व कसकशी प्रत्येकांना फसवून येते वगैरे सर्व तुला मग कळेलच. आतां आपल्या महालांत चल कशी अगोदर. आपण इकडे आल्यावर मी एक नकली तारा व रंभा आपल्या महालांत पाठविल्या आहेत. तें काम चांगल्या हुशार दासीनांच दिलें आहे. त्या नकली तारेस तुझ्या पलंगावर डोकें दुखण्याचा बहाणा करून निजण्यास सांगितलें आहे. कदाचित् माताजी आल्याच तर आपण बाहेर आहोंत; हें त्यांना न कळावें. शिवाय त्यांना या गोष्टींचा स्फोट न करण्याविषयीं सक्त ताकीद केली आहे. "

" चल चल लवकर, महालापर्यंत अगदीं सामसुम झाली आहे. शिवाय तूं काय करणार आहेस हें कोणास माहीत नाहीं म्हणून बरें आहे; नाहींतर सहज कोणी आपलें कारस्थान उघडकीस आणलें असतें. "

' तें तर खरेंच. कालच आपणांस अनुकूल आहे असें समजलें पाहिजे. ' असें म्हणून रंभा उठली व ती आतां मोठी वत्ती हातांत घेऊन चालूं लागणार इतक्यांत तारेनें तिचा एक हात ओढला व ती, म्हणाली

' जरा उभी रहा ! हें पहा काय या आरामासनाशेजारी आहे तें ' मला वाटतें दारा किंवा सलाबतखान आपली एखादी जिन्नस विसरून गेला असावा.

हें ऐकतांच रंभेनें झटकन् ती पडलेली वस्तु उचलून तारेच्या हातांत दिली. तारेनें ती आपल्या हातांत घेतली व पहाते तों तिला एक खलिता आहे असें कळून आलें. तिनें तो फोडून पाहिला तों त्यांत तिला दोन कागद दृष्टीं पडले त्यांपैकीं एकावर एक चमत्कारिक यंत्र काढलें होतें व दुसऱ्यावर शहामृगाचें चित्र होतें. रंभेनें तें सर्व पाहिलें. तिनें चट्कन् तें तिच्या हातांतून मोठ्या आनंदानें ओढून घेतलें. व ती तारेस हंसत हंसत म्हणाली ' खरोखर तूं नशीबवान आहेस बाई, ज्याच्या करितां मी इतका प्रयत्न करिते आहे तीच वस्तू आज अनायासें हातांत येऊन पडली. आतां याविषयीं जास्ती चकार काढतां उपयोग

नाहीं. पहा आतां कशी मी त्या मेल्या सलाबतखानाला धूळीला नेऊन पोचवितें तें. '

' परंतु हे तूं ह्मणतेस तरी काय याचा मला मेलीला मुळीं अर्थच कळला नाहीं. ' तारा आश्चर्ययुक्त मुद्रेनें ह्मणाली.

' चल आतां घरांत; तेथें सर्व कळेल. '

इतकें बोलून रंभा व तारा आपल्या महालाकडे निघून गेल्या.

प्रकरण ४ थें

संबंध तुटला.

ते यंत्र आणि ती तसबीर घेऊन तारा आणि रंभा आपल्या महालाकडे जाण्या करितां निघाल्या, त्या वेळीं सुमारें अर्धी रात्र उलटून गेली होती. जिकडे तिकडे शांतता देवीचेंच साम्राज्य अप्रतिबद्ध चालूं होतें. तारा आणि रंभा हळूं हळूं आपल्या महालांत येऊन दाखल झाल्या. त्या आल्या असें पाहून नकली तारा आणि रंभा उठून उभ्या राहिल्या. त्यांनीं आपला वेष काढून टाकला. व ती नकली रंभा झालेली दासी खऱ्या रंभेस ह्मणाली. " थोडया वेळापूर्वी माताजी इकडे आल्या होत्या. त्यावेळी ही (नकली तारा बनलेल्या दासीकडे बोट दाखवून) गाढ निजली आहे असें पाहून त्या चालत्या झाल्या. जरा उभ्या रहाणार परंतु, इतक्यांत एकीनें अर्जुनजी आल्याची खबर दिली. ह्मणून त्या तडक तिकडे गेल्या. '

" इकडे अर्जुनजीस येऊन वेळ तरी किती झाला ? " तारेनें जलदीनें विचारिलें.

" अजमासे अर्धी घटका झाली असेल नसेल. त्या गेल्यावर मी चपलेला त्यांच्या मागोमाग गुप्त रीतीनें जाऊन काय काय त्यांचीं भाषणें होतात हें ऐकण्याकरितां पाठविलें व कांहीं वेळानें मीही तिकडे त्या पलीकडील खोलींत जाऊन त्यांचें सर्व भाषण ऐकलें. परंतु त्यांत आपल्या (तारेच्या). लग्ना-

विषयीं कांहीं निघालें नव्हतें. माताजी अर्जुनजीस कांहीं खाण्याकरितां पदार्थ करीत होत्या व मधून मधून त्यांच्याशीं कांहीं हळूं हळूं भाषण करीत; परंतु, तें आह्मांस ऐकूं येईना. ''

हें त्या दासीचें भाषण ऐकतांच रंभा तारेसह चटकन् त्या कोठडी-मध्यें निघून गेली. तिनें सर्व दासींना आपआपल्या पहाऱ्यावर जाण्यास हुकूम दिला. त्याप्रमाणें कांहीं निघून गेल्या व कांहीं राहिल्या. त्यास, आपण ज्या खोलींत होत्या त्या खोलीच्या बाहेर पहारा करण्यास सांगितलें. हें सांगण्याचा हेतु इतकाच कीं आंत त्यावेळीं कोणी न यावें.

ही कोठडी लहानच होती, परंतु चंद्रावती ज्या ठिकाणीं अमरसिंहाकरितां खाण्याचे पदार्थ करीत बसली होती त्याच्याच शेजारी होती. तेथून चंद्रावती काय करीत आहे हें सर्व चांगलें दिसत होतें. त्या खोलींत आल्यावर रंभा व तारा एका खिडकींत पलीकडे काय चाललें आहे हें पहाण्याकरितां उभ्या राहिल्या. त्यावेळीं त्यांना अर्जुनसिंह चंद्रावतीबरोबर कांहीं बोलतो आहे असें दिसलें ह्मणून त्या तें कान देऊन त्याचें भाषण ऐकूं लागल्या तों पुढीलप्रमाणें भाषण ऐकूं आलें.

अर्जुनसिंह ह्मणाला. ' इतकें यांत तुला तिरस्करणीय तें काय वाटतें ? असें करण्यांत तारा ऐश्वर्यवान् होऊन माझें हतभाग्याचेंहि नशीब उदयास येईल. पुढें तारा हिंदुस्थानची बेगम होणार हे तुला मान्य तरी कसें होत नाहीं बुवा ? '

' अरें तूं अगदींच कसारे विचारांध झालास ? खरोखर हे तुझें मूर्खपणाचें भाषण ऐकून मला तुझा राग येऊं लागला आहे. बोलून चालून हे मुसलमान अगदींच अस्पर्श्य आहेत, कीं ज्यांचा स्पर्श झाला असतां आर्य-धर्माभिमानी सचैल स्नान करतात आणि इतके असतां तूं आपली भाची असल्या अपवित्र मुसलमानांना देण्याकरितां प्रत्यक्ष मला उपदेश करतोस तेव्हां आतां तुला ह्मणावें तरी काय. अगदींच कसा तुझा धर्माभिमान नाहींसा झाला ? आपल्या क्षत्रियकुलाचा अभिमान धरण्याचें टाकून तुला मुसलमान धर्म जास्त प्रिय वाटतोना ? धिक्कार असो तुला. काळच फिरला यांत तुला दोष देण्यांत काय अर्थ आहे. कलियुगांत हे असेच तुझ्यासारखे मूर्ख लोक उत्पन्न होऊन आमचें निर्मल रजपूतकुल जळून खाक करणार. ह्मणाऱ्या गोष्टी थोड्याच मनुष्यांचें हातून चुकणार आहेत. तुझ्यासारखे

वीरोत्पन्न वीर जर लोभवश होऊन नाहीं नाहीं तसे अनाचार करूं लागले तर माझें बोलणेंच खुंटलें. '

'हें पहा तुह्मासारख्या बायकांचें चुकतें ते इथेंच. आजपर्यंत जोधपूर जयपुरसारख्या ठिकाणच्या मोठमोठ्या सरदारांनीं आपल्या मुली दिल्लीच्या बादशहास किंवा शहाजाद्यास दिलेल्या तुला स्मरत नाहींत काय ? फार लांब कशाला जायला पाहिजे, प्रत्यक्ष तुझ्या श्वशुरकुलामधील स्त्रियासुद्धा बादशहाच्या बेगम बनल्या आहेत. मग तुलाच असें करण्यांत काय ह्मणून दुःख वाटावें. हें नाहीं मला कळत. '

' ज्याला आपल्या धर्माचा अभिमान नाहीं, बायकासारखे जे घरकोंबडे होऊन बसले, त्यांनीं आपल्या पोरी मुसलमानास नेऊन दिल्या ह्मणून त्यांचें तें करणें ग्राह्यच समजून सर्वांनींच आपल्या पोरी अविंधाना देणें मुळींच सशास्त्र होणार नाहीं. व जर कदाचित चांगल्या कुलांतील स्त्रिया मुसलमानांच्या अर्धांगी बनल्या असतील तर त्या खास स्वतःच्या खुषीनें झाल्या नाहींत. केवळ बलात्कारानें त्या मार्गाचें त्यांना अवलंबन करावें लागलें आहे. जो खरा आर्यधर्माभिमानी आहे तो कधींही आपल्या पोरी विजातीयांना नेऊन देणार नाहीं हें तूं खास समज. '

' खरोखर तुजसारखी मूर्ख स्त्री कोणी या दुनीयेमध्यें नसेल कीं, जी प्रत्यक्ष दारासारखा जावई मुद्दाम चालत येत असतां त्याला लोटून देण्यास तयार होते--- '

' मला एवढें खास माहिती आहे कीं माझी तारा आजपर्यंत ज्यांनीं आपलें शीर मुसलमानापुढें नमविलें नाहीं; किंवा आपल्या पोरीही त्यांना नेऊन दिल्या नाहींत, अशा सिसोदिया घराण्याची राणी झाली तरी तिचें वैभव हिंदुस्थानच्या बेगमपेक्षां अधिक आहे आतां असें होण्यांत तूं कदाचित् समजत असशील कीं आपल्याला दाराची प्रधानकी मिळणार नाहीं. परंतु खरोखर ती तुला तारा बेगम झाली असतां थोडीच मिळणार आहे तो केवळ तुझा भ्रम आहे. खरोखर या भारतवर्षाच्या वैभवाचा इतिहास प्रत्यक्ष तुझ्या डोळ्यापुढें असतां तूं अंध बनून या लोकांवर विश्वास ठेवितोस तेव्हां तुला ह्मणावें तरी काय ? अरे, सापावर कधीं कोणी विश्वास ठेविला आहे काय ? त्याला वेळेस टांचेनेंच चिरडला पाहिजे. व आजपर्यंत अशीच परंपरा आली आहे. आणि तूं तिकडे मुळींच कानाडोळ

करतोस तेव्हां धिक्कार असो तुला. अद्याप तरी डोळे उघड. पूर्वजांनीं काय पराक्रम केले, हे स्मरून तसें शौर्य गाजीव. असलें नीच कृत्य करण्यांत तुला भूषण तें काय वाटतें ? आतां हा मोह टाकून दे— '

' जशी तुझी इच्छा; परंतु इतकें ध्यानांत ठेव कीं माझ्या मनाप्रमाणें आज न वागशील तर तुझा आमचा ह्या घटकेला संबंध तुटला झणून समज. '

' कांहीं चिंता नाहीं. स्वधर्म आणि जात या उभयतांच्या संरक्षणाकरितां सर्व जगाचें नातें जरी तुटलें तरी बेहतर. परंतु तुझे अधर्मबोल मात्र कधींही मी मान्य करणार नाहीं. '

' ठीक आहे. दाराला तारा कशी युक्तीनें मी नेऊन देतों हें प्रत्यक्ष तूंच पहा अतां. '

' तुला जें काय करायचें असेल तें कर. आणि दारासही तसें करण्यास मोकळीक आहे. पण लक्षांत ठेव कीं तारा प्राण गेला तरी या गोष्टीला कबूल होणार नाहीं. ती हट्टी बापाची कन्या आहे. आणि तिचा स्वभावहि पण मी पूर्णपणें जाणतें आहे. असाच कांहीं तिजवर प्रसंग येऊन बेतला तर ती दारा समोर जाण्यापूर्वीच आत्महत्या केल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं. ती आपला अपमान कधींहि करून घेणार नाहीं. धर्माकरितां ती मेली असतां मला मुळींच दुःख वाटणार नाहीं; उलट अत्यानंद होईल. मुसलमानाच्या शय्येवर विहार करण्यापेक्षां तारेनें चितेंत उडी टाकलेली ऐकून मला अत्यंत समाधान वाटेल. स्त्रियांनीं धर्मसंरक्षणाकरितां रात्रंदिवस झटावें आणि तुझ्यासारख्या नीच क्षत्रियकुलांगारांनीं त्यांचा सत्यानास करण्यास तयार व्हावें यापेक्षां दुर्दैवाची दुसरी गोष्ट ती कोणती असायला पाहिजे. '

हें बोलतां बोलतां चंद्रावतीचे डोळे क्रोधानें अग्नीसारखे लाल झाले. ओंठ थरथर कापूं लागले. आतां डोळ्यांतून प्रत्यक्ष अग्नीच पडतो कीं काय असें स्पष्ट दिसूं लागलें. हें पाहून अर्जुनसिंह जरा कचरल्यासारखा दिसला. त्याला चंद्रावतीची क्रोधपूर्ण दृष्टि सहन होईना. तो तडक घराबाहेर जाण्याकरितां निघाला. जातां जातां एवढेंच झणाला ' या अपमानाचा सूड कधीं तरी घेतल्याशिवाय मात्र मी स्वस्थ बसणार नाहीं. सावध ऐस. थोड्या अवधींत याचा मोबदला मिळेलच. '

हें ऐकून चंद्रावतीहि कठोर शब्दानें ह्मणाली " जो बंधू प्रत्यक्ष कंसमय झाला, जो आपल्या बहिणीचा खून करण्यांतच मोठा पुरुषार्थ समजतो, व जो आपल्या भाचीला यवनाला विकण्यांतच मोठेपणा मानतो, ज्याला स्वधर्माची चाड नाहीं, जातीचा अभिमान नाहीं अशा या मूर्तिमंत कंसाची बहीण त्याला थोडीच भीक घालणार आहे ! माझा तर पूर्ण निश्चय ठरला आहे. ' मानसहित मरिवो भलो '

अर्जुनसिंह तेथून निघून गेल्यावर लागलेंच चंद्रावतीनें एका दासीस रंभेला बोलावून आणा' असें सांगितलें. रंभा इकडे तारेजवळ बसली होतचि. तिनें तें ऐकिलें व तेथून ती उठून बाहेर दरवाज्यापाशीं आली. तारा आंतच होती. इतक्यांत दासी तेथें येऊन तिनें रंभेस चंद्रावतीचा निरोप सांगितला; त्यावर रंभा चटकन् चंद्रावतीच्या महालांत शिरली.

प्रकरण ५ वें.

चंद्रावती व रंभा.

रंभा चंद्रावतीच्या महालांत गेल्यावर चंद्रावतीनें ज्या कांहीं खिडक्या उघड्या होत्या त्या सर्व बंद केल्या व पलीकडल्या एका दालनांत येऊन उभयतां गुप्त रीतीनें बसल्या. त्या कोठें बसल्या व काय करताहेत तें मात्र सर्व तारेला ती ज्या कोठडींत बसली होती तेथून दिसत होतें. रंभेजवळ चंद्रा व ती येऊन बसल्यानंतर चंद्रावती तिला ह्मणाली:—

' आजपासून अर्जुनचा सर्व संबंध तुटला ! '

' काय काय असें व्हायला झालें तरी काय ' रंभेनें जसें कांहीं आपणास यांपैकीं कांहींच माहीत नाहीं असें दर्शवून विचारलें.

नंतर चंद्रावतीनें अर्जुनसिंहजी आल्यापासून परत जाईपर्यंत घडलेली सर्व हकीकत तिला सांगितली. हें ऐकून रंभा ह्मणाली,

' झाली गोष्ट ती कांहीं चांगली नाहीं झाली. दुष्ट लोकांबरोबर मी

ज्याप्रमाणें नित्य वर्तन ठेवतें तद्वत् आपणही ठेवीत जा असें मीं सांगितलें होतेंना ? असल्याशीं त्यांच्याच मनाप्रमाणें वागून त्यांचींच बोटें त्यांच्या डोळ्यांत घातलीं पाहिजेत.'

' तूं ह्मणतेस तें कांहीं खोटें नाहीं. त्याच्याशीं मी तसेंच वर्तन ठेवणार. परंतु, त्याचे ते शब्द ऐकतांच मी रागानें आपलें देहभान विसरून गेले. यामुळें ती गोष्ट अशा थराला येऊन पोंचली. बाळे रंभे ! तूं अगदीं लहान असतांना तुझे आईबापांनीं तुला आमच्या हवाली करून स्वर्गलोकची वाट धरली, त्यावेळीं तूं किती लहान होतीस. ह्मणून सांगूं ? तुला अंगावरल्या दुधाशिवाय दुसरें कांहीं खातापिता येत नव्हतें. परंतु, मी तेव्हांपासून तारेची आबळ केली असेल, परंतु तुला जपण्यांत काडी इतकी कसूर केली नाहीं. तुला लहानाची मोठी केलीं. माझा तुला अधिक लळा लागला. तू मला मातेपेक्षां जास्त समजतेस व तारेलाही आपल्या सख्या बहिणीप्रमाणें मानतेस. ती ह्मणजे सध्यां तुझ्या गळ्यांतील ताईतच बनली आहे. तिला काटा मोडला तर तुला रडूं येतें इतकें तुझें व तिचें निष्कपट प्रेम आहे. सध्यां तिजवर जो प्रसंग येऊन गुदरला आहे त्यांतून तिचें रक्षण करणें सर्वस्वी तुजवर अवलंबून आहे. तिकडची कशी स्थिती आहे ती तर तूं पूर्ण जाणत नाहींस असें नाहीं. इकडे दारांनीं आणि सलाबतखानांनीं तर धुमाकूळच माजविला आहे. उदयपुरवाले तर इकडे ढुंकूनहि पहात नाहींत. त्यांचे खरें आहे ! जोपर्यंत कन्या त्यांच्या ताब्यांत दिली नाहीं तोंपर्यंत वरपक्ष तरी काय करणार ? अशा या संकट समयीं तारेची हित चिंतणारी आणि त्यांतून तिचें संरक्षण करणारी एकटी तूंच आहेस. तुझ्याशिवाय ही गोष्ट कोणाचे हातून होणें शक्य नाहीं. आतां यांतून सुटायला उपाय काय ? "

' माताजीं ! आपण त्याची मुळींच काळजी करूं नये. तारेविषयीं आपण आतां निःशंक रहा कशा. आपल्या आशिर्वादानें तारेच्या एका केसाला धक्का लावूं देत नाहीं. उदयपूरहून मिश्रजी पण लवकरच येतील असें मला वाटत आहे. ते खास त्या कार्यामध्यें विजयी होऊन येणार व कुवरसाहेबही शिपाइप्याद्यासह येथें येऊन तारेला उदयपुरला बिनधोक घेऊन जातील. '

' खरोखर सर्वस्वीं तारेचें जीवन तुझ्या हातांत आहे. तिच्याकरितां तूं

जितकी स्वतःच्या जिवाकडे न पहातां अव्याहत खटपट करतेस इतकी खटपट कोणी आपल्या पोटच्या पोरीकरितां करणार नाहीं. '

या ठिकाणीं हें सांगणें अवश्य आहे कीं रंभा जें कांहीं गुप्त रीतीनें कृत्य करी व करायचें योजी तें सर्व चंद्रावतीपासून ती लपवीत नसें. जें कांहीं ती करी तें सर्व तिला सांगून व तिची त्यांत सल्ला घेऊन करीत असें व चंद्रावतीहि रंभेजवळून कांहीं चोरीत नसे. रंभा रात्रीचें बाहेर पडण्याकरितां कदाचित् आठआठ दिवस नाहीसें होण्याकरितां चंद्रावतीची परवागी घेत असें. व चंद्रावतीहि पण तीस तसें करण्यांस परवागी देई. परंतु बिचारी तारा भोळी; तिला कोणतीही गोष्ट रंभा कळवीत नसे. उलट खोटेंच कांहीं तरी जें वेळेला सुचेल तें तिला सांगे. व तिचा रंभेवर अत्यंत विश्वास असल्यामुळें रंभा जें सांगेल तें सर्व तिला खरेंच वाटे. रंभेनें उदयपुरला मिश्रजी पाठविला होता तो सुद्धां चंद्रावतीच्याच संमतीनें.

बरेच वेळ रंभेचा व चंद्रावतीचा संवाद झाला, परंतु त्यांतील एकही शब्द तारेला कळला नाहीं. रंभेनें चंद्रावतीस पुष्कळ धीर दिला. व तेथून ती तारेकडे आली. रात्र बरीच झाली होती. यामुळें आतां यापुढें कांहीं न बोलतां स्वस्थ चार घटका निद्रा घ्यावी असें रंभेनें तारेस सुचविलें; त्याप्रमाणें त्या दोघी आपल्या महालांत आल्या. तारा आपल्या पलंगावर येऊन पडली व इतक्यांत दोन दासी तिचे पाय रगडू लागल्या. रंभेनेंही दुसऱ्या पलंगावर निजण्याचें मिष करून आपलें अंग टाकलें. कांहीं वेळानें तारेला गाढ निद्रा लागली आहे असें पाहून ती त्यावरून उठली व दुसऱ्या खोलींत जाऊन तिनें तें मागें सांपडलेलें पत्र व तसवीर पुनः एकदां पाहिली व तिनें एक कागद आणून त्यावर त्या संबंधानें सर्व मजकूर लिहून तो कागद एका लखोटयांत घालून तो लखोटा बंद केला व आपल्या एका चतुर दासीस बोलावून तिच्या हातांत दिला व तिच्या कानांत सांगितलें कीं हा इनायतुल्लास नेऊन दे. त्यावर दासी तिकडे निघून गेली. रंभाही मग जाऊन निजली. निजण्यापूर्वी तें सांपडलेलें पत्र व तसवीर तिनें व्यवस्थेनें एका पेटींत घालून ठेवली. यावेळीं सुमारें दोन वाजण्याची वेळ झाली होती.

प्रकरण ६ वें.

कांहीं गोष्टींचा स्फोट.

तारा एकदम झोंपेतून जागी झाली व पलीकडील पलंगावर रंभेला पाहूं लागली तों तिला त्या ठिकाणीं ती दिसली नाहीं. म्हणून तिनें दासीस रंभेला बोलावून आणण्यास सांगितलें; परंतु त्यावर दासी म्हणाली " बाई-साहेब आह्मीं सुद्धां उठल्यावर त्यास पलंगावर पाहिलें.० परंतु त्या आह्मांस दिसल्या नाहींत. " दासीचे हे शब्द ऐकल्यावर तारा पलंगावरून खालीं आली व तिनें रंभेला शोधण्याकरितां सर्व घर आणि बाग धुंडाळलीं. परंतु तिचा पत्ता म्हणून तिला लागला नाहीं. रंभा नाहींशी झालेली पाहून तारेची चित्तवृत्ति अगदींच बावरल्यासारखी झाली. ' रंभा कोठें बाहेर गेली किंवा कांहीं तिजवर संकट ओढवलें म्हणून ती इकडे आली नाहीं.' असे नानातऱ्हेचे तरंग वरचेवर तिच्या मनांत येऊं लागले. रंभेकरितां तारेनें सर्व दिवस घरांत वसून काढला. स्नान किंवा अन्नग्रहण सुद्धां तिनें केलें नाहीं. रंभा नाहींशी झालेली पाहून चंद्रावती सुद्धां घाबरून गेली. अशी कधीं कधीं रंभा नाहींशी होत असे, परंतु त्या वेळीं चंद्रावती मुळींच घाबरत नसे. आजपर्यंत रंभा बाहेर जातेवेळीं चंद्रावतीस सांगून जात असे परंतु आज ती न सांगतां एकाएकीं नाहींशी झाली होती सबब ती फारच घाबरून गेली.

सूर्यास्त झाल्यावर बऱ्याच वेळानें रंभा घरीं परत आली. ती आली असें कळतांच धांवत धांवत रंभेजवळ येऊन तारेनें तिच्या गालावर टिचकी मारिली व म्हणाली. "रंभे, कोणीकडेग सकाळपासून नाहींशी झाली होतीस? जातांना तुला सांगून जायला काय झालें ? तुझ्याकरितां माझे पंचप्राण कसे अगदीं या वेळपर्यंत गोळा होऊन गेले होते. सांग सांग लवकर कुठें गेली होतीस तें. "

" सांगूं तरी काय तुला ? " रंभा म्हणाली " आज मी ज्या मोठ्या संकटांत पडलें होतें त्यांतून मी सुरक्षितपणें पार पडून तुला भेटेन असें मला मुळींच वाटलें नव्हतें. सुटलें हें माझें मोठें नशीबच समजलें पाहिजे. बरें तें राहो. अगोदर कांहीं पोटपूजेची व्यवस्था केल्याशिवाय मला कांहीं सुचणार नाहीं. तें झाल्यावर मी तुला सर्व सांगतें. "

इतकें सांगून रंभा चंद्रावतीस जाऊन भेटली व तिजबरोबर एकांतांत कांहीं गोष्टी बोलून तारेला येऊन मिळाली. त्यांनीं उभयतांनीं नंतर यथाविधि भोजन केलें व नंतर त्या दोघी बागेमध्यें टेहळणीकरितां निघून गेल्या. बागेंत आल्यावर त्या दोघी तेथील सरोवराच्या काठीं असलेल्या संगमरवरी दगडावर येऊन बसल्या आणि आपल्या विश्वासूक दासींना दूरदूर पहारा करण्यास त्यांनीं सांगितलें. हें सांगण्याचा हेतु इतकाच कीं त्यांना कांहीं गुप्त गोष्टी बोलावयाच्या होत्या त्या त्यांना न कळाव्या.

" तारे ! आज मी ज्या गोष्टींचा तुला पत्ता नाहीं त्या सर्व तुला सांगतें ऐक. आजपर्यंत मी तुजजवळून पुष्कळ गोष्टी छपविल्या आहेत व कित्येक वेळीं तर खोट्या खोट्याच गोष्टी तुझ्या मनांत भरून दिल्या आहेत. हें सांगण्याचें कारण तरी काय ह्मणशील तर केवळ खऱ्या गोष्टी मीं जर सांगितल्या तर तूं मला त्या करून देणार नाहींस. मी जी नेहमीं बाहेर जात असतें ती कशाकरितां, केवळ मुसलमानांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालून त्यांना साधय करावें ह्मणून. हेंच जर मीं तुला प्रत्येक वेळीं सांगून जाण्याचा उपक्रम ठेवला असता तर तूं खात्रीनें मला घराबाहेर एक पाऊल सुद्धां टाकूं दिलें नसतेस. घराबाहेर पाऊल टाकणें ह्मणजे प्रत्यक्ष आपला जीव धोक्यांत घालणें असाच तुझा ग्रह झाला असता आणि खरोखर काल मजवर असाच प्रसंग आला होता पण त्यांतून मी कशी तरी पार पडलें. "

तारा यावर ह्मणाली " तूं कोणत्या तरी महत्त्वाच्या कामांत गुंतली आहेस आणि जेव्हां जेव्हां त्याविषयीं मीं तुला विचारतें तेव्हां तेव्हां तूं मला उडवाउडवीचीं उत्तरें देऊन माझें समाधान करीत असतेस हें सर्व मी जाणून आहें; परंतु मी फारसा हट्ट घेऊन त्यासंबंधानें कधींच विचारीत नाहीं. जरी आज मला तूं कांहीं सांगितलें नाहींस तरी पण पुढें मागें सर्व सांगशील असा मला पूर्ण विश्वास असल्यामुळें मीही पण मुद्दामच जास्त चौकशी करीत नाहीं. तुझ्या गोष्टी मला कळत नसतील इतकी मी दूधपिती पोर असेन असेंच तुला वाटतेंना ? मी आज पुष्कळ दिवस तुझें बारकाईनें निरीक्षण करतें आहे. माताजीबरोबर हळूहळूं गुप्त रीतीनें कसले बेत करीत असतेस, हें मी नित्य पहात असतें. वरचेवर तूं कोठें गुप्त रीतीनें घरांतून बाहेर जातेस. कधीं कधीं तर आठ आठ दिवस

तुझा पत्ता सुद्धां नसतो. हें जसें कांहीं मला कळतच नसेल नाहीं ? तूं काय काय करतेस याची मी चौकशी कां करीत नाहीं हें तुला ठाऊक आहे ? मला एवढें माहीत आहे कीं तूं मजजवळून कांहीं जरी गुप्त ठेवितेस तरी तें सर्व माझ्या हिताचेंच करीत आहेस. "

" वाः एकूण तूं आतां बरीच धोरणी झालीस म्हणावयाची. मग मला या गोष्टी विचारतेस तरी कशाला ? आणि मी तरी मुद्दाम कशाला बाई तुला सांगूं ? " रंभा थट्टेनें म्हणाली.

" आतां मला सांग नाहींतर ठार तरी मारून टाक. आपणही मारीत नाहीं आणि मलाही पण मरायला परवानगी देत नाहीं. " तारा रंभेच्या गालावर रागाविभराविनें चुटकी मारून म्हणाली.

" बरं बाई सांगतें हो आतां तुला. लहानपणापासून मीं तुझ्या येथेंच आहें. खाणें पिणें, निजणें सवरणें, शिकणें देखील तुझ्या बरोबरच झालें आहे. खरोखर तारे, तूं मला आपल्या सख्ख्या बहिणीपेक्षां ज्यास्त मानतें आहेस. मी अगदींच अज्ञानदशेंत असतांना मला माझे आईबाप तुमच्या येथें टाकून परलोकवासी झाले, तेव्हांपासून मीं तुझ्याच आईबापांना माझ्या माल-काप्रमाणें समजतें आहें. आणि खरोखर ते तसेच आहेत. तुला सुद्धां मीं आपल्या सख्ख्या बहिणीप्रमाणें वेळेनुसार त्यापेक्षां जास्त समजत असतें. "

" या पुराणांतरींच्या गोष्टींचें या वेळीं काय काम आहे ? वारंवार याचा तूं मजजवळ उच्चार करतेस तें जसें कांहीं मी जाणत नाहीं म्हण किंवा तुला बहिणीप्रमाणें मानीत नाहीं. "

" ऐक ग, आजपर्यंत मी तुजबरोबर वाढलें, शिकलें याची आठवण कर. मी तुजबरोबर राजमंदिरांत जहांनारेच्या वस्तादांजवळ (अब्दुल अजिजसाहेब) पार्शीभाषा शिकले आणि आपण उभयतां तेथें नित्य निर-निराळे खेळ खेळत असूं. तें पाहून जहांनारा अत्यंत प्रसन्न होऊन ती आपणांतही खेळण्यास येत असे, हें तुला स्मरत असेलच. "

" मला सर्व स्मरतें आहे आणि यापुढें त्याचें मला निदान मरेपर्यंत तरी विस्मरण होणार नाहीं. "

" त्या वेळीं तूं कधीं कधीं जहांनारेजवळ एकटीच रहात होतीस. आणि

मी राजमंदिरांत चोहोंकडे फिरत असे. त्या फिरण्यांत मीं राजगृहांतील एकही जागा पहाण्याची ह्मणून ठेविली नाहीं. हळूं हळूं जहांनारेच्या दासीची आणि माझी मैत्री जमली. खरोखर जोहरा फारच विश्वासू आहे. थोडयाच काळांत ती मला सख्ख्या बहिणीप्रमाणें समजूं लागली आणि हें आमचें जमलेलें मेतकूट मुळीं सुद्धां आह्मीं कोणास कळूं दिलें नाहीं. खरोखर पापूनीं ती ह्मणजे पुढें मागें माझी चांगली मदतगार बनेल असें स्वप्न सुद्धां कधीं पडलें नव्हतें. खरोखर आह्मी सख्ख्या बहिणीप्रमाणें वागतों—आणि पुढ प्राणांत होईपर्यंत वागूं—ह्मणून मला प्रत्येक कामांत तिचा चांगलाच उपयोग होतो. तुझ्यासंबंधीं आजपर्यंत मीं जीं जीं धोक्यांचीं कामें हातीं घेतलीं त्यांत सुद्धां मला तिचेंच पाठबळ अधिक मिळत गेलें. कदाचित् तिचा माझा स्नेह मुळींच जमला नसता तर तुला मदत करणें मुळींच मजकडून झालें नसतें. उलट तूं मुसलमानांच्या हातांत केव्हांच गेली असतीस. कदाचित् तूं आत्महत्याही करण्यास तयार झाली असतीस. बाहेर जाण्याविषयीं मी प्रथम माताजीची आज्ञा मिळविण्याकरितां त्यांच्याजवळ गेलें असतां जोहराचा आणि माझा बराच स्नेह आहे असें त्यांना त्या दिवशीं कळविलें आणि आज तुला कळविलें एवढेंच. तुमच्या दोघांशिवाय हें कोणासही आजपर्यंत माहित नाहीं. ”

“ काय ह्मणतेंस जोहरा जातीनें मुसलमान असतां तुझा आणि तिचा इतका स्नेह जमला ? आणि तूंही तिजवर बेलाशक विश्वास ठेवितेस ? ” तारेनें साश्चर्य विचारिलें.

“ हो हो. ठेवतेस ह्मणून काय विचारतेस ? जोहरा ह्मणजे एक अस्सल रत्न आहे. तिच्यासारखी विश्वासू आणि स्नेह करण्यास योग्य अशी स्त्री जगांत कचित्च सांपडेल. तिचा माझा स्नेह जडल्यावर तिनें एके दिवशीं आपली इत्थंभूत कथा सुद्धां सांगितली. ती खुरासान येथील एका प्रसिद्ध अमीराची कन्या आहे, तिचा बाप फारच श्रीमान् होता. एके दिवशीं कांहीं दरोडेखोरांनीं त्याचें घर लुटलें, त्याला ठार मारिलें, सर्व धन होतें नव्हतें तेवढें घेऊन ते पळाले. जातांना जोहरेला पण घेऊन गेले. पुढें त्यांनीं तिला मुडदेफरासास विकलें. तो मुडदेफरास कांहीं दिवसांनीं हिंदुस्थानांत आला असतां जहांनारेनें त्याच्याकडूनजोहरेस पांच हजार रुपयांस विकतघेऊन तिनें तिला आपल्या दासीवर देखरेख करण्याचें काम नेमून दिलें. ती फारच हुशार

आहे. तिला लिहितां वाचतां येतें. गाणें आणि नाचणें या दोन्ही कला तिला पूर्ण अवगत आहेत. ती उत्तम कशीदा काढते. इतकें येतें पण तिला त्याचा मुळींच गर्व नाहीं. तिचें मन अगदीं मोकळें आणि उदार असें आहे. ह्मणून मी जितका तुजवर विश्वास ठेवतें तितकाच तिजवर ठेवतें. जेव्हां जेव्हां मी राजगृहांत जात असे तेव्हां तेव्हां मी तिच्याशीं गुप्त कांहीं बोलत आहें असें तूं बरेच वेळ अवलोकन केलें असशील. तिचें मला पूर्ण साहाय्य असल्यामुळें मीं अग्रा किल्ल्यामधील कोणतेही गुप्त किंवा प्रकट मार्ग पहाण्याचें मुळींच ठेवले नाहींत. कधीं माझा ज्या ठिकाणीं प्रवेश सुद्धां होणार नाहीं अशीं सुद्धां गुप्त स्थानें मीं पाहिलीं आहेत. तीं स्थानें जहांनारा किंवा तिचीं जीं कोणी कृपापात्रें असतील त्यांनाच फक्त माहीत आहेत. ”

“ खरोखर आज तूं मला फारच महत्त्वाच्या गोष्टी सांगण्याचें मनावर घेतलें आहेस ह्मणायचें. ”

“ गोष्टी खऱ्या त्या अद्याप पुढेंच आहेत. त्या ऐकल्या ह्मणजे तूं आश्चर्यच करीत रहाशील. ऐक आतां. दिल्लीच्या किल्ल्यामधून अग्रयाच्या किल्ल्यांत येण्याकरितां एक गुप्त भुयार आहे. त्यांतून मध्यंतरीं निरनिराळ्या महालांत जाण्याकरितां वीस मार्ग आहेत. हे मार्ग फारसे लोकांना माहीत नाहींत. एखाद्याला बाहेरून किल्ल्यांत गुप्त रीतीनें यावयाचें असल्यास त्याला त्या मार्गानें सुरक्षित रीतीनें येतां येतें. असें मार्ग पांच आहेत. त्यांचीं सर्व द्वारें मला पूर्ण ठाऊक आहेत. त्यांपैकीं एक यमुनानदीच्या प्रवाहाखालून जातो दुसरा एका मशिदीमध्यें आणि राहिलेले तीन शहराबाहेरील जंगलांत निघतात. या सर्व मार्गांना श्वासोच्छ्वास जाण्याकरितां उस्त्रास आहेत. मी दोनतीनदां यमुनेच्या खालील मार्गानें किल्ल्यामध्यें आलें गेलें आहें. परंतु त्यांत आतां जलजंतु फार असल्यामुळें जरा जाण्यायेण्यास भीति वाटते. नदीखालून जाणारा जो मार्ग एका मशीदींत निघतो त्या मशिदीपासून सुमारें दोनशें यार्डांवर एक कबरस्थान आहे. आणि त्याजवळच एक जुनीपुराणी मशीद आहे. त्यांत गवत, सापकिरडूं वगैरे कांहीं नाहीं. शिवाय आमच्याशिवाय इतर कोणी उपद्व्यापी लोक कधीं तिकडे जात नाहींत. त्या मशीदीमधून कांहीं गुप्त मार्ग किल्ल्यामध्यें गेलेले आहेत. त्यांतून जहांनारा, रोशनआरा, मोतिबेगम,

शहाजहानबादशहाचे गुप्त हेर, गुप्त खजिना, गुप्त हत्यारें किंवा बातम्या जातात. आणि मीही पण जोहराबरोबर नेहमीं त्या मार्गानें जात येत असतें. तो मार्ग सुद्धां तिनेंच मला दाखविला आहे. हे मार्ग इतके कांहीं गुप्त आहेत कीं त्यांची चांगली माहिती जहांनारा, रौशनआरा किंवा बादशहापैकीं कोणासही नाहीं. याच मार्गाला एक जोडलेला दुसरा मार्ग आहे. तो मार्ग जोहराच्या महालांत जातो. तो मार्ग जोहरा किंवा माझेशिवाय तिसऱ्या कोणास माहीत नाहीं. जोहराच्या महालांतून आणखी एक मार्ग एका दुसऱ्या घरांत जात आहे. त्या घरांत वेष पालटण्याचें सर्व सामान तयार आहे. त्याच घरांत मी नेहमीं वेष पालटून आपलें कार्य उरकून घेत असतें."

'खरोखर रंभे ! तुझी बाई धन्य आहे. तूं जें सांगते आहेस त्याची मला कधीं स्वप्नांत सुद्धां कल्पना आली नाहीं.'

'ऐक, ऐक तर खरी पुढें आणखी काय काय मजा आहे ती.'

रंभा किती कारस्थानी स्त्री होती याची थोडीबहुत कल्पना आमचे वाचकांना आलीच असेल. पहिल्या भागांतील चौदाव्या प्रकरणांत आह्मीं रंभेच्या चलाखपणाविषयीं थोडा उल्लेख केला आहे त्याचा स्फोट आतां या प्रकरणांत होईल.

रंभा ह्मणाली "जोहरा सरलस्वभावी, मनमिळाऊ, विचारी, सुशिक्षित अशी आहे हें मीं तुला प्रथमच सांगितलें आहे. परंतु इतकी शहाणी असतांना सुद्धां नूरुल्हकनें तिला सहज फसविलें. आणि त्यानें जें कांहीं तिच्याशीं कुकर्म करण्याचा घाट घातला होता तो सर्व तिनें मला कळविला. मला सुद्धां तें एकून फारच दुःख झालें पण उपयोग काय ? मीं तिची पुष्कळ रीतीनें समजूत घातली. खरोखर नुरुल्हक जर तिच्याशीं चांगल्या भावानें वागता तर जोहरानें त्याच्याशीं लग्न लावलें असतें आणि पुढें तें जोडपेंही चांगलें सुखानें नांदतें. दोघांचें पूर्वी प्रेमही जमलें होतें. ती नेहमीं आपल्या महालांतील गुह्य मार्गानें नूरुल्हकचे महालांत येत असे. परंतु तिनें कधींहीं माझ्या महालांतून आपल्या महालांत येण्याकरितां एक गुप्त मार्ग आहे असें त्यांना सांगितलें नव्हतें.

"एके दिवशीं मध्यरात्रीं मी हातांत तलवार घेऊन त्या गुप्त मार्गातून

फिरत असतां एकदम माझ्या मनांत कांहीं आलें आणि मी एकाएकीं रौशन-आरेच्या महालांत आलें. तेथें आल्यावर चोरून मीं पाहिलें तों शहाजादी रौशनआरा आणि नूरुल्हक असे एकटेच बसले आहेत. ते कांहीं बोलत होते तेंही पण मीं पूर्ण ऐकिलें. त्यांत सांगण्यासारखें एवढेंच होतें कीं, नूरु-ल्हक ह्मणाला 'आतां जोहराचें नशीब चांगलेंच फुटलें ह्मणून समज.' हें मी त्याचे तोंडचे शब्द ऐकले मात्र कीं, त्याक्षणींच ते तसेच्या तसेच मीं जोहरेस जाऊन सांगितलें. हें सांगतांच तीही तें पाहण्याकरितां ताब-डतोब तेथें आली. तिनें त्यांचें सर्व संभाषण ऐकिलें. मग तिनें पुढें एके दिवशीं पुन्हां गुप्त रीतीनें रौशनआरेच्या महालांत येऊन तिच्या जवाहिराच्या पेटींत नूरुल्हकची तसबीर पाहिली. व त्याचीं सर्व भाषणें गुप्त रीतीनें ऐकलीं. त्या वेळीं तिला खरोखर नूरुल्हकचा अत्यंत राग आला पण माझ्या सांगण्यावरून तिनें तो दाबून नुरुल्हकला तेथून दूर नेण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केला. परंतु तो बेइमानी तिचें कसचें ऐकतो ? अखेर पुढें एके दिवशीं त्यांची दोघांची चांगलीच लठ्ठालठ्ठी झाली. त्या वेळीं मीही गुप्त रीतीनें भुयारांत उभी होते. लठ्ठालठ्ठी झाल्यावर जेव्हां जोहरा घरीं पळून गेली तेव्हां मी सुद्धां तिच्या मागोमाग गेलें. तिला भेटल्यावर तिनें मला घडून आलेली सर्व हकीकत सांगितली. शिवाय तो गरोदर आहे हें देखील तिनें मला कळविलें आणि तो गर्भ नष्ट करण्याचें औषध मला तिनें आपल्या चोळींतून काढून दाखविलें आणि ह्मटलें " हें औषध मला नूरुल्हकनें दिलें. " मला त्या औषधाविषयीं बरीच शंका होती. नूरुल्हकचें खरें वर्तन मला जर न कळतें तर त्या औषधा-बद्दल मला शंका पण आली नसती— शिवाय मला असें कळलें होतें कीं नूरुल्हक सौसनरंडीकडे जात असतो. हें संशय येण्याला दुसरें कारण. या-करितां मीं जोहरेस सांगितलें कीं हें औषध जर तूं घेशील तर तुजवर कांहीं निराळाच भयंकर प्रसंग गुदरेल; हें तिलाही खरें वाटलें. आणि या औषधांत कांहीं खरोखर दगा आहे कीं काय हें पहाण्याकरितां तिनें त्या औषधाचे चार थेंब मांजरीस घातले तों कांहीं वेळानें बिचाऱ्या त्या मांज-रीनें तरफडत प्राण सोडला ! त्या दिवसापासून आमचें उभयतांचें प्रेम फारच दृढ झालें "

" बरें, मग जोहरानें तो गर्भ नष्ट करण्यास कोणाची मदत घेतली ? "

" हकीम इनायतुल्लाची आणि तेव्हांपासून आतां ती कोणा पुरुषाच्या दृष्टीं न पडण्याविषयीं चांगली खबरदारी घेत असते."

" इनायतुल्लानें तिला मदत केली आणि हें जहाँनारेस कसें कळलें नाहीं ? "

" इतक्या दिवस मीं ती गुप्त ठेविण्याकरितां तिला सांगितली म्हणून. आतां इनायतुल्लानें तिला मदत केली त्याचें कारण इतकेंच कीं, जोहरेस कांहीं काम इनायतुल्लाकडून करून घ्यावयाचें होतें तेव्हां ती त्यास म्हणाली आपण तें जर काम करीत नसाल तर मला गर्भावस्थेंतून मुक्त करा. आणि जर न कराल तर मात्र मी शहाजादीस कळवीन कीं इनायतुल्ला-च्याच प्रतापानें ही अवस्था मला प्राप्त झाली आहे ". हे तिचे शब्द ऐकून इनायतुल्ला तर भ्यालाच आणि त्यानें विचार केला कीं आपण जर हिला यांतून मुक्त न केलें तर खरोखर ही शहाजादीस असें सांगण्यास मुळींच मागें घेणार नाहीं आणि मी मात्र संशयाला व्यर्थ कारण होईन. अथवा एवढेंच करून ती राहणार नाहीं तर आणखी कांहीं अपराध मजवर घालून नूरुद्दीनप्रमाणें माझी वाट लावील. असा विचार करून त्यानें एकदांची तिला त्यांतून मुक्त केली आणि तेव्हांपासून हकीमसाहेब तिच्यापासीं अगदीं भिऊन वागत असतात. मध्यंतरीं तिची मर्जी संपादन करण्याच्या हेतूनें ते तिला कांहीं बक्षिसेंही देत असतात. हकीम साहेबाकडून जें औषध ती घेई तें मी प्रथम परीक्षा केल्याशिवाय मात्र घेत नसे. "

'पुढें पुढें मीं जोहरेच्या मदतीनें जहांनारा, रौशनआरा आणि मोतिबे-गम या सर्वांच्या कृपापात्रांची ओळख करून घेतली. सौसनरंडी सुद्धां माझ्या कबज्यांत आली. रौशनआरा औरंगजेबास राज्य मिळावें या हेतूनें नित्य प्रयत्न करीत असते आणि आपल्याला त्यांत यश येण्याकरितां तिनें बरेच राजकर्मचारी आपल्या बाजूचे करून घेतले आहेत. दर महिन्यानें त्यांची एक गुप्त सभा सुरंगामध्यें भरत असते. त्या सभेंतून तर मीहि एक-दोनदां जाऊन आलें आहें. त्या सभेंत काय काय होत असतें हें जाणण्या-करितां जात असतांना मीं राजमंदिरांतील बेगमला शोभण्यासारखा पोशाख केला

१ दिल्लीच्या किल्ल्यांतून अग्र्याचें किल्ल्यांत येण्याकरितां जो गुप्त मार्ग केला होता त्याचें नांव व पुढेंही हा शब्द आला असतां याचा अर्थ असाच समजावा.

त्या वेळीं खरोखर इनायतुल्ला व रौशनआरेच्या कृपेंतील सलावतखान सुद्धां मला पाहून फसले. माझें रूपच जर बेगमला शोभण्यासारखें आहे तर मीं तसा पेहराव केल्यानें कोण नाहीं फसणार ?

यानंतर तारा आणि रंभा फिदिफिदी हंसूं लागल्या. मग त्यांनीं आपलें हंसूं आंवरून धरिलें आणि रंभा पुढें सांगूं लागली कीं, " अशा रीतीनें मीं कांहीं लोकांना फसविलें आहे आणि पुढेंही लवकर असेंच सर्वांना चकवीन. सौसन मला मिळाली आहे एवढयानें एक बरें आहे. तिची एक दासी होती. ती नित्य रौशनआरेच्या महालांत जात येत असे. 'खरें म्हटलें असतां ती जातीनें स्त्री नव्हती. एका पुरुषानें दासीचा वेष घेतला होता. असें करण्यांत रौशनआरेस कुमार्गाला लावावें असा त्याचा मुख्य हेतु होता. रौशनआरेस खरोखर ती कोण असावी हें मुळींच कळलें नाहीं आणि रंडीलाही पण कळलें नाहीं. आतां असा तो दासीवेषानें रहाणारा मनुष्य तरी कोण होता हें मग सांगेन. पुढें एके दिवशीं त्याचें तें कृत्य उघडकीस आलें. तेव्हां त्याला कांहीं खोजांनीं ठार मारिलें. हीं गोष्ट जोहराशिवाय कोणासही माहीत नव्हती. पुढें एके दिवशीं तिनेंच मला तो कोण आहे हें सांगितलें. तो एक राजगृहांतील उत्तमपैकीं गवई होता. पुढें तिच्या जागीं मी त्या रंडीचें काम करूं लागलें. पुढें मला आणखी असें कळलें कीं ती दासी इनायतुल्लाचीही कांहीं सेवा करीत होती. हें कळल्यावर मी त्यालाही जाऊन मिळालें. आणि ज्यामध्यें माझी हानि होणार नाहीं अशा गोष्टी मीं त्यास सांगण्याचा उपक्रम ठेविला. त्या रंडीबरोबरच एकदोनदां त्याच्या गुप्त सभेला मी गेलें होतें. ती सभा फारच मोठी होती. गेलें खरें; परंतु आश्चर्य हें कीं त्यासभेंतील भाषणें वगैरे मला कांहीं कळलीं नाहींत. हें न कळण्याचें कारण ती मंडळी तोंडानें कांहींच शब्द उच्चारीत नसत. ज्याला जें कांहीं सांगायचें असेल तो तें एका कागदावर लिहून त्यांस दाखवी. त्याप्रमाणें ते शहाजादीसहि तसेंच लिहून दाखवीत व शहाजादीहि त्यांना त्यांवर लेखी उत्तर देत असे. मग असें करण्यांत त्यांचा काय हेतु होता हें मला कसें कळणार ? "

हे शब्द ऐकतांच तारेनें रंभेला मोठ्या धन्यतेनें मिठी मारिली व तिला म्हटलें " राहून राहून भारीच बाई मला तुझ्या चतुराईचें आश्चर्य वाटतें. इतके गुण तुझ्या सर्वांगीं भरले असतील असें मला स्वप्नीं सुद्धां वाटलें नव्हतें.

हें तूं इतकें भयंकर कार्य करण्याचें हातीं घेतलें आहेस खरें; पण मोठ्या सावधपणानें वाग हो. जर कां एकदां याचा स्फोट झाला तर तुझे राईयेवढे तुकडे तुकडे झाले म्हणून समज. आणि माझाही त्यांतच अंत होईल. "

" तूं म्हणतेस तें कांहीं खोटें नाहीं. कालच मजवर मृत्यूची गदा आली होती पण बाई त्यांतून कशी तरी मी एकदांची पार पडलें. परंतु धर्म-रक्षणाकरितां असें कार्य न घ्यावें तर काय करावें ? या मरगट्ट्यांना असें फसविल्याशिवाय आपलें कार्य सिद्धीस जाणार नाहीं. वेळ येईल तसेंच वागलें पाहिजे. जसें करतें म्हणून ती सौसन रंडी रौशनआरेस जी कांहीं राजमंदिरांतील गुप्त खबर देते ती प्रथम मला दिल्याशिवाय मात्र तिला देत नाहीं. ती खबर नंतर मी इनायतुल्लास देतें. आणि त्यांच्यामध्यें जो कांहीं पत्रव्यवहार चालतो तोही पण मी प्रथम इनायतुल्लास दाखवीत असतें. जहानारेजवळ एक वृद्ध दासी आहे. ती सुद्धां जहांनारेकडील सर्व बातमी त्या सौसन रांडेस जाऊन सांगत असते. इकडे इनायतुल्लानें सौसनबरोबर लग्न लावण्याबद्दल तिला आशा लावून ठेविली आहे. तिकडे सलाबतखान रौशनआरेस मिळून जहानारेचीं कृत्यें उघडकीस आणून आपल्याला पळवून औरंगजेबाकडे नेण्याच्या तयारींत आहे. याकरितां मी जोहरेच्या धोरणानें वागत असतें. तिच्या जर धोरणानें न वागेन तर मला या गुप्त बातम्या मुळींच समजणार नाहींत. आतां कांहीं कांहीं गुप्त गोष्टी मी जोहरेस सुद्धां कळवीत नाहीं. वास्तविक असें वाटणें अयोग्य आह परंतु तशीच कांहीं त्या वेळीं स्थिति असते, शिवाय त्या गोष्टीशीं तिचा संबंध फारसा नसतो. "

अशा प्रकारच्या लोकांना आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या गोष्टी रंभेच्या तोंडून ऐकत असतांना पुढें पुढें तारेची विलक्षण स्थिति झाली. ती वरचेवर रंभेला आलिंगन काय देई. तिचें गालाचें चुंबन काय घेई. नाना तऱ्हा करी. हें पाहून रंभाही मधून मधून फारच हंसे. आज तिचा चेहरा फारच प्रफुल्लित दिसत होता. ती वारंवार तारेचें चुंबन घेई.

" प्यारी ताराबाई ! आतां सायंकाळ व्हायची वेळ झाली. काल आपल्याला तें यंत्र आणि एक तजबीर सांपडली होती त्याची तुला सर्व हकीकत आणि मी गेलें होतें कोठें हेंही सांगावयाचें आहे, पण आतां तें सर्व सांगत बसण्याला मला वेळ नाहीं. तूं आतां महालांत जा कशी. मला आणखी

कांहीं गोष्टींचा निकाल लावायाचा आहे व सौसनचीं थोडी नोकरीही करावयाची आहे. नंतर मला दाराकडील अब्बारखांस भेटून त्याच्याकडून कांहीं बातमी काढावयाचीं आहे. त्याला मी राजदरबारांतील एका दासीच्या वेषांत भेटत असतें.. तें दासीपणाचें रूप पाहून तो मला भुलला आहे. हें मी जाणून आहें. म्हणून मीं त्याला त्या वेषानें अगदीं आपलासा करून टाकलें आहे. मी त्याला मिळावी म्हणून तो मला (दासीला) सर्व गुप्त बातम्या सांगत असतो. आणि त्यानेंच मला गुल्शनच्या मरणाविषयीं सांगितलें. तो तरी मला इतक्या उघडपणें कां सांगतो त्याचें कारण असें आहे. मी जेव्हां दारास जोगिणीचे वेषांत भेटलें होतें. तेंव्हां मीं त्यास सांगितलें कीं यापुढें जर कधीं माझी भेट घ्यावयाचें मनांत आलें तर आपण एक पत्र दर्यामध्यें टाकून द्या म्हणजे मीं त्याच दिवशीं आपणास अवश्य भेटेन. त्याप्रमाणें दारा पत्र टाकतो व मीही त्याला भेटत असतें. अब्बारखांचाहि मजवर (जोगिणीवर) विश्वास आहे. पण त्या मूर्खाला इतकें कळत नाहीं कीं मी (दासी) च जोगीण आहें. त्यानें मला (जोगिणीला) विचारलें कीं " जिच्यावर माझें प्रेम आहे ती सुन्दरी मला लाभेल काय ? " यावर त्याला अत्यंत भुलवून टाकण्याच्या हेतूनें मीं म्हटलें "-मिळेल पण तूं जर तिच्या जवळून कोणतीही गोष्ट गुप्त न ठेवशील तर ".. झालें, त्या दिवसापासून तो कामविकारवश मूर्ख मला (दासीला) सर्व गोष्टी सांगत असतो. या सर्व गोष्टी केवळ तुजकरितां मीं हातीं घेतल्या आहेत. पाहूं आतां तुझें नशीब कसें आहे आणि माझ्या कर्तबगारीचा कितपत उपयोग होतो तो. " रंभा म्हणाली.

यानंतर त्या दोघी आपल्या जागेवरून उठल्या व कांहीं वेळ इकडे तिकडे कांहीं पहात तारा आपल्या महालांत व रंभा मर्दानी वेष धारण करून सौसनरंडीकडे चालत्या झाल्या..

प्रकरण ७ वें.

प्राणावरच बेतली होती !

मागील रात्र. सुमारें दोन वाजले असतील. अंधकार म्हणजे मी म्हणत होता. त्यामुळें सर्व रात्र भयाण भासत होती. अशा समयीं चार पिशाच्चाकृति मनुष्यें अमरसिंहाच्या बागेंत इकडून तिकडे फिरत होतीं. त्यांनीं आपाद कृष्णवर्ण वस्त्रें परिधानें केलीं होतीं. सर्व मुखभाग कज्जलयुक्त केले होते. त्यामुळें त्यांचे चेहरे फारच भयंकर भासत होते. त्या ठिकाणीं एखादा असता तर हे पुतळे कोणीं काजळाचेच निर्माण केले आहेत कीं काय असें त्यास वाटल्यावांचून कधींही राहिलें नसतें. तीं पिशाचें कांहीं वेळानें एका महालाचे खिडकीखालीं येऊन आपापसांत हळूं हळूं कांहीं बोलूं लागलीं. नंतर एकानें एक दोराची शिडी त्या खिडकीस बांधिली व तो हातांत एक दोर घेऊन त्यावरून चढून त्या खिडकीचें हळूंच दार उघडून महालांत शिरला. महालांत गेल्यावर चाचपतचाचपत तो एका पलंगाजवळ आला. मध्यंतरीं तो ठेंच लागून पडलाही. पलंगाजवळ येतांच त्यानें एक मेणबत्ती पेटविली व तिच्या प्रकाशांत त्यानें पलंगावर निजलेल्या दोन स्त्रिया अवलोकन करून त्यांपैकीं एकीस भूल देण्याकरितां खिशांतून एक कुपी काढली व कुपीचें बूच काढून ती कुपी तिचे नाकाजवळ नेली. नंतर त्यानें ती मेणवत्ती विझविली. मेणबत्ती विझल्यानतर त्यानें त्या स्त्रीस उचलून खिडकीजवळ नेलें. व आपल्या साथिदारांना सावध करण्याकरितां त्यानें शिडी हालविली. नंतर वरील मनुष्यानें तिची गठडी बांधून तिला हळू हळू खालीं सोडिलें. खालील मंडळींनीं चटकन् तिला दोरींतून सोडवून घेतलें. वरील मनुष्यही लवकरच खालीं आला. खालीं आल्यावर त्यानें ती शिडी सोडून ती गठडी आपल्या पाठीवर घेतली. व तो पुढें चालूं लागला. त्याच्या मागून तिघे हत्यारबंद चालूं लागलें. वाचकहो ! आपणही त्यांच्याच मागून ते जिकडे जातील तिकडे हळू हळू जाऊं. पण छे; हळूं जाण्यांत मतलब नाहीं. ते पहा झपझप पावलें टाकीत बागेंतून बाहेर जाऊन यमुनानदीचे किनाऱ्यावरून उजव्या बाजूनें एका जुन्यापुराण्या मशिदींत शिरले. उचला तर आपले

पाय आणि त्यांना एकदां लवकर गाठा कसें. ते पहा आणखी एक पांचवें पिशाच्च हळूहळूं येऊन त्या पलीकडल्या कोपऱ्यांत लपलें. तें जरी कोणास दिसत नव्हतें तरी त्याला मात्र तीं चारीं पिशाचें काय करताहेत हें सर्व दिसत आहे.

किल्ल्यांतील सुरंगाचा संबंध याच मशीदीशीं होता याविषयीं रंभेनें तारेस सांगितलें होतें तें वाचक बहुतकरून विसरले नसतीलच. ही मशीद अगदींच शहराबाहेर होती. तिची बरेंच दिवसांत डागडुजी न केल्यामुळें ती मोडकळीस आली होती. शिवाय तिचें स्वरूप फारच भयंकर दिसत असल्यामुळें गांवांतील कोणी मनुष्य तिकडे फिरकत नसे. आतां तेथें येणारीं मनुष्यें म्हणजे वरील पिशाच्चवर्गापैकीं. त्यांना सुद्धां कधीं कधीं एकटें जाण्यांत फार भीति वाटे. त्या मशिदींत एक जुनीपुराणी कबर बांधली होती. तिच्या पुढें मागें मुसलमान लोक एका संगमरवरी दगडावर बसून निमाज पढत असत. त्या दगडाचा आकार चौरंगाप्रमाणें असून तो जमिनीमध्यें बळकट रीतीनें बसविला होता. त्या दगडावर त्या पिशाच्चांनीं ती आणलेली गठडी ठेविली व एकानें मेणबत्ती पेटविली. दुसऱ्यानें ती गठडी सोडिली. तिसरा तरवार उपसून तयार होता. चौथ्यानें त्या गठडींतील स्त्रीला सोडवून तिचे पाय गच्च बांधून तिची धुंदी दूर केली.

ती स्त्री सावध झाल्यावर इकडे तिकडे आपले डोळे उघडून पाहूं लागली तों तिला आपल्या समोंवार कोणी चार पिशाचें उग्र स्वरूप धारण करून उभी आहेत असें दिसलें. तो त्या वेळचा भयंकर देखावा पाहून ती स्त्री अतिशय घाबरली. आपण येथें आलों कसें आणि हे लोक तरी कोण असावेत हेंच तिला कळेना ! ती कांपऱ्या स्वरानें त्यांना विचारते, " तुम्ही आहांत तरी कोण आणि तुम्हीं इतक्या अपरात्रीं मला घरांतून कोणत्या कार्यास्तव येथें आणिलें ? तुमचा बेत मला मारावें असा आहे कीं काय ? असा असेल तर मीं तुमचा असा अपराध तरी कोणता केला कीं त्याला आतां हींच शिक्षा तुमच्या मतें योग्य आहे ? "

तिचे हे शब्द ऐकतांच ज्यानें तिला पलंगावरून इकडे आणिली होती तें पिशाच्च आपली तरवार उगारून तिला म्हणालें " रंभे, आज तुझी शंभर वर्षें पुरीं भरलीं म्हणून समज आणि याचकरितां आम्ही तुला तुझ्या पलंगावरून गुप्त रीतीनें इकडे घेऊन आलों आहोंत समजलीस. "

" तुमच्या स्वरूपावरून तुह्मी मला या वेळीं येथें कशाला घेऊन आलां आहांत हें मी जाणतें आहें. परंतु असें करण्यांत तुमचा कांहीं फायदा तरी आहे काय ? " रंभेनें विचारिलें.

" हें तर तुला आतां लवकरच कळून येईल. परंतु अगोदर आमची जी तूं एक वस्तु घेतली आहेस ती या घटकेस तूं आह्मांस देऊन टाक कशी. नाहींतर तुझ्या देहाची काय अवस्था होईल तें पहा. वास्तविक पाहिलें असतां तुझें माझें वैर नाहीं परंतु अशा-करितां असें करणें अह्मांला भाग पडलें आहे ".

" पण मीं अशी तुमची वस्तु तरी कोणती घेतली आहे ती तर अगोदर सांगाल ? खरोखर घेतली असेल तर ती मी आपणास परत देऊन माझा प्राण तरी धोक्यांतून काढीन ! "

" आज मध्यरात्रीं सलावतखान अमरसिंहाच्या बागेंत तारेची भेट घेण्याकरितां गेला असतां तूं त्याला भेटली होतीस हें खरें का ! "

" याचें उत्तर मीं दिलें नाहीं तर "

" या तरवारीनें तुझे दोन तुकडे या क्षणींच केले ह्मणून समज ". असें बोलून त्यानें तरवार तिच्यावर उगारली.

" बरं, मीं थोडक्याकरितां आपणास होय असें उत्तर दिलें. तर आपणास त्यापासून काय मिळणार ? "

" मिळणार ह्मणजे त्या वेळीं त्याच्या खिशांतून एक खलिता तेथें गहाळ झाला आहे आणि त्याची तर आह्मांस फार जरूर आहे. तो खलिता तूं उचलून घेतला आहेस ह्मणून तुला आह्मी येथवर घेऊन आलों आहोंत. आतां तो आह्मांस लवकर दे कसा. शिवाय त्याचा तुला थोडाच उपयोग होणार आहे ह्मणून ठेवून घेतेस ? "

हे शब्द एकतांच रंभेला त्याचे तो शब्द ओळखीचे आहेत असें वाटूं लागलें. परंतु ते शब्द उच्चारणारा मनुष्य आहे तरी कोण हें तिला कांहीं केल्या समजेना. दुसरे तिघे अगदीं मूकवृत्ति धारण करून उभे होते आणि चौथा ह्मणजे बोलणारा आपला स्वर बदलून बोलत होता ह्मणून तिला तो खरा कोण असावा, हें समजेना. एकदां तिला तो कोण असावा अशाबद्दल शंका आली परंतु त्याला तूं अमुक आहेस असें विचारण्याची छाती होईना. नंतर तिनें थोडा आत्मगत विचार करून उत्तर दिलें.

" होय. जेव्हां सलावतखान माझी भेट घेऊन गेला तेव्हां मला एक खलिता मिळाला. पण त्या खलित्यांत फारशी भाषेंत कांहीं यंत्र काढलें होतें. परंतु तें मला समजलें नाहीं. (खरोखर ही गोष्ट रंभेनें अगदीं अक्षरशः खोटी सांगितली. कारण, तें यंत्र पूर्णपणें तिला समजलें होतें.) आणखी एक कसलीशी तसबीर होती. पण—

रंभा पुढें बोलणार इतक्यांत तें पहिलें पिशाच्च दरडावून तिला म्हणालें " पण पण काय करते आहेस ? तें यंत्र आणि ती तसबीर चट्कन आमच्या स्वाधीन कर. नाहींतर या घटकेस प्राणास मुकलीस म्हणून समज ! '

' कांहीं हरकत नाहीं. '

' काय तसबीर आणि यंत्र देण्यापेक्षां आपला जीव धोक्यांत घालणें तुला अधिक इष्ट आहे ? त्यांचा तुला असा उपयोग तरी कोणता आहे ? '

' खरोखर नाइलाजाची गोष्ट आहे. माझ्याच मूर्खपणामुळें मी हा मृत्यु बळेंच आपल्यावर ओढून घेतें आहें. त्याचा मला मुळींच उपयोग नाहीं असें समजून मीं त्याचे तुकडे तुकडे करून बागेंतील विहीरींत फेंकून दिले. आतां माझ्याजवळ मोकळा खलिता आहे. पाहिजे असल्यास देतें. '

यावर तें पिशाच्च रागानें दात खाऊन म्हणालें " आतां कांहीं या वेळीं तूं आमच्या तावडींतून सुटत नाहींस. मरते वेळीं आपल्या खुदाचें स्मरण कर पाहूं. "

" घटकोघटकीं मी इश्वराचें स्मरण करीत असतें. आतां आपल्या कामाला लागा कसें आणि एका गरीब निरपराधी अबलेस ठार मारून आपल्या मर्दपणाचें प्रदर्शन करून स्वतःला धन्य मानून घ्या. " असें म्हणून रंभेनें डोळे मिटले.

" ठीक आहे " असें म्हणून त्या पिशाच्चानें आपली तरवार चांगली धरली. आतां तो तिचे दोन तुकडे करणार इतक्यांत सों सों आवाज करीत चार तीर त्या चौघांवर आले व त्या तीरांनीं चौघे घायाळ होऊन जमिनीवर बेशुद्ध होऊन पडले ! मेणबत्तीही विझून गेली. त्यामुळें जिकडे तिकडे काळोख झाला. ही क्रिया डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या अवधींत घडली. काय गडबड उडाली हें पाहण्याकरितां रंभेनें डोळे उघडले. तों तिला जिकडे तिकडे अंधकार दृष्टीं पडला. तिला

त्या वेळीं थोडें आश्चर्य आणि थोडी भीतीहि वाटली. परंतु आज ही विचित्र करणी असावी तरी काय याचा तिला चांगलासा उलगडा होईना.

वाचकहो ! हे तीर त्या चौघास कोणीं वरे मारिले असावेत याची तुह्मांला कल्पना आली आहे काय ? नसेल आली तर सांगतों. मागें जें आह्मीं एक पांचवें पिशाच्च मशिदींत एका कोपऱ्यांत लपलें ह्मणून लिहिलें त्याच पिशाच्चानें हे तीर सोडिले. ते चौघे पडल्यावर जिकडे तिकडे अंधकार झालेला पाहून त्यानें आपल्या जवळील मेणवत्ती पेटविली व ज्या ठिकाणीं ते चौघे घायाळ होऊन पडले होते तेथं येऊन त्यानें त्या मेणवत्तीच्या मदतीनें पाहिलें तों त्याला कोणाच्या कंबरेंत, कोणाच्या छातींत, तर कोणाच्या मानेवर, तर कोणाच्या पायाला असे तीर लागलेले दिसले. ते तीर त्या त्या जागीं चांगले एक एक दोनदोन अंगुळें शिरले होते. त्यांतून रुधिराभिसरणही अप्रतिबद्ध चाललें होतें. आणि याचमुळें तीं चारी पिशाचें बेशुद्ध होऊन जमिनीवर पडलीं होतीं. नंतर त्यानें रंभेकडे नजर टाकली तों त्याला तिचे हात व पाय दोरीनें बांधले आहेत असें दिसलें. ती दोरी तोडून त्यानें तिला त्यांतून मुक्त केलें आणि त्यानें त्या पिशाच्चांचे मात्र हातपाय चांगले बळकट बांधून त्यांच्या शरीरांत शिरलेले सर्व तीर उपसून काढिले. त्यांना ज्या जखमा झाल्या होत्या त्यावर त्यानें खिशांतून एक डबी काढून कसलेंसें त्यांतील मलम लाविलें. त्यायोगानें त्यांच्या जखमांचा रक्तप्रवाह मात्र बंद झाला. हें सर्व रंभा शांत रीतीनें पहात होती. हा पांचवा मनुष्य आपल्याला मदत करणारा कोण असावा, या विचारांत ती चूर झाली होती. नंतर तें पांचवें पिशाच्च—ज्यानें अकस्मात् रंभेला त्या दुष्टाच्या तडाक्यांतून मुक्त केलें— ह्मणालें ' खुदाची पूर्ण मर्जी तुजवर आहे. त्यानेंच मला तुझ्या मदतीकरितां योग्य वेळीं पाठविलें. मीं तुला या भयंकर संकटांतून मुक्त केल्यामुळें जे कांहीं आजवर मजकडून गुन्हे झाले आहेत ते सर्व मला क्षम्य झाले. याबद्दल मी त्याला अनन्यभावें प्रणाम करितों. तूंही आपल्या परमेश्वरास याबद्दल धन्यवाद दे. '

यावर रंभा उठून ह्मणाली ' याबद्दल मी परमेश्वरास कोट्यावधि दंडवत घालून आपणास या मदतीबद्दल धन्यवाद देतें आहें. आपण मला मत्यूच्या दाढेंतून सोडविल्यामुळें खरोखर मी आपली आजन्म कष्टी होऊन बसलें

आहें. आपले हे उपकार मी कधींही विसरणार नाहीं. केवळ आपण माझे प्राणदाते पिताजीच आहां असें कल्पून आपली सेवाच मी करीत राहीन. परंतु आतां आपण आहांत तरी कोण हें मला कळवाल काय ? आपला स्वर माझ्या ओळखीचा वाटतो आहे पण आपण कोण असावेत हें चांगलेंसें उमगत नाहीं. '

रंभेच्या तोंडचे याप्रमाणें शब्द ऐकून त्या पांचव्या पिशाच्चानें आपला पिशाड्याचा पोषाख दूर फेंकून दिला तोंच आपला उद्धार करणार हकीम इनायतुल्ला आपल्या समोर उभा आहे असें रंभेला दिसलें.

आतां चतुर वाचकांनीं ताडलेंच असेल कीं त्या चारी पिशाच्चांच्या मागोमाग लपून येऊन त्यांना योग्य प्रसंगीं तीर मारून घायाळ करणारा दयावान् हकीम इनायतुल्ला होता.

प्रकरण ८ वें.

पत्र काढून घेतलें.

आपल्या समोर इनायतुल्ला मूर्तिमंत उभा आहे असें पाहतांच रंभेला अत्यानंद झाला. तिनें त्याच्या पायावर लोळण घेतली. परंतु हकीमनें तिला तसें फार वेळ करूं दिलें नाहीं. तिला उठवून तो ह्मणाला ' बेटी रंभा ! खरोखर पाहिलें असतां तूं या (सलावतखानाकडे बोट दाखवून) दुष्टास प्राण गेला तरी बेहत्तर असें समजून कोणत्याही गोष्टीचा पत्ता लावून दिला नाहींस याबद्दल मीच तुझ्या चरणाचे वारंवार चुंबन घेतलें पाहिजे. आणि जर कां तूं त्यांना सर्व सांगितलें असतेंस किंवा मी इनायतुल्लाला या गोष्टी कळविल्या आहेत असें ह्मणाली असतीस तर खात्रीनें तूं किंवा मी येथून जिवंत घरीं गेलों नसतों. शाबास ! मजकरितां तूं आपल्या प्राणाची पर्वा बाळगिली नाहींस याबद्दल जितकी तुझी स्तुति करावी तितकी थोडीच आहे. त्या यंत्रासंबंधानें मजजवळ स्फोट केलास आणि या नीचाजवळ तूं त्यासंबंधानें थोडा सुद्धां उल्लेख न करितां स्वतः देहत्याग करण्यास तयार

झालीस तेव्हांच तुझी खरी योग्यता काय आहे हें मला कळून चुकलें. मजकरितां तूं जें संकट आपणावर ओढून घेतलें त्याचे उपकार मी कधींही विसरणार नाहीं व आजपासून मी तुला आपली प्रत्यक्ष मुलगी—नव्हे त्याहीपेक्षां ज्यास्त समजतों. आजपर्यंत राजमहालांत मजकडून जे गुन्हे झाले आहेत ते खात्रीनें तुजवर यापुढं थोडे जरी उपकार केले तरी खुदा मला माफ करील. '

" हकीम साहेब ! या गोष्टी मग बोलूं पण अगोदर मला सांगा कीं आपण या ठिकाणीं केव्हां आलांत आणि आपण हा पिशाचवेष तरी काय म्हणून धारण केला होता ?"

" काय सांगूं रंभे ! तुझ्यासारखी चाणाक्ष पोर आजवर मीं मुळींच पाहिली नाहीं. ज्या दिवशीं जोगीपा दाराला भेटली त्या दिवशीं त्या उभयतांचीं सर्व भाषणें मीं गुप्त रीतीनें ऐकिलीं. त्याच वेळीं ती जोगीण नसून तूंच आहेस असें माझें मन माझी खात्री करूं लागलें आणि त्या तुझ्या भाषणावरून मीं ताडलें कीं, केव्हांना केव्हां तरी तूं दारास चांगल्याच खड्ड्यांत घालशील; त्याचप्रमाणें सलावतखानासही. तुझें दाराबरोबर झालेलें सर्व भाषण ऐकून घेऊन संध्याकाळीं तुमच्या बागेंत मी मुकाट्यानें येऊन दडून बसलों. आणि तें तुझें तारा बनून दाराशीं आणि अस्सल रूपांत सलावतखानाशीं झालेलं भाषण मीं सर्व ऐकलें.

सलावतखान घरीं गेल्यानंतर तूं तो खलिता घेऊन त्यांतील यंत्र व तसबीर पाहिलीस ती मीं सुद्धां पाहिली. नंतर मी घरीं जाण्याकरितां बागेंतून बाहेर चालता झालों. तूं दासीकरवीं त्यासंबंधानें जो उल्लेख पत्रामध्यें केलास तोही मला तिच्याकडून रस्त्यांत मिळाला. त्या वेळीं मी सलावतखानाच्या चौकशीकरितां त्याच्या डेऱ्याकडे चाललों होतों. तें तुझें पत्र वाचून पाहून मी दासीस परत पाठविलें. त्या पत्रांतील मजकूर वाचून पाहतांच मला वाटलें कीं आतां सलावतखान खास परत बागेमध्यें खलिता शोधण्याकरितां येईल आणि तो त्याला न सांपडला तर तो खास ताराबाईस किंवा तुला कांहीं तरी त्रास दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीं. म्हणून मी बागेंत मुद्दाम त्या वेषानें आलों होतों. मला एवढें माहीत होतें कीं हें यंत्र आणि तसबीर फारच महत्त्वाची आहे आणि तें गहाळ झाल्यामुळें सलावतखानास बराच त्रास सोसावा लागेल. सुमारें मध्यरात्रीं मला हीं चार पिशाचें

बागेंत इकडे तिकडे फिरत आहेत असें दिसलें. त्यांना पाहून माझी खात्री झाली कीं हे लोक सलावतखानाच्या हुकुमावरून पिशाच्चवेषांत आले असावेत. नंतर मी सुद्धां आपल्या घरीं धावत जाऊन यांच्यासारखा पोषाख करून परत बागेंत आलों. परमेश्वर आपला कैवारी ह्मणूनच मी तेथें वेळेवर येऊन पोंचलों. ते एक गठडी घेऊन चालले होते. आणि त्या वेळीं जर कां मी आलों नसतों तर तुझें काय झालें असतें हें मला सांगतां आलें नसतें. आतां त्या गठडींत असावें तरी काय हें मला मात्र कळेना. याच्या मागोमाग आपण जावें ह्मणजे आपल्यास सर्व कळेल असा निश्चय करून मीं त्यांच्या मागोमाग येथें आलों. येथें आल्यावर त्यांनीं ती गठोडी सोडली तोंच मला तुझी मूर्ति दिसली. नंतर त्यांनीं तुझे हातपाय बांधून तुला शुद्धीवर आणिलें. पुढें काय काय झालें हें तुला माहीत आहेच."

" खरोखर आपण वेळेवर येथें आलां नसता तर खास आज माझें मरण चुकलें नसतें. आपण मला बेटी असें विशेषण देऊन हाक मारली तेव्हांच आपल्याविषयीं मीं आंत बाहेर कांहीं एक ठेवायचें नाहीं असा निश्चय केला. आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी तारेसंबंधीं मीं घडवून आणल्या त्या सर्व आपल्यास आतां सांगितल्या शिवाय माझ्यानें रहावत नाहीं. "

असें बोलून तिनें तारेला ज्या गोष्टी सांगितल्या होत्या त्या सर्व त्यास सांगितल्या. त्या गोष्टी ऐकतांच इनायतुल्ला तिची हजार मुखानें स्तुति करूं लागला. तो ह्मणाला " बेटी, तूं जहानारेसबंधीं मुळींच शंका घेऊं नकोस. खरोखर तारेचें काडीइतकें वांकडे करण्याचें तिच्या मनांत नाहीं. जितकी जलदी तुझ्यानें करवेल तितकी जलदी करून तूं तारेला उदयपुरास घेऊन जा कशी आणि यांत जर का तुह्मीं विलंब कराल तर मात्र खास समजून ठेवा कीं आजपासून तुमच्या उभयतांचा वनलेला शत्रु सलावतखान तुमच्या प्राणावर आजच्याप्रमाणें आणखी कधीं तरी उठेल. "

" काय होईल तें होईल. परंतु आपण त्या तसबीरीप्रमाणें रौशनआरेच्या सभेंत जाणार आहांना ? "

" मीच एकटा जाणार नाहीं. तू, जहांनारा व मीं असें तिघेजण गेले पाहिजे. मी सलावतखान बनेन. कारण, सलावतखानासच सभेमध्यें जातां

येणार आहे. आणि त्याचें जरूर काम आहे पण त्याच्याजवळ तसबीर किंवा यंत्रही नाहीं. तेव्हां मी सलावतखानाच्या वेषानें गेल्यास आपलें काम होईल."

'पण सलावतखान रौशनआरेस दासीकरवीं पत्र पाठवून आपलें पत्र गहाळ झालें असें नाहीं कां कळविणार? असें कळविलें ह्मणजे अर्थात् आपलें जाणें होणार नाहीं आणि आपलें सभेमध्यें जाणें बंद करणें त्यास मुळींच अशक्य नाहीं.'

'त्याबद्दल कांहीं काळजी नको. ज्या दासीचे मार्फत रौशनआरेचा आणि सलावतखानाचा पत्रव्यवहार होतो ती दासी संध्याकालापासून माझ्या येथें कैदेंत आहे. उद्यां सभा आहे तोंपर्यंत कांहीं मी तिला मोकळी करीत नाहीं. अशा रीतीनें एका बाजूनें त्याचें नाक दाबून ठेवलें आहे. आतां तो कदाचित् सुरंगमधून रौशनआरेस भेटण्याकरितां जाईल असें ह्मणशील तर मी त्याच्या येण्याचे दारास चांगलें कुलूप लावून ठेविलें आहे. तें त्याला तोडतां किंवा तसें काढतां येण्यासारखें मुळींच नाहीं. कारण, तें उघडावें कसें हें त्यास मुळींच माहित नाहीं.'

"मग तर दरबारामध्यें मोठी गम्मतच होणार ह्मणायची!" रंभा हंसून ह्मणाली "बरं पण सलावतखान या रस्त्यानें (महिदींतील त्या संगमरवरी दगडाकडे बोट करून) गेला आणि त्यानें सर्व गोष्टी तिला सांगितल्या तर?"

"या ठिकाणीं सुद्धां मीं सुरंगच्या तोंडाला कुलूप अडकविलें आहे. आतां कदाचित् तो गेला तर त्याच्या पूर्वीच सभेंत जाऊन तेथील हालहवाल मी तुला व जहांनारेस येऊन सांगेन आणि खरोखर मला यामध्यें बिनधोक यश येईल. आतां या यंत्रावरून आणि तूं जें मला तसविरीविषयीं कळविलें त्यावरून असें स्पष्ट होतें कीं सभेंत जाणाऱ्या मनुष्यानें 'शिमाख्त' हा शब्द उच्चारला नाहीं तर तेथील पहारेवाला त्यास आंत सोडीत नाहीं. आणि शिमाख्त ह्मणावयाचें सलावतखानास मुळींच माहीत नाहीं. तेव्हां त्याचें घोडें या ठिकाणीं आडलें कीं नाहीं? बरें आतां पुढें काय काय घडतें तें पहावें."

"मग तर मी आतां घरीं जातें. आणि आतां मला घरीं जाण्याला विलंब लागला तर सकाळीं मी पलंगावर नाहीं असें पाहून ती फार घाबरी होईल."

"पण जरा थांब पाहूं. मला तुझ्याशीं कांहीं बोलावयाचें आहे. या

कंबख्ततांना येथेंच टाकून वाटलें तर सुरंगमध्यें कुलुपें कशीं उघडावयाचीं हें पाहण्यास चला पाहूं. तीं कशीं उघडावयाचीं हें फार लोकांना माहीत नाहीं. ”

“ बरं तर चला. पण या बिचाऱ्यांचे हात, पाय सोडा कसे. सावध झाल्यावर हे पाहिजे तिकडे निघून जातील. ”

‘ तूं जातीनें स्त्री आहेस समजलीस; यांना जर मी मोकळे करीन तर हे तुला जिवंत सोडतील होय ? ’

‘ नाहीं हें जरी खरें आहे तरी पण आतां मी आपली कन्या झालें आहें. यापुढें मी आपल्याप्रमाणें कठोर होऊन यांच्या हातून प्राणरक्षण नाहीं कां करणार ? ’

“ मग कांहीं हरकत नाहीं. ” असें म्हणून इनायतुल्लानें त्या चौघां पिशाच्यांचे हातापायाचें बंधन तोडिलें. नंतर रंभेनें न्याहाळून त्या चौघांकडे पाहिलें तों तिला त्यांत सलावतखान दिसला. इतक्यांत इनायतुल्लानें त्याच्या कमरपट्ट्यांत एक पत्र आहे असें पाहिलें व त्यानें तें काढून वाचूनही बघितलें. तें पत्र रंभेस देऊन तो तीस म्हणाला “ हा पहा एक उत्कृष्ट मुद्दा सांपडला आहे. आतां सर्व झालें म्हणून समज. ”

रंभेनें तें पत्र वाचून पाहिलें व म्हटलें “ ठीक आहे, चला खालीं. पण हे लोक मेले तर नाहींत ना ? ”

“ नाहीं नाहीं. हे माझ्या तीरांच्या माऱ्यानें बेशुद्ध होऊन पडले आहेत. ते बराच काळ त्या स्थितींत पडावे म्हणून मीं त्यांच्या जखमेवर मलम चोळलें आहें. त्यामुळें ते आणखी अर्धा घंटा असेच पडतील. नंतर पूर्ववत् होतील ”

असें म्हणून इनायतुल्लानें त्या संगमरवरी दगडाला लाविलेलीं गुप्त कुलुपें काढिलीं व तीं काढावयाचीं कशीं हेंही रंभेस त्यानें दाखविलें. नंतर त्यानें त्या दगडावर जोरानें एक लत्ताप्रहार केला. त्या प्रहारानें तो दगड आंत बऱ्याच अंतरावर जाऊन पडला. नंतर त्या वाटेनें हळू हळू ते दोघे आंत गेले. ते आंत जातांच एकदम मोठा आवाज होऊन तो दगड पूर्ववत् जागेवर येऊन चिकटला.

रंभा व इनायतुल्ला सुरंगामध्यें गेल्यावर इकडे वर सलावतखान आपल्या साथीदारांसह शुद्धीवर आला व कण्हत कण्हत इकडे तिकडे पाहूं लागला; परंतु काम्म कांहीं केल्या रंभा म्हणून दिसली नाहीं. तीर कोणीं —

असावा ? या जखमेमध्यें मलम कोणीं भरलें असावें ? आणि रंभा तरी कोठें गेली असावी, हें त्यास कांहींच समजेना. त्याच्या चेहऱ्यावरील मर्दानी झांक या वेळीं पूर्ण मावळलेली दिसत होती. तो कमरपट्ट्यांत पत्र पाहूं लागला तों त्याला तें न दिसल्यामुळें त्याची जी कांहीं स्थिति झाली ती सांगतांच येणार नाहीं. हेंच पत्र इनायतुल्लानें काढून घेतलें होतें. यापुढें तो रंभेविषयीं फारच द्वेष करूं लागला. तिच्या जीवावर उठला परंतु त्यामध्यें त्याला यश आलें किंवा तोच प्राणास मुकला हें आपण पुढें पाहूं.

प्रकरण ९ वें.

पुरी फजिती झाली !

सुरंगमध्यें गेल्यावर रंभा आणि इनायतुल्ला यांच्यामध्यें जें कांहीं भाषण झालें तें या ठिकाणीं अवश्य सांगितलें पाहिजे. न सांगूं तर वाचक आह्मांस दोष देतील. तो दोष त्यांनीं न द्यावा या हेतूनें आह्मी त्याच कामाला लागतों.. आंत आंत जसे ते दोंघे गेले तसे ते एका चांगल्याशा खोलीमध्यें आले..

याच खोलींतून एक चोरवाट मोती बेगमचे महालांत जात होती. परंतु ती मोतिबेगम किंवा सलावतखान यास मुळींच माहीत नव्हती. सलावतखानाच्या कमरपट्ट्यांतून जें पत्र इनायतुल्लानें काढून घेतलें होतें, तें रौशनआरेनें सलावतखानास पाठविलें होतें. त्या पत्रांत पुढीलप्रमाणें धमकावणी सलावतखानास दाखविली होती.

" मला असें कळलें आहे कीं, आपलें प्रेम मोतिबेगमवर बसलें आहे व आपण तिजकडे नेहमीं गुप्त रीतीनें जात असतां, आतां आज या पत्रानें आपणास स्पष्ट कळविण्यांत येतें कीं, आपण कोणत्याही तऱ्हेनें मोतिबेगमवरचें प्रेम कमी न कराल तर आपणांस दरबारामध्यें तारेस पळवून घेऊन येण्यास मुळींच परवानगी मिळणार नाहीं. वेळेनुसार आपण प्राणास सुद्धां मुकाल. यांमध्यें गाफल्यास मुळीं सुद्धां पुढें मागें क्षमा होणार नाहीं. तर आपण याचा पूर्ण विचार करावा. इत्यादि. "

हें पत्र रंभेस दाखवून इनायतुल्ला तीस ह्मणाला " आतां तुला या मार्गानें मोतिबेगमचे महालांत सहज जातां येईल. तर आतां या मार्गानें तूं

हें पत्र, शिवाय मी आणखी एक पत्र यांत लिहून तुजजवळ देतों, तं घेऊन तूं मोतिबेगमचे चोळींत ठेवून गुप्त रीतीनें परत ये. " असें सांगून त्यानें एक पत्र जसें कांहीं खुद्द सलाबतखानच लिहीत अहि अशा प्रकारें लिहिलें. तें असें—" प्यारी बेगम ! रौशनआरेच्या भीतीमुळें मला नाइलाजास्तव तुजवरील सर्व प्रेम आकुंचित करणें भाग आहे. आतां यापुढें तुझा माझा संबंध तुटला. आतां माझी आशा करण्यांत तुला कांहीं फायदा होणार नाहीं. तुझी खात्री होण्याकरितां सोबत रौशनआरा बेगमचें पत्र पाठविलें आहे. इ० "

अशा प्रकारें पत्र लिहून इनायतुल्लानें दोन्हीं पत्रें रंभेजवळ दिलीं व रंभाही तीं घेऊन त्या मार्गानें मोतिबेगमचे महालांत गेली. या वेळीं मोतिबेगमला गाढ निद्रा लागली होती. जवळ कोणी दासदासी नव्हत्या. अशी संधि पाहून रंभा हळूं हळूं मोतिबेगमचे पलंगाजवळ गेली व तिनें मुकाव्यानें मोतिबेगमचे चोळींत तें पत्र खोवून परत गुप्त मार्गांत येऊन आतां पुढें काय काय फार्स उडतो हें पहाण्याकरितां स्वस्थ उभी राहिली. इकडे इनायतुल्ला घरीं जातांना तिला म्हणाला " कदाचित् सलाबतखान इकडून मोतिबेगमकडे जाईल तर तूं सावध रहा. " एवढें सांगून तो सुरंगाबाहेर आला. या वेळीं त्याला पहाण्याकरितां तेथें कोणीही नव्हतें. तो तडक कोणी नाहीं असें पाहून आपल्या डेऱ्याकडे चालता झाला. या वेळीं तो नेहमींच्या वेषांत होता.

इकडे इनायतुल्ला डेऱ्याकडे गेल्यावर रंभा मोतिबेगमकडे काय फार्स उडतो हें पहाण्याकरितां चोरवाटेंत उभी राहिली हें आह्मीं वर लिहिलेंच आहे. कांहीं वेळानें मोतिबेगम झोपेंतून जागी होऊन पहाते तों तिला चोळीमधून अंगास कांहीं खुपतें आहे असें वाटलें म्हणून तिनें चोळींत हात घातला तों तिच्या हातास एक पत्र लागलें. तें तिनें काढून वाचून पाहिलें मात्र, तों ती अत्यंत क्रोधायमान झाली. डोळे इंगळासारखे लाल झाले. सर्वांग थरथर कांपूं लागलें. तिनें तें पत्र क्रोधाच्या सपाट्यांत फाडून टाकिलें व आपल्या एका दासीस बोलावून तिला विचारलें ' कुणी ग हें पत्र माझ्या चोळींत आणून ठेविलें ? किंवा कोणी तुजजवळ दिलें तें तूं आणून ठेविलेंस ? काय बोल लवकर. '

यावर बिचारी दासी काय बोलणार ? ती अगदीं गोंधळल्यासारखी झाली. तिला पत्रासंबंधीं कांहींच जर माहिती नव्हती तर ती स्वस्थ बसली हें उघड

आहे. तीं बोलत नाहीं हें पाहून मोतिबेगम पूर्वीपेक्षां अधिक क्रोधाविष्ट झाली. आणि दासीस दोनतीन कानशिलांत लगावून तिनें तिला महालाबाहेर घालवून दिलें आणि आपल्या विश्वासू दासीस बोलाविलें. तिचें नांव मुश्करी असें होतें. ती आल्यावर वेगानें तिनें तिला पत्रासंबंधीं विचारिलें. तिनें पत्रासंबंधीं प्रश्न ऐकतांच ताडलें कीं, जी स्थिति पहिल्या दासीची झाली तीच स्थिति माझी होणार. परंतु त्यांतून सुटावें या हेतूनें तिनें एक चांगलीच बतावणी केली. ती म्हणाली " बेगमसाहेब ! आपण गेल्या रात्रीं निजल्या असतां मी या पलीकडील खिडकींतून समोरचें जंगल पहात होतें तोंच एकाएकीं सलावतखान त्या जंगलांतून इकडे आला व त्यानें बाहेरूनच मला एक चिट्ठी दिली व म्हटलें " ही चिट्ठी बेगमसाहेबांच्या चोळींत ठेव व झोंपेंतून जाग्या झाल्यावर त्यांनीं तुला जरी हजारदां विचारिलें तरी तूं कांहींच सांगूं नको. फक्त मला ठाऊक नाहीं एवढेंच सांग म्हणजे झालें. हें पत्र मीं बेगमसाहेब मला वश व्हाव्यात या हेतूनें एका फकिराकडून पैदा केलें आहे " इतकेंच मला माहीत आहे.

मुश्करीच्या तोंडचे वरील शब्द ऐकतांच बेगमच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तिनें तिला सांगितलें कीं " अतांच्या आतां सलाबतला बोलावून घेऊन ये. "

" आज्ञा बाईसाहेब ! " असें म्हणून दासी चालती झाली. बेगम नागिणीप्रमाणें फों फों करीत सलाबतखानाची मार्गप्रतीक्षा करीत पलंगावर पडली. या वेळीं कोणी जर बेगमचा चेहरा पहाता तर त्याला खास तिच्या चेहऱ्यावर पैशाच्चिक लीलारस पाघळतो आहे असें दिसलें असतें. इकडे रंभा तिची सर्व हालचाल पहात होती व मधून मधून मुश्करीचें तें विचित्र उत्तर ऐकून हंसून हंसून तिची मुरकुंडी वळे.

नंतर सुमारें दोन घटकेनें सलावतखान हबशी गुलामाच्या वेषानें दोन्ही हात जोडून नम्रतेनें बेगमपुढें येऊन उभा राहिला. तो आल्यावर चोहोंकडील दरवाजे बंद करून मोतिबेगम व तो त्या महालांत बसले. व मोतीबेगम खास म्हणाली " सलावत ! आपलें रौशनआरेच्या बरोबर आलेलें पत्र मला माझ्या चोळींत सापडलें तें मीं सर्व वाचून पाहिलें. आतां यापुढें आपल्याला रौशनआरेची मेहरबानी संपादन करण्यास मोकळीक आहे. आणि आजपासून आपणास मीं डोळ्यापुढून दूर केलें आहे ! "

रात्रीपासून हा तमाशा आहे तरी काय ? तारेला मी मारीत असतां कोणत्या दुष्टानें आह्माला तीर मारून घायाळ केलें ? रंभा पळाली कोठें ? माझ्या कमरपट्ट्यांतील यंत्र तरी कोणी चोरून हिला आणून दिलें ? हें सलाव-तखानास कांहींच कळेना. बरं नुसतें यंत्र तरी हिला आणून दिलें आहे ? त्यांत आणखी असा पाजीपणाचा मजकूर ! काय या उपद्व्यापी मनुष्यांना ह्मणावें? असे विचार त्याच्या मनांत सारखे घोळू लागले. शेवटीं आतां मोतिबेगमला उत्तर द्यावें तरी काय हेंच मुळीं त्याला सुचेना; परंतु उत्तर दिल्याशिवाय तर गत्यंतर नाहीं असें पाहून तो तीस ह्मणाला "बेगम ! खुदाकसम मला या गोष्टींतील कांहींच माहिती नाहीं. कोणी तरी हें दुष्टानें मजवरील आपलें प्रेम नष्ट व्हावें ह्मणून लिहिलें असेल. "

या सलावतखानाच्या शब्दानें कांहीं सुपरिणाम न घडतां उलट मोतिबेग-मच्या क्रोधाग्नीला जास्त पेटण्यास घृतच मिळालें. मग काय विचारतां ? ती त्याला झिडकारून ह्मणाली " चुप बैस ! केवळ लपवालपवी करण्याकरितां तूं हें सर्व झूट बोलतो आहेस. तूंच रात्रीं येथें येऊन मुश्तरीला हें यंत्र देऊन माझ्या चोळींत ठेवण्यास सांगून उलट या वेळीं धडधडीत खोटें बोलायला पहातोस ! तेव्हां ह्मणावें तरी काय तुला ? चल चालता हो कसा येथून पाहूं ! "

आतां सलावतखानाची पुरी खात्री झाली कीं कोणीं तरी दुष्टानें माझी नाचक्की करण्याकरितां ही युक्ति केली असावी. मुश्तरी बाहेरच उभी होती. सलावतखानाचें तें उत्तर आणि मोतिबेगमचे क्रोधयुक्त शब्द ऐकून तिला वाटलें कीं आपल्या बतावणींत खास सिद्धि आली. तिकडे रंभा तो संवाद ऐकूनही फारच आनंदयुक्त झाली. नंतर सलावतखान कांपत कांपत ह्मणाला " बेगमसाहेब ! रात्रीपासून मला प्रत्येक कामांत असें विघ्न येत आहे. कोणता दुष्ट मजवर उठला आहे कोण जाणें ! कसम खाऊन सांगतों कीं यासंबधांत मला कांहीं माहीत नाहीं. आणि मी केव्हांही मुश्तरीस पत्र दिलें नाहीं. हें जर आपणांस मी सांगतों त्यानें खात्री होत नसेल तर त्या पत्रांतील मजकूर मी एका दुसऱ्या कागदावर लिहितों. जर तो त्याप्रमाणें अक्षरांत जमला तर आपण मजवर रागवा ! सलावत-खानाचे हे शब्द मोतिबेगमला मानवले व कांहीं एक न बोलतां तिनें कलम, दौत, कागद आणून सलावतखानास दिले व त्याला मी सांगतें त्याप्रमाणें

लिही असें सांगितलें. सलाबतखान कागद लेखणी घेऊन लिहूं लागला. मोतिबेगम पत्रांतील मजकूर वाचून त्यास सांगूं लागली. मजकूर संपल्यावर त्यानें तो कागद तिच्याजवळ दिला. खरोखर सलाबतखानाचें नशीब फिरलें. त्यानें जो मजकूर लिहिला होता तो चांगल्या रीतीनें त्या पत्रास जुळला. मग काय विचारतां? आणखी क्रोधांत भर पडली! मोतिबेगमनें सारखें यथेच्छ तोंडसुख घेतलें. सलाबतखान मध्यें एकदां म्हणाला " मला तर दाखवा तें अक्षर ". पण मोतिबेगम त्याच्या बोलण्याकडे कशाला लक्ष्य देतें?

" आतां मी हें पत्र तुझ्या हातांत देण्याइतकी मूर्ख नाहीं. समजलास? पत्र मागण्यांत तुझा डाव काय आहे हें मी पूर्णपणें जाणून आहें. अनायसा पत्र हातांत आलेलं पाहून त्याचे तुकडे करून आपल्या गुन्ह्यांतून मोकळा होशील. परंतु आतां हातीं पत्र येण्याची बिलकुल आशा धरूं नको, समजलास? आतां हीं पत्रें मी बादशाहाजवळ नेऊन देतें म्हणजे रौशनआरेचें सर्व कारस्थान बाहेर येऊन तुझी उभयतां या लोकाची यात्रा करून परलोकीं चालते व्हाल आणि आतां मी तारेलाही सावध राहण्याविषयीं कळवितें. "

यावर मोतिबेगमनें खरोखरच तारेला सावध रहाण्याविषयीं मुस्तरीकडून निरोप कळविला.

वरील प्रकारें सलाबतखान आणि मोतिबेगमचें संभाषण चाललें आहे इतक्यांत मुस्तरी महालांत घाबऱ्या घाबऱ्या येऊन मोतिबेगमला म्हणाली " बाईसाहेब! आपल्याला जहांपनाह बोलावीत आहेत. "

हें ऐकतांच बेगमनें चटकन् दोन्हीं पत्रें आपल्या पेटीमध्यें ठेविलीं व पेटीला चांगलें कुलूप लावून बादशाहाकडे चालती झाली आणि मुस्तरी सलाबतखानास चोरवाटेनें घेऊन गेली. जातां जातां सलाबतखान तिला म्हणाला " काय ग हें पत्र तुला कोणीं बरें दिलें? "

मुस्तरीला माहीतच कीं, सलाबतखान आपणास असा प्रश्न करील. तिनें चटकन् विचार करून ठेविलेलें उत्तर ठोकून दिलें.

" आपण रात्रीं कां हें यंत्र बेगमसाहेबाच्या चोळींत ठेवायला दिलेंत? " यावर सलाबतखान काय बोलणार? आणि तो या वेळीं गुलामाच्या वेषांत तेथें आला होता. तेव्हां त्याला तिच्याशीं कांहीं जास्तकमी करितां येण्यासारखें नव्हतें. मोतिबेगमची आणि आपली आजची शेवटचीच भेट झाली आणि

आतां रौशनआरेकडेही जाण्यास संधि मिळत नाहीं, हें पाहून त्यास फारच वाईट वाटलें. शेवटीं मुस्तरीनें त्याला महालाबाहेर नेऊन पोंचविलें..

* * *

महालांतून बाहेर पडल्यावर आपल्या घरीं येईपर्यंत तारेला कोणत्या रीतीनें पळवून न्यावी या विचारांत तो चूर झाला होता. पुढें एकें दिवशीं त्यानें बादशहाची भेट घेऊन अमरसिंहाविषयीं कांहीं उलट सांगून त्याचे कान भरले. बादशहानेंही अमरसिंहास दरबारांत हजर राहण्याविषयीं त्याला सांगितलें. आतां यापासून शेवट काय झाला हें आम्ही येथेंच सांगत नाहीं.. प्रसंगोपात्त त्याचा उल्लेख करूं..

* * *

येथें आम्ही इतकेंच वाचकांना कळवितों कीं मोतिबेगमनें आपल्याशीं पुष्कळ विचार करून त्या यंत्रासंबंधीं बादशहास कांहींच कळविलें नाहीं. मात्र त्यासंबंधानें जहांनारेस तिनें कळविलें व त्या दिवसापासून सलावत-खानाचा संबंध तोडिला. जहांनारेनेंहि त्या यंत्राविषयीं ज्यास्त चौकशी न करितां तें तसेंच दाबून ठेविलें..

* * *

रंभा वरील प्रकार पाहून आपल्या महालांत सूर्यास्ताचे वेळीं चालती झाली व तिनें झालेली सर्व हकीकत तारेस सांगितली.. यासंबंधानें आम्हीं सहाव्या प्रकरणांत उल्लेख केलाच आहे. तिनें तारेला सर्व गोष्टी कळविल्यावर मोतिबेगमच्या दासीनें (मुस्तरी), ताराबाईला सावध रहाण्यास सांगितलें..

प्रकरण १० वें.

आग भडकली !

एक तर मशिदींमध्यें चागली फजिती झाली आणि दुसरें मोतिबेगमनें महालांतून हाकलून दिलें असा दोहों ठिकाणीं अवमान झालेला पाहून सलावतखान अत्यंत क्रोधातिशयानें वेडा होऊन गेला. आणि त्या वेडाचे सपाट्यांत त्यानें शहाजहान बादशहास अमरसिंहाचे उलट नाहीं नाहीं. तें

सांगून त्याचे कान भरले. अमरसिंहास दरबारांत हजर रहाण्याविषयीं त्याच्याकडून सलावतखानानें हुकुम मिळविला हें मागें आम्हीं कळविलें आहेच. पुढें एके दिवशीं सलावतखान आपल्या घोडयावर स्वार होऊन अमरसिंहाच्या बागेभोंवतीं फिरूं लागला. तेथें फिरण्याचा हेतु इतकाच कीं आणखी एकदां तरी तारेला आपल्या डोळ्यांनीं पाहून घ्यावें. त्याप्रमाणें त्या वेळीं त्याला तारा आपल्या महालावरील गच्चीवर उभी आहे असें दिसलें. त्यानें तिला पाहून आपल्या नेत्राचें पारणें फेडलें. तारेनेंही सलावतखानाला अवलोकन केलें. तिनें त्याला अवलोकन करतांच तिकडे पाठ फिरवून रंभेस हाका मारण्यास सुरुवात केली व कांहीं वेळानें ती आपल्या महालांत चालती झाली. इकडे सलावतखान तारा आतां येईल, मग येईल या आशेवर उभा राहिला; परंतु पुन्हां तारा मात्र आली नाहीं. तारा येत नाहीं असें पाहून त्याची निराशा तर झालीच पण तो एकाएकीं रागानें लाल होऊन तेथून चालता झाला.

तो गेल्यानंतर कांहीं कालानें एका दासानें अमरसिंहाच्या दासाजवळ अमरसिंहास देण्याच्या हेतूनें एक पत्र आणून दिलें व तो त्याचा डोळा चुकवून तेथून कोणीकडे चालता झाला. त्या दासानें तें पत्र अमरसिंहास आणून दिलें. अमरसिंहानें तें पत्र हातीं घेऊन वाचलें मात्र तोंच तो सिंहासारखे क्रोधानें हातपाय आपटूं लागला. असें होण्याला त्या पत्रांत मजकूर तरी काय होता ?:—

" हे अभाग्यवश काफर ! सावध रहा, आज संध्याकाळीं तुझें सर्व घरदार लुटून तुझी कन्या भ्रष्ट न करीन तर नांवाचा सलावतच नव्हे ! "

अशा प्रकारचा मजकूर वाचून अमरसिंहाचा कांहीं वेळानें जरा क्रोध शांत झाला व त्यानें विचार केला कीं सलावतखांच्या या पाजीपणाबद्दल बादशाहास भेटून त्याच्याकडून त्यास चांगलाच दंड करविला पाहिजे. त्याशिवाय त्याचे डोळे उघडणार नाहींत. " असा विचार करतो तोंच त्याला एकदम स्मरण झालें कीं आज पंधरावीस दिवस आपण दरबारांत गेलों नाहीं तेव्हां बादशाहाची मर्जी आपल्यावरून कदाचित् उडाली असेल. असें स्मरण होतांच पुन्हां त्याचा विचार ठरला कीं बादशाहास कांहीं नजराणा पाठवून पुन्हां चांगली मर्जी संपादन करावी. नंतर सलावतखानाचा सूड उगवावा असा विचार करीत अमरसिंह इकडे तिकडे महालांत फिरूं लागला. इतक्यांत एका शिपायानें

सलाबतखान आल्याची वर्दी अमरसिंहास दिली. त्यानें त्यास आंत आणण्यास परवानगी दिली. सलाबतखान आंत आला. परंतु या वेळीं त्याची स्थिति फारच विलक्षण झाली होती. डोळे लाल झाले होते. ओंठ थरथर कांपत होते. मूर्तिमंत राक्षसच जणू काय आपणास भेटण्याकरितां आला आहे असें अमरसिंहास वाटलें. सलाबतखान दांत ओंठ खाऊन ह्मणाला—

" तूं बागेसंबंधीं कांहीं आफरातफर केलीस, असें बादशहास कळलें आहे, तेव्हां त्यानें मला तुझी बाग ताब्यांत घेण्याकरितां हुकूम फर्माविला आहे. त्याकरितां मी येथें मुद्दाम आलों आहें. येथील सर्व वस्तु माझ्या स्वाधीन करून या घटकेस मजबरोबर राजदरबारांत चल. त्या ठिकाणीं तुझा शिरच्छेद करावयाचा आहे. काफर ! नालायक ! बे इमान ! "

सलाबतखानाचे हे विलक्षण धाडसाचे शब्द ऐकून अमरसिंहाचें माथें अगदींच खवळून गेलें. व तो महाक्रोधी मदांध अमरसिंह तेथून चालता झाला. व जातां जातां तो एवढेंच ह्मणाला—

" जो बादशहा तुझ्यासारख्या नीच चुगलखोराच्या गोष्टी ऐकून अन्यायी बनला, त्याला मी आपला पूर्ण हाडवैरी समजतों. आणि यापुढें त्याच्या हातांखालीं रहाणें ह्मणजे केवळ मला तें निंद्य कृत्यच वाटतें. " असें ह्मणून त्यानें त्यास घराबाहेर घालविण्याकरितां आपल्या एका बहादुरास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केलें. सलाबतखानाचे त्यापुढें कांहींच चाललें नाहीं. त्याला त्याच्या पुढें मुळीं कांहींच बोलतां येईना. बोलतो काय ? कमीजास्ती कदाचित् झालें तर ही फिर्याद बादशहाजवळ जाऊन उलट त्यानें जरी आपल्यास अमरसिंहास दरबारांत बोलाविण्यास हुकूम दिला आहे तरी पण हें सर्व आपल्याच गळ्यांत येईल, असें त्यास वाटलें. ह्मणून तो मुकाटयानें घरीं चालता झाला. घरीं गेल्यावर तो स्वस्थ बसला नाहीं. त्यानें रक्तानें भरलेला अंगरखा अंगावर चढविला व मांडीतं तीर लागलेल्या जागीं जरा जास्त रक्तस्राव होण्याकरितां तेथें शस्त्रानें थोडें कापलें. अशा थाटाने तो बादशहापुढें गेला व ह्मणाला " आपण मला अमरसिंहास बोलाविण्यास पाठविलें खरें, परंतु त्यानें तेथें आपली व माझी नालस्ती करून मला बेदम मारिलें. " असें ह्मणून त्यानें बादशहास जखम व कपडे, खरें आहे किंवा खोटें आहे हें पहाण्याकरितां दाखविले. तें पहातांच बादशहा अत्यंत रागावला परंतु अमरसिंहाच्या बापाचें व त्याचें योग्य वेळीं साहाय्य

मिळाल्याबद्दलचे उपकार मनांत आल्याबरोबर त्याचा राग जरा शांत झाला व तो सलाबतखानास ह्मणाला "त्याला सांग कीं, तूं आह्मांस वेळोवेळीं मदत केलीस ह्मणून तुला कैदेंत टाकतां येत नाहीं. तेव्हां तूं एक लाख रुपये आह्मांस बागेबद्दल दे व चोवीस घंटयांच्या आंत सर्व बंगला रिकामा करून शहराबाहेर चालता हो."

सलाबतखान याबर "जी हुकूम" ह्मणून जो चालता झाला तो पुन्हां अमरसिंहाकडे ह्मणून गेला नाहीं. परंतु संध्याकाळीं पुन्हां दरबारांत येऊन त्यानें बादशहास खोटेंच सांगितलें कीं, "अमरसिंह पूर्ण राजद्रोही बनला आहे. दरबारांतील सर्व सरदारांवर चांगली सरशी व्हावी एतदर्थ तो प्रयत्न करीत आहे. जहांपनाह ! ह्मणूनच मला त्यानें दुसऱ्या वेळीं बेदम मारून बाहेर घालविलें ! खरोखर आपलें ऐश्वर्य सुद्धां तो लुटावयाचे बेतांत आहे असें दिसतें."

वाचकहो, असें शब्द ऐकून कोणता बादशाह स्वस्थ बसणार आहे ? वरील शब्द त्यानें ऐकिलें मात्र तों त्यानें त्यास हुकूम दिला कीं, या वेळीं सरकारी फौज घेऊन अमरसिंहावर चालून जाऊन त्याला आपल्या स्वाधीन करून उदईक त्याला दरबारांत येऊन ये."

असा हुकूम देऊन बादशहा महालांत चालता झाला. तो हुकूम ऐकून सलाबतखानास खरोखर अत्यानंद झाला. त्यानें निश्चय केला कीं आतां आपण अमरसिंहास ठार मारून तरेला आपल्या स्वाधीन करून घेणारच. असा निश्चय करून त्यानें कंबर बांधली. लागलेंच अमरसिंहावर चालून जाण्याकरितां बादशहाचें सैन्य ताब्यांत घेतलें व आतां मध्यान्ह केव्हां होते या विचारांत तो बसला. सलाबत आपल्यावर चालून येणार आहे यासंबंधानें थोडी सुद्धां कुणकुण अमरसिंह किंवा तारा किंवा रंभा यांपैकीं कोणा एकासही कळली नव्हती. परंतु प्रथम सलाबतखान जेव्हां घरून रागानें चालता झाला तेव्हां चंद्रावती, तारा व रंभा जाणून चुकल्या कीं आतां खास आपलें दैव फुटलें व निराश होऊन त्या आपल्या महालांत बसल्या. परंतु उद्धट अमरसिंहानें त्याबद्दल मुळींच काळजी केली नाहीं. तो आपल्या बागेमध्यें खुशाल क्रोधवश होऊन टेहळणी करीत होता.

दारा शिकारीच्या नादांत फत्तेपूर शिकरीनजीक अरण्यांत शिकार करण्याकरितां गेल्यामुळें मागें सलाबतखानानें धुमाकूळ मांडला आहे हें त्यास कळलें

नव्हतें. म्हणूनच सलावतखान बेफिकीर होऊन असलें नीच कृत्य करण्यास तयार झाला होता. मनुष्य स्त्रीरत्नाच्या प्राप्तीकरितां काय न करील ? ' कामातुराणाम् न भयं न लज्जा. ' म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

सलावतखान काय करतो आहे हे अर्जुनसिंहास किंवा इनायतुल्लास मुळींच माहीत नव्हतें. सलावतखानानें अशा कांहीं चातुर्यानें शहाजहान बादशहाचें मन कलुषित करून मनाप्रमाणें हुकूम मिळविला होता कीं हे तिसऱ्याला कळणें अशक्य होतें. विचारा बादशहाही अविचारी; त्यानेंही असल्या नीच मनुष्यावर विश्वास ठेवून बेलाशक वाटेले तें करण्यास त्यास आज्ञा दिली. त्याला जर सलावतखानाविषयीं संशय येता तर खास त्यानें असें करण्यास त्याला परवानगी दिली नसती.

ही गोष्ट जहांनारेस कळली होती परंतु ती वेळेवर कळली नव्हती. शिवाय तिला ती गोष्ट कळतांच तारेस इषारा देण्याकरितां आपल्या कडील कोणास पाठवितां न यावें म्हणून सलावतखानानें सुरंग मधील जो मार्ग त्याला माहीत होता त्या मार्गावर खडा पहारा ठेविला होता. व त्यांना अशी ताकीद दिली होती कीं राजमहालांतील कोणास बाहेर जाऊं देऊं नये व कोणास राजमहालांतही सोडूं नये कदाचित् जहानारेस या गोष्टी कळल्या तर ती तारेस घराबाहेर नेऊन सोडील. परंतु बिचाऱ्या सलावतास सुरंगामध्यें किती रस्ते आहेत हें काय माहीत. त्याला केवळ दोनच मार्ग माहीत होते. म्हणून त्यानें त्या रस्त्यावर बंदोबस्त ठेविला होता. इतका जरी बंदोबस्त सलावतखानाचा होता तरी पण जहानारेनें इतक्या चलाखीनें तारेस आग्रा शहराबाहेर नेलें कीं तें सलावतखानास किंवा इतर कोणासही कळलें नाहीं. जहानारेनें हा आपल्यावर उपकार केलेला पाहून तारा फारच आनंदली व पुढें ती जहानारेचे उपकार आजन्म विसरली नाहीं. त्यापुढें तिची व जहानारेची मुळींच भेट झाली नाहीं. परंतु मरतेसमयीं सुद्धां तारेनें तिची तजबीर डोळ्यापुढून दूर केली नाहीं. आतां जहानारेनें तारेस कशी मदत केली हें आम्हीं पुढें लवकरच वाचकांना कळविणार आहोंत.

प्रकरण ११ वें.

यंत्रांत होतें तरी काय ?

मागें सलावतखानाचें पत्र ताराबाईच्या बागेंत गहाळ झालें तें रंभेनें उघडून पाहिलें. तेव्हां तिला त्यांत एक यंत्र व शहामृगाची तसबीर दृष्टीं पडली वगैरे गूढ होतें तरी काय ? हें एक विलक्षण कोडेंच आमच्या प्रियवाचकगणांना पडलें असेल. वाचकहो ! आम्ही तें कोडेंच आपल्या करितां सोडवितों म्हणजे झालें.

तें यंत्र शहाजादी रौशनआरेनें आपल्या गुप्त सभासदांना आज्ञापत्र ऊर्फ निमंत्रणपत्रिका पाठविली होती. त्यांतील मतलब पुढीलप्रमाणें होता. " आज सभा कांहीं कारणास्तव मुद्दाम भरविण्यांत येणार आहे. तरी सर्व सभासदांनीं आपापल्या मित्रमंडळाबरोबर आपलें अस्सल स्वरूप बदलून त्या ठिकाणीं हजर रहावें. जो कोणी सभासद येईल त्यानें सुरंगाच्या बहिर्द्वारांत पहारा करीत असलेल्या शिपायास तसबिरीचा भेद कोणत्या रीतीनें केला आहे तें अवश्य सांगावें. तें जो न सांगेल त्याला—मग तो आमचा खरा सभासद असला—तरी—कैद केलें जाईल व सभेस हजर राहूं दिलें जाणार नाहीं. याविषयीं प्रत्येकानें अवश्य काळजी घ्यावी. इ० इ० "

हा मजकूर कांहीं सांकेतिक शब्दांनीं गोविला होता.

याप्रमाणें मजकूर ल्या यंत्रामध्यें आहे, हें रंभेस माहीत होतें व तिनें तोच मतलब इनायतुल्लास एका पत्रांत लिहून कळविला. आतां त्या तसबिरींत गूढ काय होतें तें आपण पाहूं. त्यांतील सारांशच आम्हीं येथें देतों. ही तसबीर म्हणजे एक प्रकारचें फारच अवघड कोडें होतें; हें सोडावयाचें कसें हें जर कोणी सांगणार नाहीं तर त्याला मुळींच सुरंगमध्यें सोडीत नसत. आतां कदाचित एखाद्याला याच्याविषयीं चांगलें न च सांगतां आलें तर त्याला द्वारपाल शहाजादीजवळ कैद करून नेत व मग तिच्यापुढें खराखोटा निवाडा होत असे. त्या ठिकाणीं जर त्याला कांहींच सांगतां आलें नाहीं तर मात्र त्याची गर्दन उडविलीच म्हणून समजावें.

आतां सलावतखानानें त्या पत्राकरितां रंभेस इतका धाक दपटशा कां

बरें दिला असावा ? याचें कारण इतकंच कीं सलावतखानास निमंत्रण-पत्रिकेमध्यें काय आहे हें सर्व समजलें होतें. परंतु तसबिरीचा भेद कसा करावा व त्यांत आहे काय हें त्याला मुळींच कळलें नव्हतें. तें दुसऱ्या दिवशीं तो समजून घेणार होता. परंतु रंभेला भेटण्याचे नादांत तो तें पत्र तसेंच खिशांत घालून अमरसिंहाच्या बागेंत आला असतां तेथें तें गहाळ झालें. पुढें घरीं जाऊन त्यानें पाहिलें तों त्याला खिशांत दिसलें नाहीं. ह्मणून त्यानें रंभेस तिच्या महालांतून आणून तिला त्या मशिर्दीत इतकी दहशत घातली. तें पत्र जर आपल्याला तिच्याजवळून मिळालें नाहीं तर तसबिरींत काय आहे हें कांहींच सभेला जातांना द्वारपाळांना सांगतां येणार नाहीं व मग अर्थात आपल्याला सभेस जातां न येतां त्यांच्या कैदेंत मात्र रहावें लागेल. आपण मग हजार प्रयत्न जरी केले तरी त्यांतून आपली सुटका ह्मणून होणार नाहीं व आपलें सर्व कार्य फसेल असें त्याला वाटलें. उघड आहे. निमंत्रणपत्रिका ज्या सभेकरितां वांटल्या होत्या ती सभा केवळ सलावतखानाकरितांच भरणार होती. तेव्हां त्या सभेला जाण्यास जर सलावतखानास तसविरीचा भेद कसा करावा हें द्वारपालास सांगतां आलें नाहीं तर अर्थात् त्याचें शिर उडणार ! या सभेंत ताराबाईला पळवून औरंगजेबाकडे सलावतखानानें कशा रीतीनें जावें हें ठरावयाचें होतें. अशा सभेस अटकाव होणार हें पाहून सलावतखानास कां बरें वाईट वाटणार नाहीं ? आतां असें त्या गुप्त तसबिरींत होतें तरी काय ?

ज्या ज्या वेळीं रौशनआरेस कांहीं गुप्त मजकूर सभासदांना कळवावा असें वाटे त्या त्या वेळीं ती एका अद्भुत मसाला लावलेले कागदावर इष्ट मजकूर लिहून त्यावर एक शहामृगाचें चित्र काढी. त्या चित्राचे अंगीं अशी कांहीं विलक्षण शक्ति असे कीं तें चित्र पाण्यानें धुतल्याशिवाय त्या चित्राखालचा मजकूर कोणास कळत नसे. असें करण्याचा मुख्य मतलब इतकाच कीं, एखाद्या परक्या गृहस्थाच्या हातीं ती तसबीर जर पडली तर त्याला त्यांतील मजकूर न कळावा. एखाद वेळ यंत्रांतील मतलब कोणाला समजे परंतु तसबिरींतील मात्र कळत नसे. यंत्रांतील मजकूर समजून कोणी जर सभेकडे गेला तर विनाकारण तो प्राणाला मुकत असे. आतां ज्यांना तसबिरीचा भेद कसा करावा हें ठाऊक असे ते ती तसबीर

गरम पाण्यांत टाकून त्या चित्राचा सर्व रंग काढून टाकून त्या कागदांवरील सर्व मजकूर समजून घेत. अर्थात् पुढें त्यांना सभेमध्यें जाण्यास मुळींच त्रास पडत नसे. अशा प्रकारच्या तसबिरी रौशनआरा प्रत्येक वेळीं निरनिराळ्या करीत असे. व त्या सभासदांकडे रवाना होत. आतां या प्रकरणांत उल्लेख केलेल्या तसबिरींत इतकाच मतलब होता कीं

"आज जो कोणी द्वारपाळानें प्रश्न केल्यावर 'शाद' असें उत्तर न देईल त्याला सभेमध्यें घेतलें जाणार नाहीं."

अशा प्रकारची नित्यं निमत्रणपात्रिका व तसबिरी शिपायांकरवीं जात असत व प्रत्येक वेळीं त्यांत निरनिराळे सांकेतिक शब्द असत.

वरील प्रकारचें यंत्र किंवा तसविरींतील मजकर समजून कसा द्यावा हें धूर्त रंभेला चांगलें कळलें होतें. तिनें एके दिवशीं लपून सौसननें तसवीर पाण्यांत भिजवितांना पाहिली होती. तेवढें ध्यानांत धरून रंभेनें आज सलावतखानाची गहाळ झालेली तसबीर गरम पाण्यांत भिजवून तीवरील सर्व मजकर समजून घेतला व तो सर्व मजकूर इनायतुल्लास लिहून कळंविला. हें आम्हीं आमच्या वाचकांचा मागें एकदां कळविलेंच आहे.

प्रकरण १२ वें.

आणखी कांहीं गोष्टींचा स्फोट.

रंभा मर्दानी वेष धारण करून सौसनरंडीचे घरीं गेली असें सहाव्या प्रकरणांत आम्हीं लिहिलेंच आहे. ती जेव्हां आपलें सर्व काम करून घरीं परत आली, त्यावेळीं रात्र बरीच झाली होती. सर्व मंडळी निद्रासुखानुभव घेत पडली होती. परतु तारेला मात्र तिचा अनुभव मिळाला नव्हता. ती रंभेची वाट पहात आपल्या बिछान्यावर तळमळत पडली होती. इतक्यांत रंभा आलेली पाहून तिला आनद झाल्यासारखें झाल. रंभा येतांच तारेनें काय काय झालें म्हणून विचारलें. यावर रंभा तिला म्हणाली 'मला सध्यां फारंच भूक लागली आहे. अगोदर कांहीं तरी त्याची तजवीज केल्याशिवाय

---

१ कागदावरील मजकूर मात्र धुवून जात नसे.

दुसरा तिसरा व्यवसाय मला मुळींच सुचणार नाहीं. ' असें ह्मणून तिनें पोटाची व्यवस्था लावली. नंतर ती तारेस घेऊन एकांतांत गेली व झालेल्या सर्व गोष्टी तिनें तिला निवेदन केल्या. प्रथम तिनें तिला तसवीर व यंत्र यांसंबंधानें सांगितलें. यासंबंधानें आह्मीं मागील प्रकरणीं उल्लेख केला आहेंच. नंतर आपल्यावर सलावतखानानें काय प्रसंग आणला होता व आपणांस इनायतुल्लानें योग्य वेळीं मदत करून त्या प्रसंगांतून कसें मुक्त केलें हें सांगून ती ह्मणाली:—

" येथून मी मर्दानी वेषांत गेलें खरें परंतु सौसनला त्या वेषानें भेटलें नाहीं. त्या वेळीं मीं एका दासीचा वेष धारण केला होता. असें कां ह्मणून विचारशील तर मीं तुला यासंबंधानें काल सांगितलें आहे. ज्या वेळीं मी तिच्या घरीं गलं त्यावेळीं फारशी रात्र झाली नव्हती. त्यावेळीं सौसनचा चेहरा मला मुळींच प्रफुल्लित दिसला नाहीं. त्यावर भीति आणि चिंता यांचें मिश्रण दिसत होतें. ती एका खिडकीजवळ जाऊन बसली होती. इतक्यांत मी (दासी) आल्याचीं चाहूल ऐकून तिनें मागें वळून पाहिलें तों तिला मीं दृष्टीं पडलें. मी दृष्टि पडतांच तिनें मला आपल्याजवळ येण्याविषयीं खुणाविलें. मी तिच्याजवळ जाऊन बसलें. मी बसल्यावर ती मला घाबऱ्या घाबऱ्या ह्मणाली "तूं आलीस खरी पण तुझे येणें ह्मणजे प्राण गेल्यावर संजीवनी मिळाल्याप्रमाणें झालें आहे. "

"काय! काय! आज आपल्याला हीं अशी दुःखी वृत्ति धारण करण्याला असें कारण तरी काय झालें ? " मी ह्मणालें. यावर सौसन ह्मणाली " काय, सांगूं तरी काय तुला ? फारच भयंकर प्रसंग येऊन ठेपला आहे. उद्यां सभा होणार आहे. त्याबद्दलचा जाहिरनामा रौशनआरेनें मजकडे पाठवून दिला होता. त्या जाहिरनाम्यांत एक तसवीर व दुसरें एक यंत्र असे जिन्नस होतें. ते कोठें हारवले, हेंच कांहीं कळत नाहीं ! " यावर मीं विचारलें " हे जिन्नस आपणास कोणीं आणून दिले ? माझ्याजवळ तर नाहीं बाई शहाजादी रौशनआरेनें कांहीं दिले. " ती ह्मणाली. " छे छे, तूं नाहींस ग आणून दिले. ते जिन्नस एका खोजानें मला आणून दिले. व सभेसंबंधानें जाहिरनामे तोच वांटीत असतो. " यावर मीं ह्मणालें 'मग बाई कुठें बरं गेले असावेत. ती ह्मणाली " तेंच तर समजत नाहीं. मला काल त्या यंत्राचा अर्थ कळला व तसाविरीचा मतलब उद्यां समजून घेईन या हेतूनें मीं तीं तस—

बीर त्याच खलित्यामध्यें घालून तो खलिता निजायच्या गादीखालीं घालून ठेवला. आणि आज निजून उठून पहातें तों त्या ठिकाणीं मला तो मिळाला नाहीं. त्याच्या करितां सर्व घर शोधलें. त्याचा अद्याप पत्ता ह्मणून नाहीं. कोणीं चोरला ह्मणावें तर तेंही कळत नाहीं. ”

हे शब्द ऐकून खरोखर मला तर मनापासून आनंद झाला. इकडे सौसनचा खलिता चोरीला गेला व तिकडे सलावतखानाचा पार नाहींसा झाला हें पाहून मला हसूंच येणार परंतु तें मीं कसें तरी दाबलें व ह्मटलें “ आपल्याकडे काल लोक तरी कोण कोण आले होते ? ” सौसन ह्मणाली “ काल किंवा आज या वेळपावेतों कोणीही आलें नाहीं. इतकें असून खलिता नाहींसा झाला याबद्दल राहून राहून सखेदाश्चर्य वाटतें. ” यावर मी ह्मणालें “ कदाचित् निशेमध्यें आपण पलंगाखालीं न ठेवतां इतर कोठें तरी ठेविला असेल. ” ती ह्मणाली “ छे छे ! मी रात्रीं दारू मुळींच प्यायलें नाहीं. मीं गादीखालीं ठेविला हें मला चांगलें स्मरतें. ”

मीं विचारलें “ कोणीं घेतला आहे याबद्दल आपणास कोणाचा वहीम येतो का ? ” सौसन ह्मणाली “ मला कोणाचा वहीम तर येत नाहीं. परंतु माझ्या कोणी तरी दुस्मानानें माझ्या दासींपैकीं कोणास तरी वश करून घेऊन हा खलिता उपटून नेला असावा असें मला वाटतें; परंतु तो दुस्मान तरी असावा कोण हें कांहींच कळत नाहीं. त्यामुळें मला एकवार वाटतें कीं, सर्व दासदासींना ठार मारावें ! पण पुनः वाटतें त्यांना मारण्यापेक्षां आपणच आत्महत्या केलेली बरी. आतां यासंबंधीं कोणास विचारावें तर तसें करणें बिलकुल इष्ट नाहीं. माझा खलिता गहाळ झाला तो झाला, पण सलावतखानाचा कां बरं गहाळ व्हावा ? तो आज सकाळींच त्याविषयीं सांगत होता. त्यालाही आतां सभेमध्यें जातां येणार नाहीं ! ”

यावर मीं मुद्दाम आश्चर्यचकित होऊन विचारिलें “ काय आपण बोलतां तरी काय हें ? बरंशी सलावतखानाचा खलिताही गहाळ झाला ह्मणजे ? ” यावर सौसन ह्मणाली “ असं तो मला सांगत होता खरा. रात्रीं मीं पेटीमध्यें घालून ठेविला होता तो कोणी दुष्टानें ती पेटी फोडून त्यांतील खलिता पळविला असें त्यानें सांगितलें. खरोखर काय तें कांहीं ठाऊक नाहीं.” सलावतखानास आपला खलिता कोठें गेला हें सर्व माहीत होतें. परंतु आपल्याच निष्काळजीमुळें खलिता गहाळ झाला हें सांगणें ह्मणजे आपलें अज्ञान

तिला दिसेल ह्मणून त्यानें अशी बतावणी केली. शिवाय तो तिच्याकडे येवढयाच हेतूनें गेला होता कीं, सौसनच्या तरी खलित्यावरून आपल्याला सभेचा सर्व मतलब कळेल. पण तिचाही खलिता हारवलेला पाहून आपल्या-संबंधीं खोटेंच सांगून तो तेथून चालता झाला. नंतर सौसन ह्मणाली ' सकाळ-पासून या विचारांतच गर्क आहें. तुझी मार्गप्रतीक्षा करीतच होतें. आतां एक माझें तूं काम कर पाहूं. हें पत्र घे आणि शहाजादीस नेऊन दे. यांत सलाव-तखानाचा व माझा खलिता गहाळ झाला तेव्हां आह्मांला यापुढें सभेंत येतां येणार नाहीं तर आपण आह्मांस मेहरबानी करून नेण्याची व्यवस्था करा.' असें ह्मणून तिनें एक पत्र मला दिलें. मीं तें पत्र घेऊन तिला सांगितलें कीं याचें उत्तर मी शहाजादीकडून दोन घंटयांनीं घेऊन येईन. असें सांगून मी सौसनचे घरांतून जी बाहेर पडलें ती थेट इनायतुल्लाचे घरीं आलें. इनायतुल्ला घरीं येतांच त्याला मीं सौसनचें पत्र दाखविलें व सौसनकडे झालेली सर्व हकीकत त्यास सांगितली. इनायतु-ल्लानें तें रौशनआरेच्या नांवचें पत्र फोडून त्यांतील मजकूर वाचला. तो मजकूर वाचून त्यास इतकें कांहीं हंसूं आलें कीं तें त्याच्यानें कांहीं केल्या आवरेना. नंतर कांहीं वेळानें हंसूं कमी झाल्यावर त्यानें आपली लोखंडी पेटी उघडून मला त्यांतील एक खलिता दाखविला व ह्मटलें. " सौसनचा जो खलिता गहाळ झाला आहे तोच हा. हा खलिता जहांनारेच्या एका दासीनें-जी दासी नित्य सौसनकडे असते तिनें-जहांनारेस दिला व जहानारेनें तो मजकडे पाठवून दिला. झाली ती गोष्ट फारच बहारीची झाली. उदईक सलावतखानास किंवा सौसनला सभेमध्यें ह्मणून जातां यावयाचें नाहीं. पाहूं आतां काय मजा उडते ती. आतां मला असें वाटतें कीं आपण दोघे सभेला जावें व तेथें काय काय घडतें हें पहावें. रंभे ! तूं सलावतखानाच्या खटल्यासंबधीं जे मला लिहिलें तें पाहून माझी अशी खात्री आहे कीं रौशनआरा ज्याकारितां गुप्त सभा भरवीत असे त्यांत तिला चांगलें यश येऊन औरंगझेब गादीवर बसेल. " असें ह्मणून त्यानें पुन्हां एकदां सौसनचें पत्र वाचलें. ' त्यांतील मजकूर काय होता हें मीं तुला सांगितलेंच आहे. ' पुन्हां पत्र वांचून तो मला ह्मणाला " मात्र या चिठ्ठीचें काय करायचें ? रौशनओरस नेऊन देणार काय ? " यावर मी ह्मणालें " ही चिट्ठी आतां रौशनओरस मुळींच पोंचती करण्याचा

माझा विचार नाहीं. या वेषामध्यें जोंपर्यंत माझा या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत तरी मी सौसनला भेटणार नाहीं. पण एकदां सौसनकडे गेलें मात्र पाहिजे. यावर तिचा माझा संबंध तुटला असें समजावें. " यावर इनायतुल्ला ह्मणाला " ठीक बोललींस. पण आतां सौसनकडे कशाला जाणार. " मी ह्मणालें " तिला मीं दोन घंट्यानीं उत्तर देतें असें सांगून आलें आहें. ह्मणून एकवार अवश्य तिला भेटलें पाहिजे. " इनायतुल्ला ह्मणाला " पण आतां शहाजादीचा जबाब तरी तूं काय सांगणार ? " यावर मी हेसून ह्मणालें " कां, कांहींच सागायला नाहीं वाटतें ? " इनायतुल्ला ह्मणाला. " तसें माझें विचारणें नाहीं. पण तिला सांगण्याचा तरीं काय विचार केला आहेस ? " मी ह्मणालें " आपण (सौसननें) जो मजकूर लिहिलांत तो शहाजादीनें वाचून पाहिला. त्यावर त्यांनीं मला तोंडीं उत्तर दिलें कीं आपण आपल्या स्नेह्याबरोबर सभेंत यावें. मीं त्यांची बंदोबस्ती केली आहे. तसेंच सलावतखानासहि येण्यास सागावें. आतां ज्यांना आपले खलिते सांपडले ते दुष्ट लोकहीं सभेस हजर रहातीलच. तेव्हां त्यांना पकडून चांगली शिक्षा दिली ह्मणजे झालें. व ती गोष्ट करणें ह्मणजे आपणांस मुळींच अशक्य नाहीं. उर्दईक सभा मात्र अवश्य भरणार आहे. कालच्या सभेंत येणाऱ्या सभासदांनीं ' शमशीर ' असा उच्चार करावा असें ठरविलें होतें. उर्दईक ला ऐवजीं ' शिनाख्त ' असा शब्द उच्चारावा ". हे शब्द ऐकून इनायतुल्ला मजकडे एकसारखा साश्चर्य अवलोकन करूं लागला व कांहीं वेळानें ह्मणाला " पोरी, तुझ्या शहाणपणाची खरोखर कमाल आहे. तूं केवळ मानवी स्त्री या भूतलावर उतरली नसावीस. तुझा मला सर्व मतलब कळला. आपल्याला सभेंतील सर्व गोष्टी निर्धास्त कळून घेतां याव्यात आणि सौसन व सलावतखानांनीं शिनाख्त शब्द उच्चारला कीं कैदेंत पडावें हाच ना तुझा हेतु ? " यावर मी ह्मणालें " होय. हेतु तोच. कदाचित् यांत आपलीं मसलत फुटली तर आपणांस त्यांतून निसटतां येईल. " असें ह्मणून आणखी थोडें मोतिबेगम व सलावतखान यांच्याविषयीं सांगितलें. तें ऐकून इनायतुल्ला फारच हंसूं लागला. व मी कांहीं वेळानें तेथून जी निघालें तीं अर्ध्या घंट्यानें सौसनचे घरीं आलें. या वेळीं सलावतखानाशीं सौसन कांहीं बोलत होती. मी (दासी) आलेली पाहून सौसन व सलावतखान उठून उभे राहिले. सौसननें माझा हात धरून मला दुसऱ्या एका-

खोलींत नेलें व मला विचारलें "काय हुकूम आहे?" नंतर मीं हकीम इनायतुल्लास जें सांगितलें तेंच तिला निवेदन केलें. "शिनाख्त" यासंबंधानें सांगून पुन्हां म्हणालें कीं "जर ते दुष्ट लोक न सांपडतील तर शहाजादी कोणास पत्र वगैरे देणार नाहीं. हें मला तिनें बजावून सांगण्यास सांगितलें आहे." हे माझे शब्द तिला सत्य वाटले व तिनें शिनाख्त शब्दही लिहून घेऊन माझ्या हातावर पांच मोहरा ठेवल्या. मीं त्या घेऊन तिचा निरोप घेतला तों थेट जोहरेस जाऊन भेटलों. तिला हा सर्व वृत्तांत कळवून दाराविषयीं चौकशी केली तेव्हां ती म्हणाली 'तो शिकारीस गेला आहे. त्यानें आपणांस काल सांगितलेंच होतें. शिवाय अव्वारखानहि त्याच्या बरोबरच गेला आहे, असें कळल्यावर मला थोडें समाधान वाटलें. तो असता तर त्या मेल्याला आणखी भेटावें लागलें असतें. तो नव्हता हें एक माझ्या पथ्यावरच पडलें म्हणावयाचें. मग हळूच त्या मिळालेल्या पांच मोहरा तिच्या नकळत पेटींत घालून सुरंगमध्यें जाऊन मी आपला दासीपणाचा पोषाख बदलून ही आतांच तुजकडे आलें."

"हे खरोखर तूं फार धोक्याचें काम हातीं घेतलें आहेस. जर कां हें सलावतखानास कळलें तर तुझी काय अवस्था होईल?" तारा म्हणाली.

'जसा खेळ करतें आहे त्याचप्रमाणें माझी अवस्था होईल. काल मी बेसावध निजल्यामुळें सलावतखानाचें हातीं सांपडलें. नाहीं तर काय त्याचें तोंड आहे माझ्या शरीरास स्पर्श करण्याचें? शिवाय त्या नीचानें मला भूल दिली होती म्हणून मला कांहींच कळलें नाहीं. आतां मी चांगली सावध राहीन. शिवाय मला मदतगारही पण माझ्या जिव्हाळ्याचाच मिळाला आहे"

इतकें बोलून रभेनें आपल्या हातांतिल विषारी अंगठी तिला दाखवून तिचें तिनें चुंबन घेतलें.

'मला वाटतें तूं या खटपटींत न पडावीस हें चांगलें' तारा म्हणाली.

'असें काय? ठीक उपदेश!' रंभा हंसून म्हणाली 'दोन दिवसांची कथा ऐकली नाहींस तोंच तुझ्या मनावर असा परिणाम झाला. आणि मीं जर प्रथमच तुला विचारून हें काम हातीं घेतलें असतें तर तूं मला मुळींच घराबाहेर जाऊं दिलें नसतेंस.'

'होयच. अशा धोक्यामध्यें तुला मीं जाऊं दिलें असतें कीं काय?'

' आतां फार दिवस नाहींत कांहीं अशा स्थितींत काढावयाचें ? चार दिवसांनीं उदयपुरला गेलों ह्मणजे या भानगडींत मुळींच पडण्याचें कारण नाहीं आणि मी पडणारही पण नाहीं. '

' उदयपुरला जाण्यासारखें माझें कुठें असें भाग्य हाका मारतें आहे ? हे नित्य घडून येणारे प्रसंग आणि मिश्रजीचें येणें लांबणीवर पडत चाललेलें पाहून माझ्या मनाची काय स्थिति होते आहे ह्मणून तुला सांगू. रंभे ! – " यापुढें तारेचा कंठ अत्यंत भरून आला. तिच्यानें पुढें कांहीं बोलवेना हें पाहून रंभेनें तारेस आपल्या हृदयाशीं धरिलें व तिचे पाण्यानें भरून आलेले नेत्र आपल्या पदरानें पुसून ह्मटलें " उगी उगी. तूं आतां त्याची अगदीं काळजी करूं नकोस. ईश्वर आपला सहाय्यकर्ता आहे. तो कधींहि आपलें वाईट करणार नाहीं. उद्यां मी या सभेंतून सुटून आलें ह्मणजे तूं थोडयाच अवधींत उदयपुरला गेलीस ह्मणून समज. चल बाई आतां ऊठ कशी. पहा, रात्र किती झाली ती ! "

प्रकरण १३ वें.

गुप्तमार्ग.

वाचकहो ! आजच त्या गुप्त सभेचा दिवस. या सभेंत हजर राहणाऱ्या प्रत्येक सभासदाला रौशनआरेनें निमंत्रणपत्रिका—यालाच आह्मीं मागें यंत्र अशी संज्ञा दिली आहे—व शाहामृगाच्या तसबिरा आपल्या गुप्त हेराकरवीं वांटल्या होत्या. निमंत्रणपत्रिकेमध्यें गुप्त सभेचा सर्व कार्यक्रम सविस्तर दिला होता. यासंबंधानें मागें एकदां आह्मीं उल्लेख केलाच आहे. वरील निमंत्रण-पत्रिकेंत किंवा तसबिरांत सभेला सुरुवात होणार केव्हां व कोठें याचा मात्र मुळींच उल्लेख नव्हता. याचा उल्लेख फक्त निमंत्रणपत्रिका वाटणारा गुप्त हेर प्रत्येक सभासदाजवळ करीत असे. यांचें कारण इतकेंच कीं यदाकदाचित् निमंत्रणपत्रिका तसबिरा परक्याच्या हातीं पडल्या, आणि त्याला जर त्यांतील सर्व मजकूर समजला तर सर्वच

बेत फसावयाचा. वेळ आणि स्थळ हें जर कोणास न कळतां इतर कांहीं जरी कळलें तरी त्याचा कांहीं गुप्त सभेस उपद्रव होणार नाहीं. आणि हें कळलें नाहीं ह्मणजे अर्थात त्या इसमास गुप्त सभेस हजर रहातां येणार नाहीं. या एवढ्याच गोष्टीवरून रौशनआरेचा दूरदर्शीपणा किती होता हें वाचकांना सहज कळण्यासारखें आहे. तिनें इतका जरी दूरदर्शीपणा आपुल्याकडून होतां होईल तितका दाखविला होता तरी पण आमच्या रंभेस सभा कोठें व केव्हां भरणार हें सर्व कळलें होतें. हें तिला कसें कळलें याचें वर्णन आह्मीं मागें दिलेंच आहे.

ही सभा सुमारें मध्यरात्रीं भरणार होती. ही ज्या ठिकाणीं भरावयाची होती त्या ठिकाणीं जाण्याला एका मशीदींतून गुप्त मार्ग होता. आतां ही मशीद असावी कोणती हें चतुर वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. आतां कित्येक मंद वाचकांच्या ध्यानांत नसलें आलें तर आह्मी सांगतों. ज्या ठिकाणीं रंभेस सलावतखानानें आणून ठेविलें तीच ही मशीद.

उत्तररात्रीस नुकताच आरंभ झाला होता. रात्रही अंधेरी असल्यामुळें त्यावेळचा सर्व देखावा फारच भयाण दिसत होता. जी मशीद नेहमीं उजाड भासे तीच आज गजबजलेली दिसत होती. जिकडे तिकडे मशाली पेटलेल्या दिसत होत्या. बाह्य प्रदेशांत जिकडे तिकडे हत्यारबंद शिपाई फिरत होते. यांची संख्या बरीच होती. प्रत्येकाच्या हातांत तक्षिण धारेच्या नग्न तलवारी चमकत होत्या. त्यांनीं आपलें खरें स्वरूप लपवून भयंकर रूप धारण केलें होतें. मशीदींत ज्या रस्त्यानें सुरंगमध्यें जावयाचें त्या रस्त्याच्या तोंडावर एक संगमरवरी दगड ठेविला होता. तो बराच मोठा होता. याही दगडासंबंधानें मागें एकदां उल्लेख केला आहेच. त्या दगडाभोंवतीं चांगले धिप्पाड हत्यारबंद दहा मोंगल उभे होते. मध्यंतरीं एक दाढीवाला मोंगल आपला भाला त्या दगडावर ठेवून उभा होता. जवळच एक मशाल जळत होती. येथीलही शिपायांनीं छद्मवेष धारण केलेला होता.

कांहीं वेळानें सभासदांनीं हजर रहावें याबद्दल घंटा वाजविली. घंटेचा नाद ऐकतांच दगडाजवळचे सर्व शिपाई मशीदीबाहेर येऊन आतां कोण कोण सभासद येणार याचीच ते वाट पाहूं लागले. इतक्यांत तेथें दोन गृहस्थ आले. यांनीं पायांपर्यंत लोंबणारे कृष्णवर्ण झगे परिधान केले होते. स्वरूपही बदललें होतें किंवा कसें याचा मात्र येथें निर्णय करतां येण्यासारखें नाहीं. ते

गृहस्थ तेथें येतांच वरील दहा मोगल त्यांच्या भोंवतीं जमले. त्यांच्याच मागून तो दाढीवाला आपला भाला सरसावून आला. त्यानें त्या दोघांस तेथेंच उभें करून त्यापैकीं जो मोठा होता त्याचा हात धरिला व त्याला जरा दूर नेऊन त्याच्या कानांत "शिनाख्त" असा शब्द उच्चारिला. त्यावर त्या गृहस्थानें 'शाद' असें प्रत्युत्तर दिलें. हें उत्तर ऐकतांच त्या शिपायानें त्या गृहस्थास लघून कुरनिसाद केला व दूर उभें रहाण्यास सांगितलें. नंतर त्यानें दुसऱ्या धाकट्या गृहस्थास पूर्वीच्या गृहस्थाप्रमाणें दूर नेऊन तोच शब्द त्याच्या कानांत उच्चारिला. यावर त्याला मागल्याप्रमाणेंच उत्तर मिळालें. तें उत्तर मिळतांच त्याला पुन्हां कुरनिसाद करून त्या उभयतांस सुरंगमध्यें जाण्यास परवानगी दिली.

शिपायांची परवानगी मिळतांच थोरला गृहस्थ मशालींत शिरला व त्याच्या मागून धाकटाहि शिरला. ते संगमरवरी दगडाजवळ येतांच पहिल्यानें त्या दगडावर खूप जोरानें लाथ मारली. त्यासरशीं त्या दगडांतून मोठा थोरला आवाज एकूं आला व तो दगड आंतील खोल भागांत गुप्त झाला व त्या ठिकाणीं खालीं जाण्याकरितां एक शिडी दृष्टीं पडली. त्या शिडीवरून ते दोघे गृहस्थ खालीं उतरून गेले. ते खालीं जातांच गुप्त झालेला दगड पूर्ववत् स्वस्थलीं येऊन बसला. व खालीं गेलेले गृहस्थ एका खोलींत आले. ही खोली सुमारें चार हात रुंद व आठ हात लांब अशी होती.

आतां या ठिकाणीं वाचकांना एक गोष्ट अवश्य सांगितली पाहिजे. एखाद्या गृहस्थास शिनाख्त शब्द उच्चारण्याचें ठाऊक असून त्यास जर सुरंगाचा दरवाजा उघडतां न आला तर तेथील शिपाई त्याला प्रतिबंधांत ठेवीत असत व ज्याला तो दरवाजा उघडतां येइल त्यास मात्र ते खुशाल जाऊं देत. पहिल्या द्वारांतून त्याची सुटका झाली म्हणजे त्यास मग पुढें मुळींच त्रास सोसावा लागत नसे.

ते दोघे गृहस्थ त्या चौकोनी खोलींत आले नाहींत तो त्यांच्याजवळ मागीलप्रमाणें घट्टेकट्टे आठ मोंगल शिपाई आले व त्यांपैकीं एकानें त्यास निरानिराळ्या रीतीनें एका कोंपऱ्यांत नेऊन 'शिनाख्त' संबंधीं विचारिलें. त्यावर त्याला अनुकूल अशींच उत्तरें मिळालीं. तीं मिळतांच त्या गृहस्थांस पुढील द्वारानें जाण्यास परवानगी मिळाली. या खोलींत येतांच परक्या मनुष्यास कोठून जावयाचें हें सहज समजत नसे. तो खास तेथें गोंधळून जाई-

तो शुद्ध कैदखाना झटलें असतां विशेष शोभेल. असो. तें दोघे गृहस्थ शिपायांची परवानगी मिळतांच उजव्या बाजूस वळलें. पुढें तें दोनतीन हात चालून गेले नाहींत तोंच त्यांना त्यांच्या समोर असलेल्या भिंतींत एक रंगीत सुमारें दींड वींत लांबीची खुंटी दिसली. ती खुंटी दिसतांच त्या गृहस्थांपैकीं थोरल्यानें तिच्यावर जोरानें मुष्टिप्रहार केला. त्यासरशी ती भिंत दुभंगली व त्या जागीं एक लहानशी खिडकी दिसली. त्या खिडकींतून ते पुढें गेले तों त्यांना एक लहानसें दालन दिसलें. त्यांनीं त्या दालनांत प्रवेश केला. त्यांत प्रवेश करितांच आतां जावें कसें व कोठें याचा तें विचार करूं लागले न लागले तोंच त्यांच्या डाव्या भागाकडे एक लहानसा मार्ग दिसला. त्या मार्गानें ते दुसऱ्या एका खोलींत आले. या वेळीं या खोलींत कोणीही नव्हतें. तें या खोलींत आल्यावर इकडे तिकडे पाहूं लागले तोंच एकाएकीं त्यांनीं बंदूक उडाल्याचा आवाज ऐकला व त्यांच्या सभोंवार कांहीं हत्यारबंद शिपाई जमले. या शिपायांचे चेहरे फारच उग्र दिसत होते. मात्र त्यांचें तें खरें स्वरूप नसावें खास असें पहाणारास वाटत होतें. या ठिकाणींही त्यांना त्या शिपायांनीं मागीलप्रमाणें प्रश्न केला व त्यावर त्यांना त्यांच्यापासून जें उत्तर पाहिजे होतें तें मिळालें. व त्यांनीं तें उत्तर ऐकून त्यास सविनय कुरनिसाद् करून उजव्या बाजूनें जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते दोघे गृहस्थ त्या मार्गानें जाऊं लागले. पुढें कांहीं मार्ग चालून गेल्यावर त्यास एका भिंतीशीं शिडी दिसली, तीवरून तें चढून गेले. त्यांच्या मागोमाग दोन हत्यारबंद शिपाई येत होतें. आतां ते एका मोठ्या थोरल्या दालनांत आले. या ठिकाणीं बऱ्याच तार्तरी स्त्रिया इकडे तिकडे फिरत होत्या. यांनीं आपलें स्वरूप बदलून हातांत नग्न तलवारी घेतल्या होत्या. त्या स्त्रियांपैकीं एकीनें वरील गृहस्थ आलेले पाहिले. ती त्याच्याजवळ गेली. मागीलप्रमाणें प्रश्नोत्तराचा समारंभ झाल्यावर त्यानें त्यास सविनय मुजरा करून पुढील दरवाजा उघडून आंत जाण्याविषयीं खुणाविलें. वाचकहो ! आपणहीं त्यांच्यामागून जावें..

प्रकरण १४ वें.

गुप्त महालामध्यें प्रवेश.

त्या स्त्रीनें दरवाजा उघडून आंत जाण्याविषयीं आपणांस खुणावलें असें पहातांच ते दोन्ही गृहस्थ त्या दरवाज्याजवळ येऊन दाखल झाले. त्यांपैकीं एकानें तो दरवाजा उघडला व ते दोघेही आंत शिरले. ते जसे आंत शिरले तसे त्या दरवाज्याचे दार पूर्ववत् बंद झालें. व ज्या ठिकाणीं आज रौशनआरेचीं गुप्त सभा भरणार तो महाल त्यांच्या दृष्टीं पडला.

हा महाल फारच मोठा होता. त्यामध्यें सहज हजार सभासद बसत. हा महाल चौसष्ट खण असून त्याला वरती छत वगैरे कांहीं एक नव्हतें. याचा आकार गोल असून दिसण्यांत फारच मोहक असे. या महालाचें सर्व सामान लांकडी असून त्याला अक्षय्य टिकणारा रंग लाविल्यामुळें जसा कांहीं तो आजच तयार केला आहे किंवा काय असें पहाणारास वाटे. मध्यभागीं एक मोठें थोरलें बिलोरी झुंबर दिसत होतें. त्यांत व्यवस्थित मेणबत्त्या जळत असल्यामुळें त्यांचा प्रकाश सर्वत्र पसरला होता. खालीं जमिनीवर अनेक मखमालीचीं आसनें मांडलीं होतीं. हो, मुख्य सांगवयाचें तें राहिलेंच. या महालांत एकदा कोणीं प्रवेश केला—मग तो कोणत्याही दरवाज्यांतून कां असेना—त्याचें आपलें दार एकदम बंद होई व आंत प्रवेश करणारास बाहेर जाण्याची इच्छा झाल्यास त्यास आपण दार उघडून आतां बाहेर जावे कसें हें कांहींच कळत नसे. अशा तऱ्हेची त्या महालाची अप्रतिम रचना होती. त्यामुळें पहाणारा अगदीं थक्क होऊन जाई. असो.

आमच्या गृहस्थद्वयांनीं त्यांच्यासमोर असलेले एक सुवर्णमय सिंहासन पाहिलें. हें पहाण्यासारखें होतें. जणूं काय तें सिंहासन ह्मणजे त्या महालाचा एक अमोल अलंकारच आहे असें त्यांना वाटलें. त्या सिंहासनावर एक लहानसा लांकडी मंडप होता व वरपासून खालपर्यंत तीन बाजूंनीं बारिक मखमलीचे पडदे सोडले होते. अशा त्या सिंहासनावर

राजनीतीची दुसरी मूर्ति किंवा औरंगजेबाची प्रत्यक्ष प्रतिमाच विराजमान झाली होती. परंतु सभोंवार पडदे असल्यामुळें तिचा चेहरा पाहणारास मुळींच गोचर होत नसे. या वेळीं तिच्या भोंवतीं कोणी दासदासी सुद्धां दिसत नव्हत्या. आजची सभा फारच गुप्त असल्यामुळें तिनें मुद्दामच दास-दासींना दूर केलें होतें.

महालांत प्रवेश करतांच त्या गृहस्थांनीं क्षणभर तेथील शोभा अवलोकन करून तेथूनच एकदां जमिनीला स्पर्श केला. व पुढें ते मंडपाजवळ आले. तेथें आल्यावर त्या दोघांनीं आणखी एकदा त्रिवार जमिनीला स्पर्श केला. व एकेकानें आपआपल्या झग्यामधून एक एक पत्र काढून शहाजादीस देण्या-करितां पुढें केलें. व शहाजादी रौशनआरेनें तीं पत्रें पडद्याबाहेर हात करून घेतलीं.

बिलोरी झुंबर जरी बाहेर जळत होतें तरी पण त्यांचा प्रकाश रौशनआरा जेथें बसली होती तेथें चांगला पडला होता. त्यामुळें तिला तीं पत्रें वाचण्यास व त्यांचीं उत्तरें लिहिण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. तिनें तीं पत्रें आळीपाळीनें घेऊन त्यांतील सर्व मजकूर चांगला वाचून पाहिला. व नंतर तिनें एक पत्र लिहून तें पडद्याबाहेर करून मोठ्या गृहस्थास दिलें. तें पत्र त्या गृहस्थानें मोठ्या आदबीनें घेऊन तिला मुजरा केला व त्यांतील मजकूर वाचून पाहिला. त्या पत्रांत असा मजकूर तरी काय असावा? हें समजून घेण्याची साहजिक इच्छा वाचकांना झाली असेल. सबब त्यांच्याकरितां त्या पत्राचीच हुबेहुब नक्कल आम्ही खालीं देतों:—

" बख्शी सलावतखान !

आपण अगदीं वेळेवर येथें आलांत. आपली इच्छा सफल होण्याची सुसंधि जवळ आली आहे. तर आपण आवश्य खुदाचे आभार मानावेत. तुम्ही होतां होईल तितकें विलंब न लावतां तारेस पळवून इकडे औरंगजेबाच्या आश्रयाला येऊन निर्धास्त रहावें हें बरें. मी तुम्हांला एक मोहोरबंद पत्र देतें तें तुम्हीं त्यांस दिलें असतां तो तुम्हांस आपल्या अमीरउमरावांमध्यें घेईल. आतां ज्यावेळीं तुम्ही तारेबरोबर विवाह लावाल आणि औरंगजेबाचे अमीर व्हाल तेव्हां त्याची खबर मला देण्यास मात्र विसरूं नका. मी आज तुम्हांस एक खबूतराची जोडी देणार आहें. त्यांपैकीं एक खबूतर शहाजाद्यास द्या व दुसरें खबूतर मजकडे पाठवितांना

मात्र बारीक कागदावर ' आनंदी आनंद " एवढे शब्द लिहून तो कागद त्याच्या गळ्यांत बांधून पाठवून द्या. ते खबूतर आपल्या हातांतून सुटलें ह्मणजे मजकडे खास येईल, असें समजा. व नंतर तुह्मी औरंगजेबास हें सर्व सांगून त्याचा राग शांत करा. मी पुढें यामध्यें यश आल्यावर मला जें कांहीं करायचें तें करीन. हें पत्र मनःपूर्वक वाचून तें मजकडे परत द्या इ. "

रौशनआरेनें सलावतखान समजून त्याला तें पत्र दिलें. तो गृहस्थ कोण बरें असावा ? काय ? अद्याप तो कोण हें तुह्मांस नाहीं कळलें ? कांहीं हरकत नाहीं. आह्मीच त्याचा येथें उलगडा करितों.

त्या दोन गृहस्थांपैकीं थोरला गृहस्थ इनायतुल्ला व धाकटा गृहस्थ रंभा बनली होती. तें उभयतां सलावतखान व सौसन या वेषानें आले होते. व मार्गें जीं त्यांना दोन पत्रें सांपडलीं होतीं तीं त्यांनीं रौशनआरेस दिलीं. रौशनआरेच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्या पत्रांवर यंत्र व तसबीर असल्यामुळें तिला हें सलावतखान सौशन असावेत असें खास वाटलें.

वरील पत्र वाचून पाहिल्यावर इनायतुल्लानें तें रौशनआरेस परत दिलें. तिनें तें पत्र घेऊन त्याला एक पिंजरा व मोहोर केलेला खलिता दिला. त्या पिंजऱ्यांत दोन खबुतरें होतीं. त्या खबुतरांचा ' गुटरकूं गुटरकूं ' असा आवाज फारसा लांब ऐकूं न जावा ह्मणून त्याच्या मळ्यासभोंवार एक बारीक रेशमी जाळी बांधली होती. पत्र व पिंजरा घेतल्यावर इनायतुल्लाने तो खलिता झग्याच्या कप्यांत ठेविला व सविनय मुजरा करून तो स्वस्थ पुढें काय होतें हें पहाण्यास उभा राहिला. इतक्या वेळांत शहाजादीनें आणखी एक पत्र लिहून तें इनायतुल्लास दिलें. त्यांतील मजकूर येणेंप्रमाणें होता:—

"तुह्मी आपला वेष पालटून येथें कोणास न कळवितां आलां हें एक परी बरें झालें. वेष पालटून यावें हें कळविण्याचा मुख्य हेतु इतकाच कीं मीं कोणास खबुतराचा पिंजरा दिला हें इतरांस न कळावें. याकरितां आज मीं माझ्या सर्व दासींना मुद्दाम दूर केलें आहे. आतां हें पत्र वाचून मला द्या व आपला तो छद्मवेष जरा दूर करा ह्मणजे मला आपला खरा चेहरा पहाण्यास मिळेल. सौसनच्या पुढें मीं आपला खरा वेष कसा दाखवावा याची आपणास भीति वाटत असेल परंतु ती वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. "

वरील पत्र इनायतुल्लानें पूर्णपणें वाचून शहाजादीस परत दिलें व आपला छद्मवेष दूर केला तों शहाजादीस हुबेहूब सलावतखानाचीच प्रतिमा दिसली. नंतर शहाजादीनें रंभेस एक पत्र दिलें. त्या पत्रांतही वरीलप्रमाणेंच छद्मवेष दूर करण्यास लिहिलें होतें. रंभेनें तें पत्र वाचून शहाजादीस दिलें व आपला छद्मवेष दूर केला तों शहाजादीस प्रतिसौमन दृष्टीं पडली. असें जों घडत आहे तोंच ज्या दरवाज्यांतून रंभा व इनायतुल्ला आले होते तो दरवाजा एकदम जोरानें उघडला जाऊन "दगा झाला! दगा झाला!!" असें ओरडत कांहीं तार्तरी स्त्रिया हातामध्यें नग्न तलवारी घेऊन आंत आल्या व एकाएकीं तो दरवाजा बंद झाला. हें पहातांच इनायतुल्लानें त्वरित आपल्या झग्यांतील चार गोळ्या बाहेर काढल्या व त्यांपैकीं एक शहाजादीकडे व बाकींचे तीन आंत आलेल्या त्या स्त्रियांकडे फेंकले. त्याबरोबर त्या सर्व स्त्रिया एकदम बेभान होऊन पडल्या! हें काम केवळ डोळ्याचें पातें लवतें न लवतें तों झालें.

ज्या दरवाज्यांतून त्या स्त्रिया आंत आल्या तों दरवाजा एकदम बंद झाला, हें वर लिहिलेंच आहे. तो बंद झाल्याकारणानें आतां बाहेरून कोणासही आंत येणें शक्य नव्हतें. इनायतुल्लानें हें पाहून ताबडतोब त्या दरवाज्याची आंतील कळ दाबल्यामुळें आंतील मंडळीसही बाहेर जाणें अशक्य झालें. आंतील कळ दाबून दरवाजे उघडावे हें फारच थोड्यांना माहीत होतें.

मागें आम्ही सांगितलें आहे कीं गुप्त सभेचा महाल चौसष्टखणी बनविला होता. त्या चौसष्ट खणांपैकीं प्रत्येक खणास एक एक दरवाजा होता. असे चौसष्ट दरवाजे या वेळीं बंद होते. व प्रत्येक खणावर आंकडे मांडले होते. इनायतुल्लानें एक मेणबत्ती पेटविली व तो प्रत्येक खणावरील आंकडे पाहूं लागला. त्यानें आकडा ज्याघर होता त्या खणाचें दार मोठ्या खुबीनें उघडलें तों आंतून हसत हंसत जहांनारा बहेर आली. हा दरवाजा उघडावा कसा हें सर्व इनायतुल्लास व जहांनारेस पूर्ण माहीत होतें. रोशनआरेस वाटत होतें कीं या महालाचा भेदाभेद काय तो आपणाशिवाय कोणासही माहीत नाहीं. परंतु तिचें तें वाटणें खोटें होतें.

इतर स्त्रिया बेभान झाल्या परंतु इनायतुल्ला, रंभा व जहान्नारा यांच्यावर मात्र त्या गोळ्यांचा कांहींच परिणाम झाला नाहीं. आपल्यावर कांहीं एक परिणाम न व्हावा याविषयीं इनायतुल्लानें पर्ण खबरदारी ठेविली होती.

आंत येतांच जहानारेनें " होता होईल तितकी त्वरा करून आगोदर रौशन-आरेस गिरफ्तगार करून घेऊन चला कसे. आतां विलंब मुळींच उपयोगी नाहीं. " असें इनायतुल्लास सांगितलें.

" अवश्य " इनायतुल्ला म्हणाला " बाविसाव्या खणांतील दरवाज्यांतून बाहेर गेलें असतां जो रस्ता दिसतो तो थेट रौशनआरेच्या महालांत जातो व तो बाविसाव्या खण या (बोटानें दाखवून) मंडपाचे मागें आहे व याच मंडपांतील सिंहासनावर रौशनआरा बसली होती. व आतां ती त्याठिकाणीं बेभान होऊन पडली असेल? "

इनायतुल्लाचे वरील शब्द ऐकतांच जहांनारा मोठ्या उत्सुकतेनें रौशन-आरा जेथें बसली होती तेथें गेली व मंडपाचा जाळीदार पडदा दूर करून आंत पाहूं लागली तों तिला तेथें काय दिसलें? सिंहासन रिकामें असून रौशनआरा केव्हांच तेथून नाहींशी झाली! तिनें रंभेस व इनायतुल्लास जवळ बोलाविलें. इनायतुल्लानें रौशनआरा तेथें नाहीं असें पाहतांच ताडलें कीं, ' दगा ' शब्द ऐकल्याबरोबर ती पळाली असावी. त्याच्या तोंडांतूनही पुढील शब्द एकदम बाहेर पडले. ' अशी जबरदस्त आणि चलाख बायको नाहीं बुवा आपण पाहिली. '

वरील प्रकार पाहून त्या सर्वांस अत्यंत आश्चर्य वाटलें. त्यांनीं मोठ्या दक्षतेनें सिंहासनावर व त्याभोवतीं कांहीं कागदपत्र सांपडेल या हेतूनें पाहिलें परंतु त्यांना तेथें कांहीं सांपडलें असेल तर शपथ ! त्यांना वाटलें होतें कीं, कांहीं तरी मुद्देमाल सांपडेल आणि त्यायोगानें आपण रौशनआरेस पकडूं. परंतु हें वाटणें अगदींच निष्फळ झालें. त्यांचा हा बेत अगदींच जेव्हां फसला तेव्हां इनायतुल्ला जहांनारेस म्हणाला " आतां स्वस्थ उभें राहून उपयोगी नाहीं. कदाचित् रौशनआरा आपले लोक घेऊन इकडे येईल व ती आल्यानें आपणांस भयंकर प्रसंग गुदरेल. तेव्हां प्रथम या सर्व खणांच्या दरवाज्याच्या आंतील कळा बंद करा कसे. म्हणजे आंत कोणी येईल अशी भीति बाळ-गण्याचें कारण नाहीं. "

इनायतुल्लाचें म्हणणें जहांनारेस व रंभेस मान्य झालें. त्या तिघांनीं मिळून होता होईल तितक्या घाईनें त्या सर्व दरवाज्याच्या आंतील कळा दाबून टाकल्या. नंतर ते त्या बेभान झालेल्या स्त्रियांकडे वळले. त्यांच्या जवळ कांहीं तरी सांपडेल या हेतूनें त्यांनीं त्यांची झडती घेतली; परंतु

व्यर्थ. त्यांना त्यांच्याजवळ शस्त्राशिवाय दुसरा जिन्नस ह्मणून सांपडला नाहीं. त्या आपल्या ओळखीच्या तरी आहेत काय हें पहाण्याच्या हेतूनें जहांनारेनें त्यांचे चेहरे बारकाईनें अवलोकन केले पण त्यांत एक देखील तिच्या ओळखीचा तिला दिसला नाहीं. तेव्हां ती इनायतुल्लास ह्मणाली " आतां जोंपर्यंत रौशनआरा आपल्या हातून सुटून गेली आहे तोंपर्यंत तिच्याविषयीं उघड चौकशी करणें श्रेयस्कर नाहीं. "

नंतर इनायतुल्लानें त्या बेशुद्ध झालेल्या स्त्रियांना बाविसाव्या खणाच्या दरवाज्याशीं नेऊन ठेविलें. येथें ठेवण्याचा त्याचा इतकाच हेतु कीं त्या हुशार झाल्या ह्मणजे त्यांनीं रौशनआरेकडे जावें. मात्र तसें करतांना त्यानें त्यांचीं हत्यारें मात्र काढ़ून घेतलीं. आंत असा प्रकार चालला असतांना बाहेर कांहीं गडबड चालली आहे असें इनायतुल्लास वाटलें. तेव्हां बाहेर जाऊन (जिकडून ते आले तिकडे) कोणी मनुष्यें आहेत किंवा काय हें पाहून यावें असा इनायतुल्लानें आपला हेतु जहांनारेजवळ प्रकट केला. परंतु जहांनारेनें त्याला आपली अनुमति दिली नाहीं. ती ह्मणाली कीं " ही वेळ फारच भयंकर आहे. या घटकेस बाहेर जाणें ह्मणजे बळेंच संकट अंगावर ओढून घेणें आहे. मीं जोहरेला रौशनआरेच्या दासदासींमधून फिरून गुप्त गोष्टींचा स्फोट करून येण्याविषयीं सांगितलें आहे. व ती तिकडेच गेली असेल. त्यांत जर तिला यश आलें असेल तर ती इकडेच येईल. ती आल्यावर मग आपणांस सर्व कळेल ".

इतकें जों ती ह्मणत आहे तोंच आकराव्या खणाच्या दरवाज्यांतून ' खट् खट् ' असा अवाज ऐकूं आला. हें ऐकताच जहांनारेनें लागलींच दार उघडलें तों तिला जोहरा आलेली दिसली. जोहरा आंत आली व तें दार बंद झालें. जहांनारेनें जोहरेस हंसत हंसत विचारलें " कशी कायग! खबरबात ? "

' खबर तर मजेदार आहे. परंतु आतां येथें राहून उपयोग नाहीं. धाकट्या शहाजादी सरकार आपल्यावर संकट केव्हां आणतील याचा नेम नाहीं. महालांत गेल्यावर मी आपणास सर्व सागतें. ' जोहरा ह्मणाली.

यावर जहांनारा इनायतुल्लाकडे तोंड वळवून ह्मणाली—

' जोहरा ह्मणते तें कांहीं खोटं नाहीं. रौशनआरा येथून गेली ती कांहीं स्वस्थ बसली नसेलच. आतां येथं क्षणभर सुद्धां राहून उपयोगी नाहीं. कदाचित् ही गोष्ट बादशहाचे कानांवर जाऊन व्यर्थ आपल्या कारस्थानांत

व्यत्यय येईल. तर मी आतां रंभेला घेऊन आपल्या महालांत जातें आणि आपण तिसऱ्या दरवाज्यांतून आपल्या डेऱ्याकडे चलावें. '

जहांनारेनें केलेली सूचना इनायतुल्ला व रंभा या उभयतांस पसंत पडली. इनायतुल्लानें रौशनआरेनें दिलेलें मोहोरबंद पत्र जहांनारेस देऊन आपला मार्ग सुधारला. जोहरेनें एक पलिता पेटविला व जहांनारेनें त्या महालांत जळत असलेल्या सर्व मेणबत्त्या विझवून रंभेसह आपलाही मार्ग धरिला. या वेळीं जोहरा त्याच्याबरोबर पलिता घेऊन चालली होती.

रजपूत कुमारी.

भाग ३ रा.

प्रकरण १ लें.

भयाण अरण्य.

प्रिय वाचकवृंद! कादंबरींतील त्याच त्याच पात्रांचीं नांवें वरचेवर वाचून व त्यांची एकमार्गी कृति अवलोकन करून बराच कंटाळा आला असेल तर त्यानें आतां संकोच न धरितां आमच्या मागून मेवाड प्रांतांतील एक भयाण पहाडावर यावें, हें बरें.

उंच उंच पहाडांतून नित्य प्रवास करणारासच तेथील सुखदुःख विचारून घ्या. तेथील तें तुटलेले कडे, भयंकर खोल दऱ्या; दाट अरण्यें; त्यांतील उंचसखल मार्ग व श्वापदांच्या हृदयविदारण करणाऱ्या आरोळ्या या सर्व गोष्टी कल्पनेनेंच जाणाव्या. आज आपण ज्या पहाडावर आलों आहोंत तो वरीलप्रमाणेंच भयानक आहे. या पहाडावरून खालीं जावयाचें किंवा खालून पहाडावर यावयाचें म्हणजे मनुष्याचा पुनर्जन्मच होणें आहे. या पहाडावरून एकट्या प्रवाशानें जाणें फारच धोक्याचें आहें. कदाचित एखादा हट्टानें जाईल तर खास त्याला एखादें वाघरूं किंवा लुटारू लोक भेटावयाचेंच. त्यामुळें अशा ठिकाणीं सहसा एकटा मनुष्य येत नसे. या पहाडाच्या पायथ्याशीं वनास नांवाची नदी वहात जात असून तिच्या तीरानें प्रवाशाचे चालण्यानें थोडी मळलेली पायवाट चालली होती. या मार्गानें गर्द झाडी होती. अशा या मार्गानें वरील पहाडावरून खालीं येऊन दोन प्रवाशी चालले होते. या दोहोंपैकीं पुढील प्रवाशी तरुण असून अंगानें चांगला धष्टपुष्ट होता. चेहरा अत्यंत उग्र असून पोशाख अगदींच साधा होता. त्याच्या हातांत एक मोठा थोरला भाला व एक ढाल होती. त्या जवानावर एका वेळेस दहा जरी मनुष्यें चालून आलीं असतीं तरी तो त्यांना भारी होता. मागील मनुष्य अत्यंत उंच होता. तो तरुणही नव्हता व अगदीं म्हातारांही नव्हता. मध्यम वयाचा होता असें म्हटलें असतां

चालेल. त्यानें अपुरें धोतर नेसून त्याचा काच्या मारला होता. रू भरलेली बंडी अंगांत घातली होती. डोईवर मारवाडी चालीचें लहानसें पागोटें होतें. कमरेला धोतर गुंडाळलें होतें. त्यानें खांद्यावर एक लोटा टाकला होता व त्याच्या शेवटाला एक लहानसें गाठोडें लटकत होतें.

एवढयावरून वरील दोन प्रवाशांची ओळख वाचकांना पुरेशी होणार नाहीं परंतु या वेळीं आपण इतक्याच परिचयानें पुढील कथानकाकडे वळूं या.

नदीकिनाऱ्यानें जाणाऱ्या प्रवाशांपैकीं मागील प्रवाशानें पुढल्यास विचारलें " काय भाईसाहेब ! आतां आम्ही उदेपुरला पोंचणार तरी केव्हां ? "

यावर जवान त्रासून म्हणाला " बस् बस्. मुकाट्यानें ये कसा माझ्यामागून. आतां आपण उदेपुरानजीक आलों आहोंत. सूर्यास्ताचे सुमारास तेथें जाऊन पोहोंचूं. मला सुद्धां लवकरच तिकडे गेलें पाहिजे. "

" राम ! राम ! केव्हां तेथें जाऊन पोंचतों आहें कोणास ठाऊक ? आज सारखा चार दिवस मार्गक्रमण करीत आहें. परंतु वरचेवर आपण ' आतां पोंचू मग पोंचू ' अशा चाळवणी दाखवीत आहां. आज कांहीं या रस्त्यानें मला दम धरवत नाहीं. "

हें एकतांच पुढील जवान उभा राहून त्याला म्हणाला ' होय. आजचा रस्ता खरोखरच भयंकर आहे. या रस्त्यानें लुटारू लोकांची फारच भीति आहे. काय, तुझ्याजवळ कांहीं माल तर नाहींना कमी जास्ती ? '

जवानच्या तोंडचे हे शब्द त्यानें ऐकिले मात्र तोंच त्याच्या तोंडचें पाणी पळालें. त्याचें सर्व अंग कंपायमान होऊं लागलें. नजर कावरीबावरी झाली. अशा प्रसंगीं मनुष्यानें धीर सोडला म्हणजे त्याच्यावर मरण ओतलेंच म्हणून समजावें. वरील स्थिति अवलोकन करतांच जवाननें ताडिलें कीं, याच्याजवळ कांहीं तरी मौल्यवान् जिन्नस असावेत खास. हें ताडतांच तो जवान त्या मारवाड्यापुढें आला व त्याचा जोरानें हात धरून त्याला म्हणाला " आटप, काय जी मालमत्ता तुझ्याजवळ असेल ती इकडे आण. कारण, हें स्थळ लुटारू लोकांचें आहे. आतां जर ती मालमत्ता तुझ्याजवळ राहिली तर खास तूं गमावून बसशील. मी तुझ्यापेक्षां पुष्कळ सशक्त आहे. म्हणून म्हणतों कीं, ती सर्व मालमत्ता मजजवळ देऊन मोकळा हो कसा ! माझ्याजवळ दिल्यास तुझ्या तनमडीला सुद्धां धक्का लागण्याची भीति नाहीं. या स्थलाचे बाहेर गेलों म्हणजे सर्व माल मी तुझा तुला सुरक्षित देतोंच आहें. "

जवानचे हे शब्द ऐकल्याबरोबर त्या मारवाड्याची विलक्षणच स्थिति झाली ! त्याला आतां करावें तरी काय हेंच मुळीं समजेना. कांपत कांपत तो इकडे तिकडे पाहून त्याला आडखळत म्हणाला " म–म– मला कं–क–शा–करितां ध–ध–रिलेंस ? मा–मा–माझ्या ज–ज–जवळ आ–आ–आहे का–का–काय ? मी–मी–मी ए–ए–एक ग–ग–गरीब ब–ब–ब्राह्मण आ–आ–हें. म–म—

यावर त्या जवानानें हातांतील भाला सांवरला व त्याच्याकडे राक्षसी मुद्रा करून पहात तो म्हणाला " कायरे ए भटुरग्या ! देतोस कीं नाहीं काय तें तुझ्याजवळ असेल तें. बोल बोल लवकर. नाहीं तर हें पहा केलेंच या भाल्यानें (भाला उगारून) तुझे दोन तुकडे ! "

असें म्हणून तो जवान आपला भाला त्याच्या छातींत मारणार तोंच तो मारवाडी एकाएकीं बेशुद्ध होऊन जमीनीवर धाडकून पडला त्याबरोबर तो जवानही त्याच्या अंगावर कलंडला. तो उठून आपला भाला सावरणार इतक्यांत जवळच्याच रानांतून एका अकाळविकाळ वाघानें भयंकर गर्जना करीत व लांबलांब उड्या टाकीत त्या जवानावर अचानक झडप घालून त्याच्या नरडीचा घोट घेतला ! इतक्यांत कोणीकडून सों सों करीत एक बंदुकीची गोळी येऊन वाघाच्या माथ्यावर आदळली. त्यासरशीं तो वाघ अतिशय चवताळून इकडे तिकडे गर्जना करीत पाहूं लागला. गोळी आली कोठून हें कांहीं त्यास समजेना. पुन्हा एक गोळी सों सों करीत आली त्या सरशीं वाघाचे पंचप्राण एकत्र झाले व तो जमिनीवर धापा टाकीत पडला ! या वेळपर्यंत मारवाडी ब्राह्मण बेशुद्धच पडला होता !

कांहीं वेळानें ब्राह्मण शुद्धीवर येऊन सभोंवार नजर टाकून पहातो आहे तों त्याला त्याच्याभोंवतीं कांहीं शिकारी लोक जमले आहेत असें दिसलें. त्यांपैकीं कोणी त्याच्या तोंडांत पाणी घालीत होते. कांहीं डोळ्याला पाणी लावीत होते. कोणी मस्तकावर ओलें फडकें टाकीत आहेत. कोणी कांहीं, कोणी कांहीं करण्यात गुंतले होते. त्या शिकारी लोकांपैकीं जो तरुण सरदार होता तो आपला भार भाल्यावर टाकून आपल्या लोकांना कांहीं विचारीत होता. ब्राह्मण शुद्धीवर आलेला पाहून तो त्यास म्हणाला " आपल्याला कांहीं मर्मस्थानीं इजा तर नाहीं ना झाली ? "

हे लोक असावेत तरी कोण हेंच मुळीं त्याला कांहीं केल्या समजेना.

प्रकरण २ रें.

धन्य युवराज !

नर्दीकिनाऱ्यानें जात असतांना जेव्हां मागील प्रवाशीं मध्येंच थांबले त्यावेळीं वर पहाडावर कांहीं शिकारी लोक आपल्याला शिकार केव्हां मिळेल या विचारांत वृक्षलतांच्या शीत छायेखालीं बसले होते त्यावेळीं खालून कोणी दोन प्रवाशी चालले आहेत हें त्यांना मुळींच ठाऊक नव्हतें. तों एकाएकीं त्यांच्या कानांवर वाघाची भयंकर गर्जना आली. ती ऐकतांच ते शिकारी आनंदी होऊन उठले व ज्या दिशेनें गर्जना ऐकूं आली ती दिशा त्यांनीं धरली. पहाडावरून त्यांनीं खालीं नर्दीकिनाऱ्याकडे नजर फेंकली तों त्यांना त्या प्रवाशावर मारलेली वाघांची झडप दृष्टीं पडली. ती पहातांच त्यांपैकीं एकानें आपली बंदुक सावरून त्यावर नेम धरला व वाघाचा एकदोन गोळ्यांमध्यें प्राण हरण केला. वाघाचा या जगांतील सर्व पराक्रम आटपला असें जेव्हां त्यांना दिसलें तेव्हां ते सर्व त्या ठिकाणीं धावत आले. तों त्या ठिकाणीं मागील दोन प्रवाशी मृतवत् जमिनीवर पडलेले दिसले ! त्यांपैकीं एक तर अगदींच निरुपयोगी झाला होता. व दुसरा जो भिऊन पडला होता. तिकडे ते वळले व त्याला सावध करण्याचे तयारीला लागले.

या लोकांची संख्या फार नव्हती. यांपैकीं प्रत्येक तरुण असून सशक्त दिसत होता. पोषाख सर्वांचे सारखेच होते. सर्वांचे चेहरे आनंदित दिसत होते. त्यांपैकीं एकाचाच पोषाख काय तो अत्यंत मौल्यवान् असून अगदींच निराळा होता. वर्ण गोरा असून त्याला नुकतीच कोठें मिसरु फुटूं लागली होती. त्याच्या अंगाच्या ठेवणीवरून व पोषाखावरून तो कोणी तरी उच्च कुलापैकीं असावा असें पहाणारास वाटे.

याच वीर पुरुषानें मारवाड्यास विचारलें "कसें काय भटजीबुवा ! तुमची तब्यत ठीक आहेना ? कांहीं शरीराला इजा झाली असल्यास सांगण्यास लाजूं नका. "

तरुण वीराचें वरील भाषण ऐकून मारवाडी वरचेवर डोळे मिटी व उघडी व कांहीं वेळ त्या वीराकडे पाहिल्यासारखें करी. असें त्यानें बरेच वेळ केल्यावर तो एकदम उठून उभा राहिला. व त्या वीर पुरुषास

मुजरा करून साश्चर्य म्हणाला "काय मी आपल्या पुढें मेवाड-कुल-केसरी-वीरचक्रचूडामणि श्रीमहाराणा जगत्सिंह यांचे आदरणीय पुत्र युवराज राजसिंहच पहात आहें काय? छे! छे! यांत मुळींच संशय नाहीं. हेच ते युवराज! महाराज! जगाचा अंधकार नाश करणाऱ्या भुवनभास्कराप्रमाणें प्रतिदिन आपल्या कुलाची उन्नति होत जावो!"

खरोखरच तो युवराज राजसिंह होता. त्यानें त्यास आश्चर्यानें विचारलें "आपण ब्राह्मण कां आहां! तर मग मी आपणास सविनय प्रणाम करतों. सांगा पाहूं आतां आपण रहाता कोठें? आपलें नांव काय? आलां कोणत्या कार्याला? व हा खालीं पडलेला मनुष्य कोण?"

"महाराज!" ब्राह्मण म्हणाला "आपण जरा निवांत स्थानीं बसा आणि मग मला काय तें विचारा नंतर मी सर्व सांगतों. या वेळीं उभे राहून मला कांहींच सांगतां येणार नाहीं. कारण, मला घटकेपूर्वी फारच हाल सोसावे लागले आहेत."

"कांहीं हरकत नाहीं." असें म्हणून त्या ब्राह्मणास जवळच एका वृक्षाखालीं असलेल्या एका शिलाखंडावर बसवून आपण त्याच्या पुढें एका खंडावर युवराज बसला. इतर मंडळी त्याच्या सभोंवार बसली. बसल्यानंतर राजसिंहानें ब्राह्मणास विचारलें "आपलें नांव काय?"

'भुवनेश्वरमित्र माझें नांव. जोधपुरास रहात असतों. या वेळेस मी आग्र्याहून इकडे आलों आहें.' ब्राह्मणानें उत्तर दिलें.

"आपण आतां चाललां कोठें?"

"आपणाकडे."

"होय काय?" राजसिंहानें साश्चर्य विचारलें. "माझ्याकडे येण्याचें कारण?"

"सांगतों त्याचें पुढें कारण."

"बरें तर आपल्याला इकडे कोणीं पाठविलें हें तर प्रथम सांगाल?"

"तेंही पण नंतरच सांगेन."

नंतर जवान लुटारूकडे बोट करून राजसिंहानें विचारलें "हा मनुष्य कोण आहे?"

"महाराज! हा दुष्ट मनुष्य आहे कोण, हें मला मुळींच माहीत नाहीं. आज चार दिवस झाले. तो मजबरोबर येत होता. याची व माझी भेट एका

धर्मशाळेंत झाली. त्या वेळीं यानें मला सांगितलें कीं मी उदेपुरचा रहाणारा आहें. युवराजाच्या कार्याकरितां मी इकडे परगांवीं गेलों होतों व आतां मी त्यांनाच भेटण्यास जात आहें. त्यावेळीं मलाही आनंद झाला. मीं त्याला सांगितलें कीं मलाही पण तिकडेच जावयाचें आहे. तेव्हां तो मला ह्मणाला 'मी तुमची व युवराजाची भेट करून देईन. या बोलण्यावर मी विश्वास ठेवून त्याच्या मागोमाग इकडे येण्यास निघालों. परंतु तो खरोखर विश्वास ठेवण्यास योग्य मनुष्य नव्हता. या दुष्टानें या ठिकाणीं मला धमकी दिली कीं 'तुझ्याजवळ जो कांहीं माल असेल तो सर्व मला दे. हें स्थान लुटारूं लोकांचें आहे. कदाचित् एखादा लुटारूं तुला लुटण्यास कमी करणार नाहीं.' महाराज ! हें त्याचें भाषण ऐकतांच माझी पांचावर धारण बसली. आतां पुढें करावें काय हेंच मला समजेना. अशी स्थिति झालेली जेव्हां त्यानें अवलोकन केली तेव्हां त्यानें ताडलें कीं मजजवळ कांहीं तरी किंमतवान् जिन्नस असावा. असें ताडल्यावर त्यानें मला दरडावून मजवर भाला उगारला त्यासरशी मी जमिनीवर पडलों. इतक्यांत वाघाची गर्जना माझे कानीं आली त्याबरोबर मी अगदींच बेशुद्ध पडलों. पुढें झालें काय हें मला स्मरत नाहीं ".

इतक्यांत त्याची नजर वाघाकडे गेली. वाघ पहातांच ब्राह्मणाचें सर्वांग कांपूं लागलें. ब्राह्मणाची अशी स्थिति झालेली पाहून राजसिंह विनोदानें त्यास ह्मणाला " असें भितां काय ? हा वाघाचा मुर्दा आहे ". असा धीर देऊन पुढें ह्मणाला " आह्मी त्यावेळीं वर होतों. वाघाची गर्जना ऐकून इकडे जर येण्याची घाई केली नसती तर खास आज मांझ्या राज्यांत ब्रह्महत्या झाली असती. परमेश्वरकृति अगाध ह्मणूनच या वाघाचें मरण आमच्या हातीं होतें ".

" युवराज ! आपल्या पुण्याईनें आणि एका गरीब अबलेल्या निर्मल पातिव्रत्यधर्माच्या साह्यानेंच आज माझे प्राण वांचले. नाहींतर हा ब्राह्मण घटकेचा विलंब न लागतां स्वर्गवासी झाला असता ! या कार्मी धन्य आहे तुमची युवराज ! "

" यांत मीं काय विशेष केलें आहे ? जगदीश्वराच्या प्रेरणेनेंच आज मला इकडे येण्याची बुद्धि सुचली. बरें आतां तें असो. आपण आतां आलां कोणाकडून, कशाकरितां वगैरे लवकर सांगा पाहूं "

यावर ब्राह्मण ह्मणाला " या गोष्टी उघड सांगतां येणार नाहींत. "

ब्राह्मणाचें वरील भाषण ऐकून राजसिंह सरदारांस ह्मणाला " आपण सर्व पुढें व्हा. मी यांना घेऊन येतों. आतां बराच सूर्य वर आला आहे तर पुढें जाऊन आह्मी तिकडे येईपर्यंत भोजनाची तयारी करा. नंतर पुढें काय तें पाहूं. "

राजसिंहाची ही आज्ञा ऐकतांच सर्व सरदार ' आज्ञा महाराज ! ' असें ह्मणून पुढें चालते झाले. सरदार निघून गेल्यावर राजसिंह ब्राह्मणदेवतेस ह्मणाला " महाराज ! आतां माझ्या प्रश्नाचें उत्तर द्या पाहूं. "

हें ऐकून ब्राह्मणानें ' ठीक आहे ' असें ह्मणून आपल्या कमरेभोंवतीं गुंडाळलेलें धोतर सोडून त्यांत गुंडाळलेली सुबकशी चांदीची पेटी बाहेर काढली. ती पेटी आठ इंच लांब, तीन इंच रुंद आणि तितकीच इंच उंच अशी होती. त्या पेटीवर सुबक नकशी कोरली होती. वरतीं मध्यभागीं मेवाड राज्याचा नकाशा कोरला होता. अशी ती सुंदर पेटी पाहून राजसिंह फारच प्रसन्न मुद्रा करून ह्मणाला " वा वा ! ही अपूर्व पेटी मला कोणत्या मित्रानें नजर केली आहे ? "

" सांगतों सांगतों. पण आपण या पेटीचा स्वीकार खास करालना ? "

' जोंपर्यंत ही पेटी मला कोणीं पाठविली हें कळलें नाहीं तोंपर्यंत तरी मला खास कांहींच सांगतां येणार नाहीं. '

' जरा तसदी घेऊन या पेटीवर काय लिहिलें आहे हें वाचून पाहिल्यास सहज कळेल. '

राजसिंहानें त्या पेटीवर काय जें लिहिलेलें होतें तें सर्व वाचलें; परंतु त्यानें त्या पेटीला स्पर्श ह्मणून केला नाहीं व ब्राह्मणानेंही ती पेटी राजसिंहाचे हातीं दिली नाहीं. याचें कारण इतकेंच. पेटीचा स्वीकार करीन अशी राजसिंहानें प्रतिज्ञा केल्याशिवाय पेटी त्याला द्यावयाची नाहीं असा ब्राह्मणाचा हेतु होता व नांव कळल्याशिवाय पेटीचा स्वीकार करावयाचा नाहीं असा राजसिंहाचा पूर्ण निश्चय होता. मग आतां त्या पेटीवर लिहिलें होतें तरी काय ?

मेवाड-कुल-केसरी

युवराज राजसिंह यांचे चरणकमलीं एका अभागिनी बालेचें आत्म-समर्पण.

वरील मजकूर वाचतांच राजसिंह अत्यानंदित झाला. त्यानें ती पेटी आतुरतेनें आपल्या हातीं घेऊन हृदयाशीं धरिली. हें पाहून भुवनेश्वरजी फारच प्रसन्न झाला व जरा विनोदानें त्यास ह्मणाला—

' आपण हें अनुचित कृत्य केलें. प्रतिज्ञेवांचून या पेटीस आपण कसा बरें स्पर्श केला ? '

' दोष देऊं नका ' राजसिंह हंसत हंसत ह्मणाला " प्रतिज्ञेवीण मीं इला स्पर्श केला याबद्दल मला माफ करा. '

" मग आपण या पेटीचें ग्रहण खरोखर मनापासून केलें नाहीं वाटतें ? "

" अगदीं मनापासून ग्रहण केली आहे. असो. कोण क्षत्रिय पुरुष आहे कीं जो आपल्या पामर झालेल्या प्राणेश्वरीनें पाठविलेल्या उपहाराचें ग्रहण करण्यांत कमीपणा मानतो ? '

" जो क्षत्रियकुलदीपक आपल्या प्राणवल्लभेकरितां वाटेल तें राक्षसी कृत्य करण्यास तयार होत आहे त्याला मी कोणती उपमा देऊन अलंकृत करूं ? '

भुवनेश्वरजींचे वरील उद्गार ऐकतांच राजसिंहानें त्यास घाबरून विचारलें ' भटजी, आपण हें बोलतां तरी काय ? झटपट सांगा पाहूं खरें काय आहे तें. '

" ही आपल्या हातांत पेटी कोणाची आहे ? काय समजून आपण ही ग्रहण केली आहे ? '

" राव अमरसिंहाची सुशील कन्ये— '

" काय, ती कोणत्या भयंकर चरकांत सांपडली आहे याची अद्याप आपणांस कांहींच खबर नाहीं वाटतें ? '

' ईश्वरसाक्ष सांगतों कीं यांतील मला कांहींच माहीत नाहीं. विवाहाचें नक्की ठरवून या वेळपर्यंत अमरसिंहजी गप्प तरी कसे बसले याचेंच मला

सहून राहून मोठें आश्चर्य वाटतें. असो. आतां मला प्रथम सांगा पाहूं त्या सुशीलेवर असे भयंकर प्रसंग तरी कोणते ओढवले आहेत. आजकाल अग्र्या-मध्यें अमरसिंहाची कशा प्रकारची स्थिति आहे याची मला मुळींच कांहीं खबर नाहीं. ''

'आज काल अग्र्यामध्यें अमरासिंहाचीं, विशेषतः राजकुमारी ताराबाईची-काय जी शोचनीय स्थिति झाली आहे ती मी नंतर सांगतों. प्रथम आपण ही पेटी उघडा आणि त्यांत आहे काय हें पाहून त्याप्रमाणें करण्यास तयार व्हा कसें ! '

हें ऐकतांच राजासिंहानें पेटीची कळ दाबून पेटी उघडली. तों त्याला एक मोत्यानें गुंफलेली राखी, एक माणिकाचीं अंगठी, तसबिरींचीं दोन गुंडाळीं व एका मखमाली पिशवींत एक पत्र असे जिन्नस त्याला दिसले. तसबिरीच्या प्रत्येक गुंडाळयावर निरनिराळीं नांवें लिहिलीं होतीं.

' महाराज ' भुवनेश्वरजी ह्मणाला ' या पिशवींत राजकुमारीचें पत्र आहे ! जर आपणास तें वाचावयाचें आहे तर प्रथम हें रक्षाबंधन मी तुमच्या हातांत बांधतों. असें केल्याशिवाय आपणास तें पत्र वाचण्याचा हक्क पोंचत नाहीं. मी तिचा पुरोहित आहें व हें रक्षाबंधन आपल्या हातीं बांधण्याचा मला पूर्ण अधिकार आहे. '

शास्त्रानुसार रक्षाबंधनाचा विधि उरकला होता, हें भुवनेश्वरजीस माहीत होतें; परंतु, मध्यंतरीं मिश्रजीवर मोठें संकट आल्यामुळें पुन्हां तसें करावें असें त्यास वाटल्यावरून तो तें करण्यास तयार झाला. भोळ्या ब्राह्मणाची ही इच्छा पाहून हंसत हंसत आपला हात राजसिंहानें पुढें केला व ब्राह्मणानें ' येन बद्धो बली राजा ' हा मंत्र ह्मणत मोत्याचें रक्षाबंधन त्याचे हातांत बांधिलें व ह्मणाला " राजकुमारी ताराबाईची सखी रंभाबाई हिनें मला सांगितलें आहे कीं प्रथम राजपुत्राच्या हातांत रक्षाबंधन बांधा आणि नंतर हें पत्र त्यास वाचण्यास द्या. महाराज आतां वाचा आपण हें पत्र ".

यावर राजसिंहानें आपल्या गळ्यांतील मोत्याची माला काढून ती ब्राह्मणाच्या गळ्यांत घातली व हंसत हंसत तो त्याला ह्मणाला " ही रक्षाबंधनाची आपण दक्षिणा घ्यावी. आतां या अंगठीचें काय करायचें ? "

ब्राह्मण मान हालवीत हालवीत ह्मणाला " त्याच्याविषयीं नाहीं बुवा तिनें आपणांस कांहीं सांगितलें. यांत सुद्धां मीच—

" छे, छे, मी मी अंगठी घेतों. " असें ह्मणून त्यानें ती अंगठी आपल्या हातांत घातली व ब्राह्मणाची नजर दुसरीकडे फिरविण्याच्या मिषानें तो त्यास ह्मणाला " हें पहा, आपण जरा या दिशेकडे पहा. कोणी आलें तर मला चटकन् सांगा. कारण, राजकुमारीची पत्रिका दुसऱ्या कोणीं वाचतां कामा नये. "

हें ऐकून विचारा भोळा ब्राह्मण आपलें तोंड फिरवून झाडीकडे टक लावून पाहूं लागला. राजसिंहाचे साथीदार ज्या मार्गानें निघून गेले त्या मार्गाकडे ब्राह्मण पहात होता हें चतुर वाचकांना सांगावयास नको च.

ब्राह्मणाची नजर दुसरीकडे फिरल्यावर राजसिंहानें दोन्ही तसबिरा फोडून त्यांवरील नांवें वाचून पाहिलीं. ज्यावर त्याचें नांव होतें तीच त्यानें आपल्या हातीं घेतली. ही तरा बाईची तसबीर होती. ती तसबीर त्यानें मोठ्या प्रेमानें आपल्या हृदयाशीं धरून एकवार तिचें चुंबन घेतलें. नंतर त्यानें तीं तसबीर आपल्या खिशामध्यें ठेविली. दुसरी कोणाची आहे ह्मणून पाहूं लागला व त्यानें हंसत हंसत त्यावरील रेशमी दोऱ्यानें काढलेलें नांव वाचलें. तें नांव पुढीलप्रमाणें होतें.

श्रीचन्द्रावतजी.

हें नांव वाचून त्यानें आंत काय असावें हें ताडलें. व तें न फोडतां त्यानें तीं गुंडाळी आपल्या खिशांत टाकली नाहीं तोंच ज्या दिशेकडे ब्राह्मण टक लावून पहात होता तिकडून चन्द्रावतजी धांवत धांवत राजसिंहाजवळ आला व ह्मणाला ' या वस्तूवर आपला हक्क पोंचत नाहीं. कृपा करून ती माझी मला द्या कशी. '

चन्द्रावतजीचें वरील भाषण ऐकून राजसिंहास हंसूं लोटलें. त्यानें ती गुंडाळी त्याच्या स्वाधीन केली व तो ह्मणाला ' ही घ्या रागावू नका. बसा बसा खालीं. मी सुद्धां माझ्याजवळ काय आहे हें दाखवितों. यांत लुच्चेगिरी करण्याचें कांहीं कारण नाहीं. '

' लुच्चेगिरी न करावी तर काय आपली वस्तु घालवावी होय ? असो. आतां चला वर. या ठिकाणीं यापुढें बसण्यांत सुखावह होणार नाहीं. ' चंद्रावतजी ह्मणाला.

' ठीक आहे. ' असें ह्मणून तो उठला व त्याला प्रेतांकडे बोट दाखवून

ह्मणाला " कोणाला तरी सांगून या प्रेताची व्यवस्था लावा आणि वाघाचें कांतडें साफ करून राजमंदिरांत घेऊन चला. "

असें सांगून राजसिंह पुढें चालूं झाला व ब्राह्मण आणि चंद्रावतजी हे त्याच्या मागोमाग चाललें. राजसिंहानें ज्या हेतूनें ब्राह्मणास दुसरीकडे पहाण्यास लाविलें होतें तो हेतु मात्र सिद्धीस गेला नाहीं. चंद्रावतजी इतक्या वेगानें धावत आला कीं त्याची खबर राजसिंहास देण्यास ब्राह्मणास मुळीं फुरसतच मिळाली नाहीं. बरें, चन्द्रावतजी तरी इतक्या घाईनें कां आला असावा ? हें आपल्याला समजलें पाहिजेच. तो आणि साथीदार जेव्हां तेथून निघन केले तेव्हां त्यानें जरा पुढें गेल्यावर साथीदारास पुढें दवडिलें आणि आपण झाडीमध्यें लपून राहिला. आणि ब्राह्मणाचे व राजसिंहाचें जें भाषण झालें तें सर्व त्यानें आडून ऐकिलें व आपल्या नांवाचें पत्र आहे असें पहातांच तो धांवत आला.

सरदारांनीं पुढें जाऊन भोजनाची तयारी केलीच होती. राजसिंहाचीच ते वाट पहात होते. इतक्यांत ती त्रयी तेथें येऊन दाखल झाली. नंतर त्यांनीं सर्वांनीं स्नानसंध्या वगैरे आटोपून प्रथम भुवनेश्वरजीस भोजनास घालून आपण सर्वांनीं भोजन उरकलें. भोजन झाल्यानंतर राजसिंह चन्द्रावतजी व मिश्रजी अशी त्रयी पुन्हां एकांतांत जाऊन एका शिलाखंडावर बसून गुप्त वाटाघाट करूं लागली.

स्नानसंध्या झाल्यावर राजसिंहानें प्रथम पुन्हां एकंदर ताराबाईची तसबीर अवलोंकन केली व पत्र वाचलें. त्या वेळीं त्याला अत्यंत दुःख झालें व क्रोधहि आला. परंतु पत्रावरून जसा बोध व्हावयाला पाहिजे तसा मात्र झाला नाहीं. ह्मणून ते भोजनोत्तर एकदां एकांतांत आले व त्यांनीं ताराबाईवर कोणतें घोर संकट उपस्थित झालें आहे याची चौकशी केली. ब्राह्मणानें इत्थंभूत हकीकत त्यास सांगितली. ती ऐकतांच राजसिंहाचे नेत्र क्रोधानें अग्नीसारखे लाल झाले व त्यानें एक दीर्घ श्वास सोडून ताराबाईचें पत्र पुन्हां वाचण्यास सुरवात केली. चन्द्रावतजी व मिश्रजी हे एकाग्र चित्तानें श्रवण करूं लागले.

प्रकरण ३ रें

पत्रिकेचा परिणाम काय झाला ?

बाणाचा वर्षाव सिंहावर जसजसा अधिकाधिक होत जातो तसतसा त्याचा क्रोध अत्यंत वाढत जातो त्याप्रमाणें ताराबाईच्या पत्रिकेंतील प्रत्येक वाक्य वाचून राजसिंहाचा क्रोधाग्नि अनिवार प्रदीप्त झाला ! तो सिंहाप्रमाणें गर्जना करीत म्हणाला " प्रिय मित्रा ! आतां यापुढें विचार विचार तो आणखी काय करावयाचा ? मिश्रजीच्या सांगण्यावरून सिद्ध होतें कीं दारा किंवा सलावतखानाच्या गुप्त कुचक्राविषयीं शाहाजहान बादशाहास कांहींच अद्याप माहित नसावें खास. एका बाजूनें ताराबाईस हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न दारा ज्यारीनें करीत आहे व दुसऱ्या बाजूनें तो नीच सलावतखान करीत आहे. शिवाय त्या दुष्टाला रौशनआरेची अंतस्थ मदत आहे. तिच्या मदतीनें तिला गीरफदार करून औरंगजेबास जाऊन मिळावें असा त्याचा हेतु दिसतो. इकडे ही हीनदीन अबला हरिणीप्रमाणें या दुष्ट नरव्याघ्राच्या तावडींत सांपडली असतां अमरसिंहजींनीं तिच्या विवाहसंबंधांत अगदींच कशी डोळेझांक केली कोण जाणे ! अशा या आणीबाणीच्या प्रसंगीं आपण काय केलें असतां त्या गरीब अबलेच्या मानेवरची तरवार दूर होऊन तिचें पातिव्रत्य पवित्र राहील ? "

या वेळीं चन्द्रावतजीही क्रोधानें अग्नीसारखा लाल झालेला दिसत होता. त्याच्याही पत्रिकेंत रंभेची एक तसबीर होती. रंभेनें ती मोठ्या प्रेमानें त्यास पाठविली होती. या पत्रिकेंत मात्र ताराबाईवर ओढवलेल्या भयंकर प्रसंगाचें सांगोपांग वर्णन होतें. तें वर्णन वाचून आतां काय करूं आणि काय न करूं असें चन्द्राजीस झालें होतें. त्यानें त्या पत्रिकेंतील प्रणयविषयक जेवढा मजकूर होता तेवढा राजसिंहाची नजर चुकवून फाडून आपल्या खिशांत टाकिला व ती पत्रिका राजसिंहास वाचण्यास दिली. राजसिंहानें ती पत्रिका वाचली. त्या पत्रावरून त्या चतुर युवराजानें ताडलें कीं यांतील कांहीं मजकूर कोणीं तरी फाडून घेतला असावा खास. व तो मजकूर चंद्रावतजीनेंच फाडला असला पाहिजे, अशीही त्यास शंका आली. परंतु त्या वेळीं त्याबद्दल

विशेष चौकशी न करितां तो त्यास ह्मणाला " मग आतां करायचें काय तें तरे कळूं दे. "

यावरे चंद्रावतजीनें उत्तर दिलें " आपणांला आतां याविषयीं योग्य विचार हा केलाच पाहिजे. स्वस्थ बसणें ह्मपाजे आपल्यासारख्यां क्षात्रियकुलांत निर्माण झालेल्या गृहस्थास अनुचित आहे. पण महाराज ! आपण असें सचिंत कां दिसतां ! ज्यावेळीं ताराबाईच्या मातापित्यांकडून वाङ्निश्चय झाला त्याच वेळीं ती आपली अर्धांगी बनली. आतां त्या पत्नीस रजपूत वीरानें आलेल्या संकटांतून मुक्त न करावें तर काय तिला अविंधांच्या हातीं भ्रष्ट होण्यास पाठवावीं किंवा आत्महत्या करण्यास मोकळीक द्यावी ? काय क्षात्रियांचा पराक्रम ! सूर्य अगदींच अस्ताचलाला गेला ? आर्यधर्म नष्ट झाला ? कीर्तिचंद्रास खग्रास ग्रहण लागलें ? विचार करा. पूर्ण विचार करा. रजपूतकुमारी ताराबाई आतां आपली आहे. आज जर आपण आतां स्वस्थ माशा मारीत बसलों तर त्या हरिणीला त्या दुष्ट व्याघ्रांनीं आपल्या जाळींत ओढून नेली ह्मणून समजा. आज क्षत्रियकुमारी मोगलांनीं नेल्या कीं, उद्यां आपलें राज्यही त्यांच्या हातीं जाण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं. आजपर्यंत हें मेवाडचें राज्य सुरक्षित राखण्याकरितां लाखों मोंगल वीरांचे बळी धारातीर्थीं दिले आहेत. त्या मोंगलांच्या धर्मभ्रष्टांच्या शय्येवर आपल्या पोरी आह्मी हतबल झालों ह्मणून पाठवावयाच्या ? किंवा आह्मी बायका झालों ह्मणून त्यांना आत्महत्या करा ह्मणून सांगण्यास तयार व्हायचें. शरणागताचें रक्षण करणें हें मेवाडाधिपतीचें आद्य कर्तव्यकर्म आहे. आणि याच कारणाकरितां लाखों वीर रणयज्ञांत बळीं पडले आहेत. त्यांच्याच निर्मल कुलांत आह्मीं आज जन्म घेतला आहे. त्यांच्याच कृतींचें अनुकरण करणें आह्मांस प्रशस्त वाटतें. तेव्हां मेवाडचे उत्तराधिकारी युवराज राजसिंहजीस आपली भावी पत्नी यवनांच्या शय्येवर विहार करण्यास जावी असें वाटेल काय ?

' युवराज ! आज या पवित्र भारतभूमीवरील सर्व क्षात्रधर्माचा लोप झाला काय ? क्षत्रियमाता यथार्थ पुत्र प्रसविण्याऐवजीं षंढ पुत्र प्रसवूं लागल्या काय ? मेवाडचा हिन्दुपति यवनबादशहास भिऊन हातांत बांगड्या भरून चुलीपुढें भाकरी बडवीत बसला काय ? बाप्पा रावळच्या पवित्र कुलांत जन्म पावलेल्या प्राण्यास आज शरणागताचें रक्षण करण्यांत, समरांगणांत मरण्यांत

किंवा .रानोरान शिकार करण्यांत अपमान वाटूं लागला काय? असें जरं वाटूं लागलें असेल तर हें राज्य सपशेल बुडालें खास. पत्रिका वाचून आपणावर असें संकट तरी कोणतें पडलें? आज नाहीं उद्यां आपण मरणारच ! आमचे बापजादे नाहीं या मृत्यूच्या करालमुखीं जाऊन पडले? त्यांची गति तीच आमची. आह्मांला तरी कोणीं अमरपट्टा दिला आहे? याकरिता सांगतों कीं आमच्यासारख्यांनीं मरावें तर समरांगणांतच ! आपण त्याला एका पायावर तयार झालें पाहिजे. जगलों तर मानमान्यता वाढेल, मेलों तर स्वर्गलोकीं देवताजवळ जाऊन बसूं.'

हे शब्द उच्चारतांना चंद्रावतजीचा गळा अगदीं क्रोधातिशयानें दाटून आला. त्याला पुढें बोलतां येईना. नेत्रांतून अग्निकण पडतात कीं काय असा पहाणारास भास होऊं लागला. त्यांचें सर्वांग कंपायमान झालें. चंद्रावतजीची या प्रकारें अवस्था अवलोकन केल्यावर राजसिंह शांतपणें त्यास ह्मणाला ' चंद्रावतजी ! इतके क्रोधवश होण्याचें काय कारण? ताराबाईशीं विवाह करण्यास किंवा तिला आलेल्या संकटांतून मुक्त करण्यास मी तयार नाहीं असें तूं कशावरून बुवा ताडलेंस ह्मणून इतका अद्वातद्वा बडबडत सुटलास? क्रोधवश होऊन मनास मानेल तसें बडबडणें योग्य नव्हें. भावी प्रियेचा—त्यांतून ती शरण आली असतां—उद्धार करण्यास मी प्राणाची सुद्धां पर्वा बाळगीत नाहीं. ती पत्रिका वाचन दुःख, शोक, क्षोभ किंवा यांपैकीं कोणतीही भावना मला झाली नाहीं असें तुला वाटतें का? विचारण्याचा हेतु इतकाच ताराबाईला संकटमुक्त करण्यास सोपा उपाय योजावा कोणता? या कामीं त्या दुष्टास बादशाहाचें अंग असेल असें मुळींच संभवत नाहीं. मग त्याच्यांत आणि आपल्यांत वैर उत्पन्न करून विनाकारण लढाई का उत्पन्न करा? असा कांहीं रामबाण उपाय शोधून काढला पाहिजे कीं त्याचा काडीइतका सुद्धां गवगवा न होतां ताराबाईला सहज संकटमुक्त करून इकडे बिनधोक आणतां यावी. आतां असें मात्र तूं समजूं नको कीं मी मरणाला भितों आहें. त्याची मला मुळींच भीति वाटत नाहीं. मला मरावयाचें आहे पण कसें: ह्मणशील तर आमचे विजयशाली पूर्वज आपली निर्मल कीर्ति भूलोकीं ठेवून स्वर्ग लोकीं गेले त्याप्रमाणें जावें अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. कोणत्याही क्षुल्लक बाबतींत विजयी होऊन मरणें मला मुळींच प्रिय नाहीं. राणा हयीर, राणा संग, राणा कुंभ अथवा प्रतापसिंह

जसे समरांगणांत पराक्रम गाजवून मेले त्याप्रमाणें आपण कां न मरावें ? त्यांचेच ना आपण वंशज ? आपण आज उभयतां नवतारुण्यांत आलों आहोंत. संसारसुख संसारसुख ह्मणजे काय आहे हें आपल्यापैकीं एकासही माहित नाहीं. आज आपण प्रत्येकानें एकेका नवयुवतीस आपल्या फांसांत गुंतवून आपणही त्याच्या फांसांत गुतलों आहोंत. अशा स्थितींत आपण त्या तरुणींचें संकटमोचन न करूं तर आपणांस सुखाला मुकून त्यांच्या आत्महत्येचा दोष माथीं घेण्यास मात्र तयार व्हावें लागेल. ह्मणून ह्मणतों:—

उपायेन हि यच्छक्यं न तच्छक्यं पराक्रमैः ।

" आपण या कामीं मेलों तर आपले वृद्ध मातापिता आपल्याकरितां प्राण सोडतील. व शेवटीं मेवाडचे सर्व लोक ह्मणतील कीं ' या पोरट्यांनीं केवळ तरुण स्त्रियांच्या प्रेमफांसांत गुंतून आपले प्राण गमाविले ! राज्य परक्याचे स्वाधीन केलें. पूर्वजांच्या विमल कीर्तीला आपल्या निंद्य कृतीनें कलंक लाविला ! ' आतां या गोष्टींत मी इतकी चिकित्सा कां करतों याचें खरें कारण आपल्या ध्यानांत आलेंच असेल. नसलें तर सांगतों. आपले विवाह केव्हां होणार व ते आग्रयास अगर जन्मस्थान जोधपुरास होणार ? असें विचारिलें असतां अमरसिंहाकडून उत्तर काय आलें हें नाहीं अद्याप तुह्मांला स्मरत ? या वेळीं चंद्रावतजींचें क्रोधाग्नीनें जळफळत असलेलें मन बरेंच ताळ्यावर आलें होतें. त्यानें राजसिंहाचें सर्व भाषण लक्ष्यपूर्वक ऐकून उत्तर दिलें. ' होय, मला सर्व स्मरतें आहे. एकदां ज्या स्थानाचा त्याग केला त्या स्थानीं पुन्हां निदान माझ्या शरीरांत जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत तरी हा शूराचा बच्चा जाणार नाहीं, हें खास समजा. आतां विवाह वाटल्यास आग्रयास अगर इकडे व्हावा. पण याचा आणि .... "

" थांबा. आतां कुठें तुह्मी ताळ्यावर आलां आहांत. कांहीं कारणास्तव श्रीपिताजीस स्वतः आग्रयास वाङ्निश्चय करण्यास जातां आलें नाहीं. तेव्हां आपणास तिकडे गुप्त रीतीनें पाठविलें होतें व आपण तिकडे गेल्यावर आमचाच नाहीं तर आपलाही वाङ्निश्चय करून आलांत, हें स्मरतें का ? " राजसिंहानें विनोदपूर्ण स्वरानें विचारिलें.

' होय ' चंद्रावतजीनें हंसत उत्तर दिलें " आपला आतां सर्व मतलब माझ्या ध्यानीं आला. "

आतां या ठिकाणीं आह्मीं गुप्त ठेविलेला वृत्तांत सांगणें अवश्य आहे.

आग्रामुक्कामीं ताराबाईच्या विवाहाचा वाङ्निश्चय करण्यास महाराणा जगत्सिंह गेला नाहीं याचें कारण इतकेंच कीं जरी शहाजहान बादशहाचें आणि त्याचें सरळ होतें तरी यवन बादशहाचे राज्यांत त्यानें न बोलावतां जाणें ह्मणजे त्याच्या मुठींत जाणें होय. व असें जाणें ह्मणजे राजनीतीच्या विरुद्ध आहे असें वाटत होतें. शिवाय तिकडे अमरसिंहानेंही निश्चय केला होता कीं आजन्म आपल्या पित्याची निवासभूमि जी जोधपूर तेथें पाऊल टाकावयाचें नाहीं. अमरसिंहास त्याच्या कानिष्ठ बंधूनें (यशवंतसिंहानें) सांगितलें कीं, आपण जोधपुरास येऊन तेथें वाङ्निश्चय, विवाह वगैरे सर्व उरकावें. परंतु अमरसिंहानें त्यास स्पष्ट सांगितलें कीं, आतां तिकडे येण्यांत माझा कांहीं संबंध उरला नाहीं. यावर तो बिचारा स्वस्थ बसला. मानी अमरसिंहाचा सुनिश्चय महाराण्यास कळल्यामुळें आपल्या सुयोग्य पुत्र राजसिंहाच्या व सर्व सरदार लोकांच्या संमतीनें आपल्या प्रधान मंत्रीचा पुत्र व राजसिंहाचा जिवलग दोस्त चंद्रावतजीस गुप्त रीतीनें वाङ्निश्चयाकरितां आग्र्यास अमरसिंहाकडे रवाना केलें. यामुळें अमरसिंहास किंवा जगत्सिंहास फारसा त्रास झाला नाहीं.

यावर चंद्रावतजीनें आपला पेहराव बदलला व आग्र्यास येऊन त्यानें जवाहिर विकण्याचें दुकान उघडलें व गांवांत प्रसिद्ध केलें कीं आपण मारवाडचे प्रसिद्ध जवाहिरे आहोंत. नंतर तो एके दिवशीं अमरसिंहास जाऊन गुप्त रीतीनें भेटला. त्याच वेळीं ताराबाईच्या विवाहाचा वाङ्निश्चय झाला, यावरून जगत्सिंहाची राजनीति अमरसिंहाच्या पूर्ण ध्यानांत आली. वाङ्निश्चयाचे वेळीं उभयतांमध्यें असें ठरलें कीं लग्नतिथीचा निश्चय झाल्यावर दोन महिने अगोदर अमरसिंहानें महाराणा जगत्सिंहास पत्रद्वारें कळवावें. नंतर लग्नतिथीपूर्वी कांहीं दिवस जगत्सिंहानें राजसिंहास व अमरसिंहानें ताराबाईला बरोबर घेऊन उदयपूर व जोधपुरच्या मध्यभागीं ठरलेल्या स्थानीं शिकारीला जाण्याचा बहाणा करून निघून यावें. याठिकाणीं दोन्ही पक्ष एक झाल्यावरोबर तारेचा विवाह राजसिंहाबरोबर लावावा व अमरसिंहानें आग्र्यास परत जावें. तेथें गेल्यावर त्यानें चोहोंकडे कळवावें कीं ताराबाईचा विवाह राजसिंहाबरोबर झाला व आतां तिला तिकडेच रवाना केली आहे.

वरील आशय जेव्हां चंद्रावतजीनें अमरसिंहास कळविला तेव्हां त्यास तो

प्रथम पसंत पडला नाहीं. परंतु त्यानें जेव्हां मधल्या नडी सांगितल्या तेव्हां त्याला त्याचा विचार पसंत पडला. त्याच्या म्हणण्याला रुकार देऊन त्याला उदयपुराला जाण्यास परवानगी दिली. चंद्रावतजीनेंही उदयपुरला आल्यावर महाराण्यास सर्व वृत्त कथन केलें. वरील वाङ्निश्चय झाला त्या गोष्टीला सुमारें दोन वर्षें झालीं. तरी अमरसिंहाकडून तिथिनिश्चयाचें पत्र म्हणून महाराण्यास गेलें नाहीं. बिचाऱ्या उदयपुरवाल्या मंडळीस मोठी काळजी पडली. त्यांना वाटलें कीं आतां अमरसिंह आपल्या इकडे मुलगी देतो किंवा नाहीं कोण जाणे. स्पष्ट पत्रांतून विचारावें तर तें बरें दिसत नाहीं या समजुतीनें ते स्वस्थच होते. यामुळें एकमेकास एकमेकाची खबरबात मुळींच कळेना.

वाङ्निश्चय झाल्यावर कांहीं महिने अमरसिंहास व ताराबाईस चांगल्या रीतीनें गेले. या गोष्टीचा स्फोटही झाला नव्हता. परंतु जेव्हां हळूं हळूं तारेवर सलावतखान व दारा या उभयतांचीं कुचकें येऊं लागलीं तेव्हां मात्र अमरसिंह वेड्यासारखा करूं लागला. त्याला तारेला घरांत ठेवून बाहेर सुद्धां पडणें म्हणजे मृत्यूच्या दाढेंत गेल्याप्रमाणें वाटूं लागलें.

वाङ्निश्चय झाला हें अमरसिंह, चंद्रावती, तारा व रंभा या चौघांशिवाय आग्र्यास कोणाला कळलें नव्हतें. व तें कोणास कळविणेंही प्रशस्त नव्हतें, सबब जहांनारेनें 'लग्न कोणाबरोबर होणार?' असें तारेस विचारिलें असतां तारेनें तिला 'मला यासंबधानें कांहींच कळलें नाहीं' असें उत्तर दिलें होतें.

चंद्रावतजी जेव्हां आग्र्याहून उदयपुरला परत आला तेव्हांच त्याचें मन रंभेवर बसलें. त्या वेळीं त्यानें आपली तसबीर रंभेस व राजसिंहाची तारेस दिली. मागें राजसिंहास व चंद्रावतजीस दिलेल्या त्या उभयतांच्या तसबिरा होत्या. त्या तसबिरींपैकीं तारेची तसबीर पाहून राजसिंह अगदीं दिवाणा होऊन बसला. ती तसबीर त्याच्या गळ्यांतील ताईत होऊन बसली. खरोखर ताराबाई त्रैलोक्यमोहनी होती. अशा मोहनीची तसबीर राजसिंहासारख्या तरुणांना कां बरें वेड लावणार नाहीं?

* * *

एकाएकीं ताराबाईच्या संरक्षणार्थ आपण गेलों तर काय काय प्रसंग आपल्यावर ओढवतील याचा राजसिंहानें पूर्ण विचार केला होता. सबब तो

चंद्रावतजीस मागील प्रश्नाप्रमाणें प्रश्न विचारीत होता. आतां त्यानें दूरवर किती विचार केला होता हें पुढील लेखनावरून वाचकांना सहज कळेल.

तारेवर कोणत्याही प्रकारचीं संकटें आलीं नसतांना शिवाय आपल्या पित्याचें व बादशहाचें सख्य आहे तरी महाराणा (जगत्सिंह) स्वतः अमरसिंहाकडे वाङ्निश्चयास गेला नाहीं व उघड रीतीनेंही त्यानें आपला कोणी सरदार पाठविला नाहीं आणि आतां तर तारा, सलावतखान व दारा या दोन दुष्ट व्याघ्रांच्या तडाक्यांत हरिणीप्रमाणें आडकली आहे. तेव्हां एकदम विचार न करितां तिला सोडविण्यास जाणें म्हणजे वणव्यांत जाऊन बसणें होय. सलावतखान राहो, दारा तर बादशाहीचा उत्तराधिकारी आहे. त्याला चेतवून तारा सोडवून आणणें म्हणजे आजच लढाई उत्पन्न करून जगांत छीः थूः करून घेण्यासारखें आहे. विचार न करतां गेल्यास लढाई करणें भाग पडणार खास. उदयपुरवाले तारेस नेण्याकरितां आले आहेत हें त्यास एकदां कळलें कीं तो आपले मार्ग बंद करीलच. अशा स्थितींत लढाई तरी केली पाहिजे किंवा आपली कीर्ति धुळीस नेऊन पोंचविली पाहिजे. त्याशिवाय तिला सोडवून आणणें म्हणजे शुद्ध मूर्खपण आहे. कदाचित् बादशहाचें व महाराणाजीचें सख्य असल्यामुळें बादशहा दारास अटकाव करील असें म्हणावें तर तेंही नाहीं. कारण, शहाजहानानें जसें आपल्या बापास कैद केलें तसें दारा त्यास करण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं.

राजनीतीला अनुसरून जसा राजसिंहानें स्वस्थ चित्तानें विचार केला होता तसा चंद्रावतजीनें मुळींच केला नव्हता. तो क्रोधातिशयानें वाटेल तसा वडबडत सुटला ! साधारण नियम असा आहे कीं एकदा मनुष्य क्रोधवश झाला व त्या भरांत तो जर वाटेल तें करण्यास तयार झाला तर त्याची हानि झाली म्हणून समजावी. विचारी जो आहे त्याला सदा यश येणारच. राजासह फारच विचारी होता. त्याचें तें शांत भाषण ऐकतांच चंद्रवतजीचा सर्व क्रोधानल विझून गेला ! तो राजसिंहाची स्तुति करूं लागला !

" आपला मतलब मला सर्व समजून चुकला. आपण धन्य आहांत. ईश्वर साह्य असो म्हणजे झालें. खास आपण राजनीतिबलानें या मगरगड्यांना खास पाणी पाजाल. "

' प्रसंगानुसार सर्व पहातां येईल. सध्यां जो प्रसंग आला आहे तो

टाळण्यास सुलभ उपाय आपण कोणता योजिला आहे ?' राजसिंहानें विचारिलें.

' युवराज ! ' चंद्रावतजी ह्मणाला ' मीं आपणास काय सांगावें ? माझी सर्व बुद्धीच कशी या वेळेस नष्ट झाली आहे. ताराबाईचे संकटनिवारणार्थ आपणच रामबाण उपाय योजिला आहे खास, असें मला माझी मनोदेवता सांगते आहे. मग माझ्या अज्ञानाची परीक्षा पहाण्यांत काय अर्थ आहे ? आपण तरुण, विद्वान्, बुद्धिमान्, चतुर आहांत. आपणास आपल्या कुलांतील चालीरीती सर्व माहीत आहेत. आजपर्यंत आपल्या वंशामध्यें शरणागताचें रक्षण करण्याकडे नाक मुरडणारे वीर मुळींच निपजले नाहींत. बाप्पारावळच्या वंशजांचा मनोनिग्रहच असा आहे कीं वाटेल तसली घोर विपत्ति येवो, त्याला तोंड द्यावयाचें. शरणागतास आपल्या कुलाची, पूर्वजांची मर्यादा, विमल कीर्ति, प्रतिष्ठा न घालविण्याकरितां ' नाहीं, मी तुला साह्य करणार नाहीं ' असा रोकडा जबाब द्यावयाचा नाहीं; आजपर्यंत कोणीं दिला नाहीं व पुढें तसा कोणी देणारही पण नाहीं; ह्मणून ह्मणतों होता होईल तितका विलंब न लावतां राजकुमारी ताराबाई संकटमुक्त केली पाहिजे. त्या योगानें आपल्या कुलाची कीर्ति अजरामर कायम राहील. हें पहा सत्याचा जय होणार ! आपल्यांत खरेपणा आहे ह्मणून हा संसार चालला आहे. पृथ्वी जिवंत आहे, सूर्य वेळचे वेळेवर उदय व अस्त पावत आहे. वायु अप्रतिबद्ध वहात आहे. गंगानदी निर्मल जलानें वाहत आहे. एकदा आमच्यांतील खरेपणा गेला, आणि महाराणा संगाच्या वंशजाकडून शरणागतास निराशेचें उत्तर गेलें ह्मणजे काय राहिलें ? संसार नष्ट झाला ! पृथ्वी रसातळाला जाऊन पोंचली, सूर्य पश्चिम दिशेस उगवूं लागला व सर्व ब्राह्मण नष्ट झाले समजावें खास. ज्या राण्यांनीं आपल्या कन्याच काय पण दासी सुद्धां तुर्क लोकांच्या हातीं जाऊं दिल्या नाहींत त्या राण्यांच्या कुलदीपकाची भावी पत्नी यवनाच्या शय्येवर जाऊन लोळणार ! ज्या शिसोदे घराण्यांतील वीरांनीं आपले सर्व पुत्र मारले; कीर्ति राखण्याकरितां राज्यें सोडून अरण्यवास स्वीकारिले; राज्यसौख्यावर लाथा मारून कंदमूळांवर उपजीविका केली; भिल्ल लोकांकडून आपलें संरक्षण केलें; ते हजारों शत्रूंच्या भोंवऱ्यांत सांपडले परंतु शत्रूला शरण गेले नाहींत व आपल्या दासी सुद्धां अविंधांना देण्याला तयार झाले नाहींत; त्यांच्या वंशजांतील प्रतापी प्रतापसिंहाच्या कुलाचा कुलदीपक युव-

राज राजसिंह आपली भावी पत्नी ताराबाई देशशत्रु आणि धर्मशत्रु जे मुसलमान त्यांच्या हातांत जाऊन देईल ? हाय ! अशी गोष्ट घडून येणार ह्मणतां ? काय माझ्या शरीरामध्यें जरा राक्षसीनें वास्तव्य केलें किंवा माझें शरीर हतबल झालें किंवा माझी तलवार बोथट झाली ह्मणून असला प्रश्न ऐकण्याचें माझ्या नशीबीं आलें ! '

" ह्मणतां तें कांहीं खोटें नाहीं. बाकी भी खास समजून चुकलों कीं रंभाबाईच्या वतीचें आपल्याशिवाय दुसरें कोणी वकील नाहीं. अशी जादू तरी काय त्या रंभाबाईच्या पात्रिकेंत आहे कीं त्यामुळें तुह्मी इतकें क्रोधांध झालांत. " असें बोलत राजसिंह हंसूं लागला. परंतु बिचाऱ्या चंद्रावतजीस मात्र वरमल्यासारखें झालें. तो त्यास कळवळ्यानें ह्मणाला " युवराज ! आज हें आपण वेड्यासारखें काय आरंभिलें आहे ? "

" खरोखर रंभाबाईसारख्या स्त्रीच्या ताब्यांत माझें मन गेलें नाहीं ह्मणून ईश्वरास अवश्य धन्यवाद दिला पाहिजे, नाहींतर माझीही आपल्यासारखीच स्थिति झाली असती ".

राजसिंहाचें वरील भाषण ऐकतांच चंद्रावतजीच्या क्रोधानलानें पुन्हां पेट घेतला. त्यानें चट्कन् मिश्रजीकडे तोंड वळवून त्यांस सांगितलें " काय मिश्रजी, ऐकलें कीं नाहीं युवराजांचें सर्व भाषण ? आतां आपण येथून जा आणि तारेस मुसलमानांशीं निक्का लावण्यास सांगा कसे ! "

' आणखी रंभाबाईस माझा निरोप कळवा कीं आपले प्राणवल्लभ श्रीमान् चंद्रावतजी हे आपली समशेर गाजवून आपणास संकटांतून मुक्त करण्यास लवकरच येणार आहेत. आणि .... '

' क्षमा करा महाराज ! ' चंद्रावतजी राजसिंहास ह्मणाला ' काय आपणास थट्टा करण्याला हीच संधि वाटते ना ? '

' आपण थट्टा करून दुसऱ्यावर ती लादणें आपणास पसंत पडतें ह्मणावयाचें ? '

' महाराज ! अशी मीं आपली थट्टा तरी काय केली ? '

' इतक्या वेळ केली तर खरी. असो. पण तुला वाटतें का कीं रजपूतकुमारी वानरतोंडया मुसलमानांची भोग्या बनेल. अरे ! कोमलांगी पद्मिनी कधीं मंडूकाची घरवाली बनली आहे किंवा राजहंसी बग-

ळ्याची अर्धांगी झाली आहे ? असें विपरीत तूं मनांत सुद्धां कधीं आणूं नको. परंतु आपण एकदम रंभेच्या पत्रिकेंतील मजकूर वाचून कापराप्रमाणें क्रोधानलानें जळूं लागलां हें पाहून मला सखेदाश्चर्य वाटतें. ' असें बोलून राजसिंह हंसूं लागला. राजसिंहाचे अशा प्रकारचे विलक्षण रंगढंग पाहून मिश्रजी मोठ्या संकटांत पडला. त्या बिचाऱ्याला राजसिंहाच्या मनांत तारेसंबंधीं

' काय विचार आहेत हें कांहींच कळेना. तेव्हां राजसिंहास त्यानें विचारिलें ' महाराज ! मला काय आज्ञा आहे ? आपण राजकुमारीच्या पत्रिकेचें कांहीं उत्तर देतां किंवा कसें ? काय जें लिहावयाचें असेल तें जलदीनें लिहून तें पत्र मला द्या; नाहींतर तोंडीं सांगायचें असल्यास तसें सांगा म्हणजे मला जाण्यास बरें पडेल. '

" जरा धीर धरा. भिऊं नकां. मी आपल्याबरोबर येऊन मला काय उत्तर द्यावयाचें आहे तें मी तिलाच समक्ष देणार आहें. "

' आपण काय उत्तर देणार तें मला तर कळूं द्याल कीं नाहीं ? ' चंद्रावतजीनें विचारिलें.

यावर राजसिंहानें चंद्रावतजीस जवळ बोलावून त्याला कांहीं सांगितलें. परंतु त्यांतील एकही अक्षर मिश्रजीस कळलें नाहीं. आतां काय सांगितलें त्याचा उलगडा पुढें होणारच आहे.

राजसिंहानें जें कांहीं चंद्रावतजीस सांगितलें तें ऐकून त्यास फारच आनंद झाला. त्यानें मग एका सरदारास बोलावून आपल्या सैन्यास बोलावण्याकरितां आज्ञा दिली. त्याप्रमाणें त्या सरदारानें लागलीच एका उंच झाडावर चढून आपली तुतारी वाजविली त्या तुतारीचा आवाज सर्व रानभर भरून गेला. तो आवाज ऐकतांच ज्या ठिकाणीं राजसिंह बसला होता त्याच्या सभोंवार सुमारें पांचशें सहाशें स्वार येऊन दाखल झाले. आज बरेच दिवस राजसिंहानें या पहाडावर आपला मुक्काम दिला होता. दिवसां हे स्वार एक एक टोळीनिशी इकडे तिकडे शिकार करीत फिरत व सायंकाळ झाली म्हणजे राजसिंहाच्या डेऱ्याभोंवतीं येत. ज्या वेळीं स्वार आले त्या वेळीं सूर्यास्ताचा समय बराच जवळ आला होता. सर्व सैन्य एकत्र होतांच राजसिंहानें एका उंचशा शिलाखंडावर उभें राहून त्यांना ताराबाईची दुर्दशाकहाणी

मोठ्या अस्खलित वाणीनें निवेदन केली व तिची ती पत्रिकाही वाचून दाखविली व त्यास त्यानें विचारिलें " प्यारे बहादुरो, यांत आपला सर्वांचा कसा काय विचार आहे ? " यावर त्या सर्व सैन्यानें गर्जना करून आग्र्यावर तुटून जाऊन पडण्याची इच्छा प्रकट केली. ताराबाईचा उद्धार करण्याकरितां आमचे प्राण गेले तरी पतकरले असें ह्मणून त्यांनीं आपल्या तरवारीवर हात ठेवून शपथ वाहिली कीं ' बेहत्तर मेलों तरी; पण शत्रूस पाठ ह्मणून कधीं दाखविणार नाहीं ! '

हे शब्द ऐकून राजसिंहास किती बरें धन्यता वाटली असेल ! तो त्यांस ह्मणाला ' वीरहो, ज्याची मी आशा करीत होतों तेच शब्द तुमच्या तोंडांतून निघालेले ऐकून मला फारच आनंद आणि उल्हास वाटत आहे. हे शब्द जर कायम ठेविलेत तर मेवाडचें राज्य यावच्चंद्रदिवाकरौ राहिलें ह्मणून खास समजा. आतां आपणांस मुसलमानांच्या राजधानींत जावयाचें आहे. त्या ठिकाणीं मोठ्या बेतानें वागलें पाहिजे. आपल्याला गुप्त तऱ्हेनें जावयाचें आहे. तेथें होतां होईल तितकें लोकांच्या नजरेस आपण न याल अशी पूर्ण खबरदारी ठेविली पाहिजे. नाहींतर उलट आपली फजिती होण्याची पाळी येईल. आपल्याला मुसलमानांशीं वागावयाचें आहे. ते किती कपटी आहेत हें आपणां सर्वांस माहीत आहेच. त्यांच्याशीं कसें वागावयाचें हें सर्व सांगण्यापेक्षां ' शठे शाठ्यं समाचरेत् ' हें सांगतों तेवढें ध्यानांत ठेवा ह्मणजे झालें. शत्रूच्या घरांत प्रवेश करावयाचा ह्मणजे फार सावधगिरीनें वागायला पाहिजे व कुटिल नीतीचें अवलंबन करून आपलें सर्व काम उरकून घेतलें पाहिजे. जोंपर्यंत आपण त्यांना आपला विचार काय आहे हें कळविलें नाहीं तोंपर्यंत आपलीं गुप्त कारस्थानें त्यांना न कळतील अशी खबरदारी घेतली पाहिजे. ' यावर कोणीं कसें वागावयाचें वगैरे सर्व त्यानें त्यांस सांगितलें. युवराजाची ही धूर्तता पाहून मिश्रजीस मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें त्यांस आशीर्वाद दिला. राजसिंहानें सर्वांस कोणीं कसें वागावें, कोणीं कसें करावें हें सांगितल्यानंतर एका कागदावर कांहीं मजकूर लिहून तें पत्र व ताराबाईची पत्रिका एका लिफाफ्यामध्यें घालून बंद करून एका स्वाराबरोबर तें आपल्या पित्याकडे रवाना केलें. व आपल्या सैन्यासहवर्तमान आग्र्याची वाट धरिली. चंद्रावतजी व भुवनेश्वर मिश्रजीसही त्यानें आपल्याबरोबर घेतलें होतें. पहाडी रस्त्यांतून मिश्रजीस

घोडयावर बसून जातां येईना. तेव्हां त्यास डोलींत बसविलें. सुमारें पाचशें स्वार राजसिंहाबरोबर गेले. व बाकीचें सैन्य मागेंच होतें. त्या सैन्यानें तंबू, डेरे, राहुटया व इतर महत्त्वाचें सामान घेऊन दुसऱ्या दिवशीं पहाटे अग्रयाकडे जाण्याकरितां कुच केलें. व आडरस्त्यानें जाऊन ते राजसिंहास तिसऱ्या दिवशीं सायंकाळीं जाऊन मिळाले.

प्रकरण ४ थें.

जोहरेनें लाविलेला शोध.

दुसऱ्या भागाच्या शेवटल्या प्रकरणांत कळविलेंच आहे कीं जहांनारा रंभेस घेऊन आपल्या महालांत आली त्यावेळीं जोहरा मशाल घेऊन त्यांच्या बरोबर गेली. रंभेच्या जवळ खबूतरांचा पिंजरा होता. महालामध्यें आल्यावर जहानारेनें जोहरेस रौशन आरेचा शोध लावून आणण्यास पाठविलें व आपण रंभेबरोबर भुयारांत जाऊन रौशनआरेनें दिलेल्या पत्रावरील मोहोर फोडून त्यांतील तसबीर व यंत्र बाहेर काढिलें. कढत पाणी आणून रंभेनें ती तसबीर धुतली. व त्यावरील सर्व मतलब उभयतांनीं समजून घेतला. रौशनआरेच्या शहाणपणाबद्दल मनामध्यें तारीफ केल्यावांचून त्यांना राहवलें नाहीं. आतां त्या चित्राची किंवा यंत्राची येथें जरूर नसल्यामुळें आह्मीं येथें त्याचा उलगडा करण्याचें टाळलें आहे.

सर्व मतलब कळल्यावर उभयतां पुनः महालांत आल्या व इकडल्या तिकडल्या गोष्टी सांगत बसल्या. या वेळीं सुमारें एक प्रहर रात्र अवशेष राहिली होती. जहांनारा हंसत हंसत रंभेचा हात धरून ह्मणाली 'कसं काय जोगीणबाई, आमचा नाहीं का हात आपण पाहून आमच्या नशीबीं काय आहे तें सांगणार ? करा करा एवढी कृपा, आणि पहा एवढा हात ' असें ह्मणून जहांनारेनें आपला हात रंभेच्या पुढें केला.

' पुरे मेली चेष्टा ! त्याचें काय बाई आतां आहे. आपली मर्जी जर मजवर

नसती तर माझें कांहींच चाललें नसतें. हकीमसाहेब मला साहाय्य करितात म्हणून तर मला प्रत्येक गोष्टींत यश येत आहे. '

' तें कांहीं खोटें नाहीं. याबद्दल हकीमसाहेबांचे फारच उपकार आहेत. ज्या वेळीं त्यांनीं तुला मुली, अशी हाक मारिली त्या वेळेपासून ते तुला मुली-प्रमाणें मानतात व मीही त्याचप्रमाणें मानतें. तुजसारखी हुशार स्त्री खुदानें मला दिली असती तर मीं तिला क्षणभर सुद्धां डोळ्यापुढून दूर केली नसती. तुझें सर्व चातुर्य मला हकीम साहेबांकडून कळलें. खरोखर तूं हुशार, चतुर-लढकी आहेस. खरें पाहूं गेलें असतां तुझ्या सर्व कृतीनें सर्व सरदार सुद्धां वेडे होऊन गेले आहेत. तूं त्यांच्या डोळ्यांत पुरी धूळ टाकली आहेस. '

रंभेनें जहांनारेचें वरील सर्व भाषण स्वस्थपणें ऐकून घेऊन पुढें बोल-ण्यास सुरवात केली. ' हुजूर ! ईश्वराची कृपा मजवर असल्याशिवाय मी पोर काय करणार ? ईश्वराची कृपा तर खरीच. पण आपण जर आमच्या विरुद्ध असता तर मला कांहींच करतां आलें नसतें. आजपर्यंत जें कांहीं मीं केलें तें आपल्या कृपेनें. आपलें उतराई होणें मला अशक्य दिसतें. '

" असो. आतां झोप येते आहे. पण आतां रात्र तरी कुठें फार आहे ! फार तर दोन प्रहर असेल. तेव्हां आतां घरीं जाण्यापेक्षां क्षणभर येथेंच थांब. आतां जोहरा रौशनआरेकडून इकडे येईलच; ती काय सांगते तें ऐकून घेतल्यावर वाटल्यास घरीं जा. नाहींतर येथेंच निजलीस तरी हरकत नाहीं.

" कांहीं हरकत नाहीं. जोहरा येईपर्यंत मी थांबतें. तिकडली सर्व बातमी केव्हां एकदां ऐकेन असें मला झालें आहे. पण हुजूर मी पालखीमेण्यां-तून मात्र घरीं नाहीं हो जाणार ! मशिदींतील गुप्त मार्गानें जाण्याचा माझा विचार ठरला आहे. "

' यापुढें त्या मार्गानें जाणें म्हणजे बळेंच अंगावर संकट ओढून घेतल्या-प्रमाणें आहे. तुला पकडण्याकरितां हेराची कशी अगदीं तेथें जय्यत तयारी असेल. '

' आपला प्रियकर माझा पुरा मदतगार असल्यावर मला कोण काय कर-णार आहे ! मी सहज असल्या दुस्मानांना अंगठा दाखवून चालती होईन. '

' ज्या वेळीं तूं त्या मार्गानें जाण्यास निघशील त्यावेळीं मी जोहरेस प्रथम त्या रस्त्यानें कांहीं दगाबिगा होण्याचा संभव आहे कीं काय हें पाहण्यास

पाठवीन व तसें कांहीं असलें तर मात्र तुला तिकडून जाऊं देणार नाहीं. मग तुला पालखी किंवा मेण्यांतूनच मोठ्या बंदोबस्तानें गेलें पाहिजे. '

जहांनारेचें वरील बोलणें रंभेस कांहीं मानवलें नाहीं. इतक्यांत जोहरा आली. तिनें सर्व दरवाजे बंद केले व आपण जहांनारेजवळ येऊन उभी राहिली. जोहरा आलेली पहातांच जहांनारा तिला हंसत हंसत म्हणाली ' या तुझी मदतगार, सांगा, आमच्याकरितां तसदी घेऊन काय काय बातम्या उखळून आणल्या आहेत त्या. '

यावर जोहरा आदबीनें जहांनारेस मुजरा करून जवळच बसली. ती बसल्यावर पुन्हां जहानारेनें तिला विचारिलें. ' पहाऱ्याचा चांगला बंदोबस्त करून आलीस ना ? नाहींतर कोणी लुच्चा येथें येऊन आमचें गुप्त कारस्थान ऐकावयाचा. '

" त्याची मुळींच काळजी नको. बाहेर पहाऱ्यावर सर्व स्त्रिया हुशार आहेत. "

' आतां चालूं दे तुझें. रंभाबाईस घरीं जाण्यास वेळ होतो आहे. '

' हुजूरची आज्ञा घेतल्यावर मी बेगमसारखा पोषाख करून भुयारांत शिरलें व आतां आपल्याला केव्हां इच्छित शिकार मिळते या विचारांत इकडे तिकडे फिरूं लागलें. तों कांहीं वेळानें समोरून कोणी येत आहे अशी मला चाहूल लागली. तो कोण आसावा हें समजून घेण्याच्या हेतूनें मी एका कोपऱ्यांत लपून राहिलें. इतक्यांत तेथें एक खूपसुरत जवान सरदार आला व तो कांहीं बातमी घेऊन चालला आहे असें त्याच्या पेहेरावावरून मला समजून चुकलें. तो एकटाच आला आहे अशी माझी खात्री झाल्यावर मी कोपऱ्यांतूनच तो बेहोष व्हावा या हेतूनें हकीमसाहेबांनीं दिलेलें औषध त्याच्या नाकावर नेमकें टाकलें. त्याबरोबर तो बेभान होऊन जमिनीवर पडला. मात्र त्याला कोणीं मारिलें हें कांहीं समजलें नाहीं. नंतर त्याच्या जवळ जाऊन मीं त्याचा पोषाख उतरला व त्याच्या पायांत बेड्या अडकवून त्या पोषाखासह पोषाख बदलण्याच्या खोलींत गेलें. तेथें मीं आपले कपडे उतरून तें अंगावर चढविले. व तोंडावर रोगण लावून हुबेहूब त्याच्याप्रमाणें मर्द बनलें. त्याच्या कोटांत काय आहे हें पाहण्याकरितां मीं हात घातला तों मला एक खलिता लागला. तो खलिता फोडून मीं वाचून पाहिला. ' हा पहा तो खलिता ' असें म्हणून तिनें आपल्या चोळ्यां-

तून एक खलिता काढून जहांनारेजवळ दिला. जहांनारेनें व रंभेनें तो वाचून पाहिला. त्यांतील मजकूर पुढीलप्रमाणें होता.

" सरदार जलालुद्दीन ! आज सभा भरण्याचा दिवस आहे तर तूं शेवटच्या क्षणजे बाहेरून पहिल्या कोठडीच्या तोंडीं रहावें व जे कोणी सभासद येतील त्यांना तार्तरी स्त्रिया ज्या खोलींत आहेत तेथें आणून सोडावें. "

वाचकवृंदांस स्मरत असेलच कीं सलावतखान व सौसनच्या पोषाखामध्यें इनायतुल्ला व रंभा मुयारांतील दुसऱ्या कोठडीनजीक आल्याबरोबर त्यांना कांहीं नकली चेहऱ्याचे हत्यारबंद शिपाई भेटले. तेव्हां त्यांच्या मुख्य सरदारानें शिनाख्तसंबंधीं प्रत्येकास वेगळाले प्रश्न करून त्यांच्याकडून योग्य उत्तरें मिळाल्यावर पुढें जाण्यास परवानगी दिली. परवानगी मिळाल्यावर ते पुढें शिडी चढून गेले. त्याच्या मागून दोन शिपाई शिडीवर चढले. त्या शिपायांपैकीं एक जोहरा होती. तिनेंच जलालुद्दीनाचें सोंग घेतलें होतें.

त्यांनीं तें पत्र वाचल्यावर जोहरा पुढें झणाली. " पाहिलेंत पत्र कसें आहे तें. यावरून कोणा एकासही हें झणजे खुद्द रौशनआरेनें लिहिलें आहे असें वाटणार नाहीं. हें पत्र वाचल्यावर मला फार आनंद झाला. हें पत्र जर मला मिळालें नसतें तर मात्र मला कांहींच करतां आलें नसतें. तें पत्र घेऊन मी इकडे तिकडे फिरतें आहें इतक्यांत तेथें आणखी कांहीं शिपाई आले. त्यापैकीं मला अनेकांनीं विचारिलें कीं " सरकार ! आपण महालांत नाहीं असें पाहून आम्ही आपला शोध करीत इकडे आलों. आतां आपला शोध लागला. जातों आम्ही. " ते गेल्यावर मी दुसऱ्या मार्गानें दुसऱ्या कोठडींत आलें. तेथें कांहीं तार्तरी स्त्रिया दृष्टीं पडल्या. त्या खोलींत आल्यावर मी एका आरामासनावर सरदाराचा बहाणा करून बसलें. माझी (सरदाराची) प्रकृति क्षीण झाली आहे असें समजून त्या सर्व स्त्रिया माझ्या समोर आल्या. त्यांनीं मस्तकाला मालिस करण्याविषयीं माझी परवानगी मागण्यास सुरुवात केली. यावर मीं दोनतीन घटकांनीं ' माझें चढलेलें मस्तक उतरेल; यावर दवा करणें झणजे मूर्खपणा आहे ' असा बहाणा करून ती वेळ टाळली. तेव्हां त्या सर्व स्त्रिया खालीं बसल्या व मला ज्या गोष्टीनें आराम वाटेल त्या त्या गोष्टी त्यांनीं बोलण्यास सुरुवात केली. त्यांच्या त्या भाषणावरून असा मतलब निघाला कीं रौशनआरेनें सुमारें पांचशें शिपायांची गुप्त फौज तयार केली आहे. त्यांपैकीं कांहीं गुप्त रीतीनें अग्र्यामध्यें जवाहीर विकण्याचीं दुकानें

घालून बसले आहेत. कांहीं राजमंदिरांत फिरत असतात. शिवाय रौशन-आरेजवळ सुमारें दोनशें तार्तरी स्त्रिया आहेत. त्या नेहमीं शिपायाबरोबर असतात. कधीं वेळ प्रसंग येईल तेव्हां त्या जरूर रौशनआरेस जाऊन मिळतात. हे गुप्त लोक शहरांतील, दरबारांतील व रिसायतीमधील सर्व गुप्त बातम्या काढून त्या सर्व रौशनआरेस कळवितात. आज गुप्त सभा होती म्हणून त्या गुप्त लोकांपैकीं शंभर मर्द व पंचवीस स्त्रिया त्या सुरंगमध्यें आल्या होत्या. तेथें अर्धी घटका विश्रांति घेतली नाहीं तोंच कोणी मजकडे येत आहे अशी मला चाहूल लागली. ती लागतांच मी चट्कन् उठलें व शिडीवरून खालीं गेलें. तेथें मला कांहीं स्त्रियांनीं शिनाख्तसंबंधीं प्रश्न केले. याचा अनुभव हकीम साहेबांस व रंभाबाईस माहीत आहेच. तेथें आल्यावर मी एका आरामासनावर बसलें.

'त्यावेळीं कोणीं तुला ओळखलें कसें नाहीं यांचेंच मला मोठें आश्चर्य वाटतें.' रंभा म्हणाली.

'जसें त्यांनीं तुह्मांला ओळखलें नाहीं तसेंच तिला. असो. चालूं दे पुढें.' जहानारा म्हणाली.

'ऐका हुजूर ! आतां थोडेंच सांगण्याचें राहिलें आहे. हकीमसाहेबांस सुमारें अर्धी घटका पुढें जाऊन झाली नसेल तोंच माझ्या कानीं कांहीं लोकांचें ओरडणें आलें. त्यांचें ओरडणें ऐकून मी खुर्चीवरून इकडे तिकडे काय झालें आहे म्हणून पाहूं लागलें, तों इतक्यांत तेथें कांहीं शिपायी 'दगा दगा !' असा शब्द करीत आले. त्या शिपायांच्या तोंडचे ते शब्द ऐकतांच तेथील स्त्रियांनीं चट्कन् दरबार महालाचे दरवाजे उघडून आंत प्रवेश केला. या वेळपर्यंत आह्मांला कोणीं कोणाशीं दगा केला हें कांहीं कळलें नाहीं; परंतु जेव्हां सलावतखानाची आणि माझी भेट झाली तेव्हां मला सर्व कळलें. परंतु मी मुद्दाम अज्ञानीपणा पांघरून तेथें आलेल्या शिपायास 'काय झालें ?' म्हणून विचारिलें. त्यावर त्यांनीं सांगितलें कीं 'शिनाख्त' संबंधीं प्रश्न केल्यावरून सलावतखान व सौसन हे गिरफ्तदार केले आहेत. ते सांगतात कीं आमचीं पत्रें कोठें गहाळ झालीं आहेत व तीं कोणा बदमाषाच्या हातीं गेल्यामुळें आज असा दगा झाला ! आतां जलदी कराल तर दरबार महालांत गेलेले बदमाष आपणांस सांपडतील.

त्यास गिरफ्तार करून बेगमसाहेबापुढें नेलेंच पाहिजे. ' सलावतखानाच्या तोंडचे शब्द ऐकतांच तेथील सर्व लोकांचें धाबें गडाडलें. काय करावें हेंच त्यांना सुचेना. मला सुद्धां त्यावेळीं यांना आपलें कारस्थान तर नाहींना कळणार अशी भीति पडली. ते लोक दरबार महालांत घुसतात न घुसतात तोंच त्याचा दरवाजा बंद झाल्यामुळें बाहेर राहिलेल्या शिपायास आंत जातां येईना. सबब रंभाबाई व हकीमसाहेबांवरचें संकट टळलें. '

' त्यावेळीं हकीमसाहेबांनीं जर का कुचर केली असती तर मात्र प्राणावरच बेतली असती ! ' रंभेनें विचारिलें.

' इतका जो फार्स इकडे उडतो आहे तोंच आम्ही ज्या गुप्त कोठडींत आलों होतों तेथें रौशनआरा आली; मग ती कशी आली कोण जाणें. तिनें घाबऱ्या स्वरानें त्या सर्व शिपायांस सांगितलें कीं ' बहादुरहो ! या ठिकाणीं मला वाटतें जहानारेनें हें कपट लढविलें आहे. मी तिला आपल्या शत्रूसमान गणतें. तर तुम्ही सर्व या घटकेस पळून जा कसें. मात्र कांहीं दिवस गुप्त रीतीनेंच विहार करा म्हणजे झालें. खुदा चाहील तर मी हां हां म्हणतां या गोष्टींचा पुरा पत्ता लावल्याशिवाय राहणार नाहीं. ' असें म्हणून रौशनआरा तेथून नाहींशी झाली. जातांना ती सलावतखानाशीं किंवा सौसनशीं सुद्धां कांहीं बोलली नाहीं. ते शिपाई सुद्धां तेथून पळाले. त्यावेळची त्यांची जी तेधा झाली ती वर्णन काय करावी ! नंतर मी परत फिरलें. व जेथें मीं त्या सरदाराला कैद करून टाकलें होतें; तेथें येऊन दाखल झालें. परंतु आश्चर्य हें कीं त्यावेळीं त्या खोलींत मला तो सरदार मुळींच दिसला नाहीं. तो केव्हां पळाला हें कांहीं समजलें नाहीं. याला सोडलें कोणीं व गेला कोठें हें मला उमगेना. तेथून भीतभीत मी माशिर्दीत शिरलें पण तेथेंहि मला कोणी दिसलें असेल तर अगदीं शपथ ! जिकडे तिकडे उदासीनता फांकली होती. मग मी उदासीन होऊन पुन्हां दरबारमहालाकडे आलें. दरवाज्यावर मीं आल्याची खबर आपणांस कळावी म्हणून दारावर थाप मारली. पुढें काय झालें तें आपणांस माहीत आहेच ! ! '

जोहरेची करामत ऐकून जहांनारेस व रंभस अत्यंत आश्चर्य वाटलें. रौशनआरेच्या कृतीनें तर त्यांना अगदीं थक्कच करून सोडिलें होतें. जोहरेची कर्तबगारी पाहून जहांनारा व रंभा खुष झाली. जहांनारेनें

लागलीच आपल्या गळ्यांतील मोत्यांचें पेंडें काढून आपल्या हातानें जोहरेच्या गळ्यांत बांधिलें. यावर जोहरेनें जहांनारेच्या चरणाला स्पर्श केला. जहानारेनें तिच्या कर्तबगारीबद्दल वरील बक्षिस दिलें. यावर जहांनारा रंभेकडे तोंड फिरवून म्हणाली "रंभाबाई ! मला तुझ्याजवळून कोणती गोष्ट आज न लपवावी असें वाटतें आहे. तेव्हां आणखी एक जोहरेकडून तुला बातमी ऐकावयाची आहे. आपण जेव्हां इकडे आलों तेव्हां मीं तुला न कळत एक पत्र लिहून रौशनआरेस देण्याकारितां जोहरेजवळ दिलें व तिला रौशनआरा आहे कोठें व करते आहे काय याचाही पत्ता लावून ये असें सांगितलें. जोहरा, सांग तिकडची एकदां हालहवाल. "

" आपल्याकडून पत्र घेतल्यावर मी थेट रौशनआरा बेगम साहेबाकडे गेलें त्यावेळीं तेथें कांहीं तार्तरी स्त्रिया नग्न शस्त्रांनिशीं पहारा करीत होत्या. म्हणून मी जमिनीवर पडलें. या वेळीं बरीच रात्र असल्यामुळें हळूं हळूं सरकत सरकत कशी तरी एकदांची रौशनआराबेगमच्या महालांत गेलें. यावेळीं त्या पलंगावर स्वस्थ निजल्या होत्या. जवळच एक दिवा जळत होता. तो मालवून मीं आपलें पत्र त्यांच्या चोळींत ठेविलें व जशी गेलें तशी परत आलें. " जोहरा म्हणाली.

' त्या पत्रामध्यें मीं एवढेंच लिहिलें होतें कीं तुझीं गुप्त कारस्थानें मला सर्व कळलीं. यापुढें तुला जय मिळणें अगदींच अशक्य आहे. आतां तूं औरंगजेबाची बाजू सोडून दे कशी. हेका धरून बसशील तर तुझे अत्यंत हाल होतील. मग ते तुझे हाल कुत्रा सुद्धां खाणार नाहीं ' जहांनारा म्हणाली.

' यावरून सिद्ध होतें कीं आतां रौशनआरा म्हणजे विषरहित सर्प बनली आहे. ती चावेल पण तिच्या चावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. परंतु, आपण मात्र त्यामुळें बेफिकीर नसावें हो ! ' रंभा म्हणाली.

' तूं म्हणतेस तें कांहीं खोटें नाहीं. मी रात्रंदिवस सावधच असतें ' जहांनारा म्हणाली.

* * *

गुप्त दरबार महालाचे दरवाजे एकदां बंद झाल्यामुळें ते आतां उघडावेत कसें हें रौशनआरेस माहित नसल्यामुळें व जहांनारेकडील पत्र तिला तिच्या चोळींत सांपडल्यामळें कारस्थान चालविणें तिनें बंद ठेविलें. रौशन-

आरा भ्याली अशी कल्पना करून जहांनाराही स्वस्थच होती ; परंतु शेवटीं रौशनआराच विजयी होऊन औरंगजेब बादशाही तख्तावर आरूढ झाला. आमच्या कादंबरींतील हा विषय प्रधान नसल्यामुळें तो येथें देण्याचें आम्हीं टाळलें आहे.

* * * *

नंतर जोहरा तेथून बाहेर चालती झाली. व जहांनारा व रंभा कांहीं इकडच्या तिकडच्या गोष्टी आपआपसांत बोलूं लागल्या. जहांनारा म्हणाली ' बिबी रंभा ! आतां यापुढें तारा किंवा तूं येथें राहणें म्हणजे फारच धोक्याचें काम आहे. आतां सलावतखान चांगलाच जळूं लागला असेल. तो केव्हां एकदां भडका उडवून देईल हें कांहीं खात्रीनें सांगतां येणार नाहीं. तेव्हां मी सांगतें कीं तूं यापुढें होतां होईल तों जलदी करून अमरसिंहजीचे स्वार घेऊन तारेसह उदयपुराला जा कशी ! आतां विलंब करतां कामा नये. जर कां यापुढें राहशील तर मग दाराशीं गांठ आहे. ' असें म्हणून जहानारेनें एक कागद घेऊन त्यावर कांहीं लिहिलें व बादशाही शिक्का मोर्तब केला व तो कागद रंभेस देऊन ती म्हणाली ' हा कागद तुमच्याजवळ असला म्हणजे तुम्हांला कोणीही अटकाव करणार नाहीं. दारा किंवा सलावतच काय पण खुद्द बादशहा सुद्धां तुम्हाला अटकाव करणार नाहीं. तेव्हां हा कागद घेऊन तुम्ही उदयपूराचा मार्ग स्वीकारा. जातांना चौकीदारास हा हुकुमनामा दाखवावा. हीं खबूतरें येथें असूं दे. मी तुला दुसरी जोडी देतें. ती घेऊन उदयपुरला गेल्यावर तुम्हीं सुखरूप पोंचल्याबद्दल एक कागद त्यांपैकीं एका खबूतराच्या गळ्यांत बांधून तें सोडून द्या म्हणजे बिनचूक तें मजकडे येईल. पुढें दुसऱ्याचें कारण पड-ल्यास तेंही पाठवा' असें म्हणून जहांनारेनें खबूतरांची जोडी ज्यांत होती असा एक दुसरा पिंजरा रंभेस दिला. नंतर जहांनारेनें आपल्या गळ्यांतील मोत्यांची एक माळ रंभेस गळ्यांत घालण्यास दिली. या वेळीं जहांनारेस रंभा आतां जाणार हें पाहून अत्यंत वाईट वाटलें. ती रोदन करू लागली. रंभेलाही रडें आल्यावांचून राहिलें नाहीं. परंतु थोडया वेळांतच त्यांनीं आपलें दुःख कमी करून तारे-करितां एक मौल्यवान् मोत्यांचा हार दिला व सांगितलें कीं, ' तारेला म्हणावें तूं जरी उदयपुरवासिनी झालीस तरी इकडील ओळख विसरूं नकोस. कधीं पुढेंमागें सवड मिळाल्यास मी तुझी भेट घेण्यास विसरणार नाहीं. परंतु— ,

यापुढें जहांनारेच्यानें बोलवेना. कारण, यावेळीं तिचा दुःखानें कंठ भरून आला होता. रंभेनें जहांनारेचा निरोप घेतला. नंतर ती जोहरेच्या खोलींत गेली. जोहरा तेथेंच होती. त्याठिकाणीं त्या मैत्रिणींनीं आपला विरह होणार म्हणून एकमेकींच्या गळ्यांत गळे घालून बराच शोक केला. एकमेकींनीं आपआपल्या आंगठ्या बदलल्या. जोहरेनें पुन्हां तुला एकदां भेटेन असें आश्वासन देऊन तिची रवानगी केली.

इतका प्रकार होतां होतां सूर्योदय होण्याचा समय आला. रंभा तेथून जी निघाली ती एका भुयारांतून माशिदींत येऊन दाखल झाली.

प्रकरण ५ वें.

रंभा आणि मोंगल.

रंभा ज्यावेळीं जहांनारेचा व जोहरेचा निरोप घेऊन सुरंगच्या द्वाराशीं येऊन दाखल झाली त्यावेळीं पूर्ण सूर्योदय झाला होता. अशा वेळीं द्वारांतून ती बाहेर आली न आली तोंच तिच्या पुढें एक मोंगल सरदार दत्त म्हणून पुढें उभा राहिला. त्यानें तिला खूपच दरडाविलें. या वेळीं रंभेची मात्र गाळण झाली ! असा कांहीं तरी भयंकर प्रसंग तुजवर येईल असें जें जहांनारा बेगम म्हणाली होती त्याचें तिला या क्षणीं स्मरण झालें. परंतु आतां या आणीबाणीच्या प्रसंगीं ती करणार काय ! जरी त्यावेळीं तिची पांचावर धारण बसली होती तरी तिनें थोडी उसनी ऐट आणून हातामध्यें कंबरेंतील खंजीर घेऊन ती त्याच्यावर चालून गेली. मोंगल तिच्यापुढें लघळपणानें जाऊन म्हणाला 'काय, मी आपल्या दीलरूबा रंभाबाईलाच का प्रत्यक्ष पहातों आहें ?'

'मी कोण वाटेल तें असो. तुला यावेळीं मला भटकाव करण्याचें काय प्रयोजन ? खुशाल आलास तसा वाटेनें चालता हो कसा. खबरदार माझी खोटी करशील तर हा खंजीर.....' असें म्हणून तिनें आपला खंजीर

त्या मोंगलावर उचलला. खंजीर उपसून रंभा आपणांवर आलेली पाहून तो मोंगल मोठ्यानें हंसत तिला ह्मणाला " वाः अशा नाजुक बायका जर असे खंजीर उपसून पुरुषावर चालून जाऊं लागल्या तर आह्मी मर्दबच्चांनीं काय करायचें ? काय तूं तो खंजीर मला देणार ह्मणतेस ? दे. हा मी तो घेण्यास तयार आहें. तो तुजजवळ नकोच आहे. कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ ह्मणतातना तशांपैकीं तो खंजीर तुझ्या सुकुमार देहाला व्यर्थ इजा करील. " असें ह्मणून त्या मोंगलानें डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्यांत तो खंजीर तिच्या हातांतून सहज काढून घेतला. या वेळेला मात्र तिची जी त्रेधा उडाली ती वर्णन काय करावी ? उरांत धडकी भरली. हातपाय थरथर कांपूं लागले. ती घेरी येऊनच पडली असती परंतु तिनें पुनः जरा अवसान आणून त्या मोंगलास पुनः दरडावून विचारिलें.

" अरे, मगरगट्ट्या ! मेल्या ! आहेस तरी तूं कोण ? आणि या वेळीं मला आडवून धरण्याचा हेतु तरी काय आहे तुझा ? "

" हेतु दुसरा काय असणार ? तुझें सौंदर्यच तुला मला आडवून धरण्याला हुकूम देत आहे. आतां तूं जातेस कुठें ? माझीच झालीस या घटकेला, मी अशा वेळीं तुला सोडणार आहें होय ? चालून आलेली लक्ष्मी कोणी दवडील कीं काय ? पण तूं अशी वरचेवर आपल्या हाताच्या अंगठीकडे काय पहाते आहेस ? आतां तिचा प्रयोग माझ्यावर करण्याचा तुझा विचार आहे वाटतें. पण इतके त्याकरितां तूं परिश्रम तरी कशाला घेतेस ? त्या तुझ्या अंगठीनें माझें काडीइतकें सुद्धां वांकडें होणार नाहीं. नको नको मारूं, त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. ' असें तो ह्मणत आहे तोंच रंभेनें अंगठीचा तडाखा दिलाच मोंगलाच्या हातावर ! परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मोंगल जशाचा तसाच उभा होता. तो ह्मणाला " तुझ्या या कटयारीनें किंवा अंगठीनें मला कांहींच होणार नाहीं. परंतु हे तुझे नेत्रकटाक्ष मात्र मला असह्य होताहित. त्यांत जें कांहीं अद्भुत भरलें आहे तें या निर्जीव पदार्थांत कोठून येणार ? अग, तूं गुलाबाचं फूल आहेस फूल !! त्याचा वास घेण्याकरितां तर मला खुदानें इकडे मुद्दाम पाठविलें आहे. मग तूं अशी कोमेजतेस काय ह्मणून ? भ्रमरानें मकरंदाची हांव धरून यावें आणि तूं आपलें मुख मिटावेंस ह्मणजे काय ? असें जर करायचें तर आपल्या

दोघांचा जगांत उपयोग काय ? चल; चल, हो कशी मला प्रसन्न.. कोपाशिवाय प्रेमसिद्धि नाहीं हें मी जाणून आहें.. पण आतां झाला तितका पुरें आहे..'

मोंगलाची ही विचित्र भाषा व हातचलाखी पाहून रंभेचें प्रसंगावधान पार नाहींसें झालें. इतक्या लोकांना तिनें चकाविलें परंतु या मोंगलापुढें मात्र तिची मात्रा चालेना. आतां यापुढें क्रोध दाखवन आपली मुळींच सुटका होणार नाहीं. नरम होऊन बोलावें तरच झालीं तर सुटका होईल असा मनांत विचार करून ती त्यास ह्मणाली ' आपण कोणी का असाना. पण मला वाटतें कीं आपण कोणी तरी उच्च प्रतीचे सरदार असावें. आपण तरुण आहांत. आपल्या मनांत आलें तर आपण क्षण न लावतां माझा सप्पा उडवाल. परंतु आपल्यासारख्या शूराला मजसारख्या अबलेला बळी देऊन काय बरें उपयोग आहे ? उलट आपल्या पुरुषत्वाला कमीपणा येणार ! '

रंभेच्या तोंडचें वरील भाषण ऐकून तो मोंगल मोठमोठ्यानें हंसत सुटला.. कांहीं वेळानें आपलें हंसें आवरून तो तिला ह्मणाला. ' वेडी कुठली. मी तुला ठार का मारणार आहें ? अग गुलाबाचें फूल मस्तकीं धारण करण्याचें टाकून कधीं कोणीं तें पायाखालीं तुडाविलें आहे काय ? मजविषयीं तुझा जो वाईट ग्रह झाला आहे तो सोडून दे कसा. मीं तुला खुदाला साक्ष ठेवून आपली अर्धांगी बनवणार ! ' असें ह्मणून तो तिच्याकडे डोळे मिचकावीत मोठ्या प्रेमानें पाहूं लागला. हा मोंगल असावा तरी कोण हेंच मुळीं रंभेला कांहीं केल्या समजेना.. मोंगलाच्या हातावर तुरी देऊन जाण्याकरितां ती मनामध्यें उपाय योजी पण त्याचा कांहीं उपयोग होईलसें तिला दिसेना. ती इकडे तिकडे पाहूं लागली. तिची नजर सुरंगच्या संगमरवरी दगडाकडे गेली. तीं त्या मोंगलानें अवलोकन केली. तेव्हां मोंगल पुन्हां तिला ह्मणतो-

" काय, तुझी इच्छा सुरंगमध्यें जाण्याची दिसते.. कांहीं हरकत नाहीं.. मीं तिकडेच येतों. आणि तूं आंत चलावेंस ही माझी मुख्य इच्छा. ही मशिद आहे.. येथें एखाददुसरा यायचा. त्यानें आपणास पाहिलें तर व्यर्थ संशयाला कारण, मग तूं आपली चल कशी सुरंगमध्यें. आपल्यासारख्या प्रेमपात्रांना त्याशिवाय येथें दुसरी सुरक्षित जागा तरी आहे कोठें ? "

असें ह्मणून त्या मोंगलानें रंभेचा हात लघळपणानें जाऊन धरिला; परंतु तिनें हिसका देऊन तो सोडवून घेतला. यावेळीं रंभेचा क्रोध अनिवार झाला. ती ह्मणाली ' दुष्टा ! खबरदार पुन्हां माझ्या अंगास स्पर्श करशील; तर; ही कट्यारच उरांत खुपशीन. नाहींतर मी तरी मरेन. '

असें ह्मणून रंभेनें आपल्या चोळींतील कट्यार चट्कन बाहेर काढून त्यावर उगारिली. रंभा अतिशय क्रोधाविष्ट झालेली पाहून पुन्हां मोंगल हंसत हंसत तिला ह्मणाला ' अग, तूं मेलीस ह्मणजे मला तरी जिवंत राहून काय करायचें आहे ? तुझ्यासारखी गुलाबाचीं फुलें प्रफुल्लित आहेत ह्मणून तर आह्मी भ्रमर जीवंत आहोंत. ठेव ठेव कशी ती कट्यार दूर ! '

" मेल्या बोकडा ! कर कसें एकदाचें येथून काळें ह्मणजे मी सुटलें. नाहींतर ही कटयार तुझ्या पोटांत गेली ह्मणून समज. "

" त्या कट्यारीपेक्षां ते तुझे पाणीदार नेत्रच मला विद्ध करण्यास जबरदस्त आहेत. पहा, पहा पाहूं एकदा मजकडे. माझा अंत तरी किती पहातेस ! "

" दुष्टा ! माझ्याशीं असले शब्द बोलण्यास तुला लाज तरी कशी मेल्या वाटत नाहीं. "

' आपल्या प्रत्यक्ष अर्धांगीशीं लाज आणि असले शब्द बोलताना ? ' असें ह्मणून मोठ्या चलाखीनें त्यानें रंभेची कट्यार दूर फेकून तिच्या गुलाबी गालाचें चुंबन घेतलें व चट्कन आपल्या खिशांतील हातरुमाल काढून तोंडास लाविलेलें सर्व रोगण पुसून दूर उभा राहिला. त्याचा हा चावटपणा पाहून रंभेचा क्रोधानल अनिवार पेटला. आतां ती मोंगलाला जाळन भस्म करणार कीं काय असें दिसू लागलें. तिनें मोंगलाकडे आपली क्रोधानें लाल झालेली मुद्रा फिरविली तों काय ? एकदम तिचा क्रोध नाहींसा होऊन तिचा मुखचंद्रमा प्रफुल्लित दिसं लागला. तिनें लागलीच मोंगलास जाऊन मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें व एकमेक एकमेकांच्या मुखाकडे मधुर स्मित करून पाहूं लागले.

वाचकवृंद ! हा चमत्कार काय बरें असावा ? रंभेनें आपल्या पवित्र कुळाला असलें निंद्य कृत्य करून काळिमा कसा लाविला ? हाय ! हाय ! क्षत्रियकुल–बाला होऊन मोंगलाला जे मोंगल त्याज्य मानले गेले आहेत त्याला आलिंगन, चंबन देऊन हंसत उभी राहिली तेव्हां तिला ह्मणावें तरी काय ? पण हा मोंगल तरी कोण ? विचारा विचारा रंभेला कीं हा मोगल

आहे तरी कोण ? हा मोंगल कोण आहें हे जर आज आपणास कळलें नाहीं तर या कादंबरीला हातांत काय म्हणून धरावें ?

ऐका ऐका ते काय बोलताहेत तें, म्हणजे आपणांस कांहीं कळलें तर कळेल.

' वाः चांगलेंचं मला चकविलें. आपल्या दटावणीनें माझी पुरीच त्रेधा उडाली ! असो. आपल्याकडील सर्वत्र खुशाल आहेतना ? अशा वेळीं आपण या पोषाखांत इकडे कोणीकडे ? '

आतां हा मोंगल होता कोण हें समजून घेण्याचा प्रयत्न वाचकांनींच करावा. रंभेचें भाषण संपल्यावर तो मोंगल तिला म्हणाला ' प्यारी ! थोडा वेळ या सुरंगमध्यें चल म्हणजे सर्व कांहीं तुला कळेल. '

' कांहीं हरकत नाहीं, पण आपणास सुरंगसंबंधानें कांहीं माहिती आहे कां ? '

' नाहीं, कांहीं सुद्धां नाहीं. फक्त रात्रीं मी येथून फिरत होतों, तों मला दगड दिसला. तो आज तेथून तुझी मूर्ति मला गोचर झाली. मूर्ति पहातांच ही कोणाची आहे, हें पाहून तूं रंभा आहेस अशी माझी पूर्ण खात्री झाल्यावर मीं तुझ्याशीं विनोद करण्यास सुरवात केली. त्या विनोदाबद्दल मला क्षमा करशीलच. '

' चोराला कोणीं माफी केली आहे कधीं ? एक वेळ केली पण पुन्हा नाहीं हो मला असा लघळपणा पसंत पडणार ' असें म्हणून रंभा गालांत हंसूं लागली ' परंतु आपणास मीं न ओळखतां अपशब्द उच्चारले त्याबद्दल क्षमा आपणाकडून होईलच. '

' केली क्षमा. परंतु तुझे ते सर्व शब्द मात्र माझ्या हृत्पटलावर उठलेले कधींही पुसून जाणार नाहींत. '

इतकें त्यांचें संभाषण झाल्यावर रंभेनें सुरंगचें दार उघडून मोंगलांसह आंत प्रवेश केला. ते आंत गेल्यावर पूर्ववत् द्वार बंद झालें. आतां आंत त्या दोघांचें काय काय संभाषण झालें तें येथेंच सांगत नाहीं. परंतु इतकेंच येथें सांगून ठेवितों कीं ते दोघे दोन घटकेनें बाहेर आले. जातां जातां मोंगलानें रंभेचा गोडसा पापा घेतला. रंभाही आनंदानें तारेकडे गेली. तिनें चंद्रावतीस व तारेस दरबार महालामध्यें घडलेली सर्व वृत्तांत कळविला. मात्र मोंगलासंबंधानें कांहींच कळाविलें नाहीं.

प्रकरण ६ वें.

सलावतखान आणि सरदार.

दुसऱ्या भागांतील दहाव्या प्रकरणांत सलावतखानास क्रोधांध बनण्यास काय काय कारणें झालीं याचें थोडेंबहुत वर्णन केलेंच आहे. ज्या दिवशीं रंभा दरबार महालांतून घरीं आली त्या दिवशीं दोनप्रहरीं सलावतखान घोडयावर स्वार होऊन अमरसिंहाच्या बागेभोंवतीं टेहळणी करण्याकरितां आला व गच्चीवर तारा व रंभा आपआपसांत कांहीं बोलत आहेत असें त्यानें अवलोकन केलें; परंतु तारा त्याला पाहून घरांत गेल्यामुळें त्याला आपल्या नेत्राचें पारणें फेडतां आलें नाहीं ! तेव्हां त्याचीं स्थिति काय झाली यांचेंही थोडें वर्णन दिलें आहे. या प्रकरणांत त्यापुढील सर्व वर्णन देण्याचा विचार आहे.

रंभा गुप्त मार्गानें जहांनारेकडून निघून तारेकडे आल्यावर थोड्या वेळानें सलावतखानानें सुरंगामध्यें जाणाऱ्या रस्त्यावर आपले शिपाई पहारा करण्याकरितां ठेविले. जर का तारा आणखी अर्ध्या घटकेनें बाहेर येती तर मात्र खास तिच्या गळ्याला चांगलाच फांस बसला असता. परंतु तिचें जर यावेळीं नशीब बलवत्तर होतें तर मग सलावतखानाचें त्यापुढें काय बरें चालणार ? तेवढेच मार्ग बंद करून तो स्वस्थ बसला नव्हता. त्यानें जहांनारेकडील कोणीही दासदासी तारेकडे न जाऊं देण्याविषयीं चांगलीच खबरदारी ठेविली होती. परंतु त्यांतही त्याला यश आलें नाहीं. जहांनारेनें रंभेला बादशहाच्या शिक्कामोर्तबानें मंडित केलेला परवाना दिला असल्यामुळें तो पाहून शिपायांनीं तिला कांहीं चिकित्सा न करितां सोडून दिलें. पुढें असा प्रसंग येईल हें जहांनारेस जरी कळलें नव्हतें तरी पण रंभेस व तारेस उदयपुरला सुखरूप जातां यावें अशा सद्भेतूनें तिला परवाना देण्याची इच्छा झाली हें रंभेच्या चांगलेंच पथ्यावर पडलें.

सलावतखानानें सुमारें पांचशें लोक गुप्त रीतीनें जमविले होते व ते सर्व लोक सलावतखानाच्या पूर्ण वचनांत होते, अमक्या घटकेस अमुक केलें पाहिजे असा सलावतखानानें हुकूम दिला असतां ते त्यावेळीं करीत. कोणाचा खून करण्यास सांगितल्यास तो सुद्धां करण्यास ते मागेंपुढें पहात नसत. रात्री-

च्या रात्रीं तारेस पळवून न्यावयाची हें सुद्धां सलावतखानानें त्यांच्याकडून कबूल करून घेतलें होतें. परंतु रौशनआरा बेगम पाहून तारेसह औरंगजेबाकडे जाण्याविषयीं हुकूम न मिळाल्यामुळें सर्व काम दिरंगाईवर पडलें होतें. तिच्याकडून आपणास आज्ञापत्र लवकरच मिळेल अशी त्याला बळकट आशा होती. तारेला आज्ञापत्र मिळतांच औरंगजेबाकडे सहज घेऊन जाईन अशी त्याला उमेद होती. 'अमरसिंहास ठार मारून तारेस जर न वळवीन तर माझें सर्व कपट बादशहाचे कानावर जाऊन माझा चांगलाच घात होईल. यदाकदांचित् अमरसिंहास मारून तारेसह आपण आग्र्यास राहिलोंच तर दारा कांहीं आपणास सुख लाभूं देणार नाहीं. तो माझें शिर उडवील व आपण कष्ट करून मिळविलेली त्रैलोक्यमोहिनी तारा आपली पट्टराणी करील' हें सर्व तो जाणून होता; परंतु दारास भिऊन आपण औरंगजेबाकडे तारेशिवाय गेलों तर तो आपणास जोडयापुढें सुद्धां उभें राहूं देणार नाहीं, याचेंही त्याला आगोदर स्वप्न पडलें होतें. म्हणून त्यानें होतां होईल तितकें करून आपल्या विश्वासूक सरदाराशिवाय कोणास तारेला पळवून नेण्यासंबंधानें न कळविण्याची चांगलीच खबरदारी ठेविली होती.

युवराज राजसिंह आग्र्यास आला किंवा नाहीं याविषयीं आमचे वाचक चिंतातुर झाले असतील. परंतु वाचकहो, यासंबंधानें येथें उल्लेख करण्याचा आमचा विचार नाहीं. तो समयानुसार होईलच, तेव्हां त्याविषयीं आपण गडबड न कराल अशी आम्हांस आशा आहे.

बरेच दिवस आग्राशहराबाहेर दोन मैलांवर सुमारें पांचशें मांगल सौदागर आपला तळ देऊन राहिले होते व येथूनच एक मार्ग उदयपुराकडे जात होता. ते आपल्याबरोबर तऱ्हेतऱ्हेचा माल घेऊन शहरांत फिरत व कोणी त्यास त्यांची माहिती विचारिल्यास ते त्याला आम्ही काबूलकंदाहारकडचे रहाणारे आहोंत असें सांगून खुशाल संध्याकाळपर्यंत फिरत व संध्याकाळ झाल्यावर आपल्या मकाणावर परत येत. त्यांच्याजवळ विशेष माल म्हणजे जवाहीर होता. हे सर्व लोक हत्याराशिवाय कधींच बाहेर पडत नसत. आपल्या मकाणासभोंवार हे स्वतः पहारा करीत. या मोंगल सौदागरांचा मुख्य सौदागर बादशहास भेटला होता व बादशहानें त्यांना शहरांत येऊन रहाण्यास मोकळीक दिली होती परंतु ते मुद्दामच शहराबाहेर राहिले होते.

सूर्यास्त होण्याचा समय फारच जवळ आला आहे. वाचकहो ! चला आतां आपण शहराबाहेर राहिलेल्या सौदागरांच्या मुख्य सरदाराच्या तंबूंत प्रवेश करूं या. तो पहा सलावतखान त्या सरदाराच्या उजव्या हाताजवळ बसला आहे. तो पहा आतां त्याच्याशीं कांहीं बोलतो आहे.

ज्या डेऱ्यामध्यें सलावतखान व तो सरदार कांहीं बोलत बसले होते तेथें त्याच्याशिवाय दुसरें कोणीच दिसत नव्हतें. फक्त डेऱ्याबाहेर बरेच लोक आपआपले घोडे खराऱ्यानें साफ करीत होते. त्यांपैकीं कोणी दाणा देत होते; कोणी पाणी देत होते; कोणी त्यावर खोगीर चढवीत होते. यावरून पहाणारास असें वाटत होतें कीं आजरात्रीं त्यांना कोठें तरी सफर करण्यास जावयाचें आहे खास.

थोडा वेळ त्यांचें संभाषण झाल्यावर तो मोंगल सरदार सलावतखानाला झणाला 'सरकार! आपल्या या महत्त्वाच्या कामांत आम्ही आपली सौदागरी सोडून आपल्याकरितां अपमान सोसावयाचे, वेळप्रसंगीं जीव सुद्धां देण्यास तयार व्हायचे. व आपणास दक्षिणभागाचे सुभेदार औरंगजेबाकडे नेऊन पोंचवायचें; तेव्हां आपण आम्हांस पांच हजार मोहरा बक्षिस देणार ! परंतु यांत कसें बरें आमचें भागेल ? आपण आम्हास एकंदर दहा हजार मोहरा द्याव्यात. त्यांपैकीं आज पांच हजार व काम झाल्यावर बाकी राहिलेल्या पांच हजार द्याव्यात. तरच आम्ही आपणांस त्या सुंदरीला आपल्या स्वाधीन करून आपणास सुरक्षित औरंगजेबाकडे नेऊन पोंचवूं. मग काय आमचें मागणें आपणांस आहे कबूल ? '

' आपण जी रक्कम मागतां ती फारच मोठी आहे '.

' मोठी तर आहेच. परंतु त्या सुंदरीच्या पुढें ती आपणास कांहींच नाहीं. सौदागिरी सोडून आम्ही आपल्या बरोबर आलों असतां आमचें नुकसान किती होणार आहे याचा आपण कधीं विचार केला आहे ? '

' बरें तर, आपण झणतां तें मला कबूल करणें भाग आहे. आज आपण पांच हजार द्या आणि मला औरंगजेबाकडे नेऊन पोंचविल्यावर बाकी राहिलेल्या पांच हजार मोहरा देऊन आपल्या ऋणांतून मुक्त होईन. परंतु आपण या कामीं यत्किंचित् हयगय करतां कामा नये. '

' त्याची आपणांस बिलकुल काळजी नको. आपण निर्धास्त असां. आणखी पांच हजार अगोदर ! '

'ठीक आहे' असें ह्मणून सलावतखानानें बाहेर असलेल्या आपल्या गुलामास आंत बोलाविलें. गुलाम आंत आल्यावर सलावतखानानें त्याला नेत्र-संकेतानें कांहीं सुचविलें. त्यावर तो गुलाम चट्कन बाहेर गेला व कांहीं वेळानें त्यानें पांच हजार मोहरांनीं भरलेली कातड्याची पिशवी सलावतखाना-पुढें आणून ठेविली व बाहेर जाण्याचा मार्ग सुधारला. तो बाहेर गेल्यावर सलावतखान त्या सरदारास ह्मणाला 'घ्या मोजून !'

'आपण मोजलेच असतील. परंतु सरकार! आतां आह्मीं कोणत्या स्थळीं, केव्हां, कशा वेषानें आपल्या सेवेस सादर व्हावें ?'

'उत्तर रात्रीच्या सुमारास माझा गुलाम आपणास सूचना करण्यास येईलच. त्यावेळीं आपण सशस्त्र होऊन आपल्या घोड्यानिशीं तो जेथें नेईल तिकडे यावें. त्या ठिकाणीं मी सुद्धां कांहीं हत्यारबंद शिपायांबरोबर तेथें हजर राहीन. लक्ष्यांत ठेवा. ज्या ठिकाणीं आपण येणार तेथील सर्व लोकांस ठार मारून एका सुंदर स्त्रीस पकडून घेऊन आग्रा शहरांतून बाहेर चालते व्हायचें. त्या स्त्रीचें नांव तारा असें आहे.'

'कांहीं हरकत नाहीं. परंतु रात्रीच्या वेळीं आह्मी तेथें येत असतांना आह्माला कोणी अटकाव तर नाहीं ना करणार ?'

हें ऐकल्यावर सलावतखानानें आंगरख्याच्या खिशांतून एक कागद काढून त्या सरदारास दिला व तो ह्मणाला 'आपण निर्धास्त या. आपणांस कोणी सुद्धां अटकाव करणार नाहीं. कारण, आज जिकडे तिकडें माझाच अंमल आहे. यदाकदाचित् जर कोणी तुह्मांस अटकाव केलाच तर हा कागद त्यास तुह्मी दाखवा ह्मणजे तुमच्या वाटेस कोणी जाणार नाहीं.'

'आपण हा कागद आह्मांस देतां आहां खरें, परंतु आह्मांस शहरांतून बाहेर पडतांना तर कोणी कैद करून ठेवणार नाहीं ना ?'

'त्याची आपणांस नको काळजी ! हा कागद शहरांत जाण्याच्या उपयोगाचा आहे. व मीं तो आज मुद्दाम बादशहाकडून मिळविला आहे. आतां बाहेर जाण्याकरितां सुद्धां दुसरा कागद आहे तो मी बाहेर जातांना आपणांस देईन. मग पहातां कोण आपणास अटकाव करतो तें.'

'मग आतां आपण स्वस्थ असा' असें ह्मणून तो सरदार उठला. त्याबरोबर सलावतखानही उठून उभा राहिला. त्या सरदारानें सलावतखानास

मुजरा करून बाहेर जाण्यास सुचविलें. यावेळीं सूर्यास्त होऊन बराच काल लोटला असून आग्रा शहर अंधकारांत पूर्ण लपून राहिलें होतें.

सलाबतखानाचे गुप्त पांचशें स्वार होते असें आह्मीं मागें एकदा लिहिलेलें वाचकांना स्मरत असेलच. हेच सौदागर ते स्वार होत.

बादशाही फौज केवळ आपल्या आज्ञेवरून अमरसिंहावर चालून जाणार नाहीं किंवा कोठें बाहेरही येणार नाहीं, हें सलाबतखान पूर्णपणें जाणत असल्यामुळें त्यानें शहराबाहेर तळ देऊन राहिलेल्या काबुली स्वारांशीं हळू हळू वळण बांधिलें होतें. परंतु हे काबुली स्वार होते तरी कोण?

सलाबतखान घरीं परत आल्यावर तो आपल्या दोनशें स्वारांनिशीं तारेच्या मंदिराकडे निघाला व त्याचा गुलाम गांवाबाहेरील मोंगल स्वारांना मशिर्दीत घेऊन आला. तेथें आल्यावर त्यानें त्यांस सांगितलें कीं गांवांत "येण्याविषयीं सरकारचा निरोप आल्यावर आपण गांवांत जाऊं."

गांवाबाहेरील सैन्यांतील कांहीं लोक आपल्या मकाणावरच राहिले होते. असा ते कां राहिले कोण जाणें!!

प्रकरण ७ वें.

कालरात्र.

इकडे सलाबतखान आपल्या कामांत चूर असतां तिकडे अमरसिंह सलाबतखानाचें पत्र व अत्याचार पाहून अत्यंत क्रुद्ध झाला. त्यानें आपल्या तीन हजार स्वारांस तयार होऊन येण्यास हुकूम सोडिला. परंतु त्या तीन हजार स्वारांपैकीं एकही स्वार अमरसिंहाकडे आला नाहीं. याचें कारण इतकेंच कीं सलाबतखानानें अमरसिंहाविरुद्ध कांहीं गोष्टी सांगून बादशहाचे चागलेच कान भरले होते. त्यामुळें बादशहानें अमरसिंहाकडे असलेल्या सर्व स्वारांस अमरसिंहास कोणत्याही कामांत मदत करूं नये असा हुकूम सोडिला होता. हें पाहून अमरसिंहाचा क्रोधानल अनावर झाला. त्यानें आपल्या खासगींतील दोनतीनशें स्वार बोलावून आपल्या

घराची पूर्ण रक्षा करण्याचा विचार केला.. इकडे चंद्रावती व ताराबाईस इकडे आड तिकडे विहीरीप्रमाणें झालें. त्यांना कांहींच सुचेना ! रंभा वरवर दुःखी मुद्रा करून त्या दोघींना धीर देत होती.. परंतु अंतर्यामीं तिला फारच आनंद झाला होता.. व तिला खास उमेद होती कीं "आज सर्वांना हीच कालरात्र फारच सुखावह झाल्यावांचून रहाणार नाहीं.."

अमरसिंहानेंही आपल्या स्त्रीस व मुलीस पुष्कळ धीर दिला; परंतु त्याचा काय उपयोग होणार ? अमरसिंह आज पूर्ण रणोन्मत्त झाला होता..

हां हां म्हणतां भगवान् दिनमणीनें संध्यादेवीच्या मंदिरामध्यें प्रवेश केला.. या वेळीं तारेनें रंभेच्या गळ्याला मिठी मारून मोठमोठ्यानें रडण्यास सुरवात केली. रंभेनें तिला धीर देण्यास आपल्याकडून शिकस्त केली,, परंतु उपयोग काय ? तिचें काळीज चरचर कांपत जात होतें !

तारा रडत म्हणाली ' सखे रंभे ! मला वाटतें आज हीं कालरात्र आपल्या सर्वांच्या आनंदाचा,, सर्वांच्या सौभाग्याचा,, वैभवाचा आणि जीवनाचा खास अंत करणार ! सखे ! रजपूत कुमारी मरण्यास भीत नाहींत.. आपत्काल आला असतां आपले लोक हंसत हंसत मरतात हें तुला माहीतच आहे. मी सुद्धां मरणाला भीत नाहीं. मला आज एवढेंच दुःख होतें कीं, माझी मनःकामना अतृप्त राहिली आहे.. ज्याच्या तसबिरीची आजपर्यंत पूजा केली, त्याच्या चरणाची सेवा करण्याचा प्रसंग या अभागिनीला न यावा यापेक्षां दुःखद गोष्ट ती आणखी काय असायला पाहिजे ? ' असें म्हणून तारा एकदम मिठी सोडून रंभेला म्हणाली ' पण हें काय ? आज या दुर्दिनप्रसंगीं असा शुभ शकुन कां बरें होतो आहे ! "

' हें पाहिलंस का तारे ! माझा सुद्धां वामनेत्र स्फुरण पावूं लागला आहे ! "

' तीच स्थिति माझी होत आहे. पण आज या अशा संकटकाळीं असा शुभ शकुन का बरं होत आहे ? '

' कुलदेवतेचें स्मरण कर. सखे ! तूं संसारांतील कोणतें सुख पूर्ण अनुभविलं आहेस म्हणून तुला परमेश्वर या संसारांतून पार नाहींशी करील ! तूं आतां ईश्वरावर सर्व विश्वास ठेव कसा. आणि लक्ष्यांत ठेव कीं, जिला आपण आज कालरात्र असें समजतों तीच रात्र आपणांस आनंदरात्र होणार ! आणि तारे ! मला आज खास वाटतें कीं तुला राजसिंहाला आलिंगन देण्याचा सुयोग येणार ! '

'सखे ! ही वेळ चावटपणा करण्याची नव्हे. प्रथम ज्या उपायानें धर्म-संरक्षण होईल असा उपाय शोधून काढ पाहूं ! ' असें बोलून तारेनें पेटीमधील दोन विषारी अंगठ्या बाहेर काढल्या. त्यांपैकीं एक आपल्या हातांत व दुसरी रंभेच्या हातांत घातली. नंतर विषगर्भ नांवांच्या अंगठ्या दोघींनीं आपल्या करांगुळीमध्यें आडकविल्या. ही अंगठी तोंडामध्यें ठेविली असतां देह-पंजरस्थ-प्राण-पक्षी हां हां म्हणतां उडून जात असे. नंतर एकेकीनें एकेक कट्यार आपल्या चोळीमध्यें दडविली. तलवार, तीर, कमान वगैरे सर्व सामान खुंटीवर लटकावत ठेविलं. एक बंदुकही भरून तयार ठेविली. व एकमेकी एकमेकींना मिठ्या मारून रडूं लागल्या. इतक्या अवधींत सुमारें दीड प्रहर रात्र उलटली.

हळूं हळूं कालरात्रि वाढूं लागली. आज विक्रम संवत् १७०१ इसवी सन १६०४ बुधवार श्रावण वद्य अमावास्या ! खरोखर अमावास्येला योग्य अशीच ती रात्र भयंकर होती. अंधार इतका पडला होता कीं दिव्यांचून इतर कोठें जातां येत नव्हतें. दीड प्रहर रात्र होऊन गेली असेल, जिकडे तिकडे उजाड दिसत होतें. गल्लीकुच्चीमध्यें थोडासा तरी दिव्याचा प्रकाश दिसेल तर शपथ ! बादशाही नगरी अमावास्येतील कृष्णसमुद्रांत पूर्ण बुडाली होती व कुल्यांच्या भुंकण्याशिवाय नगरीची सजीवता कळण्यास दुसरा मार्गच नव्हता. जों जों रात्र वाढूं लागली तों तों अंधकार दाट पडूं लागला व राणी चंद्रावती व तारेची भीति अधिकाधिक वाढूं लागली. ते पत्र आणि सलावतखान घरांतून जात असतांना त्याचें तें वर्तन पाहिल्यावर त्या उभयतांस वाटलें कीं आज रात्रीं कांहींना कांहीं तरी आपल्यावर संकट येणार खास. परंतु रंभेला त्याचें कांहींच वाटत नव्हतें. ती वरचेवर त्या दोघांस बराच धीर देई. वरचेवर ती खिडकींत जाऊन बाहेर पाही. मध्येंच बागेकडे जाई, मध्येंच कांहीं ऐकल्यासारखें करी व पुन्हां चंद्रावतीस व तारेस धीर देऊन सांगे कीं, " नारायण आपले मुळींच हाल, वेअब्रु करणार नाहीं. त्याचे हात फारच लांब आहेत. त्ययोगानें तो आपला विपत्सागरांतून उद्धार करीलच करील. "

इकडे अमरसिंहाच्या मनाची चलबिचल कांहीं विलक्षण झाली होती. तो जिकडे तिकडे वरचेवर बारकाईनें पाही. त्यावेळीं त्याच्या हातांत नंगी तलवार होती. व तो आपल्या दिवाणखान्यामध्यें वरील प्रकारची हालचाल करीत होता. त्याचे खाजगी विश्वासुक दास आपलीं शस्त्रें हातांत घेऊन कसाही प्रसंग

आल्यास तोंड देण्यास तयार असे होते. त्यांनीं आपल्या यजमानाचें मंदिर चोहों बाजूंनीं घेरलें होतें असें ह्मणण्यास कांहीं हरकत नव्हती. त्यांनीं आपल्या लोकांच्या मुख्य तीन तुकड्या केल्या होत्या. एक तुकडी यमुनानदीकडे असलेल्या भागाकडील द्वाराकडे उभी होती. दुसरी मंदिराच्या पुढल्या दरवाज्याकडे उभी होती व तिसरी व चवथी इकडून तिकडे कोण चोर येत आहेत हें पाहण्याकरितां व जे कोणी येतील त्यांचीं हाडें चांगलींच नरम करण्याच्या निमित्तानें फिरत होती. या लोकांत जे कोणी जवान होते ते वरचेवर गर्जना करून सर्वांस सावध राहण्यास इशारा देत होते.

हां हां ह्मणतां उत्तर रात्रीचा समय अगदींच जवळ येऊन ठेंपला व एकाएकीं "अल्लाहू अकबर! धरा! धरा! मारा! पकडा! काटाकाट! अल्लाह! अल्लाह! दीनइस्लाम! अल्लाहु अकबर!" असल्या गगनभेदी कर्कश शब्दांनीं सर्व आग्रा शहर अगदीं कंपायमान झालें. वरील शब्द महालाच्या मागील भागाकडून ह्मणजे यमुनानदीकिनाऱ्यावर असलेल्या अमरसिंहाच्या बागेंतून ऐकूं आले व कांहीं वेळानें शस्त्रांचा खणखणाट सुद्धां त्या शिपायांच्या कानांवर आला.

आजची रात्र ह्मणजे अमावास्येची हें आह्मीं एकदां मागें कळविलेंच आहे. तशांतून आकाशमंडल कृष्ण मेघांनीं पूर्ण व्यापिलें होतें. मग अशा वेळीं अंधकार किती पडला असेल हें आह्मीं वर्णन करून काय सांगावें? अशा प्रसंगीं सलावतखान आपल्या लोकांबरोबर— या लोकांची संख्या सुमारें दोनशें होती— एका चोरवाटेनें कांहीं एक गलबला न करितां अमरसिंहाच्या बागेंत शिरला व त्यानें अमरसिंहाच्या तुकडीवर हल्ला करण्यास आपल्या लोकांना आज्ञा दिली. मग काय विचारावें? ते लोक त्या तुकडीवर एकदम तुटून पडले. अंधकार अत्यंत पडल्यामुळें कोणी कोणास दिसत नव्हतें. त्यामुळें उभय तुकडींतील लोक जें कांहीं लागेल, मग तो मनुष्य असो किंवा एखादें झाड असो त्यावर शस्त्रप्रयोग करण्यास मागें पुढें पहात नव्हते. अशा तऱ्हेनें त्यांची चकमक उडते आहे तोंच त्यांची खबर अमरसिंहाच्या अंतःपुरांत जाऊन पोहोंचली. रंभेनें महालाची खिडकी उघडून बागेकडे नजर टाकिली; परंतु तिला अंधकाराशिवाय दुसरें काय दिसणार! इकडे अमरसिंह तीं चकमक ऐकतांच आपल्या महालांतून तारा, चंद्रावती व रंभा ज्या ठिकाणीं होत्या त्या महालांत

प्रवेश करून मोठ्या तीव्रतेनें आपल्या पत्नीस व कन्येस-क्षत्रियबालेस- अशा समयीं आपलें काय कर्तव्यकर्म आहे याबद्दल योग्य उपदेश करून तेथून बाहेर पडला. बाहेर आल्यावर महालाचा बंदोबस्त कसा करावयाचा तो करून आपण घोड्यावर सशस्त्र स्वार होऊन ज्या ठिकाणीं अमरसिंहाच्या लोकांची व सलावतखानाच्या लोकांची चकमक उडत होती तेथें येऊन दाखल झाला. तेथें आल्यावर अमरसिंहानें दोन्ही हातांत तलवारी घेऊन असे सफाईदार वार करण्यास सुरवात केली कीं तें पाहून सलावतखान अगदीं गर्भगळित झाला व आपल्या लोकांत मागें मागें सरण्यास सूचना करूं लागला. अमरसिंहाचें झपाझप वार करण्याचें काम सारखें सुरूं होतें. तें जर आणखी कांहीं वेळ चालूं राहतें तर खास सलावतखानही आपल्या लोकांबरोबर अमरसिंहाच्या तरवारीला बळी पडले असते ! परंतु काय उपयोग ? एकाएकीं अंतःपूरांतून ' इकडे सुद्धां मोंगल शिरले ! ' असे रंभेच्या तोंडचे शब्द अमरसिंहाच्या कानीं पडले. ते पडतांच अमरसिंह तीराप्रमाणें धांवत अंतःपुरांत आला तों त्याला आपली प्राणासमान कन्या तारा म्लानवदना दुःखाश्रूनें न्हात असलेली दिसली. अमरसिंहास पहातांच त्याला गच्च मिठी मारून तारा मोठमोठ्यानें रोदन करीत म्हणाली " पिताजी ! काय हा प्रसंग ? काय आतां आम्हीं आपल्या धर्माकरितां निरुपायास्तव मरावेंना ! "

हाय ! हाय ! ! प्रिय कन्येच्या तोंडचे वरील प्रकारचे करुणाव्यंजक शब्द ऐकतांच क्षणभर राठोडवीराचें वज्रहृदय सुद्धां द्रवल्यावांचून राहिलें नाहीं ! परंतु बिचारा करतो काय ? बागेकडील खिडकीला शिडी लावून त्यावरून कांहीं मोंगल महालांत शिरलेले त्यानें पाहिले. हे आंत येतांच रंभेनें मागें अमरसिंहाच्या कानीं जाईल अशा स्वरानें कळविलें होतें. तें कळतांच अमरसिंह इकडे आला होता. हें पाहून तारेस धीर देऊन तो त्यावर चढून आलेल्या मोंगलावर तुटून पडला. हे मोंगल सहासात होते. अमरसिंहानें क्षणार्धांत त्या मोंगलांस ठार करून ती शिडीही तोडून टाकिली. इतक्यांत हाणमार करीत सलावतखानाचे बरेचसे लोक जनानखान्याकडे आलेली चाहूल त्याला लागली. ती लागतांच अमरसिंहानें चंद्रावती, तारा व रंभा यांस एका खोलींत कोंडून त्यांस सांगितलें कीं ' जोपर्यंत माझा स्वर तुह्मांस ऐकूं येईल तोंपर्यंत तुह्मांस आत्महत्या करण्याची जरूर नाहीं. माझा स्वर ऐकूं न आला

तर मग मात्र तुमच्या हातांत तुमचा क्षात्रधर्म आहे !" इतकें सांगून अमरसिंह जनानखान्याकडे गेला तों त्याला काय दिसलें ? शेंकडों मशाली पेटल्या आहेत ! अगणित मोंगल जिकडे तिकडे वावरत आहेत ! हें पाहून त्यानें मनाशीं विचार केला कीं आतां यांच्याशीं लढणें किंवा यांच्यापासून आपला बचाव करणें अगदींच अशक्य आहे. इतका जरी त्यानें मनाशीं विचार केला तरी तो स्वस्थ बसला कीं काय ? जोंपर्यंत क्षात्ररुधिर आपल्या शरीरांत वास्तव्य करीत आहे तोंपर्यंत तरी निदान या मोंगलांनां आपल्या समक्ष जनानखान्यांत जाऊं द्यावयाचें नाहीं. अशी त्यानें शपथ वाहिली व त्यानें तेथून त्या मोंगलांवर चाल केली. त्याचे लोकही प्राणाची मुळींच पर्वा न मानतां चालून गेले.

'अल्लाहू अकबर' असा शब्द उच्चारीत सलावतखानाचे लोक जनानखान्याचे दाराजवळ आले. तें पाहून अमरसिंह आपली तरवार सरसावून त्यांना अटकाव करूं लागला. परंतु, त्यांच्यापुढें एकट्या अमरसिंहाचें काय चालणार ? हां हां म्हणतां सलावतखानाचे लोक वाढूं लागले व त्यांपैकीं कांहीं आंतही शिरले व जेथें चंद्रावती, तारा व रंभा होत्या तेथें आले. त्यांनीं खोलीच्या दारावर लाथ मारून दार उघडलें. दार मोंगलांनीं उघडलेलें पाहातांच त्या स्त्रीमंडलास काय बरें वाटलें असेल ! त्यांनीं फारच कोलाहल केला ! इतक्यांत अमरसिंह खोलींत शिरून त्यांना म्हणाला 'मी अद्याप जिवंत आहें; भिऊं नका' असें म्हणून बाहेर निघतांना आपल्या प्राणासमान कन्येच्या हृदयांत आपली तरवार भोसकून तिला निष्कलंक स्वर्गीं धाडणार तोंच त्या मोंगलांपैकीं लालभडक पोषाख घातलेल्या मोंगल सरदारानें झटकन् आंत येऊन अमरसिंहाचा हात मागें ओढला व तो म्हणाला "मी राजसिंह जिवंत असतांना"—हे अर्धवट शब्द त्या मोंगल सरदाराचे ऐकतांच बाहेर असलेल्या सलावतखानाचें हृदय चरर् झालें.

मोंगलवेषधारी राजसिंहाचें नांव ऐकतांच अमरसिंह, चंद्रावती, तारा आणि रंभादिकांच्या मनाची काय बरें स्थिति झाली असेल !

प्रकरण ८ वें.

मनोवासनेची तृप्तता.

एकाएकीं राजसिंहाच्या तोंडचे शब्द कानीं पडतांच अमरसिंह, चंद्रावती, तारा, रंभादि सर्व मंडळी अगदीं चकित झाली ! त्यावर अमरसिंहानें गर्जना करीत त्यास विचारिलें.

'काय ? आपण म्हणतां हें अगदीं अक्षरशः खरें ? '

'होय. मी कधींच खोटें बोलत नसतों. '

'पण क्षत्रियकुलकेसरीनें असा हा मोंगलवेष केव्हांपासून धारण केला ? '

'क्षत्रियकुलकेसरीच्या अर्धांगीवर मोंगल लोकांनीं पैशाचिक अत्याचार सुरू केल्यापासून. '

'असं काय ? '

'होय, पण आपणास एवढें आश्चर्य तें काय वाटतें 'ये यथा मां प्रपद्यते तां स्तथैव० '

'तें खरें पण जोंपर्यंत आपलें खरें स्वरूप कळलें नाहीं तोंपर्यंत आहीं आपल्यावर विश्वास तरी कोणत्या आधारावर ठेवावा ? '

'आपलें म्हणणें योग्य आहे ' असें म्हणून राजसिंहानें नकली दाढी दूर फेंकून दिली. हातरुमालानें तोंड पुसलें व अमरसिंहास विचारिलें—

'आतां तर विश्वास ठेवालना खास ?'

जिकडे तिकडे अगदीं आनंदीआनंद ! ! !

'युवराज ! दीर्घायुष्यमस्तु ! ही आपली दासी आहे. हिचें पाणिग्रहण करून आमचा आशीर्वाद घ्या. ' असें म्हणून अमरसिंहानें तारेचा हात राजसिंहाच्या हातांत दिला. नंतर राजसिंहानें चंद्रावतीस व अमरसिंहास प्रणिपात केला. चंद्रावतीनें आनंदाश्रु ढाळीत वधूवरांचें मस्तक हुंगिलें व राजसिंहास एक रत्नमाला गळ्यांत घालण्यास देऊन सांगितलें 'वीरवर! या माझ्या लोकप्रिय वालिकेस यापुढें आपण आपल्या नेत्रांतील बाहुलीप्रमाणें संभाळावें एवढेंच सांगणें आहे. संकटकाळ आला असतां आपण आमचें रक्षण केलेंत याबद्दल आपले जितके आभार मानावेत तितके थोडेच आहेत. "

राणीच्या तोंडचे वरील शब्द ऐकून तेथील प्रत्येकाचे नेत्र पाण्यानें भरून आले. तारेनें मातेला मिठी मारून रडण्यास आरंभ केला. तीच स्थिति राणाची झाली.

नंतर राजसिंहानें रंभेची मुद्रा अवलोकन करीत विनोदानें अमरसिंहास विचारिलें " महाराज, आपणाजवळ आणखी मला कांहीं मागावयाचें आहे तें आपण मला द्याल कां ? "

यावर पुलकित होत्साता अमरसिंह म्हणाला " मजजवळ जें कांहीं होतें नव्हतें तें सर्व मीं आपणास अर्पण करून चुकलोंच आहें ! आतां मज-सारख्या अधम यवनकिंकराजवळ आपणास देण्यासारखें दुसरें काय असणार ? "

" आहे आहे आपणाजवळ " असें म्हणून राजासिंहानें विनोदप्रचुर स्मितहास्य करून रंभेकडे पाहिलें मात्र, तोंच तिनें सलज्ज मुखकमल खालीं फिरविलें.

' जर आतां माझ्याजवळ आपणास उपयुक्त अशी वस्तु असेल तर ती आपण निस्संदेह मागावी. प्रत्यक्ष माझे प्राण आपल्या हातांत आहेत असें समजा '.

यावर राजसिंहानें रंभेकडे बोट दाखवून म्हटलें ' ही सुन्दरी आपण मला अर्पण करावी असा माझा हेतु आहे '.

राजसिंहाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच अमरसिंह अगदींच विस्मय-चकित होऊन त्यास म्हणाला ' ठीक आहे. आपण तिचा स्वीकार करावा. आपल्यासारख्या गुणधर स्वामीनें तिच्यावर कृपादृष्टि ठेवणें म्हणजे खरोखर तिचें सौभाग्य उदयास आलें ! '

' छे ! छे ! आपण म्हणतां तसा माझ्या बोलण्याचा भावार्थ मुळींच नाहीं. '

' मग ? '

' इतकाच कीं त्या सुन्दरीला मी याच्या (मागें उभा असलेल्या मोंग-लाकडे बोट करून) करितां मागणी घालीत आहें. '

' ठीक आहे पण हे महाशय आहेत कोण हें मात्र कळूं द्या. '

' हे माझे प्रिय मित्र आणि मंत्रिपुत्र चंद्रावतजी होत. '

' वाः वाः ' असें म्हणत अमरसिंहानें चंद्रावतजीकडे स्मितवदन करून

पाहिलें व विचारिलें ' आपण एकदां आमच्याकडे आलां होतां नाहीं ?"

प्रणाम करून चंद्रावतजी म्हणाला ' होय महाराज ! '

' तर मग आतां कृपा करून आपण हे तोंडावरील मोंगली रोगण पुसून आपला अस्सल चेहरा दाखवा कसें !"

हें ऐकून चद्रावतजीनें तोंडावरील रोगण पुसून आपलें खरें स्वरूप प्रकट केलें. तें पाहून अमरसिंह राजसिंहास म्हणाला " ही मुलगी मी आपणास अर्पण करीत आहें. तिच्यावर आपला पूर्ण अधिकार आहे. "

' ठीक आहे ' असें म्हणून राजसिंहानें रंभेचा हात चंद्रावतजीच्या हातांत घातला व तो अमरसिंहास म्हणाला " कृपा करून आतां आपण आम्हांस येथून जाण्यास आज्ञा द्यावी. आम्हीं कोणत्या वेषानें बादशाही राज्यांत प्रवेश केला आहे हें आपण सर्व जाणतांच आहां. "

' उत्तम ! शुभस्य शीघ्रम् ! ! ! "

असें म्हणून त्यानें तारेस राजसिंहाबरोबर व रंभेस चंद्रावतजीबरोबर रवाना केलें. रवाना करतेवेळीं त्यानें युवराजास विचारिलें—

' युवराज ! आतां फार वेळ नाहीं हें जरी खरें आहे तरी पण आपण आज एकाएकीं इकडे कोणीकडून आगमन केलें व सलावतखानास काय म्हणून मिळालां होतां ? '

हें ऐकून राजसिंहानें आपल्या झग्याच्या आंतील खिशांतून एक मोठेंसें पत्र काढून अमरसिंहास दिलें व सांगितलें कीं ' आपण जे कांहीं प्रश्न केले त्यांचें समर्पक उत्तर हें पत्र आपणांस देईल. " असें म्हणून राजसिंहानें व चंद्रावतजीनें अमरसिंहास व चंद्रावतीस आणखी एकदां प्रणाम करून त्यांचे आशीर्वाद घेतले. जातांना राजसिंहानें तारेचा व चंद्रावतजीनें रंभेचा हात धरिला होता. त्यांच्याबरोबर अमरसिंह व त्याचे मोगलवेशी वीर—जे राजसिंहाबरोबर आंत घुसले—होते.

जनानखान्यांतून बाहेर आल्यावर राजसिंहानें आपल्या बहादुरांना विचारिलें ' तो नालायक सलावतखान कोठें गेला ? '

हें ऐकून त्यांतील एक शिपाई म्हणाला—

' पृथ्वीनाथ ! आपलें रहस्य अवलोकन करून आमची नजर चुकवून त्या दुष्टानें येथून पळ काढला '.

' झालीं हीं गोष्ट कांहीं चांगली झाली नाहीं. तों काफर आतां आपल्याला वाटेंत अटकाव करील. असो. आतां आपणास जलदी केली पाहिजे.. लवकर घोडा आण पाहू '.

' होय सरकार ' असें म्हणून एकानें निळा घोडा त्याच्यापुढें आणून उभा केला.

' आपण आज श्रींगणेशा केलांत उद्यां मी सलावतखानाचें पाहून घेईन.. ' असें म्हणून अमरसिंह विरहाकुल होऊन महालांत चालता झाला.. व राजसिंहानें तारेच्या कानांत सांगितलें कीं ' सुंदरि ! यावेळीं क्षमा कर.. जोंपर्यंत आपण बादशाही राज्यांतून बाहेर गेलों नाहीं तोंपर्यंत तुला घोड्यावर बसलेंच पाहिजे.. नाइलाजास्तव निर्लज्ज बनलेंच पाहिजे '. असें म्हणून त्यानें तारेस घोडयावर बसविलें. आपणही मागें बसला.. भय वाटून ती न पडावी म्हणून त्यानें तिच्या व आपल्या कमरेभोंवतीं एक दोरी बांधिली. त्याचप्रमाणें चंद्रावतजीनें केलें. घोडयावर चढतांना चंद्रावतजीची व रंभेचीं ती हास्यकारक मुद्रा कशी झालीं असेल हें प्रिय वाचकभगिनींनीं जाणलेंच असेल..

* * *

महालांत प्रवेश केल्यावर राजसिंहानें प्रथम ज्यावेळीं शब्द उच्चारिले त्यावेळीं सलावतखान बाहेर दूर उभा होता. त्याच्या तोंडचे शब्द ऐकतांच त्यानें तेथून घाबरून पळ काढिला.. आणि राजसिंहाला मार्गावर अटकाव करून तारेस गिरफ्तदार करण्याच्या हेतूनें तो आपल्या डेऱ्याकडे आला तों त्याला त्याच्या नोकराकडून असें कळलें कीं कोणी मोंगल सरदारानें एक पत्र व पांच हजार मोहरा आपणास देण्याकरितां दिल्या आहेत.. हें कळतांच त्यानें नोकराजवळून पत्र घेतलें व फोडून वाचलें. त्यांत इतकेंच होतं कीं " मियासाहेब ! आपणास आम्हीं वचन दिल्याप्रमाणें तें शेवटास न नेल्यामुळें हें आम्ही बक्षिस घेणें अनुचित आहे. सबब ह्या पांच हजार मोहरा आपणाकडे परत पाठविल्या आहेत. " पत्रांतील मजकुराखालीं कोणाचेंही नांव नव्हतें. परंतु सलावतखानानें मजकुरावरून हें पत्र कोणीं लिहिलें असावें हें ताडिलें. वाचकहो ! राजनीतिविशारद राजसिंहाच्या हातचेंच हें पत्र बरें !

सलावतखानाची पुरी फजिति झाली. त्यानें तें पत्र फाडून टाकिलें व

बादशहाचा परवाना नसेल तर कोणा एकासही शहराबाहेर सोडूं नये असा बादशहाच्या चौकीदारास हुकूम दिला.

पण वहाव्वारे जहांनारेचा दूरदर्शीपणा ! बादशहाच्या शिक्कामोर्तबानें मंडित झालेला परवाना पहातांच चौकीदारांनीं कोणतेही आढेवेढे न घेतां राजसिंहास व त्याच्या लोकांस शहराबाहेर जाण्यास परवानगी दिली. शहराबाहेर येतांच राजसिंहानें आपल्या लोकांसह उदयपुरचा मार्ग स्वीकारिला त्यावेळीं जहांनारेनें पाठविलेली जोहरा रंभेस व तारेस विचित्र वेषानें भेटली. यासंबंधानें आतां पुढें उल्लेख करूं.

आपल्या पत्निकेला मान देऊन राजसिंहानें संकटास न जुमानतां आपला उद्धार केला हें पाहून तारेस काय बरें वाटलें असेल ?

प्रकरण ९ वें.

अमरसिंह घरांतून आवेशानें निघाला !

राजसिंहानें आपल्या लोकांसह तारा आणि रंभा या उभयतांस बरोबर घेऊन जहांनारेनें दिलेल्या परवान्याच्या मदतीनें आग्र्यामधून सुखरूप बाहेर येऊन उदयपुरचा मार्ग धरिला व इकडे अमरसिंह राजसिंहाची रवानगी करून दिवाणखान्यांत आला व त्यानें दिलेल्या पत्रांतील मजकूर त्यानें वाचून पाहिला.

या गुप्त लढाईमध्यें अमरसिंहाचे लोक सुमारें पंचवीस प्राणास मुकले व सलाबतखानाचे अस्सल मदतगार सुमारें शंभर मृत्युमुखीं पडले !

पत्र वाचल्यावर अमरसिंहानें आपल्या एका सरदारास बोलावून सांगितलें कीं, 'हें पहा जिकडे तिकडे काय पडलें आहे. याची अगोदर चांगली व्यवस्था लावा. ही लावतांना एवढेंच लक्ष्यांत ठेवा कीं यांत कांहीं रजपूत, कांहीं मोंगल पडले आहेत तर आपण बारकाईनें पाहून काय तें करा. ज्याच्या गळ्यांत यज्ञोपवीत आहे ते रजपूत असें समजून त्यांना अग्नि देववा

व ज्यांच्या गळ्यांत तें दिसणार नाहीं त्यांस मोंगल समजून स्मशानामध्यें पुरून टाकत्रा. '

' आपण आज्ञा करण्यापूर्वीच ही मीं आपल्या नोकरांकडून व्यवस्था केली आहे. रजपुतांस अग्नि देऊन मोंगलांस बागेबाहेर नदीवर पुरविलें. '

' मग त्यांमध्यें आपले किती वीर ठार मारले गेले ? '

' जवळ जवळ पंचवीस ! '

' बांचलेल्या सरदारांची अदमास किती संख्या आहे ? '

' जवळ जवळ तीनशें ! '

' कांहीं हरकत नाहीं. तुम्ही आतां जा आणि आपल्या सर्व शूर सरदारांना आज्ञा द्या कीं आज आपला स्वर्गारोहणाचा दिवस आहे, तर सर्वांनीं कंबर कसून तयार असावें. '

" आज्ञा महाराज ! स्वामीच्या सेवेपुढें आम्ही आपले प्राण तृणवत् गणून स्वर्गारोहण करण्यास एका पायावर तयार आहों ' असें म्हणून तो सरदार तेथून चालता झाला व अमरसिंह इकडे तिकडे कांहीं पाहूं लागला. थोड्या वेळानें राणी चंद्रावती रुदन करीत अमरसिंहाजवळ आली; ती आलेली पाहून अमरसिंह तिला म्हणाला ' सुन्दरि ! योग्य वेळीं आलीस; ये अशी माझ्याजवळ. घटकाभर मला तुझ्याबरोबर कांहीं बोलावयाचें आहे ' असें म्हणून त्यानें तिचा हात धरून तिला खालीं बसविलें तों चद्रावतीस ज्यास्तच हुंदका आला.

हें पाहून अमरसिंह एक दीर्घ श्वास सोडून तिला म्हणाला ' सखे ! सुशील तारेनें आपल्या पुण्यबलाच्या साह्यानें योग्य घर पाहून अनुरूप वर शोधून काढला. '

' ही गोष्ट खरोखर फार चांगली झाली. आतां आपण निश्चित झालों. '

' तें तर खरेंच. तारेचा विरह आपणास असह्य होतो आहे खरें परंतु जी सुशील कन्या अकालीं मृत्युमुखीं पडणार होती ती न पडतां एकाएकीं अनुरूप पतीबरोबर सुखानंद अनुभविण्यास गेली हें पाहून मला खरोखर त्या असह्य विरहाचें मुळींच कांहीं वाटत नाहीं. '

असें म्हणून त्यानें राजसिंहानें दिलेल्या पत्राचें पुन्हां पठन करून त्याच्या विलक्षण बुद्धीची मनामध्यें फारच प्रशंसा केली व तो कागद

राणीस दिला. तो कागद वाचल्यावर राणी ह्मणाली 'प्राणनाथ! क्षमा करावी. आपलें मन द्विधा झालेलें व आपणास तारेच्या विवाहाविषयी बेफिकीर झालेले पाहून मीं आपणास भीतीमुळें कांहीं गोष्टी सांगितल्या नाहींत. परंतु आतां आपणास मीं त्या सर्व निवेदन करितें. ऐकाव्यात. '

असें ह्मणून चंद्रावतीनें दारा व सलावतखानाचीं सर्व कुचक्रें व त्यांवर रंभेनें रामबाण उपाय योजून त्याचीं कशीं चांगलीं नाकें ठेंचलीं यासंबंधीं सर्व गोष्टी निवेदन केल्या. या सर्व गोष्टींचा उल्लेख आह्मीं वेळोवेळीं केलाच आहे. मग आतां त्या गोष्टी पुन्हां येथें देण्याचीं कांहीं आवश्यकता आहे काय ? आतां राजसिंहानें अमरसिंहास पत्रद्वारें काय कळविलें होतें हें मात्र येथें कळविण्याचा आमचा विचार आहे.

तारेची पत्रिका वाचल्यावर राजसिंहानें आपल्या सर्व सरदारांचीं मनें एकत्र जमवून तारेचा उद्धार करण्याकरितां आग्र्याकडे जाण्यास उत्तेजित केलीं हें वाचकांना माहितच आहे. त्यावेळीं त्यानें त्यांस काय सांगितलें तें ऐका. ' आपण मोंगल राजधानीमध्यें मोंगल सौदागराच्या वेषानें चलावें व शहराबाहेर आपला डेरा तंबू लावून बादशहास नित्य नजराणे देऊन शहरांत फिरण्याची व राहण्याची परवानगी मिळवावी व सलावतखानाची चांगली मैत्री संपादन करून योग्य वेळीं तारेचा उद्धार करावा. व उदयपुरला पुनः गुप्त रीतीनें परत फिरावें. ' राजसिंहाचा हा उपदेश ऐकून सर्व वीर प्रसन्न झाले व भुवनमिश्रजी तर अत्यंत आश्चर्यचकित झाला.

त्या काळीं मुसलमानांचा अत्यंत त्रास असल्यामुळें प्रत्येक रजपूत वीर शिकारीस जातेवेळीं आपल्या बरोबर एक एक मोंगली वेष घेत असत व योग्य वेळीं त्याचा उपयोग करून आपला मतलब साधून घेत. या वेळीं राजसिंहाजवळ व त्याच्या सर्व वीरांजवळ मोंगली वेष व जवाहिर आदिकरून सौदागराला लागणारें सर्व सामान तयार होतें. राजसिंहानें चटकन् आपल्या पूज्य पिताजीला आपला मतलब कागदावर लिहून तो कागद व तारेची पत्रिका पाठविली व आपण आग्रा शहराकडे प्रयाण केलें. आणि जेंव्हां ते आपल्या राज्याच्या (उदयपुरच्या) सीमेबाहेर आले तेंव्हां त्यांनीं आपलें पोषाख बदलले. बिचाऱ्या मिश्रजीलाही निरुपायास्तव मोंगल बनून तारेला उदयपुराकडे नेईपर्यंत राजसिंहाच्या कैदेंत राहणें भाग पडलें. !

राजसिंह मोंगल सरदार बनला होता. व त्यानें बादशहास कांहीं नजराणा

देऊन शहरांत राहण्याची व सौदागरी करण्याची परवानगी मिळविली व त्यानें थोडया वेळांत सलावतखानाची मैत्रीही संपादन केली. त्या दिवशीं सलावतखानानें त्या सरदाराशीं कांहीं गोष्टी बोलून त्याला पांच हजार मोहरा दिल्या तोच सरदार राजसिंह होता व तारेचा उद्धार करीपर्यंत त्यानें तोच वेष कायम ठेविला होता.

गुप्त समेंतील काम आटोपून जहांनारा आणि जोहरा या उभयतांचा निरोप घेऊन खबूतराच्या पिंजऱ्यानिशी रंभा गुप्त मार्गातून बाहेर येतांच तिला एक मोंगल भेटला. त्यानें तिला दरडाविलें. पुढें त्यांच्यांत जो कांहीं विनोद झाला इ० सर्व वाचकांस स्मरत असेलच. तो मोंगल-ही चंद्रावतजी होय. चंद्रावतजीला सुरंगामध्यें नेल्यावर रंभेनें तारेवर चालूं असलेलीं दारार्ची व सलावतखानार्ची सर्व कुचकें निवेदन केलीं. तीं सांगतांना तिनें आपलीं चातुर्यदर्शक कृत्येंही निवेदन करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. तीं निवेदन केल्यावर तिनें जहांनारेनें दिलेला बादशाही परवाना व खबूतरांचा पिंजरा देऊन त्याचा कसकसा उपयोग करावयाचा कौरे सर्व कळविलें. नंतर 'राजसिंह कोणत्या वेषांत तारेचा उद्धार करण्याकरितां आला आहे हें कोणास न कळावें म्हणून आम्हीं मिश्रजीला तारेचा जोंपर्यंत उद्धार झाला नाहीं तोंपर्यंत आपल्या कैदेंत ठेविलें आहे. तेव्हां तूंही हें कोणांस न कळवावें. ' असें म्हणून त्यानें तिच्या जवळून कोणास न कळविण्याविषयीं शपथ घेतली. म्हणून ही गोष्ट कोणास कळली नाहीं. मोंगल घरांत येतांच चंद्रावतजी व तारा फारच भ्याल्या; परंतु रंभा यंत्किंचितूही डगमगली नाहीं. कारण, तिला सर्व माहित होतें. म्हणून ती वरचेवर त्यांना धीर देऊन सांगे कीं ' हीच कालरात्र आपणांस सौभाग्यदायक होईल '. जेव्हां राजसिंह महालांत प्रवेश करून आला तेव्हांच रंभेनें चंद्रावतीस व तारेस ' हा सरदार खास राजसिंह आहे ' असें सांगितलें.

सलावतखानाचा स्नेह संपादन केल्यावर राजसिंहाच्या इच्छानुसार चंद्रावतजीनें हातखंडा उपाय योजून सलावतखानाला अगदीं आपलासा करून टाकिलें होतें. शेवटीं त्याच्याशीं काय काय गोष्टी झाल्या तें आम्हीं मागें कळविलेंच आहे.

थोडी रात्र झाल्यावर राजसिंह आपल्या सलावतखानाचा गुलाम येतांच कांहीं लोकांबरोबर मशिदींत येऊन दाखल झाला. राहिलेले कांहीं लोक डेरा व तंबू काढून अप्राशहराकडे जाण्यास निघाले व कांहीं राजसिंह तारेस घेऊन केव्हां येतो याची वाट पहात उभे राहिले.

इकडे सलावतखानाच्या लोकांनीं अमरसिंहाच्या लोकांवर हल्ला केला. व कांहींना ठार मारून ते दोर शिडी लावून महालांत शिरले.या वेळपर्यंत अमरसिंहाच्या लोकांनीं सलावतखानाचे बरेच लोक ठार मारिले. मोंगल सरदाराचे (राजसिंहाचे) लोक वेळेवर येतील अशी सलावतखानास आशा होती परंतु ते लोक वेळेवर न आल्यामुळें त्याचे लोक बरेच मारले गेले. महालांत मोंगल शिरलेले पाहून अमरसिंह तिकडे गेला व त्यांचा समाचार घेऊन तो मागें फिरणार तोंच अगणित लोक मशाली पेटवून घरांत शिरत आहेत असें त्यानें पाहिलें. हे सर्व लोक राजसिंहाचेच होते. मोंगलसरदार (राजसिंह) येतांच सलावतखानानें महालांत शिरून तारेस जबरदस्तीनें बाहेर ओढण्याविषयीं त्यांना हुकूम सोडिला. या वेळीं त्याचे लोक फारच थोडे राहिले होते. त्याचा हुकुम ऐकून व त्याचे लोक थोडे आहेत असें पाहून राजसिंहानें तारा ज्या महालांत होती त्या महालांत मोठ्या आनंदानें प्रवेश केला. यापुढील सर्व हकीकत आहींच मागें दिलीच आहे.

सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या अपूर्व महिम्यानें व आपल्या वीर्यप्रभावाच्या योगानें व जहांनारेनें दिलेल्या परवान्याच्या साह्यानें राजसिंह तारेसह सुखरूप उदयपुराला आला. या वेळीं त्यानें मिश्रजीसही मोंगलवेषांतच तिकडे नेलें. जातेवेळीं गुप्त लढाईमध्यें आपण किती मोंगल मारिले व आपल्या मोंगल वेषधारी वीरांनीं अमरसिंहाचे किती लोक मृत्युमुखीं दिले, याची राजसिंहानें मुद्दामच चौकशी केली नाहीं.

राजसिंहाचें पत्र वाचल्यानें व सलावतखानाचे व दाराचे अत्याचार चंद्रावतीकडून श्रवण केल्यानें अमरसिंहाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली ! तो आवेशानें उठला व राणीस म्हणाला ' प्रिये ! आतां मला क्षणभरही स्वस्थ बसवत नाहीं. त्यांचे अत्याचार मला शल्याप्रमाणें टोंचताहेत. याचें प्रायश्चित्त त्या दुष्टांना दिल्याशिवाय माझ्या मनाला मुळींच शांतता मिळणार नाहीं ! ' असें म्हणून तो महालाबाहेर वेगानें आला.

हें पाहून चंद्रावती घाबऱ्या स्वरानें ह्मणाली ' प्राणनाथ ! आपण चाललां कोठें ? विचार करा. मी काय ह्मणतें तें तर ऐका ! !' अमरसिंहाचा क्रोध अमर्याद झाला होता. तो यावेळीं थोडेंच पत्नीच्या बोलण्याकडे लक्ष्य देणार ! तो थेट अश्वशाळेकडे गेला. तेथें गेल्यावर त्याचा घोडा त्याच्या नोकरानें सामानासह तयारच केला होता. अमरसिंहानें आपल्या सरदारास स्वर्गारोहणाकरितां घोडा व आपल्या सर्व वीरांस कमर बांधून तयार राहण्याविषयीं हुकूम दिला होता त्याप्रमाणें याठिकाणीं सर्व तयारी होती. तें पाहून अमरसिंह सलावतखानाच्या लोकांबरोबर ज्या स्थितींत लढला त्याच स्थितींत घोडयावर बसला व घराबाहेर पडला. यावेळीं दोन घटका दिवस आला असेल.

हें पाहून चंद्रावती अतिशय घाबरून बाहेर येऊन आपल्या सरदारास ह्मणाली ' कोणी तरी यावेळीं त्यांच्याबरोबर जाऊन त्यांना ज्या रीतीनें परत आणतां येईल त्या रीतीनें इकडे घेऊन या '. हें सांगण्याचा तिचा हेतु इतकाच कीं अशा वेळीं खास अमरसिंहाची तलवार कांहीं तरी घोटाळा केल्याशिवाय राहाणार नाहीं तो न व्हावा.

राणीची आज्ञा होतांच ' आज्ञा सरकार ! आपण कांहीं चिंता न करितां महालांत जावें. मी आपल्या दोनशें स्वारांनिशी स्वामींना मदत करण्यास या घटकेस चाललों पहा. बाकीचे स्वार आपलें संरक्षण करतील ' असें ह्मणून तो सरदार कंबर बांधून तयार असलेले स्वार बरोबर घेऊन अमरसिंहाचे मागें गेला व राणी महालांत चालती झाली.

प्रकरण १० वें.

खून पडले !

संवत् १७०१ (१६४४ इ० स०) श्रावण शुद्ध प्रतिपदेचा प्रातःकाल. सुमारें सहा वाजण्याचा समय. आमखास महालामध्यें आज शहाजहान बादशहानें दरबार भरविला होता. सरदार दरकदार एकामागून एक असे येऊन

आपापल्या आसनावर बसत होते. थोडया वेळांत दरबार पूर्ण भरल्यावर बादशहा आपल्या सिंहासनावर येऊन बसला. बादशहा सिंहासनारूढ झाल्यावर सलावतखान आपले हात बांधून बादशहाच्या उजव्या बाजूकडे येऊन रुदन करीत अमरसिंहाविरुद्ध कांहीं सांगूं लागला. तो म्हणाला ' जहापनाह ! हुजूरच्या आज्ञेप्रमाणें राव अमरसिंहास दरबारांत आणण्याकरितां गेलों असतां त्यानें आपल्या गुलामांस बेदम मारिलें; शिवाय मला सुद्धां मारण्यास पुढें मागें पाहिलें नाहीं— '

सलावतखानाचें भाषण संपतें न संपतें तोंच ' नालायक ! बेईमान ! झूट बोलण्यास कांहीं लाज नाहीं वाटत ! ' असे शब्द उच्चारून गर्जना करीत व घोडा उडवीत अमरसिंहानें आमखास दरबारमहालांत प्रवेश केला. आपल्या म्यानांतील तरवार उपसून सलावतखानाच्या अंगावर फेंकली. त्यासरशीं त्या तरवारीनें सलावतखानाचें हृदय फोडून त्यास यमलोकीं पाठविलें. अमरसिंहानें आणखी दुसरी तलवार म्यानांतून उपसून बादशहाच्या अंगावर फेंकली. ती जर बादशहास लागती तर खास त्याचीही स्थिति सलावतखानाप्रमाणेंच झाली असती. परंतु सलावतखानाला वार होतो न होतो तोंच बादशहा आंत महालांत जाण्याला आणि तरवार एका खांब्यास लागून खालीं पडण्याला एकच गांठ पडल्यामुळें बादशहाचे प्राण वांचले. खरोखर त्या वेळीं बादशहा भाग्यवान् म्हणून त्या संकटांतून निसटला ! ज्या खांबावर अमरसिंहाची तरवार जाऊन आदळली, त्या खांबाचा एक कोपरा तुटून त्या ठिकाणीं खळगा पडला. तो खळगा अद्यापपर्यंत त्याची साक्ष पटवीत आहे. बादशहा मागल्या बाजूनें पळून गेला असें जेव्हां तेथें जमलेल्या सरदारांनीं पाहिलें तेव्हां यांची स्थिति सुद्धां विलक्षण झाली. अमरसिंह वाघाप्रमाणें गर्जना करी. त्या ऐकून ते लोक फारच भ्याले. यावेळीं अमरसिंह इतका क्रोधांध झाला होता कीं त्याच्यापुढें जो कोणी येईल त्याला तो आपल्या तलवारीच्या एका घावासरशीं स्वर्ग दाखविण्यास मागें पुढें पहात नसे. त्यानें एका घटिकेंत बरेच वीर ठार मारिले ! हकीम इनायतुल्ला, मीरखान, मीरतुजक, मलूकचंद, मुशरफ आणि इब्राहिमखान इत्यादि वीरांस तर त्यानें प्रथम स्वर्गीं धाडिलें व नंतर सरदारबहादरांचा समाचार घेण्यास तो सरसावला. परंतु, असा तो किती वेळ लोकांना मारणार ! हजारों वीरांबरोबर एकटा अमरसिंह किती वेळ टिकाव धरील ! परंतु, त्यानें धैर्य न सोडितां व आपल्या प्राणाची

पर्वा न करितां आपलें काम चालूंच ठेविलें होतें. इतक्यांत त्याचे शूर सरदार—जे चंद्रावतीनें पाठविले होते ते—आमखास मंदिरांत अमरसिंहाजवळ येऊन दाखल झाले. त्यांनीं अमरसिंहास बरीच मदत केली. परंतु, दरबारांतील लोक फार असल्यामुळें क्षणार्धांत त्याचा चुराडा झाला व एकटा अमरसिंहच काय तो त्या लोकांबरोबर तोंड देण्यास जिवंत राहिला. मनास वाटेल तसें लोकांचें प्राणहरण करून अमरसिंहानें आपल्या घोड्याला बाहेर चालण्याकरितां रागाच्या सपाट्यांत जोरानें टांग मारिली त्यासरशीं तो घोडा बाहेर येऊन पडला[1] व थोडया वेळांत त्यानें धन्याकडे पाहून प्राण सोडिले !

आपल्या घोडयानें प्राण सोडलेले पाहून अमरसिंह जरा दूर झाला व किल्ल्याबाहेर जाण्याचा विचार करतो आहे इतक्यांत त्याचा मेहुणा अर्जुन गोरे तेथें धांवत धांवत येऊन त्यास ह्मणाला ' वीरवर ! खरोखर आपलें शौर्य अवर्णनीय आहे. याबद्दल आपणास मला भेटूं द्या कसे ! '

अर्जुन गोऱ्याच्या तोंडचे शब्द ऐकतांच अमरसिंह धिक्कारयुक्त मुद्रा करून त्याला ह्मणाला ' अरे धिक्कार असो तुला ! प्रत्यक्ष आपली भाची केवळ लोभवश होऊन यवनाची भोग्या बनविण्यास पहात होतास तेव्हां तुझ्यासारखा नराधम तूंच पण असो. चल ये भेटून घे. ' असें ह्मणून त्यानें बाहु पसरिले.

चंद्रावतजीकडून अर्जुनगोऱ्याविषयीं अमरसिंहास सर्व कळल्यामुळें त्यानें वरीलप्रमाणें धिक्कारदर्शक भाषण केलें होतें. अमरसिंहाच्या तोंडचे शब्द ऐकतांच अर्जुनगोरे मनामध्यें फार जळूं लागला. त्यानें अमरसिंहास मिठी मारतांना त्याच्या पोटांत असें वाघनख खुपसलें कीं त्याबरोबर अमरसिंह तळमळत खालीं पडला परंतु तसेंच आवेशानें उठून त्याच्या पोटांत आपली पाणीदार कट्यार खुपसून तो त्याला ह्मणाला ' घे आतां आपल्या विश्वासघाताचें योग्य प्रायश्चित्त ! '

एकाच वेळीं दोघां मेहुण्यानीं प्राण सोडिले ! ही बातमी वीरपत्नी चंद्राव-

---

१ ज्या ठिकाणीं घोडा पडून गेला त्याठिकाणीं एक ' अस्पबुर्ज ' ऊर्फ ' अश्वबुरूज ' बांधिला आहे. हा बुरुज शहाजहान बादशहानें बांधविला व अमरसिंहाचे स्मरणार्थ तेथें त्याचा घोडाही ठेविला आहे.

तीस कळतांच ती वीरवेष धारण करून घोडयांवर स्वार होऊन आपल्या स्वारासह अमरसिंह ज्या ठिकाणीं मृत हांऊन पडला होता तेथें आली. अमरसिंहाचें प्रेत अग्र्याच्या किल्ल्याच्या बुखारानामक द्वाराजवळ पडलें होतें. तिनें आपल्या मृत पतीचें शव आपल्या घरीं नेलें व यमुनानदीच्या किनाऱ्यावर फार मोठी चिता रचून त्यावर तें शव ठेविलें व आपण सती गेली. अमरसिंहाचे सर्व लोक किल्ल्यामध्यें प्रवेश करितांच बादशहाच्या लोकांबरोबर लढून धारातीर्थी मरण पावले ! व त्यांनीं मागें अमरसिंहाच्या विमल कीर्तीशिवाय कांहीं ठेविलें नाहीं !

× × ×

आज अमरसिंहास झालें तरी काय आणि हा असा प्रकार होण्याचें कारण काय ? हें बादशहास कांहीं केल्या कळेना. तो चिंतातुर होऊन जहांनारेच्या महालांत जातांच जहांनारेकडून त्याला सलावतखानाचे सर्व अत्याचार व रात्रीं तो अमरसिंहावर तारेकरितां चालून गेल्याचेंही त्याला समजलें. हें समजतांच बादशहा वीर–केसरी अमरसिंहाकरितां अत्यंत शोकाकुल झाला.

जहांनारेनें योग्य वेळीं तारेस मदत न करावी या हेतूनें सलावतखानानें सुरंगांतील दोन्ही द्वारांवर आपला पहारा ठेविला व जहांनारेकडील लोकांस बाहेर जातां न यावें या हेतूनें आपले लोक जिकडे तिकडे ठेविले होते हें वाचकांना माहित आहेच. परंतु सलावतखानास कोठें ठाऊक होतें कीं बाहेर जाण्यास आणखी सुरंगामध्यें अनेक मार्ग आहेत. जहांनारेनें, सलावतखानानें केलेला बंदोबस्त पाहून जोहरेस तिसऱ्याच मार्गानें बाहेर पाठविलें. राजसिंह मोंगल वेषानें तारेला नेण्याकरितां आला आहे हें जहांनारेस

---

१ अमरसिंह मेल्यापासून पुढें सुमारें शंभर वर्षें हें द्वार अगदीं बंद होतें. हें द्वार जो कोणी उघडण्यास जाई त्यास तेथें असलेला विषारी सर्प दंश करून ठार मारी. या भीतीमुळें तें द्वार उघडण्यास कोणी धजत नसे. व तें द्वार उघडावें अशी कोणास कधीं इच्छाहीं झाली नाहीं. त्यावेळीं लोकांचा असा समज झाला होता कीं जो सर्प द्वार उघडणारास दंश करी तो अमरसिंह अगर अर्जुन गोरे असावा. तें कांहीं असो. पुढें सन १८९८ इसवीसनामध्यें इंग्रजी कप्तान मि० स्टील यानें जेव्हां दिल्ली शहर फस्त केलें तेव्हां त्यानें तें द्वार उघडून तो सर्प मारिला !

जोहरेकडून कळल्यामुळें शेवटीं एकदां जोहरेनें तारेस भेटून यावें या हेतूनें तिला तिनें पाठविलें होतें. तारा रंभा घोडयावर बसताहेत तोंच जोहरा विचित्र वेषानें तेथें आली. तिनें राजासिंहास व तारेस, चंद्रावतजीस व रंभेस मोत्यांच्या माला गळ्यांत घालण्यास दिल्या. त्यांनीं त्या गळ्यांत घातल्या. नंतर जोहरा, तारा व रंभा एकमेकींस मोठ्या प्रेमानें भेटल्या. रंभेला भेटतांना जोहरेस अत्यंत रडूं आलें; तसेंच रंभेलाही आल्यावांचून राहिलें नाहीं. शेवटीं जोहरा रंभेस म्हणाली ' ल्या, वेष बदलण्याच्या खोलींत जो मनुष्य मीं कैदी ठेविला होता त्याची सुटका कोणीं केली हें मला समजलें. त्याची सुटका रौशनआरा बेगमेशिवाय दुसरें कोण करणार ? '

' होय का ? ' रंभेनें विचारिलें.

' होय. आजपर्यंत जी गोष्ट मीं तुझ्यापासून गुप्त ठेविली होती ती तुला सांगावी असें माझ्या मनांत आहे. ती गोष्ट हीच कीं, तूं जोगीण बनून दाराच्या महालाखालीं गात असतांना एका मोंगलास नदींत लोटलेंस. आहे का माहित ? '

' मग त्याचें काय ? '

' तो मोंगल मीच होय. आणि मींच तुझ्या मनाची परीक्षा पहाण्याकरितां तसें अश्लील भाषण केलें. '

' काय म्हणतेस, तें सर्व खरें ? '

' माझ्या बोलण्यावर नाहीं का तुझा विश्वास बसत ? '

' परमेश्वरा ! धन्य आहे तुझी करणी ! खरोखर आज तूं मला हें सांगून माझ्या मनाला रात्रंदिवस चटका लागलेला घालविलास ! रात्रंदिवस मला वाटत होतें कीं विनाकारण एक अभागी आपल्या हातून ठार मारला गेला ! बरें, झाली गोष्ट ती खरोखर चांगली झाली ! पण तूं मोठी विनोदी दिसतेस कीग ! '

यावर चंद्रावतजी हंसत हंसत जोहरेस म्हणाला ' तुझी बहीण मोठी खुनी औरत आहे बरं का. माझ्या जवळ जर विषारी[1] फत्तर नसता तर खास हिनें मला सुद्धां त्या मशिदीमध्यें ती ठार मारल्याशिवाय रहातीना. '

---

१ हे एका प्रकारचे विषारी दगड असतात. यांपासून कसलाही विषप्रयोग मनुष्यास बाधत नाहीं.

इतकें बोलून चंद्रावतजी रंभेकडे पाहून मोठ्यानें हंसूं लागला. नंतर रंभेनें एक पत्र दारास देण्याकरितां जोहरेंजवळ दिलें. त्या पत्रांत इतकेंच लिहिलें होतें कीं ' मुलतानची जोगीण मीच बनलें होतें व आपणास जें कांहीं ज्योतिष सांगितलें तेंहीं मींच. आतां आपण कोणत्याही प्रकारचे श्रम माझ्याकरितां न घ्यावेत. '

नंतर सर्वांनीं जोहरेचा निरोप घेतला. जोहरा महालांत आली तिनें झालेली सर्व हकीकत जहांनारेस कळविली व तिनें बादशहास कळविली. सलावतखानाचे अत्याचार ऐकून शहाजहान वरचेवर आपणास धिक्कारीत असे. ' सलावतखानाच्या कपटी शब्दावर विश्वास ठेवून मीं काय म्हणून त्याला अमरसिंहास पकडून आणण्याकरितां हुकूम दिला ? ' हे शब्द त्याच्या मनाला फार जांच देत होते. पुढें सलावतखानाच्या प्रेताचा झाडा घेतांना एक कागद सांपडला. तोरेला, पळवून नेतां यावी या हेतूनें तो परवाना तयार केला आहे असें दिसलें.

हें सर्व पाहून महानुभव शहाजहान बादशहानें वीराग्रगण्य अमरसिंहाचें नांव चिरस्मरणीय राहण्याकरितां ज्या ठिकाणीं अमरसिंह मारला गेला त्या ठिकाणच्या द्वाराचें नांव ' अमरसिंह–द्वार ' असें ठेविलें. आज हें द्वार अग्र्याच्या किल्ल्यामध्यें फार प्रसिद्ध आहे. व वीरावतंस अमरसिंहाचें नांव भारतवर्षाच्या इतिहासामध्यें सुवर्णाक्षरानें मंडित झालेलें आपणांस नित्य दिसत आहे.

* * *

अग्र्यामध्यें अमरसिंहाच्या घरीं असा धुमाकूळ माजला आहे हें शहरामध्यें कोणाएकासही कळलें नव्हतें. परंतु दुसऱ्या दिवशीं जेव्हां या सर्व गोष्टी बादशहानें प्रत्यक्ष कानानें ऐकल्या व मेवाडकेसरी राजसिंहच जातीनें मोंगल वेष धारण करून आला होता अशी त्याची खात्री झाली तेव्हां तो अत्यंत चकित झाला. त्यानें लागलीच महाराणा जगतसिंहास सलावतखान, अमरसिंह व चंद्रावतीसंबंधीं सर्व हकीकत पत्रद्वारें कळवून आपल्या अज्ञानाबद्दल माफी मागितली. शेवटीं त्यानें इतके सुद्धां लिहिलें होतें कीं ' युवराजास अशा गुप्त वेषानेंच इकडे येण्याचें काय प्रयोजन होतें ? काय मला दारा आणि सलावतखानाचा पूर्ण बंदोबस्त करून ताराबाईस सुखरूप त्यांच्या स्वाधीन नसत्या का करितां आल्या ? '

* * *

शिकारीहून परत आल्यावर दारानें रंभेचें पत्र पाहिलें. तें पाहून व तारेची झालेली शोचनीय स्थिति ऐकून त्याच्या मनाची स्थिति फारच विलक्षण झाली. शोक, दुःख, मनस्ताप वगैरे सर्व भावनांनीं त्याला क्षणार्धांत पछाडलें ! त्यानें त्या भरांत राजसिंहाकडे पत्रद्वारें आपल्या अपराधांची क्षमा मागितली व राजसिंहानेंही त्याला क्षमा केली.

यावेळीं दारा व औरंगजेब यांच्यामध्यें लढाई होणार होती. जहांनारा व तारा या उभयतांची कथा श्रवण केल्यावर सर्व रजपूत राजे दाराच्या पक्षाला जाऊन मिळाले. दोघांची लढाई जुंपली व त्यांत औरंगजेब जयी झाला.

मुसलमानी राज्य कायम ठेवावें असें परमेश्वराचे मनांत नसल्यामुळें बादशाही तख्तावर दारास न बसवितां भारतशत्रु औरंगजेबासच बसविलें. परंतु आमच्या कादंबरींत त्याविषयीं विचार करावयाचा नसल्यामुळें तो येथें केल्यास अनुचित होणार आहे.

इनायतुल्यासंबंधीं बादशहास कांहीं कळविण्याचें जहांनारेच्या मनांत नसल्यामुळें जहांनारेनें सुरंगामधील गुप्त दरबारासंबंधीं किंवा रौशनआरेच्या षड्यंत्रांसंबंधीं मुद्दामच उल्लेख केला नाहीं व इनायतुल्ला मेल्यावरही तिनें त्यासंबंधानें चकार काढला नाहीं. इकडे इनायतुल्लाच्या मरणानें जहांनारा व तिकडे सलावतखानाच्या मृत्यूनें रौशनआरा दुःखीकष्टी बनल्या. पुढें कांहीं वर्षें रौशनआरा अगदीं स्वस्थच होती. परंतु आंतून मात्र तिनें हळूंहळं षड्यंत्र चालविलेंच होतें. शेवटीं त्याचा असा अंत झाला कीं औरंगजेबाच्या कैदेंत शाहाजहान बादशहा पडला व जहांनारेचें चातुर्य नष्ट होऊन दारा दुर्भागी बनला आणि सर्व भारतवर्षाचा सत्यानाश झाला ! याची साक्ष इतिहासच देत आहे !

योग्य वेळीं सुखरूप उदयपुरला पोंचतांच रंभेनें जहांनारेकडे खबूतर पाठवून कुशल कळाविलें. नंतर थोडयाच कालानें माताप्रिताजीच्या मरणाची वार्ता ऐकून कोमलहृदया बाला तारा आणि रंभा या उभयतांना जें कांहीं दुःख झालें तें वर्णन करून सांगण्यास आमची ही निर्जीव लेखणी असमर्थ आहे त्यामुळें ही दुःखाची काहणी आह्मीं येथेंच संपवितों !

प्रकरण ११ वें.

प्रेमचित्राचा एक मासला.

प्रत्येक मनुष्याला सुख आणि दुःख हें आहेच. परंतु ही सुखदुःखाची जोडी एकाच वेळीं मनुष्याच्या अंतःकरणांत वास करीत नसते. ज्या मनुष्याला उद्यां सुख मिळणार त्या मनुष्याचें आजचें दुःख अवर्णनीय असतें व ज्यानें एकदां दुःख भोगून सुखशैल चढण्यास सुरवात केली आहे त्याला आपल्या सारखे कोणी प्राणी या संसारांत वास करीत आहेत असें मुळीं सुद्धां वाटत नाहीं. अशी या मायामय संसाराची विलक्षण गति आहे. तिचें रहस्य जाणण्यास कोण बरें समर्थ आहे ?

आईबापांचें निधनवृत्त ऐकून तारा आणि रंभा अत्यंत शोकाकुल झाल्या होत्या. परंतु, आज जर त्यांच्याकडे पाहिलें तर त्यांच्या सुखाला, सौभाग्याला, नानातऱ्हेच्या भोगविलासानंदाला मुळींच उपमा नाहीं. ईश्वर प्रत्येकाला असेंच करो !

उदयपुरला आल्यावर सहा माहिन्यांत तारेचा विवाह राजसिंहाबरोबर व रंभेचा चंद्रावतीबरोबर मोठ्या समारंभानें झाला ! उभयतांना इच्छित फल प्राप्त झाल्यामुळें दोन्हीं जोडपीं आनंदसागरांत पोहूं लागलीं. राजसिंहाच्या विवाहसमयीं सर्व राज्यसूत्रें त्याच्या हातीं देऊन त्याला राज्याभिषेक करवून जगत्सिंह स्वस्थ चित्तानें यात्रेस निघाला. व त्याबरोबर त्याचा वृद्ध मंत्रीही सर्व कारभार आपला योग्य पुत्र जो चंद्रावतजी त्याच्या हातांत देऊन आपणही त्याच्याबरोबर गेला. आतां राजसिंहाला युवराज न म्हणतां सर्व लोक महाराणा असें संबोधूं लागले व ओघानें श्रीमती ताराबाई महाराणी बनली. चंद्रावतजी राजसिंहाचा मंत्री झाला व रंभा रंभाबाई झाली.

आतां या ठिकाणीं रंभेचें आणि चंद्रावतीचें किती गाढ प्रेम होतें याचें चित्र येथें देण्याचा आमचा विचार आहे. एकदां चंद्रावतजीनें मोठ्या प्रेमानें रंभेचें चुंबन घेऊन विचारिलें ' प्राणेश्वरि ! माझ्या गळ्याची शपथ आहे. खरेंच सांग मी तुला किती बरें प्रिय वाटत आहें ? '

हंसत हंसत रंभा म्हणाली ' काय सांगू, मला किनाई आपण त्या मोंगल-वीराइतके प्रिय वाटत आहांत ! '

' सुन्दरि ! खरोखर युद्धामध्यें मोठमोठ्या वीरांना मीं जिंकलें पण तुझ्या-शिवाय आज मला कोणींही जिंकिलें नाहीं ! '

' इतकी नको फुशारकी मारायला ! स्त्रीस हार जातात ते बलवाना-पुढें कितीसा टिकाव धरत असतील हे दिसतेंच आहे. ' रंभा मोठ्या विनो-दानें म्हणाली.

' बस् बस् आतां क्षमा कर. मी तुझ्यापुढें खास हरलों ! '

हें ऐकून रंभेनें चंद्रावतजीस प्रेमालिंगन देऊन विचारिलें ' प्राणनाथ ! जशी माझी मूर्ति आपल्या अंतःकरणांत वास करते आहे तशी आपली प्र-तिमा आपल्या या दासीच्या हृदयमंदिरांत रात्रंदिवस वास करीत आहे असें नाहीं कां आपणांस दिसत ? '

' कां नाहीं दिसणार ? ' असें म्हणत चंद्रावतजीनें आनंदाश्रुपूरित नेत्रांनीं तिच्याकडे पहात मोठ्या प्रेमानें तिच्या गुलाबी गालाचें चुंबन घेतलें !

प्रकरण शेवटलें.

ताराबाईस चित्रकला पूर्ण अवगत होती हें आम्हीं मागें वाचकांना कळविलेंच आहे. उदयपुरला आल्यापासून व राजसिंहाची अर्धांगी बनल्यापासून जेव्हां जेव्हां ताराबाई एकांतांत असे तेव्हां तेव्हां ती महाराणा राजसिंहाची मूर्ति मनामध्यें आणून निरनिराळ्या तऱ्हेच्या तसबिरा काढीत बसे. एके दिवशीं रात्रीं तारा एकटीच महालांत बसली होती. यावेळीं सुमारें नऊ वाजले असतील. अद्याप राजसिंहास महालांत येण्यास दोन तास अवकाश होता. व राजसिंह नेहमींच अकरा वाजण्यापूर्वीं

महालांत येत नसे. हें समजून मनाची थोडी करमणूक करण्याकरितां ताराबाई निरानिराळ रंग व लहानमोठीं कलमें घेऊन राजसिंहाची तसबीर काढीत बसली. प्राणनाथ दोन तासांपूर्वी येणार नाहींत अशी तिला पूर्ण खात्री होती. परंतु थोडें चित्र काढलें नाहीं तोंच दासीनें राजसिंह आल्याची वर्दी तिला दिली. राजसिंहाची तसबीर ती लपविणार इतक्यांत राजसिंह महालांत येऊन दाखल झाला. व त्यानें ती तसबीर पाहून तिला हंसत विचारिलें ' प्रणयसुंदरि ! ही तसबीर कुणाची आहे? '

तारेनें चटकन् ती तसबीर उलटी करून मोठ्या प्रेमानें राजसिंहास आलिंगन देऊन विचारिलें ' कोणाची का असेना आपल्याला तिच्याशीं काय करायचें ? '

' छे छे, मला तिच्याशीं कांहीं करायचें नाहीं. पण आपलं उगीच विचारलं झालं. आपल्याला इतकं रागाव्ण्याचं कांहीं कारण नाहीं '.

' आज बाई असं आपल्याला झालं तरी काय ? दासीशीं आपण आज अशा रीतीनें बोलायचं हें नाहीं बाई मला समजत. '

' स्वामिनीशीं ज्या रीतीनें बोलायचं त्याच रीतीनें मी बोलतों आहें. '

' असं मला संकटांत लोटणं आपणास योग्य वाटतं ना ? '

' आणि या हीन दासावर संकट घालतांना आपणास कसं बरं वाटतं ? '

यावर राजसिंहाच्या गळ्याला मिठी मारून ताराबाई ह्मणाली ' प्राणनाथ ! आतां कृपा कर. खरोखर तूं मला हरिलेंस. '

' अशी मागविर ये पाहूं. आतां कशी मला ' तूं ' या शब्दानें संबोधतेस ' आपण आपण ' असें चालूं दे कीं. का--गप्प का बसतेस अशी ? '

' क्षमा करावी '.

' पुन्हां तूं तसेंच ह्मणतेस. तें असो. पण ही तसबीर आहे कोणाची ? '

' कुणाची का भसेना ? तुला तिच्याशीं काय करायचें आहे ? '

' कांहीं हरकत नाहीं. नको दाखवूंस; पण ती आहे कोणाची हें मला माहीत आहे समजलीस ? '

' मग सांग पाहूं कोणाची आहे ती. '

' तुझ्या प्राणप्रिय दाराची किंवा सलावतखानाची ' राजसिंह विनोदानें झणाला.

राजसिंहाच्या तोंडचे वरील शब्द ऐकतांच तारा त्याचा हात झिडकारून रागानें भिवया चढवीत दुर उभी राहून झणाली—

' मेलं असलं अभद्र बोलणं नाहीं हो मला खपायचं. यापेक्षां माझ्याशीं न बोललेलं पतकरलं. '

राजसिंह हंसत हंसत तिच्या हनुवटीस हात लावून झणाला ' मग यांत बिघडलं कुठं ? तूंच नाहीं आपल्या पत्रिकेंत लिहिलंस ? —

रजपूत नारि एकांतीं ।
यवनाच्या शेजेवरती ।
गेली हें जाणा चित्तीं !

' असं अभद्र जर आपण मला बोललां तर पहा मी या घटकेस आपल्या पुढें डोकें फोडून घेईन कशी. '

' खरेंच सांग पाहूं माझ्या गळ्याची शपथ आहे बघ तुला. तूं असं नाहीं लिहिलंस ? '

' खरें पाहू गेल्यास त्यांत असें लिहिलं होतें—

योग्य समयीं या शीघ्र मुक्त करण्यातें
अशिवा स्थिति द्या नच मातें !
झट याळ न जर या संकटीं
रजपूत-नारि एकांतीं
यवनांच्या शेजेवरती
गेली हें जाणा चित्तीं !
चक मान्य कसा होय राजहंसीतें ! '

बाहेरून रंभेच्या तोंडचें वरील पद ऐकतांच तारा आनंदानें ह्मणाली– ' चांगली बाजू राखली. या वेळपर्यंत कसें अगदीं यांनीं मला संकटांत लोटल होतें. '

' आतां आह्मांला क्षमाच करा. ही रंभा जेथें येईल तेथें आह्मांला आपला जीभ आवरून धरणें भाग पडतें. काय रंभाबाई ! आपणांवर यजमानांनीं मंत्रिपणा सोंपविला आहे वाटतें, ह्मणून आपण यावेळीं इकडे गस्त घालीत आलां ! '

' तसें कांहीं नाहीं. आपण ताराबाईच्या अज्ञानपणाचा फायदा चांगलाच करून घ्यावा असें सांगण्याकरितां येथवर आलें आहें ! '

' ठीक ठीक बोललीस. आणखी जरा चालूं दे ' तारा ह्मणाली.

राजासिंह ह्मणाला ' रंभाबाई! आपण आंत तर याल. '

' तेवढें मात्र नको आपल्या रहस्याच्या आड मी बाई कशाला येऊं ? ' असें ह्मणून रंभा ' तारेदानी ततारेदानी तातातां ' असें गात चालती झाली!

समाप्त.